# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१४/ २०१६** **दिनांक ०९.१०.२०१६**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०९.१०.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३३७६/ २०१६, दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू रविवार दिनांक ०९.१०.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| ०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष | ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य | ०४. मा.अॅड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| ०५. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य | ०६. मा.डॉ.राजेंद्र राजाबली सिंग,सदस्य |
| ०७. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य | ०८. मा.सौ. अनिताताई विजयराव जगताप, सदस्य |

मा.श्री.बाजीराव शिंदे,
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली. सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे- सदस्य, यांनी दूध्वनीवरुन कळविले. तसेच, मा.मुख्यमंत्री महोदय यांनी शिवसेनेला उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजुनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसून खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास स्वारस्य वाटत नाही, याची कृपया नोंद घ्यावी. असे मा.डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे- सदस्या व मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी फॅक्स पत्राद्वारे व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी ई-मेलद्वारे कळविले आहे. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

दिनांक २४.०९.२०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी गजानन महाराज देवस्थान, शेगाव येथे भेट देऊन पाहणी केली व तेथील नियोजन, स्वच्छता, गार्डन, सेवेकरी इ.बाबतीतील माहिती सभेस दिली. त्या धर्तीवर शिर्डी येथेही मंदिर व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. तसेच यापुढे व्यवस्थापन समिती सभेमध्ये कोणताही निर्णय घेतेवेळेस साईभक्त हा केंद्रस्थानी ठेवूनच निर्णय घेतला जाईल, असेही सुचविले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १६.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६८८** दिनांक १६.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक १६.०९.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६८९** दिनांक १६.०९.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ पेपर रोल व प्लॅस्टिक ट्रे ई-निविदेचे Commercial Bid उघडणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे लाडु निर्मिती विभागाकरीता पेपर रोल व प्लॅस्टिक ट्रे खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२२.०३.२०१६ ते दि.१६.०४.२०१६ या कालावधीत स्वतंत्र ई-निविदा प्रक्रिया दुस-यांदा राबविणेत आलेली होती. तांत्रिक निविदेसोबत जोडलेली कागदपत्रे व डी.डी. स्विकारणेची अंतीम तारीख दि.१९.०४.२०१६ व तांत्रिक निविदा उघडणेची तारीख २१.०४.२०१६ अशी नमूद करणेत आलेली होती.

त्यानुसार दिनांक २१.०४.२०१६ रोजी ई-निविदेतील तांत्रिक लिफाफे उघडले असता एकुण सहा निविदाधारकांनी खालीलप्रमाणे Online निविदा सादर केलेल्या होत्या.

१. मे.नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्झुमर्स फेडरेशन इंडिया लि., पुणे
२. मे.हरिओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर
३. मे.स्पाम पॉली प्रिंन्ट, दमण

४. मे.सुधाम पॅकेजिंग, वसई

५. मे.जवाहर ब्रदर्स, बारामती

६. मे.मिलींद ट्रेडींग कंपनी, बारामती

वरील तांत्रीक निविदा, खरेदी समितीचे सदर बैठकीत उपस्थित सदस्य व निविदाधारकांसमोर उघडून निविदाधारकांचे कागदपत्रांची छाननी केली असता अनं. १ ते ३ यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे त्यामुळे त्यांच्या ई-निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या आहेत.

अ.नं.४ मे.सुधाम पेकेजिंग, वसई यांनी सर्व कागदपत्रांची मागणीप्रमाणे पुर्तता केलेली आहे. मात्र त्यांची वार्षिक उलाढाल रु.१,४४,३४,३५१/- अशी आहे. आपण पेपर रोलसाठी रु. दोन कोटी चाळीस लाख व प्लॅस्टिक ट्रे साठी रु. दोन कोटी चाळीस लाख अशी वार्षिक उलाढालीची मर्यादा ठेवलेली होती. सदर मर्यादेपेक्षा मे.सुधाम पेकेजिंग, वसई यांची वार्षीक उलाढाल कमी आहे. त्यामुळे सदरची ई-निविदा तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरली आहे.

अ.नं.५ मे.जवाहर ब्रदर्स, बारामती यांनी Online सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये धंद्याचे स्वरुप मशिनरी विक्री असे नमूद केलेले आहे. त्यामुळे सदरची निविदा अपात्र ठरली आहे.

अ.नं.६ मे.मिलींद ट्रेडींग कंपनी, बारामती यांनी Online सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये दुकान नोंदणी दाखला अद्ययावत नाही. तसेच त्यांचे धंद्याचे स्वरुप मशिनरी व मटेरियल विक्री असे नमूद केलेले आहे. त्यामुळे सदरची निविदा अपात्र ठरली आहे.

सदर निविदा प्रक्रियेतील पात्र झालेले निविदाधारक खालीलप्रमाणे –

१. मे.नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्झुमर्स फेडरेशन इंडिया लि., पुणे

२. मे.हरिओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर

३. मे.स्पाम पॉली प्रिंन्ट, दमण

पेपर रोल व प्लॅस्टिक ट्रे खरेदीकामी सन २०१५-१६ चे किराणा माल खरेदीच्या एकत्रित निविदेमध्ये सदर दोन्ही Items चा समावेश होता, त्यामुळे याकामी दि.०८/०४/२०१५ ते २५/०४/२०१५, ११/०६/२०१५ ते २५/०६/२०१५ व २५/०९/२०१५ ते ०७.१०.२०१५ या कालावधीत एकत्रीत तीन वेळेस ई-निविदा प्रक्रिया करण्यात आली होती. तथापी प्रतिसाद न मिळाल्यामुळे या Items साठी पहिल्यांदा स्वतंत्र ई-निविदा प्रक्रिया दि.१७/१२/२०१५ ते ०७/०१/२०१६ करण्यात आली होती, त्यावेळी ५ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी ३ निविदा अपात्र व दोनच निविदा तांत्रीक दृष्ट्या पात्र ठरल्या होत्या. त्यामुळे पुन्हा सदरची फेर ई-निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. एकदंरीत मागील व सध्याचे निविदा प्रक्रियेचा विचार करता या निविदा प्रक्रियेची ५ वी वेळ आहे.

पेपर रोल व प्लॅस्टिक ट्रे खरेदीकामी वरीलप्रमाणे अ.क्र. १ ते ३ या तांत्रीक दृष्ट्या पात्र ठरलेल्या ई-निविदेतील निविदाधारकांचे **Commercial Bid आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| **अ.नं.** | **तपशील** | मे.हरिओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर | मे.स्पाम पॉली प्रिंन्ट, दमण | मे.नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्झुमर्स फेडरेशन इंडिया लि., पुणे |
|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील एकत्रित दर रु. | | |
| 1 | पेपर रोल २००० क्विंटल | **<u>२,७३,८६,०००/-</u>** | ३,१६,००,०००/- | ५,०२,००,०००/- |
| 2 | प्लास्टीक ट्रे २०००००० नग | --- | --- | २,८२,००,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडु निर्मिती विभागाकरीता २००० क्विंटल पेपर रोल खरेदीकामी मे.हरिओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर यांचे एकत्रित रु.२,७३,८६,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच प्लास्टीक ट्रे खरेदीकामी एकाच निविदाधारकाचे दर प्राप्त झालेले असल्यामुळे त्याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस होती. परंतु सदरहू इतिवृत्त कायम करत असताना, पेपर रोलसाठी आलेले दर व बाजारभावातील दर तपासून घ्यावेत तसेच आवश्यकतेप्रमाणे टप्प्या-टप्प्याने पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी दुरुस्ती करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०२ **मंदिर परीसरातील ए.सी.च्या वाढीव लोडकरीता केबल व मेनस्विच खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक व कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.१०-११-२०१५ चे सभेतील विषय नं.१९ निर्णय क्र.४५४ अन्वये तसचे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची C.A.NO.8999 OF 2016 IN PIL NO.18 OF 2011 दिनांक ०१-०७-२०१६ अन्वये मंदिर परीसरातील ए.सी.च्या वाढीव लोडकरीता केबल व मेनस्विच खरेदी

करुन बसविणेचे काम विद्युत ठेकेदार यांचेकडुन ई-निविदा मागवून करणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १५,३१,३२७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.१९-०८-२०१६ रोजी दै.पुढारी, अहमदनगर व दै.देशदुत, नाशिक या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.१८-०८-२०१६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती व १५ ठेकेदारांना ई-मेलव्दारे दि.१६-०८-२०१६ रोजी जाहिरात पाठविण्यात आली होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.१७-०८-२०१६ रोजी अपलोड करण्यात आली होती. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.१९-०८-२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. ३०-०८-२०१६ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०२-०९-२०१६ रोजी सायं.५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. दि.३१-०८-२०१६ रोजी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये चार ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. तसेच दि.०२-०९-२०१६ रोजी पर्यंत शिर्डी कार्यालयात ०४ नग निविदेच्या हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या आहेत. तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडण्याची तारीख ०९-०९-२०१६ अशी आहे. तांत्रिक निविदा उघडून त्यांचे अर्नेस्ट मनी डिपॉझिट व टेंडर फॉर्म डी.डी., व्हॅट, टिन नंबर, पॅन नंबर वगैरे चेक करणे आहे.

मंदिर परीसरातील ए.सी.च्या वाढीव लोडकरीता केबल व मेनस्विच खरेदी करुन बसविणेकामी दि.३१-०८-२०१६ रोजी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये चार ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. तसेच दि.०२-०९-२०१६ रोजी पर्यंत शिर्डी कार्यालयात ०४ नग निविदेच्या हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या आहेत. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०४ हार्ड कॉपी (बंद पाकिट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या चार तांत्रिक निविदा व कमर्शियल बीड मा.व्यवस्थापन उप समितीचे सभेपुढे उघडावे लागणार आहे. प्राप्त झालेल्या ०४ नग तांत्रिक निविदेच्या हार्ड कॉपी तपशील अनुक्रमे खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तांत्रिक निविदा हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या ई-निविदाधारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१) | मे.राघवेंद्र इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स, पुणे | बंद पाकिट |
| ०२) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | बंद पाकिट |
| ०३) | मे.उरमुडे इलेक्ट्रो-मेक इंडस्ट्रीज, अहमदनगर | बंद पाकिट |
| ०४) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | बंद पाकिट |

उपरोक्तप्रमाणे मंदिर परीसरातील ए.सी.च्या वाढीव लोडकरीता केबल व मेनस्विच खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या चार तांत्रिक ई-निविदा व निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले ०४ नग निविदाधारकाचे तांत्रिक कागदपत्रांचे बंद पाकिटे माव्यवस्थापन उपसमितीचे सभेपुढे तांत्रिक ई-निविदा उघडल्यानंतर निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच इतर कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा यांचेमार्फत झालेनंतर सर्व निविदाधारक तांत्रिक निविदेत पात्र झाल्यास सदर कामाचे ऑनलाईन ईनिविदा ( कमर्शियल बीड) त्याच दिवशी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेपुढे तसेच निविदाधारका समक्ष उघडणेस मान्यता मिळावी,ही विनंती.

**मंदिर परीसरातील ए.सी.च्या वाढीव लोडकरीता केबल व मेनस्विच खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आले असता, चारही निविदाधारक पात्र आढळून आले. त्यानंतर कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदेमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| 1 | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १३,८५,४०६.९२ |
| 2 | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | १३,३२,२५४.२६ |
| 3 | मे.उरमुडे इलेक्ट्रो-मेक इंडस्ट्रीज, अहमदनगर | **१२,२५,३६७.६६** |
| 4 | मे.राघवेंद्र इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स, पुणे | १३,२४५९७.६३ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परीसरातील ए.सी.च्या वाढीव लोडकरीता केबल व मेनस्विच खरेदी करुन बसविणेकामी मे.उरमुडे इलेक्ट्रो-मेक इंडस्ट्रीज, अहमदनगर यांचे रु.१२,२५,३६७.६६ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.** (कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग)

---

०३ **दरवर्षीप्रमाणे सन २०१७ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन विक्री करणेकामी सिलबंद पाकीटे व तांत्रिक ई- निविदा (Technical Bid) उघडणे, प्राप्त स्पर्धक निविदाकारांचा तक्ता तयार करणेबाबत.**

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन किफायतशिर किंमतीला विक्री केल्या जातात.

**मा.व्यवस्थापन समिती ठरावः-** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका सन २०१७ ची छपाई करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणाया अंदाजे रुपये. ४,८६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली तसेच संबंधीत विभागाने प्रस्तावित प्रकाशने श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये विक्रीसाठी उपलब्ध होतील यादृष्टीने कार्यवाही करावी, असा निर्णय मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६.०८.२०१६ निर्णय क्र. ५७४ नुसार ठरले आहे.

**प्रस्तावः-** सन २०१६ चे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनुसार वृत्तमानपत्र व संस्थान संकेतस्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करुन दि.०६.०९.२०१६ ते दि. १३.०९.२०१६ पर्यंत ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सिलबंद पाकीटे दि.१४.०९.२०१६ अखेर मुंबई व शिर्डी कार्यालयाकडे जमा झालेला आहे.

**विभागाची मागणीः-** प्रस्तावित प्रकाशने श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये विक्रीसाठी उपलब्ध होतील यादृष्टीने कार्यवाहीकामी ई- निविदा उघडणे, छाननी करणे व कार्यादेश देणे आहे.

सबब प्राप्त ई-निविदेतील सिलबंद पाकीटे व लिफाफा क्र.०१ तांत्रिक बीड (Technical Bid) उघडणे, कागदपत्रांची छाननी करणे व दैनंदिनी/ दिनदर्शिका नमूने निविदेतील अटी/शर्तीनुसार असल्याची तपासणी करुन पात्र स्पर्धक निविदाकारांचा तक्ता तयार करणेकामी सदर विषय मा. उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**दरवर्षीप्रमाणे सन २०१७ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करणेकामी प्राप्त तांत्रिक ई- निविदा (Technical Bid) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधाराकांसमक्ष उघडणेत आल्या.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दरवर्षीप्रमाणे सन २०१७ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करणेकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक ई- निविदांची विहीत पध्दतीने छाननी करणेत येऊन, पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल ई-निविदा दि.१९.०९.२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर उघडणेसाठीचा प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

०४ **साठा संपत आलेली संस्थम प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण सिलबंद ई निविदा दरपत्रके (Commercial Bid) उघडून निम्मत्तम दर देऊ केलेल्या निविदाकारांचा तुलनात्मक तक्ता तयार करणे व पुस्तके छपाई कार्यादेश देणे बाबत.**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

''श्रीसाईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील''

उपरोक्त तरतुदीनुसार प.पू.श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा सस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत संस्थान प्रकाशित साई सतचरित्र, पुस्तके, फोटो व ऑडीओ/ व्हीडीओ सीडीचे पुनर्मुद्रण करुन साईभक्तांना माफक किंमतीने विक्री केली जाते.

**प्रस्ताविकः-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २४.०६.२०१५ निर्णय क्र.१६५ नुसार साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण विहित पध्दतीने ई निविदा मागवून करणेस व त्याकामी येणा-या खर्च रुपये. ०१ कोटी ८९ लाख ४८ हजार मान्यता मिळालेली आहे.

प्रस्तावित छपाईकामी मा.मुंबई उच्च न्यायलयाचे औरंगाबाद खंडपीठ Civil ॲप्लीकेशन नं. १५६८२ दि. ०५.०४.२०१६ चा आदेशान्वये न्यायालयाची खर्चास मान्यता मिळालेली आहे. पुस्तके छपाईकामी वृत्तपत्रात व संस्थान संकेतस्थळावर जाहिरात देऊन ई निविदा मागवून स्पर्धक १४ निविदाकार यांनी यात सहभाग नोंदविला आहे.

**प्रस्ताव**: दि. ०५.०८.२०१६ रोजी मा. खरेदी समिती सभेपुढे पुस्तके प्रकाशने पुनमुर्द्रणकामी सिलबंद पाकीटे व तांत्रिक ई- निविदा (Technical Bid) खरेदी समिती पुढे उघडून पात्र निविदाकारांचा तक्ता तयार करणेकामी मान्यतेनुसार खालील तपशिलाप्रमाणे पात्र/ अपात्र निविदाकारांचा तक्ता सादर केलेला आहे.

| अ.नं. | निविदाकारांचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| ०१ | संप्रती ऑफसेट, सोलापूर | पात्र |
| ०२ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | पात्र |
| ०३ | अदीनाथ प्रिंट, मुंबई | पात्र |
| ०४ | लोकमंगल प्रिंट अन पॅक, सोलापूर | पात्र |
| ०५ | शिवम ऑफसेट, कोल्हापूर | पात्र |
| ०६ | आर्टी ऑफसेट, लातूर | पात्र |
| ०७ | प्रवरा ऑफसेट, लोणी | पात्र |
| ०८ | राका प्रिंटर्स , नाशिक | पात्र |
| ०९ | सकाळ पेपर्स, कोल्हापूर | पात्र |
| १० | मनिपल टेक्नालॉजी, मनिपल, कर्नाटक | पात्र |
| ११ | चेरी ऑफसेट, सोलापूर | पात्र |
| १२ | टॅको व्हिजन, मुंबई | पात्र |
| १३ | प्रिंट प्लस प्रा.लि., मुंबई | पात्र |
| १४ | जास्मिन आर्ट प्रिंटर्स, मुंबई | पात्र |
| १५ | अरिहंत प्रिंटर्स, नवी दिल्ली | **अपात्र** |

साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रणकामी सिलबंद निविदा दरपत्रके (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अं. नं. | पुस्तके/फोटो छपाई तपशिल | १ टॅको व्हिजन प्रा.लि.मुंबई | २ चेरी ऑफसेट,सोलापूर | ३ मनिपल | ४ निट प्रिंट अ.नगर | ५ अदीनाथ प्रिंट सर्व्हीस मुंबई | ६ राका प्रिंटर्स नाशिक | ७ प्रवरा ऑफसेट, सोलापूर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित पोथी – मराठी आवृत्ती ३३ वी | ००.०० | ८५.३० | १४२.०० | ८९.०० | १०६.२० | ९१.६० | ११५.७५ |
| ०२ | श्री साई सतचरित्र – तेलगू आवृत्ती २६ वी | ००.०० | **४५.२५** | ८६.०० | ४६.९० | ६५.९० | ५२.६५ | ६८.१८ |
| ०३ | श्री साई सतचरित्र – तामिळ आवृत्ती २० वी | ०.०० | **५२.७५** | ९६.०० | ५५.३० | ७४.९० | ५९.६९ | ७८.०० |
| ०४ | श्री साईंचे सत्यचरित्र – तेलगू आवृत्ती ०५ वी | ००.०० | **११३.२** | १८८.०० | ११९.८० | १४६.१० | १२६.३३ | १२५.०० |
| ०५ | मातृसाई - तेलगू आवृत्ती क्र.५ | ००.०० | **३४.००** | ७८.०० | ३७.९० | ८३.३० | ५८.६५ | ५३.९३ |
| ०६ | श्री साईचरित्र सार हिंदी दोहावली आवृत्ती क्र.५- हिंदी | ००.०० | ६५.०५ | १३१.० | ७६.६० | ८८.१० | ७६.८५ | ७४.९० |
| ०७ | दैनंदिन साईबोध- मराठी आवृत्ती क्र.७ | ००.०० | **६६.४०** | १३२.० | ७८.२० | ८४.९० | ७३.८५ | ७९.०० |
| ०८ | शिलधी – मराठी आवृत्ती क्र.५ | ००.०० | ६.३ | १६.०० | ७.२० | ७.४० | ११.३० | **५.४२** |
| ०९ | खापर्डे डायरी - हिंदी आवृत्ती क्र.७ | ००.०० | **१८.००** | ३२.०० | २१.९० | २३.२० | ४५.९० | २३.४४ |
| १० | खापर्डे डायरी- तामिळ आवृत्ती क्र.६ | ००.०० | **१६.६५** | ३२.०० | १९.५० | २४.३० | ४२.४५ | २३.७३ |
| ११ | मुलांचे साईबाबा – मराठी आवृत्ती क्र.१२ | ००.०० | **५.५६** | १५.०० | ५.९० | ७.९० | १२.८५ | ५.८८ |
| १२ | मुलांचे साईबाबा - गुजराथी आवृत्ती क्र. ०९ | ००.०० | १६.५५ | ३०.०० | १०.९० | १३.७० | २९.६० | १५.५० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | एक फकिर की पाठशाला – हिंदी आवृत्ती क्र.०७ | ००.०० | ४०.९३ | १६०.० | ०.०० | ५०.६० | **१६.३५** | ४९.०० |
| १४ | श्री साईलीलामृत – हिंदी आवृत्ती क्र.१२ | ००.०० | **१६.३८** | ३२.०० | २०.३० | २३.०० | ३२.३० | १८.२४ |
| १५ | श्री साईलीलामृत- गुजराथी आवृत्ती क्र.१२ | ००.०० | **१९.५६** | ५१.० | ३६.९० | ४६.४० | ६८.४० | ४५.०० |
| १६ | श्री साईनाथ सगुणोपासना - हिंदी आवृत्ती क्र. ०९ | ००.०० | **८.६४** | १७.० | ९.४० | ११.८० | १०.३५ | ११.५० |
| १७ | श्री साईनाथ सगुणोपासना – इंग्रजी आवृत्ती क्र. ०९ | ००.०० | **१०.४२** | २२.० | १३.८० | १५.२० | १३.६८ | १३.१८ |
| १८ | श्री साईनाथ सगुणोपासना- तामिळ आवृत्ती क्र. ०९ | ००.०० | **१०.८७** | २१.० | १२.३० | १५.५० | १४.३५ | १३.५० |
| १९ | श्री साईनाथ सगुणोपासना – बंगाली आवृत्ती क्र. ०४ | ००.०० | **६.९१** | २३.० | ९.७० | १४.८० | १४.९५ | २०.०० |
| २० | श्री साईनाथ स्तवनमंजिरी – मराठी आवृत्ती क्र. ३५ | ००.०० | २.२३ | ७.० | २.३० | २.६० | २.६५ | **२.१५** |
| २१ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी – हिंदी आवृत्ती क्र. १० | ००.०० | २.७७ | ८.० | २.६० | ३.१० | ०३.३० | **२.४९** |
| २२ | चार अध्याय – हिंदी आवृत्ती क्र. १६ | ००.०० | ७.६२ | १८.०० | **६.८०** | १८.७० | ००.०० | ८.४३ |
| २३ | श्री साईनाथ सगुणोपासना – उर्दू आवृत्ती क्र. ०१ | ००.०० | **११.४८** | ३७.०० | १२.७० | १४.८० | ००.०० | २२.०० |
| २४ | श्री साईच्चरित पोथी – गुजराती आवृत्ती क्र. ०२ | ००.०० | **१२७.५** | २५९.० | १९१.०० | २१६.३० | ००.०० | १६४.०० |
| २५ | श्री साईच्चरित पोथी – हिंदी आवृत्ती क्र. ०१ | ००.०० | **९४.९५** | १७०.० | ११४.०० | १३९.३० | ००.०० | १२०.०० |
| २६ | श्री साईच्चरित पोथी - कन्नड आवृत्ती क्र. ०१ | ००.०० | **१२७.५** | २६५.० | १६१.०० | २१६.३० | ००.०० | १६०.०० |
| २७ | श्री साईबाबा चित्रावली - मराठी/इंग्रजी आवृत्ती क्र. ११ | ००.०० | **६.०६** | ४६.० | ६.३० | १०.०० | ००.०० | ७.३० |
| २८ | श्री साईबाबांचे शिकवण व तत्वज्ञान - मराठी आवृत्ती क्र. ०६ | ००.०० | **१३.५७** | ३३.० | १५.१० | २३.२० | ००.०० | २२.०० |
| २९ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी – तेलगू आवृत्ती क्र. ०४ | ००.०० | २.६८ | ९.० | २.९० | ३.७० | ३.९० | **२.४८** |
| ३० | मुलांचे साईबाबा – हिंदी आवृत्ती क्र. १२ | ००.०० | ५.६६ | १३.० | ५.६० | ६.१० | ८.४० | **४.९६** |
| ३१ | श्री साईनाथ सगुणोपासना- (पाकिट साईज)- तेलगू आवृत्ती क्र. ०१ | ००.०० | **६.३७** | १५.० | ८.५० | ९.०० | ८.६५ | ७.९३ |
| ३२ | श्री साईनाथ भजनमाला – हिंदी आवृत्ती क्र. ०५ | ००.०० | **२९.५०** | ५४.० | ३८.०० | ३५.९० | ००.०० | ७०.०० |
| ३३ | श्री साईसच्चरित्र पोथी डिलक्स-मराठी आवृत्ती क्र. ०१ | ००.०० | २८१.२३ | ५०६.० | २७८.२० | १६४.६० | ००.०० | ३१५.० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी– इंग्रजी<br>आवृत्ती क्र. १० | ००.०० | ३.१३ | १०.०० | **<u>३.१०</u>** | ४.५० | ००.०० | ३४५.० |
| ३५ | श्री साईबाबा ३ डि फोटो साईज<br>२.५ X ३.५ फिलीप | **<u>३.८७</u>** | ००.०० | १०.०० | ००.०० | ६.९० | ००.० | ६.०० |
| ३६ | श्री साईबाबा ३ डि पालखी फोटो-<br>२.५ X ३.५ | **<u>३.८७</u>** | ००.०० | १०.०० | ००.०० | ६.९० | ००.० | ६.०० |
| ३७ | श्री समाधी ३ डि फोटो<br>२.५ X ३.५ | **<u>३.८७</u>** | ००.०० | १०.०० | ००.०० | ६.९० | ००.० | ६.०० |

| अं. नं. | पुस्तके/फोटो छपाई तपशिल | ८<br>शिवम कोल्हापूर | ९<br>प्रिंट प्लस मुंबई | १०<br>लोकमंगल सोलापूर | ११<br>सकाळ कोल्हापूर | १२<br>जास्मीन मुंबई | १३<br>संप्रती, सोलापूर | १४<br>आटी लातूर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित पोथी – मराठी<br>आवृत्ती ३३ वी | १०५.०० | **<u>८०.००</u>** | ११३.३ | १११.९० | १०७.८३ | १४२.०० | ९३.५० |
| ०२ | श्री साई सतचरित्र – तेलगू<br>आवृत्ती २६ वी | ६७.५० | ५५.०० | ५९.५ | ७२.५० | ५९.१० | १४०.०० | ५३.५० |
| ०३ | श्री साई सतचरित्र – तामिळ<br>आवृत्ती २० वी | ७९.२० | ५९.०० | ७३.९५ | ८२.०० | ६६.८१ | १५२.०० | ५९.९० |
| ०४ | श्री साईचे सत्यचरित्र – तेलगू<br>आवृत्ती ०५ वी | १५६.६० | ११४.०० | ०.०० | १८३.० | १६१.७७ | १८६.०० | ०.०० |
| ०५ | मातृसाई - तेलगू<br>आवृत्ती क्र.५ | ६५.७० | ४०.०० | ५४.५ | ५०.९० | ४६.४८ | ६९.०० | ०.०० |
| ०६ | श्री साईचरित्र सार हिंदी दोहावली<br>आवृत्ती क्र.५- हिंदी | १०५.०० | **<u>६५.००</u>** | १२४.७ | ७४.७५ | ८६.८७ | ८४.०० | ०.०० |
| ०७ | दैनंदिन साईबोध- मराठी<br>आवृत्ती क्र.७ | १०५.०० | ७५.०० | ९०.० | ७१.७० | ९३.१० | ८९.०० | ०.०० |
| ०८ | शिलधी – मराठी<br>आवृत्ती क्र.५ | ०९.९० | ०८.०० | ९.०० | ८.१० | ०६.७५ | ९.९० | ०.०० |
| ०९ | खापर्डे डायरी - हिंदी<br>आवृत्ती क्र.७ | २७.०० | १९.०० | २३.४ | ३७.९० | २१.५८ | १८.९० | ०.०० |
| १० | खापर्डे डायरी- तामिळ<br>आवृत्ती क्र.६ | २५.७० | १८.०० | २२.० | २९.८० | २०.३६ | १९.४० | ०.०० |
| ११ | मुलांचे साईबाबा – मराठी<br>आवृत्ती क्र.१२ | ११.०० | ०७.०० | ७.३५ | ०६.८० | ६.६८ | ६.२० | ०.०० |
| १२ | मुलांचे साईबाबा - गुजराथी<br>आवृत्ती क्र. ०९ | ६३.०० | १६.०० | **<u>१०.१०</u>** | १७.०० | १५.५३ | १७.४० | ०.०० |
| १३ | एक फकिर की पाठशाला – हिंदी<br>आवृत्ती क्र.०७ | ९१.८० | ५४.०० | ०.०० | २८.८० | ५४.१६ | ५४.०० | ०.०० |
| १४ | श्री साईलीलामृत – हिंदी<br>आवृत्ती क्र.१२ | २१.६० | २२.५० | ३१.०५ | ३५.०० | २०.१८ | २१.४० | ०.०० |
| १५ | श्री साईलीलामृत- गुजराथी<br>आवृत्ती क्र.१२ | ९९.०० | २८.०० | २९.७५ | ४९.०० | ३३.७४ | २४.३० | ०.०० |
| १६ | श्री साईनाथ सगुणोपासना - हिंदी<br>आवृत्ती क्र. ०९ | ९.९० | १०.०० | १६.२ | १९.७५ | १०.२३ | १३.१० | ०.०० |
| १७ | श्री साईनाथ सगुणोपासना – इंग्रजी<br>आवृत्ती क्र. ०९ | १२.६० | १२.०० | १४.२५ | २२.७५ | १२.४० | १६.९० | ०.०० |
| १८ | श्री साईनाथ सगुणोपासना- तामिळ<br>आवृत्ती क्र. ०९ | १३.२० | १४.०० | १२.८५ | १७.२५ | १२.७५ | १७.२० | ०.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | श्री साईनाथ सगुणोपासना – बंगाली आवृत्ती क्र. ०४ | ६३.०० | १०.५० | ९.७ | १५.७५ | ११.६७ | २२.९० | ०.०० |
| २० | श्री साईनाथ स्तवनमंजिरी – मराठी आवृत्ती क्र. ३५ | २.५७ | २.५० | ३.२५ | २.५० | २.५९० | ०२.४० | ०.०० |
| २१ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी – हिंदी आवृत्ती क्र. १० | ०२.८९ | २.५० | ३.०० | २.६० | ३.०० | ०२.६० | ०.०० |
| २२ | चार अध्याय – हिंदी आवृत्ती क्र. १६ | ६३.०० | ११.५० | ८.७५ | ९.५० | ९.६९ | १३.६० | ०.०० |
| २३ | श्री साईनाथ सगुणोपासना – उर्दू आवृत्ती क्र. ०१ | ९०.०० | १६.०० | ०.०० | १६.०० | १९.६७ | २८.०० | ०.०० |
| २४ | श्री साईच्चरित पोथी – गुजराती आवृत्ती क्र. ०२ | २७०.०० | १६०.०० | १६६.१५ | ३१८.० | १८६.१० | १८४.०० | ०.०० |
| २५ | श्री साईच्चरित पोथी – हिंदी आवृत्ती क्र. ०१ | ११०.७० | ११५.०० | ०.० | १७०.० | ११४.३ | १६७.०० | ०.०० |
| २६ | श्री साईच्चरित पोथी - कन्नड आवृत्ती क्र. ०१ | ३३०.० | १५०.०० | ०.० | १६०.० | १८१.२५ | १८४.०० | ०.०० |
| २७ | श्री साईबाबा चित्रावली - मराठी/इंग्रजी आवृत्ती क्र. ११ | २४.३० | २४.०० | ७.६ | २४.८० | ६.१२ | ७.१० | ०.०० |
| २८ | श्री साईबाबांचे शिकवण व तत्वज्ञान - मराठी आवृत्ती क्र. ०६ | १९.५० | २४.०० | १८.७ | २२.० | १६.५ | १६.९० | ०.०० |
| २९ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी – तेलगू आवृत्ती क्र. ०४ | ३.४२ | ०३.४० | ३.६५ | ३.५ | ३.१७ | ४.६० | ०.०० |
| ३० | मुलांचे साईबाबा – हिंदी आवृत्ती क्र. १२ | ९.९० | ०७.०० | ६.१ | ११.२ | ५.७६ | ६.७० | ०.०० |
| ३१ | श्री साईनाथ सगुणोपासना- (पाकिट साईज)- तेलगू आवृत्ती क्र. ०१ | ८.१० | ०७.०० | ०.० | १२.१ | ७.८८ | ११.९ | ०.०० |
| ३२ | श्री साईनाथ भजनमाला – हिंदी आवृत्ती क्र. ०५ | ३६.०० | ४०.०० | ४८.१५ | ३५.० | ४७.६० | ४२.८० | ०.०० |
| ३३ | श्री साईसच्चरित्र पोथी डिलक्स-मराठी आवृत्ती क्र. ०१ | ३२०.०० | १८०.०० | ०.० | ३९५.० | **१००.७२** | ५१८.०० | ०.०० |
| ३४ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी – इंग्रजी आवृत्ती क्र. १० | ५.४० | ३२५.०० | ४.२० | ४.२० | ८.७६ | ४.६० | ०.०० |
| ३५ | श्री साईबाबा ३ डि फोटो साईज २.५ X ३.५ फिलीप | ५.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ९.५० | ०.०० |
| ३६ | श्री साईबाबा ३ डि पालखी फोटो- २.५ X ३.५ | ५.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ९.५० | ०.०० |
| ३७ | श्री समाधी ३ डि फोटो २.५ X ३.५ | ५.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ९.५० | ०.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रणकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, मागील छपाई दरांची तुलना करणेत येऊन, त्यानुसार संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा तसेच ज्या छपाईकामी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, त्यासाठी समान विभागून कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

०५ **सन-२०१६-१७ करिता पावडर मूर्ती खरेदीकामी स्थानिक पुरवठादारांकडुन प्राप्त कोटेशन्स उघडणे व दर निश्चित करणेबाबत.**

मा.त्रिसदस्य समितीचे दि.२९.०२.२०१६चे सभेतील निर्णय क्र.१९३ नुसार माहे-एप्रिल-२०१६ ते माहे मार्च-२०१६ अखेर या आर्थिक वर्षामध्ये फुटाणे, विडयाची पाने, पावडर मार्बल मुर्ती खरेदी करणेसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,३९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. मंदिर विभागाचे दि.२३ मार्च २०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बंद पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविणेत आलेल्या होत्या. निविदा सादर करणेसाठी जाहिरातीमध्ये दि.१०.०५.२०१६ अशी अंतिम तारीख नमुद करणेत आलेली होती. प्राप्त निविदा दि.२७.०५.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेमध्ये ठेवण्यात आली होती. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४.०६.२०१६चे सभेत विषय नं.०२, निर्णय क्र.३२३नुसार मा.उपसमितीने केलेल्या शिफारशींना पुष्टी देणेत आली आहे. त्यानुसार मंदिर विभागासठी आवश्यक असणारे फुटाणे प्रसाद खरेदीकामी श्री.दिपक अशोक झाल्टे, शिर्डी यांचे प्रति किलो रु.२५/- मात्र व विड्याची पाने खरेदीकामी श्री.दिपक देवराम आहेर, शिर्डी यांचे प्रति शेकडा रु.७०/- मात्र निम्नतर दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच पावडर मुर्ती खरेदी करणेकामी स्थानिक पुरवठाधारकांकडुन फेर कोटेशन मागविण्यात यावे, अशी मा.उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.

तसेच मंदिर विभागाकडील दि.०२ जुलै, २०१६ रोजीची मंजूर टिपणीनुसार उर्वरित पावडर मुर्ती खरेदी करणेकामी ०२ (दोन) कोटेशन प्राप्त झाली असल्याने स्थानिक पुरवठाधारकांकडुन आणखी ०१(एक)कोटेशन मागवुन घेणे बाबत मान्यता घेण्यात त्यानुसार “साई दिव्या-एनएक्स”, शिर्डी यांचेकडुन सामान्य प्रशासन आ.क्र.१०१९१/ दि.०५/०९/२०१६ रोजी आणखी ०१(एक) कोटेशन प्राप्त झालेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | ०३ नंबर मुर्तीसाठीचे दर प्रती नग रु. | ०४ नंबर मुर्तीसाठीचे दर प्रती नग रु. | ०५ नंबर मुर्तीसाठीचे दर प्रती नग रु. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.विरेश जैस्वाल, शिर्डी | **९०/-** | **१४०/-** | **४४०/-** |
| २ | साईकृष्णा आर्टस, शिर्डी | ११०/- | १८०/- | ५१०/- |
| ३ | साई दिव्या एनएक्स, शिर्डी | १२०/- | १८०/- | ५१०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०१६-१७ करिता पावडर मूर्ती खरेदीकामी श्री.विरेश जैस्वाल, शिर्डी यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**०६ केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल CISF (Central Industrial Security force) यांनी संस्थान परीसरात पाहणी करुन सादर केलेल्या अहवालाबाबत व खर्चाबाबत.**

मा व्यवस्थापन समिती दि.09.10.2014 चे सभेतील केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल यांचे मार्फत कन्सल्टंसी सेवा घेणेकामी विषय नं.17 वर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.902 नुसार श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षितता ही बाब अत्यंत महत्वाची असल्यामुळे सुरक्षा यंत्रणा, फायर सेफ्टी, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा वगैरे सुरक्षा विषयक मार्गदर्शनासाठी केंद्र शासनाच्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यासारख्या चांगल्या संस्थेचे मार्गदर्शन घेण्याची संस्थानला आवश्यकता आहे. मार्गदर्शन घेणेसाठी सदर संस्थेची विनामुल्य अथवा मानधन तत्वावर कन्सलटंट म्हणुन नेमणुक करणेबाबत त्यांचेकडे विचारणा करण्यात यावी. तसेच केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल संस्थेकडून श्रींचे मंदिर व मंदिर परीसराच्या सुरक्षेसाठी सुरक्षा कर्मचारी घ्यावयाचे झाल्यास त्यांचे वेतन व मानधन यावर किती खर्च येईल याबाबत सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले होते. त्यानुसार केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांचेकडे पत्रव्यवहार करुन सुरक्षा व फायर कन्सलटंन्सी फी बाबत चौकशी केली असता त्यांनी 2,50,000 + 75,000 असे एकुण रु.3,25,000/- खर्च कळविला होता. दि.27/07/2015 रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे त्याबाबत विषय क्र.14 निर्णय क्र.225 अन्वये सादर केला असता त्यावर सविस्तर चर्चा होऊन रु.3,25,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार सुरक्षा व फायर कन्सलटंन्सी फी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांना आदा करणेत आलेली आहे.

त्यानंतर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे (CISF) अधिकारी यांनी दि.14.01.2016 ते दि.18.01.2016 या कालावधीत मंदिर, मंदिर परिसर तसेच संस्थान संलग्न सर्व परिसराची पहाणी करुन आढळुन आलेल्या त्रुटी, उणीवाबाबत सुरक्षितेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना व खरेदी करणे आवश्यक असलेले सुरक्षा साहित्य इत्यादी बाबतचा सविस्तर सुरक्षा अहवाल (कन्सलटंन्सी रिपोर्ट) सुमंत सिंग, असिस्टंट इन्सपेक्टर जनरल यांनी जा.नं.42014(4)/ 31/2014 कन्सलटंन्सी/619 दि.21/03/2016 चे पत्रासमवेत अहवाल इकडील कार्यालयास सादर केला आहे.

**सदर अहवालातील काही ठरावीक ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे आहे:-**

1) श्री साईबाबा मंदिरामध्ये दर्शनाकरीता साईभक्तांची मोठया प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता, श्री साईबाबा संस्थान हे वेगवेगळया आतंकवादी संघटनांच्या हिट लिस्टवर असल्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रचंड प्रमाणात होणा-या साईभक्तांच्या गर्दीमुळे आतंकवादी हल्ला, दंगल, पाकीटमारी इत्यादी गुन्हे होवू शकतात. त्याकरीता या संभाव्य धोक्यापासून सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून CISF यांचेकडे सध्या अस्तित्वात असलेल्या सुरक्षाबाबतच्या यंत्रणेसंदर्भात सल्ला घेण्याची आवश्यकता आहे.

2) बऱ्याच वर्षापासुन इराकनंतर भारत आतंकवादांच्या हिटलिस्टवर एक प्रमुख केंद्र बनलेले आहे. मागील काळात सुध्दा भारतात काही प्रमुख धार्मिक स्थळे (उदा.बोध, गया, अक्षरधाम, अहमदाबाद इ.) आतंकवादाचे प्रमुख लक्ष आहे. शिर्डीतील साईभक्तांची मोठया प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता साईबाबा संस्थानवर हल्ला झाल्यास साईभक्तांच्या विश्वासाला तडा जाण्याची शक्यता आहे. साईबाबा मंदिर परीसरालगत असणारे हॉटेल्स/ लॉजेसची बांधकामे, दुकाने, भिकारी व इतर किरकोळ विक्रेते यांचे वाढते प्रमाण तसेच गेट नं. 1 व 5 हे नगर-मनमाड रोड लगत असुन तेथील रहदारीमुळे संभाव्य धोका निर्माण होवू शकतो. त्यावर योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे.

3) श्री साईबाबा मंदिर व परीसर येथील सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून करावयाच्या आपतकालीन सुरक्षा व्यवस्थापनाचा आराखडा तयार करणे. करीता यावर नियंत्रण करण्याकरीता दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची कडक तपासणी होणे गरजेचे आहे.

4) मंदिर परीसर, प्रसादालय, एल.पी.जी.स्टोअर, निवासस्थाने व जलसाठे इत्यादी ठिकाणची असणारे गेटस् हे आधुनिक पध्दतीची म्हणजे विजेवर चालणारे स्लायडिंग गेटस् तसेच उघडझाप करणारे बॅरीयर बसविण्यात यावेत. गेट नं.4 येथे वाहनांकरीता इलेक्ट्रिक बुम बॅरीयर (Electrically Boom barrier) बसविण्यात यावेत. महिलांच्या तपासणीसाठी सुलभरीत्या सुविधायुक्त वेगळे बुथ तयार करणे. दर्शन रांग नं. 1 व 2 येथे भक्तांसाठी बॉडी स्कॅनर (Body Scaner) बसविण्यात यावे.

5) मंदिर परीसराचे सर्व प्रवेशव्दार, प्रसादालय, निवासस्थाने व जलसाठ्यांवर तसेच प्रवेशव्दारांवर भक्तांचे व कर्मचाऱ्यांचे DFMD व्दारे त्यांचे तपासणीकरीता सामान तपासणी यंत्र (X-BIS) लावणे आवश्यक आहे. तसेच मंदिर परीसरात फिरता बुलेटप्रुफ मोर्चा (Mobile bullet proof morcha) ठेवण्यात यावा.

6) हत्यारबंद सुरक्षारक्षकांव्दारे वॉच टॉवर वरुन चोवीस तास सुरक्षा करणे. तसेच गेट नं.3 च्या दक्षिण –पुर्व च्या बाजुने कम्पाउंड वॉल नजिक बरेच दुकाने/ किरकोळ विक्रेते यांनी अतिक्रमण केले असून तेथे एक नविन वॉच टॉवर (Watch tower) बसविणे आवश्यक आहे. गेट नं.01 च्या वॉलवर धारदार ब्लेडचे प्रोटेक्शन करावे. साईभक्तांचे सुरक्षिततेसाठी मंदिरालगतची असलेली अतिक्रमणे काढणे आवश्यक आहे.

7) मंदिर व मंदिर परीसरातील हालचालीवर लक्ष ठेवण्याकरीताचे सी.सी.टि.व्ही. कॅमे-याचे रेकॉर्डींगवर 24 तास लक्ष केंद्रीत ठेवणे आवश्यक आहे. श्री साईबाबा संस्थानमध्ये सी.सी.टि.व्ही. कंट्रोल रुम फक्त् एकच आहे. समाधी स्थळापर्यंत येणाऱ्या व्ही.आय.पी. व स्थानिक साईभक्तांचे जाण्या-येण्याच्या रस्त्यांची पाहणी करणे. साईभक्तांना येण्याजाण्यासाठी असणाऱ्या सर्व गेटवर योग्य त्या सुविधा उपलब्ध करणे. संस्थानमधील सर्व कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणे. संस्थानच्या सर्व गेटवर बसविण्यात येणाऱ्या घातपात विरोधी यंत्रणांची नियमित तपासणी करणे. संस्थानच्या नियोजीत वाहनतळांना चेन लिंक फेन्स करुन सुरक्षा व्यवस्था कडक करणे.

उपरोक्तप्रमाणे दर्शविलेल्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून बसविण्यात येणाऱ्या यंत्रणा (मशिनरी) मंदिर परीसरात कोणकोणत्या ठिकाणी बसविण्यात यावे, याकरीता लागणाऱ्या सुरक्षा साहित्यांचा अंदाजित खर्चासह त्यांनी खालीलप्रमाणे तपशिल दिलेला आहे.

A SECURITY CONSULTANCY REPORT BY CISF IN RESPECT OF
SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI DTD.21/03/2016.
APPENDIX – "B"
ACCESS CONTROL SYSTEM FOR SHRI SAIBABA SANSTHAN TRUST

| Sr. No. | Item Description | Location | Qty | Rate in Rs. | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Biometric Smart Card reader | 1. Gate No.02(02 Nos)<br>2. Gate No.03(02 Nos)<br>3. Gate No.04(02 Nos)<br>4. Central Control room (01 Nos)<br>5. Cash Room (01 Nos)<br>6. Gaonkari Gate (01 Nos)<br>7. Prasadalaya (Approach way to kitchen ladoo Prasad) (02 Nos)<br>8. All Accomodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati (06 Nos)<br>9. Water reservoir (Gate no.02) (01 Nos) | 18 | 15,000 | 2,70,000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 02 | 2 Biometric smart card / finger print readers controller with a buffer of 5000 transaction on the controller complete with power supply unit and मnclosure | 1. Gate No.02(01 Nos)<br>2. Gate No.03(01 Nos)<br>3. Gate No.04(01 Nos)<br>4. Central Control room (01 Nos)<br>5. Cash Room (01 Nos)<br>6. Gaonkari Gate (01 Nos)<br>7. Prasadalaya (Appoach way to kitchen, laddo Prasad) (01 Nos)<br>8. All Accomodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati (06 Nos)<br>9. Water reservoir (Gate no.02) (01 Nos) | 14 | 35,000 | 4,90,000 |
| 03 | Access control software | Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 01 | 1,00,000 | 1,00,000 |
| 04 | Electronic Magnetic lock | Emergency Gates i.e.<br>1. Darshan Queue 1 & 2 (Outer side mandir)- Total 02 Nos<br>2. Darshan Queue Bhakti niwas (Ground Floor-02 Nos, First floor-01, Second Floor-01) Total-04<br>3. Darshan Queue shanti niwas- (Ground floor-02 Nos, First floor-01, Second floor-01, Third floor-01) Total-05<br>4. Strong Room<br>5. Cash counters in all accommodation facilities (Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati, Saibaba Hospitals) Total-05 | 17 | 6,500 | 1,10,500 |
| 05. | UVSS | Vehicle Gate No.04 | 01 | 15,00,000 | 15,00,000 |
| 06. | Bollards | Vehicle Gate No.04 (06 Nos) | 06 | 1,00,000 | 6,00,000 |
| 07. | Electrically operated sliding gates | 1. Gate No.02<br>2. Gate No.03<br>3. Gate No.04<br>4. Vehicle Gate No.04<br>5. Gate No.05<br>6. Prasadalaya (Approch way to kitchen, ladoo Prasad)<br>7. All accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala-02 Nos | 08 | 2,50,000 (Shall vary as per the length of the gate) | 20,00,000 |
| 08. | Flap barrier | 1. Gate No.02 - (02 Nos)<br>2. Gate No.03 - (02 Nos)<br>3. Gate No.04 - (02 Nos)<br>4. Gavkari Gate - (02 Nos)<br>5. Prasadalaya In Gate - (02 Nos)<br>6. All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati - 06 Nos | 12 | 1,00,000 | 12,00,000 |
| 09. | Electrically operated Boom Barrier | 1. Vehicle Gate No.04<br>Prasadalaya (In Gate)<br>2. Prasadalaya (Approch way to kitchen, ladoo Prasad)<br>3. All accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-03 Nos<br>4. Water reservoir (gate no.3) | 06 | 50,000 | 3,00,000 |
| 10. | Full Height Turn style | 1. Prasadlaya ((Approch way to kitchen, ladoo Prasad)- 02 Nos<br>2. Water reservoir (gate no.02) -01 Nos. | 03 | 90,000 | 2,70,000 |
| 11. | Cable 8 X 1 sq mm armoured | | Lot | | |

**APPENDIX – "C"**

FINANCIAL IMPLICATIONS FOR GADGETS INSTALLATION AT
SHRI SAIBABA SANSTHAN TRUST

| Sr.No. | Item Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | **Access Control System for SSST** | **As per Appendix-B** | | **68,40,500** |
| 02. | Control Panel<br>i) Mandir Complex<br>ii) Prasadalaya<br>iii) Accomodation Facilities (03 Nos)<br>iv) Water Reservoir | 06 | 25,000 | 1,50,000 |
| 03. | X-Ray baggage inspection systems<br>Gate-02 01 Nos.<br>Gate-03 01 Nos.<br>Gate-04 01 Nos.<br>Gate-05 01 Nos.<br>Prasadalaya (IN Gate)-01<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-03 Nos | 08 | 15,00,000 | 1,20,00,000 |
| 04 | DFMD<br>Gate-02 02 Nos.<br>Gate-03 03 Nos.<br>Gate-04 03 Nos.<br>Darshan Queue (1&2)-08 Nos<br>Prasadalaya (IN Gate)-02 Nos<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-06 Nos | 24 | 1,00,000 | 24,00,000 |
| 05. | Body Scanner | 02 | 70,00,000 | 1,40,00,000 |
| 06 | VHF Static base sets with antenna, battery and accessories | 12 | 34,500 | 4,14,000 |
| 07 | VHF hand set with accessories | 75 | 16,000 | 12,00,000 |
| | | | Total | 3,70,04,500 |
| * | Add 10% as installation/ testing charges cable supply, Laying etc. Shall be extra | | + | 37,00,450 |
| | | Total (appro.) | | 4,07,04,950 |
| All specifications are indicative for illustrating the concept. The prices are approximate and tend to vary subsrantially with brand, specifications and features. | | | | |

तरी उपरोक्तप्रमाणे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (C.I.S.F) यांनी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मंदीर, परीसर व संस्थान परीसरात पाहणी करुन दिलेल्या कन्सल्टंन्सी रिपोर्ट मध्ये आढळुन आलेल्या त्रुटी, करावयाच्या उपाययोजना व सुरक्षा साहित्य यंत्रणा खरेदीकामी रु. 3,70,04,500/- + 37,00,450/- (extra 10%) = 4,07,04,950/- (अक्षरी रुपये चार कोटी सात लाख चार हजार नऊशे पन्नास मात्र ) खर्च अपेक्षित आहे. करीता CISF (Central Industrial Security Force) यांनी सुचविलेप्रमाणे उपरोक्त खर्चास मान्यता मिळणेस निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल CISF (Central Industrial Security force) यांनी संस्थान परीसरात पाहणी करुन सादर केलेल्या अहवालामध्ये सुरक्षा साहित्य यंत्रणा खरेदी करणेची शिफारस केलेली आहे, त्यापैकी जे सुरक्षा साहित्य कायमस्वरुपी उपयोगी पडेल असे साहित्य खरेदी करणेस हरकत नाही, तसेच महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळास सुरक्षा ऑडिट करणेसंदर्भात आदेश देण्यात आलेला असून सदरहू साहित्य खरेदी करणेबाबत त्यांचाही अभिप्राय घेण्यात येऊन प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.**

(कार्यवाही- संरक्षण विभाग प्रमुख)

---

०७ **सहा.शिक्षक पुरुष यांना गणवेश व स्त्री शिक्षिका यांना साड्या खरेदीकामी प्राप्त दरपत्रके मा.उपसमिती समोर उघडणेबाबत.**

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला

अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – ५३०**

**प्रस्ताविक –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल मधील सहा.शिक्षक (स्त्री व पुरुष )यांना खालीलप्रमाणे गणवेश खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रुपये शिलाईसह ९३,५००/- मात्रचे खर्चास मा. व्य.मं. समितीचे दि. २८.११.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

**अ) पुरुष शिक्षक कर्मचारी**

| **अ.नं.** | **तपशिल** | **कर्मचारी संख्या** | **गणवेश संख्या** | **पॅन्टसाठी आवश्यक कापड (प्रती गणवेश १.३० मी. प्रमाणे)** | **शर्टसाठी आवश्यक कापड (प्रती गणवेश २.५० मी. प्रमाणे)** |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | प्राचार्य | ०१ | ०२ | २.६० मीटर | ५ मीटर |
| ०२. | पुरुष कर्मचारी | ०९ | १८ | २३.४० मीटर | ४५ मीटर |
| | | | **एकुण** | **२६ मीटर** | **५० मीटर** |

**ब) स्त्री शिक्षक कर्मचारी-**

| **अ.नं.** | **तपशिल** | **कर्मचारी संख्या** | **साडी संख्या** | **परकर संख्या** |
|---|---|---|---|---|
| ०१. | स्त्री कर्मचारी | २५ | **५०** | **५०** |

सदर मा. व्य.म. समीती मान्यतेनुसार मा. प्राचार्य यांनी स्थानिक दुकानदारांकडून वेगवेगळी नमुने मागवून सदरचे नमुने वरिष्ठांना दाखवून अंतिम केलेली आहेत त्यानुसार स्थानिक कापड दुकानदाराकडून कोटेशन मागणी केली असता मुदती अंती खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

**अ) स्त्री शिक्षक कर्मचारी दरपत्रके**

| अ.नं. | दरपत्रक धारकांचे नांव | आवक नं. व दिनांक |
|---|---|---|
| ०१ | कावेरी साडी, शुटींग, ड्रेस मटेरियल, रेडीमेड, हॉटेल साई संजीवनी कॉम्पलेक्स पिंपळवाडी रोड शिर्डी. | ७९२०/०३.०८.२०१६ |
| ०२ | पुजा कलेक्शन राहाता. ता. राहाता. जि. अ.नगर | ७९२१/ ०३.०८.२०१६ |
| ०३ | साई साडी सेंटर शिर्डी. ता. राहाता. जि. अ. नगर. | ७९२२/ ०३.०८.२०१६ |

**ब) पुरुष शिक्षक कर्मचारी दरपत्रके**

| अ.नं. | दरपत्रक धारकांचे नांव | आवक नं. व दिनांक |
|---|---|---|
| ०१ | कावेरी साडी,शुटींग, ड्रेस मटेरियल, रेडीमेड, हॉटेल साई संजीवनी कॉम्पलेक्स पिंपळवाडी रोड शिर्डी. | ७९१७/०३.०८.२०१६ |
| ०२ | पुजा कलेक्शन राहाता. ता. राहाता. जि. अ.नगर | ७९१८ / ०३.०८.२०१६ |
| ०३ | साई साडी सेंटर शिर्डी. ता. राहाता. जि. अ. नगर. | ७९१९ /०३.०८.२०१६. |

उपरोक्तप्रमाणे शुटींग, शर्टींग, साडया, परकर, ब्लावूज दरपत्रके मा. उपसमितीचे सभेसमोर उघडून न्युनत्तम दरधारकांस पुरवठा आदेश देता येईल. तरी दरपत्रके मा. समितीचे सभेसमोर दरपत्रके उघडणेस मान्यता मिळणेस विनंती.

| अ.नं. | दरपत्रक धारकांचे नांव | कावेरी साडी, शुटींग, ड्रेस मटेरियल, रेडीमेड, हॉटेल साई संजीवनी कॉम्पलेक्स पिंपळवाडी रोड शिर्डी. | पुजा कलेक्शन राहाता. ता. राहाता. जि. अ.नगर | साई साडी सेंटर शिर्डी. ता. राहाता. जि. अ.नगर. |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिक्षक गणवेश सुटींगसाठी कापड २६ मीटर | रु.२९८/- प्र.मीटर | रु.३२५/- प्र.मीटर | रु.३३२/- प्र.मीटर |
| ०२ | शिक्षक गणवेश शर्टींगसाठी कापड ५०मीटर | रु.३९०/- प्र.मीटर | रु.४३०/- प्र.मीटर | रु.४२८/- प्र.मीटर |
| | टाय- | रु.१९२/- प्र.नग | रु.२१५/- प्र.नग | रु.२१०/- प्र.नग |
| ०३ | स्त्री शिक्षिका गणवेश साडी, प्रिंटेड ब्लाऊज पीस सह ५० नग | रु.६१५/- प्र.नग | रु.६७०/- प्र.नग | रु.६४५/- प्र.नग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | परकर- ६ कळी | रु.९८/- प्र.नग | रु.१२०/- प्र.नग | रु.११५/- प्र.नग |
| | परकर- ८ कळी | रु.११८/- प्र.नग | रु.१४०/- प्र.नग | रु.१३०/- प्र.नग |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, इंग्लिश मिडीयम स्कुलमधील सहा.शिक्षक पुरुष यांना गणवेश व स्त्री शिक्षिका यांना साड्या खरेदीकामीचा उपरोक्त विषय रद्द करणेत येऊन, शैक्षणिक संकुलाकडील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गणवेश देणेसाठीचा एकत्रित प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्त वाचुन कायम करत असताना, शैक्षणिक संकुलाकडील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संस्थानमार्फत गणवेश देणेऐवजी ड्रेसकोड देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

०८ **कनिष्ठ महाविदियालयाकरीता प्रयोग वहया छपाईकामी प्राप्त कोटेशन उघडून न्यूनतम दरांचे कोटेशन धारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**संदर्भ-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील दि. ०९/०१/२०१६ चा मंजूर प्रस्ताव.

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** क्र.१७(१) व १७ (२) (ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील.तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** २) मा. त्रिसदस्यीय समिती दि. १६/०२/२०१६ चे सभेतील निर्णय क्र. १०६

**प्रास्तविक:-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविदयालयात सन २०१६-२०१७ मध्ये इ.११ वी व १२ वी विज्ञान शाखा वर्गातील विदयार्थ्यांना भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, माहिती तंत्रज्ञान व गणित या विषयासाठी मा. त्रिसदस्यीय समिती दि. १६/०२/२०१६ चे सभेतील निर्णय क्र. १०६ नुसार प्रयोगवहया (जर्नल) ची विहीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. १,६४,०००/- (अक्षरी रुपये एक लाख, चौसष्ठ हजार) मात्र खर्चास तसेच प्रयोगवहया छपाई दरावर १० टक्के सेवा शुल्क आकारुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळालेली आहे.

**मागणी:-** कनिष्ठ महाविद्यालयाकडील दि. ०८/०३/२०१६ ची प्रयोगवहया (जर्नल) छपाईकामी कोटेशन मागविणे मंजूर प्रस्तावाने जा.नं. एसएसएस/वशी/ ८२९/२०१६ दि. २४/०५/२०१६ नुसार दरपत्रक मागणी दि. ०७/०६/२०१६ अखेर करण्यात आली होती. त्यानुसार १ मुदतीत व दोन मुदतीनंतर दरपत्रके प्राप्त झाली होती. त्यानुसार कोटेशन उघडणेकामी दि. २१/०६/२०१६ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता.सदर प्रस्तावावर मुदतीनंतर प्राप्त दरपत्रके नियमानुसार पात्र होत नाही असे मुख्य वित्त व लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिल्याने दि. २१/०७/२०१६ रोजी प्रयोगवहया (जर्नल) छपाईकामी फेर दरपत्रके (कोटेशन) मागणीचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी/कनिष्ठ/ २२७२/२०१६ दि. ०६/०८/२०१६ नुसार दरपत्रक मागणी दि. १३/०८/२०१६ अखेर मुदत देण्यात आली आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाकडील दि. १५/०८/२०१६ ची प्रयोग वहया छपाईकामी बंद पाकिटे उघडणे मंजूर प्रस्तावाने, प्राप्त बंद पाकिटे दि.२३/०८/२०१६ रोजी मा.प्रशासकिय अधिकारी यांचे कक्षात उघडण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

१) **लक्ष्मी प्रिंटर्स, कोल्हार भगवती** यांनी त्यांचे दि. ०८/०८/२१६ चे पत्राने आपले संस्थेचे प्रयोग वहया छपाईकामी मागिल दरपत्रक क्र. २५५ दि. ०७/०६/२०१६ व त्यासोबत दिलेला डि.डि. रु. १०,०००/- मात्र व दिलेले दरपत्रकाचे दर गृहीत धरावे, असे कळविले आहे.

२) **प्रवरा ऑफसेट, लोणी** यांनी प्रयोग वहया छपाईकामी यापूर्वी दिलेले रु. १०,०००/- मात्र रक्कमेचा डि.डि.व दरपत्रक (कोटेशन ) मधील माहितीपत्र व दरपत्रक ग्राहय धरावे. असे कळविले आहे.

३) **प्रसाद प्रिंटर्स, कोपरगांव** यांनी पुन्हा प्रयोगवहया छपाई कामाचे कोटेशनची मागणी केली आहे.तरी यापूर्वी दिलेले रु. १०,०००/- मात्र रक्कमेचा डि.डि. व दरपत्रक ( कोटेशन) मधील माहितीपत्र व दरपत्रक ग्राहय धरावे. असे कळविले आहे.

वरील तिन्ही कोटेशनधारकांनी मागिल जा.नं. एसएसएस/वशी/८२९/२०१६ दि.२४/०५/२०१६ नुसार दिलेली दरपत्रके (कोटेशन) मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडून न्यूनतम दरधारकांस प्रयोग वहया छपाईकामाचा पुरवठा आदेश देणे आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** प्रयोगवहया छपाईचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-**

१) प्रयोग वहया (जर्नल) छपाई करणेकामी वरील १ ते ३ प्रेसधारकांकडून प्राप्त झालेली दरपत्रके उघडून न्यूनतम दरधारकांस प्रयोग वहया छपाईकामाचा पुरवठा आदेश देणेस मान्यता असावी.

२) प्रयोगवहया छपाई दरावर १०% सेवाशुल्क आकारुन विद्यार्थ्यांना विक्री करण्यास मान्यता असावी.

**कनिष्ठ महाविदयालयाकरीता प्रयोग वहया छपाईकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| अ.नं. | तपशील | लक्ष्मी प्रिंटर्स, कोल्हार भगवती | प्रवरा ऑफसेट, लोणी | प्रसाद प्रिंटर्स, कोपरगांव |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रती नग रु. | | |
| १ | भौतिकशास्त्र- जर्नल ५०० नग | ६५/- | ६०/- | **५५/-** |
| २ | रसायनशास्त्र- जर्नल ५०० नग | ७२/- | **५८/-** | ६०/- |
| ३ | जीवशास्त्र- जर्नल ५०० नग | ८८/- | **७२/-** | ७४/- |
| ४ | माहिती तंत्रज्ञान- जर्नल ४०० नग | ५५/- | **५३.५०** | ५९/- |
| ५ | गणित- जर्नल ५०० नग | ६०/- | **५१/-** | ५२.२० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविदयालयाकरीता प्रयोग वहया छपाई करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना छपाईचा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

०९ **कनिष्ठ महाविदयालयाकरीता उत्तरपत्रिका छपाईकामी प्राप्त कोटेशन उघडून न्यूनतम दरांचे कोटेशनधारकांना पुरवठा आदेशदेणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** क्र.१७(१) व १७ (२) (ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील.तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा.त्रिसदस्यीय समिती दि.१६/०२/२०१६ चे सभेतील निर्णय क्र.१०७

**प्रास्तविक:-** कनिष्ठ महाविदयालयातील इ.१२ वी कला,वाणिज्य व विज्ञान शाखेत ७५३ विदयार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच इ.११वी माहे जून २०१६ मध्ये कला,वाणिज्य व विज्ञान शाखेत ८०० विदयार्थी प्रवेश घेतील. या वर्गातील विदयार्थ्यांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात चाचणी व वार्षिक परीक्षेसाठी विदयार्थ्यांना घेण्यात येणा-या परीक्षासाठी मा. त्रिसदस्यीय समिती दि. १६/०२/२०१६ चे सभेतील निर्णय क्र. १०७ नुसार उत्तरपत्रिकांची विहीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. २,१०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख, दहा हजार) मात्र खर्चास तसेच उत्तरपत्रिका छपाई करणेकामाची हामी म्हणून बयाणा रक्कम रुपये-१०,०००/- (अक्षरी रुपये – दहा हजार) मात्र स्वीकारणे मान्यता मिळालेली आहे.

**मागणी:-** कनिष्ठ महाविद्यालयाकडील दि. ०८/०३/२०१६ ची उत्तर पत्रिका छपाईकामी कोटेशन मागविणे मंजूर प्रस्तावाने जा.नं.एसएसएस/वशी/ ८२८/२०१६ दि. २४/०५/२०१६ नुसार दरपत्रक मागणी दि. ०६/०७/२०१६ अखेर करण्यात आली होती. त्यानुसार १ मुदतीत व दोन मुदतीनंतर दरपत्रके प्राप्त झाली होती. त्यानुसार कोटेशन उघडणेकामी दि. २०/०६/२०१६ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता.सदर प्रस्तावावर मुदतीनंतर प्राप्त दरपत्रके नियमानुसार पात्र होत नाही असे मुख्य वित्त व लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिल्याने दि. २१/०७/२०१६ रोजी उत्तरपत्रिका छपाईकामी फेर दरपत्रके (कोटेशन) मागणीचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी/कनिष्ठ/ २२७३/२०१६ दि. ०६/०८/२०१६ नुसार दरपत्रक मागणी दि. १३/०८/२०१६ अखेर मुदत देण्यात आली आहे.

दि. १५/०८/२०१६चे उत्तरपत्रिका छपाईकामी बंद पाकिटे उघडणे मंजूर प्रस्तावाने, प्राप्त बंद पाकिटे दि.२३/०८/२०१६ रोजी मा.प्रशासकिय अधिकारी यांचे कक्षात उघडण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे ...

१) **लक्ष्मी प्रिंटर्स, कोल्हार भगवती** यांनी त्यांचे दि. ०८/०८/२१६ चे पत्राने आपले संस्थेचे उत्तरपत्रिका छपाईकामी मागिल दरपत्रक क्र. २५४ दि. ०७/०६/२०१६ व त्यासोबत दिलेला डि.डि. रु. १०,०००/- मात्र व दिलेले दरपत्रकाचे दर गृहीत धरावे, असे कळविले आहे.

२) **प्रवरा ऑफसेट, लोणी** यांनी उत्तरपत्रिका छपाईकामी यापूर्वी दिलेले रु. १०,०००/- मात्र रक्कमेचा डि.डि.व दरपत्रक (कोटेशन ) मधील माहितीपत्र व दरपत्रक ग्राहय धरावे. असे कळविले आहे.

३) **प्रसाद प्रिंटर्स,कोपरगांव** यांनी पुन्हा उत्तरपत्रिका छपाई कामाचे कोटेशनची मागणी केली आहे.तरी यापूर्वी दिलेले रु. १०,०००/- मात्र रक्कमेचा डि.डि. व दरपत्रक ( कोटेशन )मधील माहितीपत्र व दरपत्रक ग्राहय धरावे. असे कळविले आहे.

वरील तिन्ही कोटेशनधारकांनी उत्तरपत्रिका छपाईकामी मागिल जा.नं. एसएसएस/वशी/८२८/२०१६ दि.२४/०५/२०१६ नुसार दिलेली दरपत्रके (कोटेशन) मा.स्थानिक उपसमितीच्या सभेत उघडून न्यूनतम दरधारकांस उत्तरपत्रिका छपाईकामाचा पुरवठा आदेश देणे आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** उत्तरपत्रिका छपाईचा विषय आहे.

**उत्तरपत्रिका छपाई करणेकामी वरील १ ते ३ प्रेसधारकांकडून प्राप्त झालेली दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| अ.नं. | तपशील | लक्ष्मी प्रिंटर्स, कोल्हार भगवती | प्रवरा ऑफसेट, लोणी | प्रसाद प्रिंटर्स, कोपरगांव |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रती नग रु. | | |
| १ | उत्तरपत्रिका (पुरवणी) २ पानी ७० जीएसएम, व्हाईट मॅपलिथो पेपर- A4 साईज २०,००० नग | ००.५० | ००.४७ | **००.४५/-** |
| २ | उत्तरपत्रिका (पुरवणी) ४ पानी ७० जीएसएम, व्हाईट मॅपलिथो पेपर- A4 साईज २०,००० नग | ००.९५ | ००.९५ | ००.९० |
| ३ | उत्तरपत्रिका ८ पानी ७० जीएसएम, व्हाईट मॅपलिथो पेपर- A4 साईज २०,००० नग | १.७५ | **१.६८** | १.७० |
| ४ | उत्तरपत्रिका १२ पानी ७० जीएसएम, व्हाईट मॅपलिथो पेपर- A4 साईज २०,००० नग | ३.०० | **२.३८** | २.४० |
| ५ | उत्तरपत्रिका १६ पानी ७० जीएसएम, व्हाईट मॅपलिथो पेपर- A4 साईज २०,००० नग | ३.६० | **३.१५** | ३.२० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविदयालयाकरीता उत्तरपत्रिका छपाईबाबतचा उपरोक्त विषय रद्द करणेत येऊन, सर्व शैक्षणिक संकुलासाठी एकत्रित उत्तरपत्रिकांची छपाई करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

१० **शिर्डी सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीसाठी पाणी पुरवठा होणेसाठी साहित्य खरेदी करणेसाठी प्राप्त दरपत्रके (कोटेशन) उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडुन विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.(३) (१४) पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे. "..यावी सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी स.नं.१७१ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवासस्थान इमारतीसाठी पाणी पुरवठा करणेकामी प्रस्तावित साहित्य खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. परंतु बसस्थानकावरील भक्तनिवास इमारत संस्थानचे ताब्यात दिल्यानंतर सदरहू साहित्य बसविणेची कार्यवाही करणेत यावी. तोपर्यंत सदरहू विषय तहकूब ठेवणेत यावा, असे ठरले."

**प्रस्तावना:-** शिर्डी सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीसाठी पाणी पुरवठा होणेसाठी साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,९९,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२,९९,०००/- मात्रचे खर्चास मा.

त्रिसदस्यीय समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात आलेले होते. इकडील विभागाकडील दि.०६/०५/२०१६ रोजीचे टिपणीन्वये सदरहू काम करणेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेसाठी दरपत्रके (कोटेशन) मागविण्यात आलेली होती.

**प्रस्ताव:-** याकामी खालीलप्रमाणे दरपत्रके (कोटेशन) प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | नांव | प्रशासनशाखा आवक नं. / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | आशिष मशिनरी स्टोअर्स, नाशिक | ८२८८, दि.०९/०८/२०१६ | बंद कोटेशन |
| ०२ | न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) | ८२८९, दि.०९/०८/२०१६ | बंद कोटेशन |
| ०३ | अभय मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) | ८२९०, दि.०९/०८/२०१६ | बंद कोटेशन |
| ०४ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. | ८२९१, दि.०९/०८/२०१६ | बंद कोटेशन |
| ०५ | श्री साई ॲग्रो एजन्सी, लोणी बु. | ८२९२, दि.०९/०८/२०१६ | बंद कोटेशन |

शिर्डी सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीसाठी पाणी पुरवठा होणेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेसाठी ०५ दरपत्रके (कोटेशन) प्राप्त झालेले आहेत.

सदरहू कामी प्राप्त दरपत्रके (कोटेशन) **आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला**

| **अ.नं.** | **तपशील** | **कोटेशनमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| १ | आशिष मशिनरी स्टोअर्स, नाशिक | अपात्र |
| २ | न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) | **२,०३,५९०/-** |
| ३ | अभय मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) | २,०९,४५०/- |
| ४ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. | अपात्र |
| ५ | श्री साई ॲग्रो एजन्सी, लोणी बु. | २,३५,९२०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीसाठी पाणी पुरवठा करणेकरीता साहित्य खरेदी करणेकामी न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) यांचे रु.२,०३,५९०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**११ देणगी चार वाहनांचा विमा पॉलीसी घेणे कामी प्राप्त दरपत्रके उघडुन निर्णय घेणेबाबत.**

दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४८१ नुसार, देणगी स्वरुपात आलेल्या खालील प्रमाणे ०४ वाहनांच्या विमा पॉलिसीचे दि.३१/०३/२०१७ पर्यंत नुतनीकरण करणेसाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

| **अ.नं.** | **वाहन क्र.** | **वाहन कंपनी व प्रकार** | **देणगी पावती नं. / दिनांक** | **सध्याचे विमा पॉलिसीची अंतीम तारीख** |
|---|---|---|---|---|
| 01 | MH-17-BD-2442 | Tavera Ambulance | 28457-21.11.2015 | 02/10/2016 |
| 02 | MH-17-BD-2718 | Eicher Fire Fighter | 43380-24.03.2016 | 18/10/2016 |
| 03 | MH-17-BD-2552 | SML Samrat Truck | 29098-28.11.2015 | 19/10/2016 |
| 04 | MH-17-BD-3240 | Eicher School Bus | 43387, 43389-24.03.2016 | 05/01/2017 |

उपरोक्त निर्णयानुसार, संस्थान ०४ वाहनांच्या विमा पॉलिसीचे दि.३१/०३/२०१७ पर्यंत नुतनीकरण करणेसाठी जा.नं.एसएसएस/वाहन/२६७९/२०१६ दि.३०/०८/२०१६ रोजीचे पत्राने दि.०७/०९/२०१६ अखेर ४ राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे ४ राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

| **अ.नं.** | **विमा कंपनीचे नांव** | **आवक नं./ दिनांक** |
|---|---|---|
| ०१ | दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लिमीटेड, श्रीरामपुर | १०२०१-०५/०९/२०१६ |
| ०२ | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लिमिटेड, शिर्डी | १०२३४-०६/०९/२०१६ |
| ०३ | दि ओरिएण्टल इंश्योरेंस कम्पनी लिमिटेड, कोपरगांव | १०३०८-०७/०९/२०१६ |
| ०४ | नेशनल इन्श्योरेन्स कम्पनी लिमिटेड, कोपरगांव | १०३०९-०७/०९/२०१६ |

उपरोक्तप्रमाणे ०४ वाहनांच्या विमा पॉलिसीचे दि.३१/०३/२०१७ पर्यंत नुतनीकरण करणेकामी मुदतीत प्राप्त झालेली ०४ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | वाहन क्र. | दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लिमीटेड, श्रीरामपुर | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लिमिटेड, शिर्डी | दि ओरिएण्टल इंश्योरेंस कम्पनी लिमिटेड, कोपरगांव | नेशनल इन्श्योरेन्स कम्पनी लिमिटेड, कोपरगांव |
|---|---|---|---|---|---|
| 01 | MH-17-BD-2442 Tavera Ambulance | ५९२४/- | **५८५१/-** | ५८७८/- | ७५३३/- (मागणीप्रमाणे नाही) |
| 02 | MH-17-BD-2718 Eicher Fire Fighter | १२३५९/- | १२४१२/- | **१२३१८/-** | १४८९१/- |
| 03 | MH-17-BD-2552 SML Samrat Truck | १२३५९/- | १२८०६/- | **१२३५४/-** | १४८९१/- |
| 04 | MH-17-BD-3240 Eicher School Bus | **१६८१८/-** | ३७५४२/- | २०१३२/- | ३५८२५/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या प्रस्तावित चार वाहनांची विमा पॉलीसी घेणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,वाहन विभाग)

---

**१२ कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावर खोदाई करुन नाली तयार करुन देणेकामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडणेस मंजुरी मिळणे बाबत.**

दि.16/02/2016 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं. 72 व निर्णय क्रं.147 अन्वये, कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व टाकणेसाठी स्थानीक मजुरांकडुन खोदाई करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. 96,900/- (शहान्नव हजार नऊशे) मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन टाकणेसाठी (2 फुट खोल व 1 फुट रुंद) खोदाई करुन नाली तयार करुन देणे व पाईप लाईन झाल्यावर सदरची नाली बजुन लेव्हल करुन देणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-बगीचा/2633/2016 दि.27/08/2016 अन्वये, परिसरातील स्थानीक खोदाईमजुरांकडुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. दरपत्रके सादर करावयाची मुदत दि.02/09/2016 अखेर संपलेली असुन अद्याप पर्यंत एकुण 04 दरपत्रके प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | पार्टीचे नाव | आवक नंबर/दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | श्री शंकर बाजीराव गायकवाड, शिर्डी | 9776 - दि. 29/08/2016 | बंद लिफाफा |
| 02 | श्री अंकुश शंकरपवार, कनकुरी | 9925 - दि. 02/09/2016 | बंद लिफाफा |
| 03 | श्री सखाहारी आनंदा बोठे, राहाता | 9960 - दि. 02/09/2016 | बंद लिफाफा |
| 04 | श्री परसराम लक्ष्मण माळी, खडकेवाके | 10027 - दि.02/09/2016 | |

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले 04 दरपत्रक उघडुन सर्वात न्युनत्तम दर असलेल्या दरपत्रकधारकाकडुन कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावर झाडांना पाणी देणेकामी नविन पाईप लाईन टाकणेसाठी साधारणत: 2 फुट खोल व 1 फुट रुंद खोदाई करुन नाली तयार करुन देणे व पाईप लाईन टाकलेनंतर सदरची नाली बुजुन लेव्हल करुन देण्याचे काम करुन घेता येईल.

उपरोक्त ०४ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र | पार्टीचे नाव | दरपत्रकामधील मुळ दर प्रती फुट रु. |
|---|---|---|
| 01 | श्री शंकर बाजीराव गायकवाड, शिर्डी | २५/- |
| 02 | श्री अंकुश शंकर पवार, कनकुरी | २०/- |
| 03 | श्री सखाहारी आनंदा बोठे, राहाता | **१०/-** |
| 04 | श्री परसराम लक्ष्मण माळी, खडकेवाके | १९/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी श्री.सखाहारी आनंदा बोठे, राहाता यांचे प्रति फुट रु.१०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

१३ **कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व ड्रिप नळ्या टाकणेकामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडणेस मंजुरी मिळणेबाबत.**

दि.16/02/2016 रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं. 71 व निर्णय क्रं.146 अन्वये, कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील आंबा व नारळ झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व ड्रिप नळ्या खरेदी करणेकामी कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या रु. 2,95,000/- (दोन लाख पंच्यान्नव हजार) मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व ड्रिप नळ्या टाकणेबाबत जनसंपर्क विभागामार्फत दि. 10/08/2016 रोजी वर्तमान पत्रात शासकिय दराने जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. कोरे निवीदा अर्ज विक्री दि. 19/08/2016 रोजी संपलेली असुन एकुण 5 निवीदांची विक्री झालेली आहे. तसेच सिलबंद निवीदा सादर करावयाची मुदत दि.20/08/2016 अखेर संपलेली असुन अद्याप एकुण 03 निवीदा प्राप्त झालेल्या आहे.

प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | पार्टीचे नाव | आवक नंबर/दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | एल.टी. जाधव कार्पोरेशन, कोळपेवाडी | 8917 - दि. 20/08/2016 | बंद लिफाफा |
| 02 | अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी | 8921 - दि. 20/08/2016 | बंद लिफाफा |
| 03 | साई लॅण्डस्केप ॲण्ड गार्डन डेव्हलोपर्स, नांदुर्खी, शिर्डी | 8922 - दि. 20/08/2016 | बंद लिफाफा |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली 03 दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| अ.क्र | पार्टीचे नाव | दरपत्रकामधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| 01 | एल.टी. जाधव कार्पोरेशन, कोळपेवाडी | २,९३,६१८/- |
| 02 | अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी | **२,८२,०९४/-** |
| 03 | साई लॅण्डस्केप ॲण्ड गार्डन डेव्हलोपर्स, नांदुर्खी (शिर्डी) | ३,०९,७९६/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व ड्रिप नळ्या टाकणेचे काम करुन घेणेसाठी श्री.अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी यांचे एकत्रित रु.२,८२,०९४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

१४ **इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकरिता गोदरेज टेबल खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडणेबाबत.**

संदर्भ – मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.०६.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३४

अधिनियम २००४ मधील तरतुद- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमामधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविक – अ) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागातील वर्गात वापरणेकामी सनमायका टॉप गोदरेज टेबल T 8 नग ८ तसेच ऑफिस टेबल T 9 नग २ असे एकुण नग १० गोदरेज टेबल खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १,३२,०००/-(अक्षरी रुपये एक लाख बत्तीस हजार ) मात्र चे खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे दि. १४.०६.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३४ नुसार मान्यता मिळालेली होती.

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करिता गोदरेज टेबल खरेदी करणेकामी दि. ११.०२.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये इकडील जा.नं.एसएसएस/वशी/इं.मि.स्कुल/२२०२/२०१६ दि. ०१.०८.२०१६ नुसार दि. १८.०८.२०१६ पर्यंत कोटेशन मागणी करणेत आलेले होते.त्यास अनुसरुन मुदतीअंती ०४ दरपत्रकांची बंद पाकिटे प्राप्त झालेली आहे. त्यांचा तपशिल खलीलप्रमाणे –

| अ.नं. | कोटेशन धारकांचे नांव | आवक नंबर/दिनांक | पाकिट |
|---|---|---|---|
| १. | आर.टी.कराचीवाला, अ.नगर | ८५१८/१२.०८.२०१६ | बंद पाकिट |
| २. | खंडेलवाल स्टील फर्निचर, अ.नगर | ८७७८/१८.०८.२०१६ | बंद पाकिट |
| ३. | रोहन एन्टरप्रायजेस, अनगर. | ८७७७/१८.०८.२०१६ | बंद पाकिट |
| ४. | साई एन्टरप्रायजेस, श्रीरामपूर | ८७७६/१८.०८.२०१६ | बंद पाकिट |

विभागाचा अभिप्राय- उपरोक्त प्राप्त कोटेशन्स मा.उपसमितीचे सभेत उघडणेकामी सादर करावे लागतील असे मत आहे.

श्री साईबाबा इं.मि.स्कुल विभागाकरिता गोदरेज टेबल खरेदीकामी प्राप्त झालेली ०४ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | तपशील | आर.टी.कराचीवाला, अ.नगर | साई एन्टरप्रायजेस, श्रीरामपूर | रोहन एन्टरप्रायजेस, अनगर. | खंडेलवाल स्टील फर्निचर, अ.नगर |
|---|---|---|---|---|---|
| | | दर प्रती नग रु. | | | |
| 01 | गोदरेज टेबल, सनमायका टॉप, T8 ८ नग | ११,४५८/- | १०,९९९/- | **१०,६९०/-** | १२,०००/- |
| 02 | गोदरेज टेबल, सनमायका टॉप, T9 २ नग | १७,८५०/- | १६,९९९/- | **१६,६५०/-** | १८,८००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकरिता आवश्यक असलेलेगोदरेज टेबल खरेदी करणेकामी रोहन एन्टरप्रायजेस, अहमदनगर यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्या, इंग्लिश मिडीअम स्कुल)

---

१५ **फोम कंपाऊंड (AFF-3%) वार्षिक खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत.**

फायर विभागाचे अग्निशमन वाहनासाठी फोम कंपाऊड (AFF- 3%) वार्षिक टेंडर पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अदांजे रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये– एक लाख) मात्रचे खर्चास मा.व्य.समितीचे दि.१४.०६.२०१६ रोजीचे विषय नं.३९ व निर्णय क्रं.३६० नुसार मान्यता मिळालेली आहे.

फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे अग्निशमन वाहनासाठी फोम कंपाऊड वार्षिक खरेदीकामी इकडील जा.न.एसएसएस/ फायर सेफ्टी/१८०/२०१६ दि.०५.०८.२०१६ नुसार कोटेशन मागणी करण्यात आलेले होते.त्यांची अंतीम मुदत दि.३१.०८.२०१६ अशी ठेवण्यात आलेली होती.त्यासअनुसरुन मुदतीअंती बंद पाकिटामध्ये प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं | कोटेशन धारकाचे नाव | आवक नंबर/ दिनांक | पाकिट |
|---|---|---|---|
| ०१ | युनियन ट्रेडींग, नाशिक | ९४८१/२६.०८.२०१६ | बंद पाकिट |
| ०२ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक | ९६४४/२६.०८.२०१६ | बंद पाकिट |
| ०३ | के.व्ही.फायर केमीकल्स , मुंबई | ९८१९/२९.०८.२०१६ | बंद पाकिट |
| ०४ | फायर फॉक्स सेफ्टी कार्पोरेशन,मुंबई | ९९३३/३१.०८.२०१६ | बंद पाकिट |
| ०५ | रॅपीड सिटी सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस ,पुणे | ९९४५/३१.०८.२०१६ | बंद पाकिट |

तरी फायर विभागाचे अग्निशमन वाहनासाठी फोम कंपाऊड (AFF-3%) वार्षिक टेंडर पध्दतीने खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडणे व न्युनतम दरधारकास कार्योदेश देणेकामी निर्णयार्थ सादर.

फायर विभागाचे अग्निशमन वाहनासाठी फोम कंपाऊड (AFF-3%) वार्षिक टेंडर पध्दतीने खरेदीकामी प्राप्त झालेली ०५ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं | कोटेशनधारकाचे नाव | दरपत्रकामधील मुळ दर सर्व करांसहीत प्रती लिटर रु. |
|---|---|---|
| ०१ | युनियन ट्रेडींग, नाशिक | ८७.७५ |
| ०२ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक | ९२.२५ |
| ०३ | के.व्ही.फायर केमीकल्स , मुंबई | ६२.६५ |
| ०४ | फायर फॉक्स सेफ्टी कार्पोरेशन,मुंबई | ५८.५० |
| ०५ | रॅपीड सिटी सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, पुणे | **५७.८०** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर विभागाचे अग्निशमन वाहनासाठी फोम कंपाऊड (AFF-3%) वार्षिक टेंडर पध्दतीने खरेदीकामी रॅपीड सिटी सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, पुणे यांचे सर्व करांसहीत प्रती लिटर रु.५७.८० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- फायर ॲन्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

१६ **श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी प्राप्त ई-निविदाचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 02/04/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 245 अन्वये श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 4,00,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर जाहीरात दिनांक 13/06/2016 रोजी अपलोड करण्यात आली होती व ई-निविदा अपलोड करुन संस्थानकडे पाठविण्यात मुदत दिनांक 21/06/2016 अशी देण्यात आली होती. या मुदतीत 4 निविदाधारकांकडून ई-निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्यामुळ प्रती मुदतीत बंद पाकीटामध्ये प्राप्त झाल्या होत्या. सदर ई-निविदेतील तांत्रिक बीड दिनांक 21/07/2016 रोजी प्रशासकीय अधिकारी व वरिष्ठ लेखापाल, अंतर्गत लेखापरिक्षण विभाग यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केलेनंतर त्यामध्ये खालील 3 निविदाधारक पुर्वपात्रता निकषांची पुर्तता केल्याने पात्र झाले आहेत :

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | 3. | Kailash Refrigeration Works, Mumbai |
| 2. | A.J. Enterprises, Mumbai | | |

उपरोक्तप्रमाणे 3 पात्र ई-निविदांधारकांचे कमर्शियल बीड पुढील कार्यवाहीकरीता मा. उप-समितीचे सभेपुढे उघडणे आवश्यक आहे.

तरी श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी पात्र 3 निविदांधारकांचे कमर्शियल बीड आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| अ.नं | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | Kailash Refrigeration Works, Mumbai | ३,८८,६००/- |
| ०२ | A.J. Enterprises, Mumbai | ४,५४,०००/- |
| ०३ | Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | **३,८१,१७१/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune यांचे रु.३,८१,१७१/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१७ **साईभक्तांना श्रीसाईबाबांचे Live दर्शन होणेसाठी विविध ठिकाणी LED Display बसविणेसाठी प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी मटेरिअल खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन्स उघडणेबाबत.**

बांधकाम विभागाचे मागणीप्रमाणे साईभक्तांना श्रीसाईबाबांचे Live दर्शन होणेसाठी विविध ठिकाणी LED Display बसविणेसाठी 6 नग प्लॅटफॉर्म तयार करणेकामी आवश्यक मटेरिअल इकडील विभागाकडे तसेच भांडार विभागाकडे नसल्याने विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 69,200/- मात्रचे खर्चाचे प्रस्तावास दिनांक 14/06/2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतीन निर्णय क्र. 350 नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/72/2016 दिनांक 25 ऑगष्ट, 2016 अन्वये 10 पुरवठाधारकांना मटेरिअल पुरविणे याकामी कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होती. या पत्रामध्ये संस्थानकडे कोटेशन पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक 02/09/2016 अशी देण्यात आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 5 पुरवठाधारकांकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत:

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Sheetal Sales Corporation, Sakuri (Rahata) | 9440 | 25/08/2016 |
| 2. | Bhansali Motors, Sakuri (Rahata) | 9441 | 25/08/2016 |
| 3. | Rajlaxmi Steel Tranders, Rahata | 9671 | 26/08/2016 |
| 4. | Vijsun Engineerings Pvt. Ltd., | 9821 | 30/08/2016 |
| 5. | Maheshwari Steel Traders, Babhaleshwar | 10055 | 02/09/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे 5 पुरवठादारांकडून कोटेशन्स फॅब्रिकेशन मटेरिअल खरेदीकामी प्राप्त झालेली आहेत.

तरी साईभक्तांना श्रीसाईबाबांचे Live दर्शन होणेसाठी विविध ठिकाणी LED Display बसविणेसाठी प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी मटेरिअल खरेदी करणेकामी प्राप्त झालेली ५ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशन्समधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | शितल सेल्स कार्पोरेशन, साकुरी | ९९,८००/- |
| 2. | माहेश्वरी स्टील टेडर्स, बाभळेश्वर | **७९,२००/-** |
| 3. | राजलक्ष्मी स्टील, राहाता | ९८,६००/- |
| 4. | भनसाळी मोटार्स, साकुरी | ९६,५७६/- |
| 5. | विजसन इंजिनिअरींग प्रा., कोकमठाण | ९५,२३५/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना श्रीसाईबाबांचे Live दर्शन होणेसाठी विविध ठिकाणी LED Display बसविणेसाठी प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी आवश्यक मटेरिअल खरेदीकामी माहेश्वरी स्टील टेडर्स, बाभळेश्वर यांचे रु.७९,२००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**१८ साईभक्तांचे सुविधेकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान येथील क्लोकरुमकरीता लोखंडी रॅक बनविणेकामी फॅब्रिकेशन मटेरिअल खरेदीकरीता प्राप्त कोटेशन्स उघडणेबाबत.**

साईभक्तांचे सुविधेकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान येथील क्लोकरुमकरीता 50 लोखंडी रॅक बनविणेकामी फॅब्रिकेशन मटेरिअल खरेदी करणेकामी बाहेरील पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 1,49,000/- मात्र खर्चाचे प्रस्तावास दिनांक 06/05/2016 रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय क्र. 281 नुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 1742/2016 दिनांक 8 जुलै, 2016 अन्वये 10 पुरवठाधारकांना दर कळविणेबाबत पत्रे पाठविण्यात आली होती. त्याची मुदत दिनांक18/07/2016 पर्यंत देण्यात आली होती. या मुदतीत फक्त दोन कोटेशन्स प्राप्त झाली. कोटेशनची कार्यवाही करणेकरीता कमीत कमीत तीन कोटशन्सची आवश्यकता असल्याने, फेर जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 2392/ 2016 दिनांक 11 ऑगष्ट, 2016 अन्वये 10 पुरवठाधारकांना दर कळविणेबाबत पत्रे पाठविण्यात आली. त्याची मुदत दिनांक 23/08/2016 अशी देण्यात आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 4 पुरवठाधारकांकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Sai Sarthak Steel Tranders, Sakuri | 8955 | 20/08/2016 |
| 2. | Maheshwari Steel Traders, Babhaleshwar | 8956 | 20/08/2016 |
| 3. | Rajlaxmi Steel, Rahata | 9108 | 22/08/2016 |
| 4. | Bhansali Motors, Sakuri | 9109 | 22/08/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे 4 कोटेशन फॅब्रिकेशन मटेरिअल पुरविणेकामी प्राप्त झालेली आहेत.

साईभक्तांचे सुविधेकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान येथील क्लोकरुमकरीता 50 लोखंडी रॅक बनविणेकामी फॅब्रिकेशन मटेरिअल खरेदी करणेकामी प्राप्त झालेली ४ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशन्समधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | श्री सार्थक स्टील टेंडर्स, साकुरी | १,१५,९००/- |
| 2. | माहेश्वरी स्टील टेडर्स, बाभळेश्वर | **१,०८,४२५/-** |
| 3. | राजलक्ष्मी स्टील, राहाता | १,१७,५७५/- |
| 4. | भनसाळी मोटार्स, साकुरी | १,१४,५२५/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे सुविधेकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान येथील क्लोकरुमकरीता ५० लोखंडी रॅक बनविणेकामी फॅब्रिकेशन मटेरिअल खरेदी करणेकरीता माहेश्वरी स्टील टेडर्स, बाभळेश्वर यांचे रु.१,०८,४२५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१९ **अभिलेख कक्षाकरीता नवीन ४ नग स्प्लिट ए.सी. खरेदीकामी प्राप्त फेर कोटेशन उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 15/12/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र.613 अन्वये अभिलेख कक्षाकरीता नविन 4 नग स्प्लिट ए.सी. खरेदीकामी येणा-या अपेक्षित रुपये 2,20,000/- खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार खालील 7 पुरवठादारांकडून जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 6146/2016 दिनांक 8 फेब्रुवारी, 2016 चे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले होते. प्राप्त कोटशन उघडून शितल एअर कडीशनर्स, राहुरी यांचे प्रती नग रुपये 36,800/- मात्रचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी उप-समितीचे शिफारस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 02/04/2016 रोजीचे बैठकीतील निर्णय क्र. 204(8) अन्वये मान्य करण्यातआली.

वरील मान्यतेनुसार इकडील जा.क्र. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 778/ 2016 दिनांक 20/05/2016 रोजीचे पत्रान्वये निम्नतम दरधारक मे. शितल एअर कडीशनर्स, राहुरी यांना 4 नग ए.सी. पुरविणेकामी कार्यादेश देण्यात आला होता. यावर दिनांक 24/05/2016 रोजीचे पत्रान्वये मे. शितल एअर कडीशनर्स, राहुरी यांनी एप्रिल 2016 पासून ए.सी. दरात वाढ झालेली असलेने दिनांक 09/02/2016 रोजी दिलेल्या जुने दरात 4 नग ए.सी पुरवठा करु शकत नसलेबाबत कळविले होते. मे. शितल एअर कडीशनर्स, राहुरी यांनी ए.सी. पुरवठा करणेस नकार दिलेला असलेने त्यांचे लेखाशाखेत जमा असलेले ई.एम.डी. (बयाना) रक्कम रुपये 5,000/- मात्र जप्त करण्यात आली. तसेच न्युनतम (L1) दरधारक मे. शितल एअर कडीशनर्स, राहुरी यांचे प्रती नग दर रक्कम रुपये 36,800/- व L2 दरधारक मे. कुलब्रीज, पुणे यांचे प्रती नग दर रक्कम रुपये 48,150/- यामध्ये जादा तफावत असलेने आवश्यक 4 नग ए.सी. पुरविणेकामी नव्याने दरपत्रक मागविण्यात दिनांक 3 जून, 2016 चे टिपणीने मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/1401/2016 दिनांक 23 जून, 2016 अन्वये 5 पुरवठाधारकांना मटेरिअल पुरविणे याकामी कोटेशन मागविणेबाबत पत्रे पाठविण्यात आली होती. तसेच कोटेशन देणेकरीता दिनांक 16/07/2016 अखेर पर्यंत मुदत देण्यात आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 4 पुरवठाधारकांकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत:

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमाक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Works, Mumbai | 6038 | 05/07/2016 |
| 2. | Cool Breeze, Pune | 6196 | 07/07/2016 |
| 3. | Shree Venkateshwara Turnkey Project Solution Pvt. Ltd., Pune | 6776 | 16/07/2016 |
| 4. | Lucky Refrigeration, Nashik | 6796 | 16/07/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे स्प्लिट ए.सी. खरेदीकामी 4 कोटेशन प्राप्त झालेली आहेत.

अभिलेख कक्षाकरीता नविन 4 नग स्प्लिट ए.सी. खरेदीकामी प्राप्त झालेली ४ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशन्समधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | **१,७८,०००/-** |
| 2. | कुलब्रीज, पुणे | १,९०,४००/- |
| 3. | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे | २,१३,६००/- |
| 4. | लकी रेफ्रिजरेशन, नाशिक | २,००,८००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अभिलेख कक्षाकरीता नविन ४ नग स्प्लिट ए.सी. खरेदीकामी कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे रु.१,७८,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२० **श्री साई प्रसादालयाचे कार्यालयातील दरवाजाकरीता एअर कर्टन बसविणेकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालयाचे कार्यालयामध्ये स्प्लिट ए.सी. बसवून कार्यरत आहेत. वातानुकूलीत असलेले ठिकाण हे पुर्णपणे बंदिस्तअसणे आवश्यक असते. तरच त्या ठिकाणची वातानुकूलीत यंत्रणा सुस्थितीत कार्य करु

शकते. अन्यथा सदर यंत्रणा लोडवर राहून वारंवार नादुरुस्त होत असते. यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 16/02/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 131 अन्वये श्री साई प्रसादालयाचे दक्षिणे बाजूचे दरवाजाला एअर कर्टन बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रुपये 48,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार 7 पुरवठादारांकडून जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 888/ 2016 दिनांक 27 मे, 2016 चे पत्रान्वये पुरवठादारांना कोटेशन्स देणेबाबत कळविण्यात आले होते व कोटेशन पोहच करणेकरीता 18/06/2016 अखेर पर्यत मुदत देणेत आली होती. सदर मुदतीत फक्त Russel Airflow Systems Pvt. Ltd., Mumbai यांचे एकच कोटेशन प्राप्त झाले होते. लेखापरिक्षणाच्यादृष्टीने कमीत कमी 3 कोटेशन आवश्यक असलेने Russel Airflow Systems Pvt. Ltd., Mumbai यांचे कोटेशन ग्राह्य ठेवून, जा. नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 65/2016 दिनांक 19 जून, 2016 अन्वये पुन्हा कोटेशन मागविण्यात आली. कोटेशन पोहच करण्याची मुदत दिनांक 30/06/2016 अखेर देण्यात आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 4 पुरवठाधारकांकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमाक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Russel Airflow Systems Pvt. Ltd., Mumbai | 4223 | 09/06/2016 |
| 2. | Shri Venkateshwara Trunkey Project Solution Pvt. Ltd., Pune | 5375 | 24/06/2016 |
| 3. | Air Cool, Pune | 5392 | 25/06/2016 |
| 4. | G.M. Refrigeration & Air Conditioning, Pune | 5393 | 25/06/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे एअर कर्टन बसविणेकामी 4 कोटेशन प्राप्त झालेली आहेत.

श्री साई प्रसादालयाचे दक्षिण बाजूचे दरवाजाला एअर कर्टन बसविणेकामी प्राप्त झालेली ४ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव** | **कोटेशन्समधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| 1. | रुसेल एअर फ्लो सिस्टीम्स प्रा.लि., मुंबई | **२२,८०५/-** |
| 2. | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे | ३९,६७०/- |
| 3. | एअर कुल, पुणे | ४१,५७१/- |
| 4. | जी.एम. रेफ्रिजरेशन ॲण्ड एअर कंडीशनिंग, पुणे | ४३,३७३/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे दक्षिण बाजूचे दरवाजाला एअर कर्टन बसविणेकामी रुसेल एअर फ्लो सिस्टीम्स प्रा.लि., मुंबई यांचे रु.२२,८०५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२१ **श्री साईबाबा हॉस्पीटलचे आयसोलेशन रुमसाठी नविन २ नग स्प्लिट ए.सी. खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयामध्ये असलेल्या टी.एस.आर. वार्ड मधील रुम नं 7 व 8 हे आयसोलेशन रुम म्हणून नव्याने बनविण्यात आले असून, सदर रुमध्ये स्वाईन फ्लु सारखे पेशंट व आवश्यक मशीनरी स्वतंत्र ठेवणे गरजेचे असल्यामुळे दोन्ही रुममध्ये 2 स्प्लिट ए.सी. बसविणे आवश्यक आहे. यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 16/02/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 136 अन्वये 2 ए.सी. खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रुपये 96,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 884/2016 दिनांक 27 जुन, 2016 चे पत्रान्वये 7 पुरवठादारांकडुन कोटेशन बोलवण्यात आली होती. तसेच कोटेशन देणेकरीता दिनांक 16/07/2016 अखेर पर्यंत मुदत देणेत आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 4 पुरवठाधारकांकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमाक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Works, Mumbai | 6037 | 05/07/2016 |
| 2. | CoolBreeze, Pune | 6197 | 07/07/2016 |
| 3. | Shri Venkateshwara Trunkey Project Solution Pvt. Ltd., Pune | 6341 | 09/07/2016 |
| 4. | Lucky Refrigeration, Nashik | 6795 | 16/07/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे स्प्लिट ए.सी. खरेदीकामी 4 कोटेशन प्राप्त झालेली आहेत.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटलचे आयसोलेशन रुमसाठी नविन 2 नग स्प्लिट ए.सी. खरेदीकामी प्राप्त झालेली ४ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशन्समधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | ८९,६००/- |
| 2. | कुलब्रीज, पुणे | **८७,७००/-** |
| 3. | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे | १,०३,५००/- |
| 4. | लकी रेफ्रिजरेशन, नाशिक | ९२,४००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलचे आयसोलेशन रुमसाठी नविन २ नग स्प्लिट ए.सी. खरेदीकामी कुलब्रीज, पुणे यांचे रु.८७,७००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२२ **कोजागिरी पौर्णिमाबाबत.**

अध्यक्ष, डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट, कुर्ला, मुंबई यांनी शनिवार दि३० ऑगस्ट २०१६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, गेली ८६ वर्ष डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साई सेवा ट्रस्टच्यावतीने कोजागिरी पौर्णिमेनिमित्ताने साई मंदीरात आणि मंदीराच्या आवारात साईभक्तांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात येतात. सायंकाळी ७ ते ११ वा पर्यत साई मंदीरात तसेच शेजारती संपन्न झाल्यानंतर साई मंदिराच्या परिसरात पहाटेपर्यंत विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येते. आजमितीपर्यंत ही परंपरा अखंडितपणे सुरु आहे. ती शिर्डी संस्थानने दिलेल्या सहकार्यामुळेच हे नमुद करण्यास आनंद आणि अभिमान वाटतो.

यंदाही कोजागिरी पौर्णिमे निमित्ताने शनिवार १५ ऑक्टोबर,२०१६ रोजी अशाच स्वरुपाचे कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळावी. यासाठी हे विनंतीवजा पत्र विचार विनिमयासाठी आपल्याला देत आहोत. कोजागिरी पौर्णिमेच्या उत्सवासाठी शिर्डी संस्थानच्या वतीने पुढील गोष्टीचे आम्हांला सदैव सहकार्य लाभले आहे. या पत्राव्दारे यंदाही उत्सवासाठी पुढील सोयी उपलब्धतेची अपेक्षा करत आहोत.

| अ.न | तपशिल | संस्थानला करावा लागणारा खर्च |
|---|---|---|
| १. | कोजागिरी पौर्णिमेनिमित्ताने शनिवार ,१५ ऑक्टोबर, २०१६ रोजी सायं ७ ते ११ पर्यत प्रथेप्रमाणे साई मंदीरात सायं.७ ते रात्रौ.११ पर्यत भजन, प्रवचन भक्तीगीते पारंपारीक लोकगीते सादर करण्यासाठी परवानगी देणे. तेथे ध्वनीक्षेपक व इतर सुविधा उपलब्ध करणे.<br>साई मंदीराच्या आवारात सुप्रसिध्द निर्माते श्री.संतोष लांबोरे हे मराठी रंगभूमी, दुरचित्रवाणी व चित्रपट क्षेत्रातील नामवंत कलाकारांच्यासोबतीने '**सलाम लावणीला**' असा बहुढंगी कार्यक्रम सादर करणार आहेत.<br>सदर कार्यक्रमासाठी त्यांनी रंगमंच,प्रकाश,ध्वनी योजना इ. सुविधा मिळणेस विनंती केलेली आहे.<br>१) निवास व्यवस्थेसाठी सुमारे २० खोल्या व ०२ हॉल उपलब्ध करणे त्यांच्यासाठी गाद्या व चादरी त्याचप्रमाणे पांधरुण इ. उपलब्ध करणे.<br>२) गतसाली २०१५ साली कोजागिरी पौर्णिमेनिमित्त भंडाऱ्यासाठी मंगल कार्यालयाची जागा (तळमजला ) देण्यात आली होती. यंदाही हीच जागा आमच्या सेवा मंडळाला उपलब्ध करुन देण्यात यावी. | सशुल्क निवास व्यवस्था<br><br>सशुल्क व्यवस्था |
| | ३) साईमंदीरात सायं. ७ ते रात्रौ.११ पर्यत भजन, प्रवचन भक्तीगीते पारंपारीक लोकगीते सादर करण्यासाठी परवागी देणे. तेथे ध्वनीक्षेपक व इतर सुविधा उपलब्ध करणे.<br>४) ४०X५० फुट या मापाचा रंगमंच कार्यक्रमाच्या ठिकाणी कलाकारांना वेशभूषा व रंगभूषा करण्यासाठी स्त्री व पुरुष कलाकारांसाठी वेगवेगळया बंदिस्त जागा उपलब्ध करुन द्यावे. या दोन्ही दालनात १० ते १५ प्लास्टीक खुर्च्या, आरसा, प्रखर दिव्यांची सुविधा आणि फॅनची सोय करण्यात यावी.<br>कार्यक्रमाच्या ठिकाणी रंगमंचाजवळ १० ते १५ प्लास्टिक खुर्च्या त्याच बरोबर ४ टेबल्स उपलब्ध करावे.<br>५) सर्व कलाकार व साईभक्तांसाठी कोजागिरी निमित्ताने संस्थानच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या मसाले दूध व बसण्याची व्यवस्था उपलब्ध करणे. | रु. ५०,०००/- मात्र स्टेज, मेकअप रुम व बैठकव्यवस्थेसाठी खर्च (नियमा नुसार विद्युत आकार भरुन घेऊन) संस्थान मार्फत मोफत. |

सुरुवातीपासून दरवर्षी स्टेज, मेकअपरुम, बैठकव्यवस्था, ध्वनीक्षेपन व्यवस्था, कलाकारांना चहा इ. संस्थानमार्फत करण्यात येते. तसेच त्यांची नेहमीप्रमाणे सशुल्क भोजन व निवास व्यवस्था व वीज वापर ५ केव्ही पेक्षा जास्त असेल तर वीज पुरवठयाची व्यवस्था संबधीत आयोजकांनी स्वतः करावयाची आहे. जर वीज वापर ५ केव्ही पेक्षा कमी असेल तर आयोजकाकडून डिपॉझीट म्हणून रक्कम रु.३०००/- भरुन घेणे (महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या चालू आकारा नुसार) वापरलेले वीजेचे बील देऊन डिपॉझीट मधून या बीलाची रक्कम वजा करुन घेऊन राहिलेली रक्कम त्यांना परत करता येईल.

मागील वर्षी सदरचा कार्यक्रम १६ गुंठे जागेत घेण्यात आला होता.कोजागिरी पौर्णिमेस रात्रौ. शेजारती नंतर समाधी मंदिर बंद होते व सदरचा कार्यक्रम हा रात्रभर असतो त्यामुळे यावर्षी देखील सदर कार्यक्रम १६ गुंठे जागेत करता येईल.

सालाबाद प्रमाणे अध्यक्ष, डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट, मुंबई यांना उपरोक्त प्रमाणे कार्यक्रम करणेस परवानगी देणेबाबत स्टेज, मेकअपरुम, बैठकव्यवस्था, इ. साठी अंदाजे रु.५०,०००/- खर्चास मान्यता असावी.

सदर कार्यक्रम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा नसुन अध्यक्ष डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट ई/ १०४ पामलेकर्स, को.ऑप.हौ.सोसायटी, महात्मा फुले रोड, मुलुंड (पूर्व) मुंबई-४०००८१ या ट्रस्ट मार्फत साजरा केला जातो. तरी स्टेज, मेकअपरुम, बैठक व्यवस्था, इ.साठीचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे याही वर्षी डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट, मुंबई यांना कोजागीरी पौर्णिमेनिमित्तमे साईभक्तांसाठी गेट नं.३ समोरील १६ गुठे जागेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे येणाऱ्या अंदाजे रु.५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्त वाचुन कायम करत असताना, कोजागीरी पौर्णिमेनिमित्ताने साईभक्तांसाठी गेट नं.३ समोरील १६ गुठे जागेमध्ये सलाम लावणीला या कार्यक्रमाऐवजी धार्मिक कार्यक्रम सादर करणेबाबत डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट, मुंबई यांना कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-०५)

---

**२३ संस्थान आस्थापना वरील, मेकॅनिकल, ध्वनीक्षेपन व टेलीफोन, बगीचा, विद्युत विभाग, सीसीटिव्ही कंट्रोल सेल, पाणीपुरवठा, फायर ॲण्ड सेफ्टी व माहिती तंत्रज्ञान मधील काही कर्मचाऱ्यांना गणवेश शिवणेबाबत.**

संस्थान आस्थापनावरील कायम कर्मचारी प्रशासकीय अधिकारी, अधिक्षक विभाग प्रमुख, लिपीक , मदतनीस, आरोग्य विभागाकडील कर्मचारी पहारेकरी, तांत्रींक पदावरील कर्मचारी इत्यादिंना संस्थान मार्फत प्रत्येकी ०२ गणवेश देण्यात येतात.

सन २०१५ मध्ये संस्थान मधील पदनिहाय वर्गवारीनुसार गणवेश शिलाई करून देण्यात आलेले आहे. तथापि, गणवेश आर.के.कलेक्शन, नाशिक यांचेकडुन फायर ॲण्डसेफ्टी व मेकॅनिकल, ध्वनीक्षेपन व टेलीफोन, बगीचा, विद्युत विभाग, सीसीटिव्ही कंट्रोल सेल, पाणीपुरवठा , माहीती व तंत्रज्ञान मधील तांत्रीक काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाई करून देण्यात आलेले आहे.

नेव्ही ब्ल्यु (NEAVY BLUE) रंगाचे आवश्यक असणारे कापड देणगीदार साईभक्त श्री. साई दत्त/ बसवाराजप्पा/ बाल सुब्रामनी, मुंबई या साई भक्तांनी सियाराम कपंनीचे शर्टसाठी (स्काय ब्ल्यु कलर) ७२५ मीटर कापड व पॅन्ट साठी (डार्क ब्ल्यु कलर) ४५० मीटर कापड देणगी स्वरुपात देणगी पावती नं.४०२६४ दि.२४/०२/२०१६ ने संस्थानला दिलेले आहे.सदरचे कापड संरक्षण विभागाचे ताब्यात आहे.

मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांच्या दि.०९/०३/२०१६ रोजी संस्थान आस्थापना वरील वाहन चालकांसाठी व अधिक्षक, प्र.अधिक्षक, विभाग प्रमुख देणगी स्वरुपात संस्थानकडे असलेले नेव्ही ब्ल्यु (NEAVY BLUE) रंगाचे कापड वापरुन गणवेश शिलाई करणेबाबत तोंडी निर्देश दिलेले होते. त्याप्रमाणे वाहन विभागातील ३१ वाहनचालकांना ६२ गणेवश शिवण्यात आलेले आहेत. सदर कर्मचाऱ्यांना शर्टसाठी १५५ मीटर कापड व पॅन्टसाठी ७४ मीटर कापड लागले आहे.

दि. १४/०५/२०१६ चे प्रस्तावानुसार देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या कापडातून शर्ट ( स्काय ब्ल्यु कलर) ११७ मिटर कापड व पॅन्टसाठी (डार्क ब्ल्यु कलर ) ६३ मिटर असलेले कापड प्र. अधिक्षक, अधिक्षक, विभाग प्रमुख यांचेसाठी गणवेश शिलाई करणेस ,वापरणेस गणवेश शिवणेकामी येणाऱ्या अंदाजे रू. १८,०००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

परंतु कापड जास्त प्रमाणात शिल्लक राहत असल्यामुळे प्र. अधिक्षक, अधिक्षक, विभाग प्रमुख यांचे ऐवजी फायर ॲन्ड सेफ्टी व मेकॅनिकल, ध्वनीक्षेपन व टेलीफोन, बगीचा, विद्युत विभाग, सीसीटिव्ही कंट्रोल सेल, पाणीपुरवठा , माहीती व तंत्रज्ञान मधील तांत्रीक काम करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांचे गणवेश शिलाई करून घेतल्यास शर्ट ( स्काय ब्ल्यु कलर) ५६२ मिटर कापड व पॅन्टसाठी ( डार्क ब्ल्यु कलर ) ३०० मिटर कापड शिलाई करणेसाठी लागेल. किरकोळ प्रमाणात अंदाजे ०७ मिटर शर्ट कापड व पॅन्टचे ७६ मिटर कापड शिल्लक

राहील. सदर कापड कर्मचा-यांचे कपडे शिवून झाल्यानंतर उरल्यास कापडकोठी विभागामार्फत विक्री करता येईल.

ड्रेस शिवणेकामी विभागीय कर्मचारी संख्येचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं. | विभागाचे नांव | कर्मचारी संख्या | ड्रेस संख्या | दोन शर्टसाठी लागणा-या कापडाचा तपशिल (मी.) | शर्टसाठी लागणारे एकूण कापड (मी.) | दोन पॅन्ट साठी लागणा-या कापडाचा तपशिल (मी.) | पॅन्ट साठी लागणारे एकूण कापड (मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | फायर ॲण्ड सेफ्टी ( मदतनीस) | १४ | ०२ | ४.५० | ६३.०० | २.४० | ३३.६० |
| ०२ | मॅकेनिकल विभाग ( मेकॅनिक सहाय्यक, एसी मेकॅनिकल,टर्नर,फिटर,वेल्डर) | १६ | ०२ | ४.५० | ७२.०० | २.४० | ३८.४० |
| ०३ | ध्वनीक्षेपण व टेलिफोन (तारतंत्री,दुरध्वनी) | १० | ०२ | ४.५० | ४५.०० | २.४० | २४.०० |
| ०४ | बगीचा विभाग (माळी) | ०१ | ०२ | ४.५० | ४.५० | २.४० | २.४० |
| ०५ | विद्युत विभाग (तारतंत्री) | ५१ | ०२ | ४.५० | २२९.५० | २.४० | १२२.४० |
| ०६ | सी.सी.टिव्ही विभाग (सीसीटिव्ही ऑपरेटर) | ०१ | ०२ | ४.५० | ४.५० | २.४० | २.४० |
| ०७ | बांधकाम विभाग (गवंडी, सुतार) | ०४ | ०२ | ४.५० | १८.०० | २.४० | ९.६० |
| ०८ | पाणी पुरवठा (प्लंबर, तारतंत्री, पंप ऑपरेटर, फिल्टर ऑपरेटर) | २५ | ०२ | ४.५० | ११२.५० | २.४० | ६०.०० |
| ०९ | माहिती व तंत्रज्ञान विभाग (तांत्रीक सहाय्यक हार्डवेअर/ सॉफ्टवेअर) | ०३ | ०२ | ४.५० | १३.५० | २.४० | ७.२० |
| | एकूण | १२५ | १८ | ४०.५० | ५६२.५० | २१.७० | ३००.०० |

यापुर्वी मे.आर के. कलेक्शन, नाशिक यांचेकडून रु३३९.५०/- प्रति नग याप्रमाणे वरील तक्त्यात दर्शविलेल्या विभागातील कर्मचा-यांचे ड्रेस शिवण्यात आले होते. त्याच दराने १२५ कर्मचारी यांचेसाठी २५० नग गणवेश शिलाई करुन घेणेकरीता रु.८४,८७५/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी संरक्षण विभागाकडे देणगी स्वरुपातील शिल्लक असलेल्या (शर्टचे कापड ५७० मीटर व पॅन्टचे कापड ३७६ मीटर) कापडातून शर्ट (स्काय ब्ल्यु कलर) ५६२.५० मीटर कापड व पॅन्ट साठी (डार्क ब्ल्यु कलर) ३०० मीटर कापड वरील विभागांच्या कर्मचा-यांचे गणवेश शिलाई करणेस, वापरणेस तसेच गणवेश शिलाई करणेकामी येणा-या अंदाजे रु.८४,८७५/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संरक्षण विभागास देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या कापडामधून प्रस्तावात नमुद केलेल्या विभागांच्या कर्मचा-यांचे गणवेश शिलाई करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.**

**संस्थानमधील सर्व कायम कर्मचाऱ्यांसाठी नवीन गणवेश खरेदी करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. त्यामध्ये मंदिर परिसराबाहेरील विभागांमधील अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी वेगळया रंगाच्या गणवेशाची तरतूद करणेत यावी. तसेच संस्थानमधील बरेचशे अधिकारी/ कर्मचारी डयुटीवर असताना, संस्थानचा गणवेश परिधान करत नाहीत व ओळखपत्रही लावत नाही, असे निदर्शनास आलेले आहे, यासाठी प्रशासकीय स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करणेत यावी, अशा सुचना देण्यात आल्या.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ कामगार अधिकारी)

---

२४ **साईटेक प्रकल्पात कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व लेखाशाखा विभागातील ERP कार्यप्रणालीचे System Audit व Migration Audit बाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:** कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.: १)** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २३४. **२)** मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे दि. २२/०८/२०१६ रोजीचे सभेपुढील विषय क्रं. ०५

**प्रास्ताविक:** साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व अकाऊंट विभागात कार्यान्वीत केलेल्या ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit करणेकामी संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून, न्युनतम दरधारकास कार्यादेश देण्याच्या व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २३४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

विषयांकीत प्रकरणी ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. ई-निविदेअंतर्गत प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा दि. २५/०७/२०१६ रोजी उघडण्यात आलेल्या आहेत. त्यातील पात्र निविदाधारक पुढीलप्रमाणे आहेत.

1. K.K. Chanani & Associates, Kolkata
2. Suma Soft Pvt.Ltd., Pune
3. AAA Technologies Private Ltd., Mumbai
4. R S P H & Associates, Nashik
5. Digital Age Strategies Pvt. Ltd. Bangalore

उपरोक्त प्राप्त निविदाधारकांच्या व्यावसायीक ई-निविदा उघडणेकामी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे दि. २२/०८/२०१६ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत. "साईटेक प्रकल्पाचे System Audit या प्रकल्पाअंतर्गत अकाउंट विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ईआरपी कार्यप्रणाली Migration Audit करणेकामी पात्र निविदाधारकांच्या व्यावसायिक निविदा आजचे स्थानिक उपसमितीचे सभेसमोर उघडणेस मान्यता देण्यात आली व या उघडणेत आलेल्या व्यावसायीक निविदांमधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, तो पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच या सभेमध्ये आय.टी. विभागाचे तांत्रिक सल्लागार श्री. रतिश तावडे, मुंबई व श्री. विजय नायडु, कोपरगाव यांना आमंत्रित करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली."

उपरोक्त निर्देशान्वये उघडण्यात आलेल्या ई-निविदांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारक नाव | दर | एकुण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | K.K. Chanani & Associates, Kolkata | 14,60,100.00 | 14,60,100.00 | |
| 2 | Suma Soft Pvt.Ltd., Pune | 29,90,000.00 | 29,90,000.00 | |
| **3** | AAA Technologies Private Ltd., Mumbai | 4,69,200.00 | 4,69,200.00 | **निम्नतम निविदाधारक** |
| 4 | R S P H & Associates, Nashik | 19,55,000.00 | 19,55,000.00 | |
| 5 | Digital Age Strategies Pvt. Ltd. Bangalore | 13,50,000.00 | 13,50,000.00 | |

उपरोक्त मा.उपसमितीचे शिफारसीनुसार साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींचे System Audit व ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit करणेकामी प्राप्त व्यावसायीक निविदांमधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता मा. उपसमिती सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेस, तसेच आय.टी. विभागाचे तांत्रिक सल्लागार श्री.रतिश तावडे, मुंबई व श्री.विजय नायडु, कोपरगाव यांना सदर विषयी चर्चेकामी आमंत्रित करणेस सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उपसमिती सभेपुढे सविनय सादर.

**माहिती तंत्रज्ञान विभागाचे तांत्रिक सल्लागार श्री.रतिश तावडे, मुंबई व श्री.विजय नायडु, कोपरगाव हे स्थानिक उपसमिती सभेसाठी उपस्थित राहू शकले नाहीत, याकरिता सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस होती. सदरहू इतिवृत्त वाचुन कायम करत असताना, संस्थान कामांसाठी मोफत सेवा देत असलेल्या सल्लागारांची नेमणूक करणेऐवजी जाहिरातीद्वारे सल्लागारांची नेमणूक करणेत यावी, अशा सुचना दिल्या.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

२५ **श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षात आयोजित करण्यात येणा-या कार्यक्रमांबाबत देशातील व परदेशातील साईमंदिरांच्यापदधिका-यांचे चर्चासत्र आयोजित करणे बाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद- महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक - निरंक.

प्रस्ताविक – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या वतीने श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. या शताब्दी वर्षात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) मार्फत राबविण्यात येणारे विविध कार्यक्रम/उपक्रमांचे अनुषंगाने देशातील व परदेशातील साईमंदिरांनी कोणते कार्यक्रम/उपक्रम राबवावे याबाबत एका चर्चासत्राचे आयोजन करता येईल. या चर्चासत्रामध्ये देशातील व परदेशातील विविध साईमंदिरांचे अधिकारी/पदाधिका-यांना निमंत्रीत करुन त्यांना संस्थानचे उपक्रमांबाबत माहिती देवून सदरचे उपक्रम त्यांचे साईमंदिरांनी शताब्दी वर्षात राबवावे अशी विनंती करता येईल. तसेच या कार्यक्रमांसाठी उपस्थित राहणा-या

जगभरातील साईमंदिराचे अधिकारी/पदाधिका-याचे समाधी शताब्दी वर्षात राबविण्यात येणा-या विविध कार्यक्रम/उपक्रमांबाबत काही सुचना असतील तर त्याबाबतही चर्चा करुन निर्णय घेता येईल. यामुळे श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सर्व जगभरात एकाच वेळी आयोजित करण्याचा वेगळाच आनंद येईल की ज्यामुळे सर्व जगच साईमय होवून जाईल. अशा प्रकारचे चर्चासत्र मुंबई येथे आयोजित करण्यातचा मा.व्यवस्थापन समितीचा मानस आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमाचे अनुषंगाने मुंबई येथे जगभरातील साईमंदिरांचे अधिकारी/पदाधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करणेसाठी खालीलप्रमाणे कामे करावी लागतील.

| अ.नं. | विभागाचे नांव | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | जनसंपर्क विभाग | १) जगभरातील साईमंदिरांचे अधिकारी/पदाधिका-यांना श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षात आयोजित करण्यात येणा-या विविध कार्यक्रम/उपक्रमांवर होणा-या चर्चासत्रासाठी उपस्थित रहाणेबाबतची प्रेसनोट प्रशासकीय मान्यतेअंती देशपातळीवर प्रसिध्द करुन आवाहन करणे.<br>२) जगभरातील साईमंदिराची नांव, पत्ते, दुरध्वनी क्रमांक व मेल आयडी शोधून त्यांची यादी माहिती तंत्रज्ञान विभागाकडे देणे. |
| २ | ज्युनियर कॉलेज | १) चर्चासत्रासाठी निमंत्रित करण्यात येणा-या जगभरातील साईमंदिरांचे निमंत्रणपत्र तयार करुन मान्यतेअंती माहिती तंत्रज्ञान विभागाकडे सादर करणे.<br>२) माहिती तंत्रज्ञान विभागाचे मदतीने सर्व मंदिरांना कार्यक्रमाचे निमंत्रण पाठविण्याची व्यवस्था करणे.<br>३) चर्चासत्रासाठी येवू इच्छिना-या मंदिराचे पदाधिकारी-याकडून फॉर्म भरुन घेणेसाठी फॉर्मचा मसुदा मान्य करुन घ्यावा.<br>४) यामध्ये जे पदाधिकारी कार्यक्रमांसाठी येवू इच्छितात त्यांचा विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन घेण्यात यावेत.<br>५) चर्चासत्रासाठी किती प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील याची माहिती मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावी.<br>६) देशातील प्रत्येक राज्यातील साईमंदिरांचे अधिकारी/पदाधिका-यांची माहिती राज्यानुसार स्वतंत्र करावी.<br>७) परदेशातील साईमंदिरांची माहिती प्रत्येक देशानुसार करावी.<br>८) एका मंदिराचे ०२ पेक्षा जास्त प्रतिनिधींना निमंत्रीत करण्यात येवू नये.<br>९) ज्या मंदिराचे अधिकारी/पदाधिका-यांना यासंदर्भात काही सुचना करावयाच्या असतील त्यांना त्या लेखीस्वरुपात देणेबाबत कळविण्यात यावे.<br>१०) कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर मिनिट टू मिनिट प्रोग्राम, चर्चासत्रातील मान्यवरांचे मनोगत आदि कामे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त मंडळ, मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपका.अधिकारी यांचेशी चर्चा करुन करावे. |
| ३ | माहिती तंत्रज्ञान | १) देशातील व परदेशातील साईमंदिरांची अद्ययावत यादी तयार करावी.<br>२) चर्चासत्रासाठी उपस्थित राहणा-या देशातील व जगभरातील साईमंदिरांचे पदाधिका-यांना पाठवावयाचे निमंत्रणपत्र ईमेल करुन पोहचलेबाबत पाठपुरावा करावा.<br>३) ज्या साईमंदिरांचे ईमेल उपलब्ध नसतील अशा साईमंदिरांच्या पत्त्यावर सामान्य प्रशासन विभागाकडुन पत्राव्दारे संदेश पाठवावे.<br>४) कार्यक्रमासाठी उपस्थित राहणा-या जगभरातील विविध साईमंदिराचे पदाधिका-यांनी केलेले ई-मेल नोंद घेणेसाठी प्राध्यापक श्री.शिवगजे, ज्युनियर कॉलेज यांचेकडे पाठवावे. |
| ४ | बांधकाम-शताब्दी कक्ष | १) मुंबई येथे चर्चासत्रासाठी उपस्थित राहणा-या जगभरातील साईमंदिरांचे अंदाजे १००० अधिकारी/पदाधिका-यांची बैठक व्यवस्था होईल एवढया आकारमानाचा सर्व सुविधांनी युक्त असलेला हॉल पहाणी करुन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने आरक्षित करणे.<br>२) कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यकतेनुसार साऊंड सिस्टीम, प्रोजेक्टर, फोटो, शुटींग स्वच्छता आदि व्यवस्था कॉन्ट्रक्टर मार्फत (आऊटसोर्सने) मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार करावी.<br>३) चर्चासत्राचे दृष्टीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) मार्फत शताब्दी वर्षात कोणते कार्यक्रम/उपक्रम आयोजित करणार आहे याबाबतची माहिती उपलब्ध ठेवणे (आवश्यक असल्यास सादरीकरण करणे). |

| | | |
|---|---|---|
| | | ४) चर्चासत्राचे दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्व शासकीय/निमशासकीय परवानग्या घेणे व आपले विभागाशी संबंधीत कामे करणे.<br>५) कार्यक्रमास उपस्थित असणारे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यवर सदस्य, संस्थान अधिकारी व कर्मचा-यांची निवास व्यवस्था करावी. |
| ५ | संरक्षण विभाग | १) चर्चासत्र कार्यक्रमाचे मुंबई येथे आयोजनसाठी सुरक्षेचे दृष्टीने आवश्यक असलेली सर्व व्यवस्था करावी.<br>२) तसेच आवश्यकते नुसार सुरक्षा अधिकारी/कर्मचारी पुरवावे. |
| ६ | मंदिर विभाग | कार्यक्रमासाठी आवश्यक पुजारी, पुजा साहित्य, सत्कार साहित्य, शॉल, फोटो, मुर्ती, उदीप्रसाद व इतर महत्वाचे अनुषंगीक साहित्य उपलब्ध ठवावे. |
| ७ | सामान्य प्रशासन | १) कार्यक्रमांसाठी आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग व कामाचे ठिकाण याबाबतचा आदेश पारीत करावा.<br>२) चर्चासत्रासाठी उपस्थित राहणा-या जगभरातील साईमंदिरांकडून प्राप्त होणारी पत्रे, ई-मेल संदेश नोंद घेणेसाठी प्राध्यापक श्री.शिवगजे, ज्युनियर कॉलेज यांचेकडे पाठवावे. |
| ८ | वाहन विभाग | १) कार्यक्रमाचे आयोजनापासून ते समाप्ती पर्यंत आवश्यकतेनुसार वाहन पुरविण्याची व्यवस्था करणे. |
| ०९ | प्रकाशने विभाग | कार्यक्रमाचे ठिकाणी संस्थानची अधिकृत प्रकाशने जगभरातील साईमंदिरांचे अधिकारी/ पदाधिका-यांचे माहितीसाठी व विक्रीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्याशी चर्चेअंती उपलब्ध ठेवणे. |

परदेशी साईमंदिरांचे अधिकारी/पदाधिका-यांना चर्चासत्रासाठी निमंत्रीत करणेसाठी मा.श्री.सी.बी. सतपथी, निवृत्त आय.पी.एस.अधिकारी, दिल्ली यांचे मोठे योगदान असल्याने त्यांचेही याबाबत मार्गदर्शन घ्यावे असे मत आहे. तसेच परदेशी साईमंदिरांचे चर्चासत्र आयोजित करण्यासाठी साईभक्त व तिरुपती विदयापीठाचे प्राध्यापक डॉ. रघुनाथ रेड्डी यांचे मार्गदर्शन घेता येईल. डॉ. रेड्डी हे परदेशातील साई मंदिरातील पदधिका-यांच्या संपर्कात असतात. परदेशात मोठया प्रमाणात जी साईमंदिर उभारलेली आहे त्या मंदिरांच्या उभारणीमध्ये दक्षिण भारतीय साईभक्तांचे प्रमाणात जास्त आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०९.२०११ चे सभेतील निर्णय क्रमांक ७५५ अन्वये आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी मासिकचे संपादनासाठी डॉ. रघुनाथ रेड्डी, तिरुपती यांची मानद संपादक म्हणून नेमणूक करण्यात आली होती. तरी डॉ.रघुनाथ रेड्डी यांना संस्थाचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांशी सदरचे विषयावर चर्चा करणेकामी बोलाविता येईल. तसेच समक्ष भेटी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार कार्यक्रम आयोजनाबाबतचे पुढील नियोजन करता येईल डॉ. रेड्डी यांना उपरोक्त कामासाठी वेळोवेळी शिर्डी येथे येणे-जाणे करिता रेल्वेच्या प्रथम वर्गांचे तिकीट/प्रवास खर्च तसेच त्यांची निवास, प्रसाद (भोजन) दर्शन/ आरती व्यवस्था संस्थान मार्फत व्हावी असे मत आहे.

मागणी– श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रम/उपक्रमांवर चर्चा करणेकामी देशातील व परदेशातील साईमंदिरांच्यापदधिका-यांचे चर्चासत्र मुंबई येथे आयोजित करणेबाबत.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रम/ उपक्रमांवर चर्चा करणेकामी देशातील व परदेशातील साईमंदिरांच्यापदधिका-यांचे चर्चासत्र मुंबई येथे आयोजित करणेकरीता वर निर्देशीत केलेल्या विभागांनी आवश्यक त्या मंजू-या घेणेसाठी टिपण्या सादर करुन प्रशासकीय मान्यता घेता येईल. आवश्यक कामासाठी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता संबंधीत विभागामार्फत घेता येईल. तसेच परदेशातील साईमंदिरांचे अधिकारी/पदाधिका-यांना निमंत्रीत करणेकामी मा.श्री.सी.बी.सतपथी गुरुजी यांचे मार्गदर्शन व डॉ.रघुनाथ रेड्डी यांचे मार्गदर्शन मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने घेता येईल. यासाठी डॉ.रेड्डी यांची तिरुपती ते शिर्डी येण्या-जाण्याचे रेल्वेच्या प्रथम वर्गांचे तिकीट/प्रवास खर्च तसेच निवास, प्रसादभोजन व दर्शन/आरतीची व्यवस्था संस्थानमार्फत करणेस मान्यता असावी. सदर चर्चासत्रासाठी उपस्थित राहणा-या देशातील व परदेशातील साईमंदिरांच्याप्रतिनिधींची भोजन व्यवस्था व कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्व सोयींनी युक्त असलेला हॉल, कार्यक्रमाची तारीख, वेळ व ठिकाण आदिबाबत निर्णय होणेसाठी सविनय सादर. तसेच सदरचे चर्चासत्र (संमेलन) मुंबई ऐवजी शिर्डीमध्ये आयोजित केल्यास सदर कार्यक्रमासाठी उपस्थित राहणा-या जगभरातील साईमंदिरांचे प्रतिनिधींची निवास, भोजन, वाहन तसेच दर्शन आदि व्यवस्था कमी वेळात चांगल्याप्रकारे करणे सोईचे होईल व त्यांना शिर्डी या धार्मिकस्थळी साईच्या दरबारात आल्याचा आनंदही मिळेल असे मत आहे.

तरी सदरचे विषयावर मा.उपसमितीचे सभेत चर्चा करुन निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांबाबत देशातील व परदेशातील साईमंदिरांच्यापदाधिका-यांचे चर्चासत्र आयोजित करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्यामध्ये उल्लेखीत संबंधीत विभागांनी तात्काळ कार्यवाही चालू करणेस मान्यता देण्यात यावी, तसेच देश-परदेशातील साईमंदिरांच्या पदाधिकाऱ्यांना शिर्डीची माहिती**

**होणेकरीता सदरहू चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करणेत यावे व या चर्चासत्रासाठी उपस्थित रहाणाऱ्या पदाधिकाऱ्यांची निवास, भोजन, दर्शन/ आरती, वाहन व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ कनिष्ठ महाविद्यालय/ शताब्दी कक्ष/ आय.टी./ संरक्षण/ मंदिर/ वाहन विभाग/ सामान्य प्रशासन)

---

२६ **साई सहवास क्रं. ०१ व ०२ इमारतीमधील अधिकारी व डॉक्टर्स यांचे वाहनांकरीता पार्किंग शेड उभारणे कामाचे ई-निविदांचे लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) उघडून निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम -२१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतुद आहे".

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-** दि.०२/०४/२०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र.२४९ संमत करण्यात आलेला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, साई सहवास क्रं.०१ व ०२ इमारतीमधील अधिकारी व डॉक्टर्स यांचे वाहने पार्किंगकरीता शेड उभारणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.८,६९,९६५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** संस्थानचे मौजे शिर्डी येथील १०७ पैकी मधील जागेत संस्थान अधिकारी व डॉक्टर्स यांना साईसहवास क्रं. ०१ व ०२ येथे निवासाकरीता सदनिका देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर इमारतीमध्ये उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मुख्यलेखाधिकारी यांना निवासासाठी सदनिका देण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतींमध्ये पार्किंगची सोय नसल्याने सदरहु अधिकारी व डॉक्टर्स यांनी विनंती अर्जान्वये पार्किंग शेड उभारणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार सदर कामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार इकडील विभागामार्फत ई-निविदा फॉर्म तयार करुन त्यानुसार दि.१६/०६/२०१६ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहू कामाची ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती. निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Activity | Date & Time |
|---|---|---|
| 1) | Tender publishing date: | 16/06/2016 |
| 2) | Tender document download start date: | 16/06/2016 from 11:00 Hrs. |
| 3) | Tender document download end date: | 25/06/2016 upto 17:00 Hrs. |
| 4) | Bid submission start date: | 16/06/2016 from 12:00 Hrs. |
| 5) | Bid submission closing date: | 25/06/2016 upto 17:00 Hrs. |
| 6) | Bid opening date (Technical): | 05/07/2016 at 11:00 Hrs. |

उपरोक्त नमुद तारखांनुसार लिफाफा क्र.१ (Technical Bid), दि.०५/०७/२०१६ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचेसमोर उघडण्यात आली असून खालील ०३ ठेकेदार यांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.

१) मे.एन.एस.बनकर पा. ॲण्ड कं., श्रीरामपुर
२) डि. बी. फोपसे, वैजापूर
३) श्री. रविंद्र एस. शिंदे, कोल्हार

सदर ई-निविदांची तांत्रीक छाननी करण्यात आली असुन, छाननी अहवालानुसार उपरोक्त तिनही ठेकेदार पात्र होत आहेत.

**उपरोक्तप्रमाणे पात्र ०३ निविदांचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | डि. बी. फोपसे, वैजापूर | ८,०३,४३३.७१ |
| २ | मे.एन.एस.बनकर पा. ॲण्ड कं., श्रीरामपुर | ७,८७,१११.५१ |
| ३ | श्री. रविंद्र एस. शिंदे, कोल्हार | **७,४५,७६७.४४** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साई सहवास क्रं. ०१ व ०२ इमारतीमधील अधिकारी व डॉक्टर्स यांचे वाहनांकरीता पार्किंग शेड उभारणेकामी श्री.रविंद्र एस. शिंदे, कोल्हार यांचे रु.७,४५,७६७.४४ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **दिनांक १६.०९.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६९०** दिनांक १६.०९.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **CVTS OT- II, CRU- III, GICU, व डायलेसिस विभागातील यु.पी.एस.च्या बॅटरीज बदलणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक रिकव्हरी युनिट, आय.सी.सी.यु., कार्डीयाक ओ. टी., ऑर्थो ओ.टी., आणि जनरल ओ.टी. इ. अतिमहत्वाच्या ठिकाणी Life Saving Equipments & Machines नियमित वापरले जातात. अशा महत्वाच्या मशिन्स करीता एकुण पाच ठिकाणी 10 के.व्ही.ए. क्षमतेच्या यु.पी.एस. खरेदी करुन बसविणेत आले आहे. तसेच 2 के.व्ही.ए. यु.पी.एस.- 4 नग हे जी. आय. सी. यु. विभागात बसविण्यात आले आहेत. सदर यु. पी. एस. च्या 12 व्होल्ट/ 18 ए. एच. क्षमतेच्या SMF बॅटरीज्- 80 नग खराब झालेल्या आहेत. सदर बॅटरीज बदलणेकामी सदर प्रस्तावावर मा. व्य. समितीच्या दि. 23/06/2016 चे सभेतील विषय क्र. 29 व निर्णय क्र. 398 अन्वये सविस्तर चर्चा होउन, सदर बॅटरीज् विविध पुरवठा धारकांकडुन कोटेशन मागणी करुन बदलुन घेणेस आणि त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. 1,76,000/- चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार खालील पुरवठा धारकांकडुन पत्र पाठवुन कोटेशनची मागणी करण्यात आली होती.

1. M/s. Consul Neowatt Power Solutions Pvt.Ltd., Mumbai
2. M/s. Socomec Innovative Power Solutions Ltd. Ltd. Mumbai
3. M/s. Shri Sai Battery Service, Shirdi
4. M/s. Saitrons Medical Equipment, Loni
5. M/s. Tejas Electronics, Ahmednagar
6. M/s. Aar-em Electronics, Pune
7. M/s. Vedant Industrial Services, Aurangabad
8. M/s. S.V. Electronics, Nashik
9. M/s. Mahendra Batteries & Autoparts, Sakuri
10. M/s. Microtronics, Aurangabad

वरीलपैकी दि. 29/07/2016 अखेरीस खालीलप्रमाणे पुरवठाधारकांकडुन कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

1. M/s. Saitrons Medical Equipment, Loni
2. M/s. Tejas Electronics, Ahmednagar
3. M/s. S.V.Electronics, Nashik
4. M/s. Microtronics, Aurangabad

तसेच M/s. Exide Ponit Ahmednager व M/s. The Himalaya Motivations Ahmednagar यांनी देखील उपरोक्त बॅटरीजचे दि. 29/07/2016 अखेर कोटेशन पाठविले आहे. ते स्विकारणेस हरकत नाही असे मत आहे.

CVTS OT- II, CRU- III, GICU, व डायलेसिस विभागातील 2 के.व्ही.ए. यु.पी.एस. व 10 के.व्ही.ए. यु. पी. एस. च्या 12 व्होल्ट/ 18 ए. एच. क्षमतेच्या एकूण 80 नग बॅटरीज् बदलणेबाबत प्राप्त उपरोक्त ०६ कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आले व त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा करणेत येऊन, अंतीम दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| 1 | M/s. Saitrons Medical Equipment, Loni | १,८८,०००/- | १,८८,०००/- |
| 2 | M/s. Tejas Electronics, Ahmednagar | १,५६,०००/- | १,४८,०००/- |
| 3 | M/s. S.V. Electronics, Nashik | १,३२,७५०/- | **१,३२,७५०/-** |
| 4 | M/s. Microtronics, Aurangabad | १,५२,०००/- | १,४८,०००/- |
| 5 | M/s Exide Point, Ahmednagar | १,७६,०००/- | १,६८,९६०/- |
| 6 | M/s The Himalaya Motivations, Ahmednagar | १,८०,०००/- | १,८०,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS OT- II, CRU- III, GICU, व डायलेसिस या विभागातील 2 के.व्ही.ए. यु.पी.एस. व 10 के.व्ही.ए. यु.पी.एस. च्या 12 व्होल्ट/ 18 ए. एच. क्षमतेच्या एकूण 80 नग बॅटरीज् बदलणेकामी M/s. S.V. Electronics, Nashik यांचे एकत्रित रु.१,३२,७५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०२ **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-1 या विभागाकरीता 10 KVA UPS खरेदी करुन जुना 10 KVA UPS without battery परत (Buyback) करणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद**:-** १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. **:-** नवीन प्रस्ताव

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS OT-1 या विभागाने दि.०२/०१/२०१६ रोजीचे मागणी पत्रकान्वये 10 KVA UPS Single Phase- १ नगाची मागणी केलेली आहे. सदर UPS चा उपयोग ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया चालु असताना विदयुत पुरवठा अचानक बंद झाला तर मशिनरी बंद पडू नये म्हणून होतो.

CVTS OT-1 विभागामध्ये सध्या एक 10 KVA UPS उपलब्ध असून तो सन २००५ मध्ये रक्कम रु.८३,९८०/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेला आहे. सदरहू UPS जुना झाल्यामुळे नेहमी नादुरुस्त होत आहे, त्यामुळे त्यांनी नविन एक 10 KVA UPS ची मागणी केलेली आहे. तसेच बायोमेडीकल विभागाने जुना UPS without Battery बायबॅक करुन नविन 10 KVA UPS खरेदी करणेबाबत शिफारस केलेली असून नविन UPS खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.दोन लाख पन्नास हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.३५४७.१६ इतकी आहे.

**मागणी–** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS OT-1 या विभागाने दि.०२/०१/२०१६ रोजीचे मागणी पत्रकान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०३/०२/२०१६) मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

३) जुन्या 10 KVA UPS ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु. रु.३५४७.१६ इतकी होत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ ४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** CVTS OT-1 विभागामध्ये सध्या एक 10 KVA UPS उपलब्ध असून तो सन २००५ मध्ये खरेदी करण्यात आलेला असून फार जुना झालेला आहे त्यामुळे तो वारंवार बंद पडत असल्यामुळे सदरहू UPS without Battery बायबॅक करुन नविन 10 KVA UPS खरेदी करण्यास हरकत नाही असे मत आहे. तसेच जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.३५४७.१६ इतकी आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS OT-1 विभागाकरीता जुना UPS without Battery परत (Buyback) करुन एक 10 KVA UPS विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS OT-1 विभागाकरीता जुना UPS without Battery परत (Buyback) करुन एक 10 KVA UPS विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०३ **श्री साईबाबा रुग्णालयातील** Casualty **या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty या विभागाने दि.०६/११/२०१५ रोजीचे मागणीपत्रकान्वये Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे. Casualty विभागात सध्या अत्सवस्थ रुग्णांसाठी ३ पेशंट बेड आहेत व २ मॉनिटर आहेत, त्यामुळे त्यांना एक मॉनिटर कमी पडत आहेत. त्यामुळे त्यांनी १ नग मॉनिटरची मागणी केलेली आहे. सदर १ नग मॉनिटर खरेदीकामी अंदाजे रु.२,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty या विभागाने दि.०६/११/२०१५ रोजीचे मागणीपत्रक (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.१०/११/२०१५).

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३– रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casualty या विभागत सध्या २ मॉनिटर आहेत, परंतु पेशंटच्या वाढत्या संख्येमुळे त्यांनी अजुन १ नग मॉनिटरची मागणी केलेली आहे, त्यामुळे १ नग मॉनिटर खरेदी करण्यास हरकत नाही.

शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३– रु.५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असलेली वस्तु कोटेशन (दरपत्रक) मागवून खरेदी करता येईल. त्यानुसार उपरोक्त १ नग Multiparameter Monitor खरेदी विहित पध्दतीने कोटेशन (दरपत्रक) मागवून करणेस व याकामी येणा-या रु.२,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) इतक्या खर्चाचे प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty विभागाकरीता आवश्यक असलेला ०१ नग Multiparameter Monitor विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०४ **श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरीता fuji कंपनीच्या C.R. System Cassettes screen हे fuji कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s.Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडून खरेदी करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाने दि. १६/०८/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २५/०८/२०१४) Fuji कंपनीच्या 10"x12", 14"x17" व 8"x10" प्रत्येकी २ नग C.R. System Cassettes with screen ची मागणी केलेली आहे. सदर मशिन सन २०१३ या वर्षी देणगी म्हणून प्राप्त झालेले होते व कंपनीने त्याचे सोबत Cassettes with screen ह्या मोफत दिलेल्या होत्या, परंतु दैनंदिन वापराचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्या वापरुन खराब झालेल्या आहेत.

सदर विभागात दर वर्षी साधारणतः २५,००० फोटो काढले जातात, त्यामुळे कॅसेट लवकर खराब होतात. श्री साईनाथ रुग्णालयात Fuji कंपनीचे मशिन असुन त्यासाठी त्याच कंपनीच्या कॅसेट स्क्रिनसह लागतात. त्यामुळे त्यांनी नवीन Cassettes ची मागणी केलेली आहे. सदरहू Cassettes खरेदीकामी Fuji कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s. Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडून ईमेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दरानुसार सदरचे साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ५,७३,७५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Particular | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|
| 01. | 14x17 Cassettes with screen | 1,01,250.00 | 2,02,500.00 |
| 02. | 10x12 Cassettes with screen | 95,625.00 | 1,91,250.00 |
| 03. | 8x10 Cassettes with screen | 90,000.00 | 1,80,000.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | **5,73,750.00** |

दि.२०/११/२०१४ निर्णय क्र. १०१० अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत सदरहू CR System Cassettes with screen विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ५,७३,७५०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, दिव्य मराठी- नाशिक, दै. पुण्यनगरी– पुणे, सामना औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.०४/०२/२०१५ ते १८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२१/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, तर मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| **Sr.No.** | **Name of Tenderer** | **Received Date** |
|---|---|---|
| 1 | M/s. Shreya Enterprises, Ahmednagar (2 Envelope) | 21/02/2015 |
| 2 | M/s. Kundan Surgical, Ahmednagar (2 Envelope) | 21/02/2015 |
| 3 | M/s. Nirmal Agencies, Ahmednagar (2 Envelope) | 21/02/2015 |

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबंद निविदा दि १६/०६/२०१५ रोजी मा. उप समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिकबाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. त्यानुसार अ)M/s.Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडे Authorization Letter असून M/s.Kundan Surgical, Ahmednagar व M/s. Shreya Enterprises, Ahmednagar यांचेकडे Authorization Letter नाही. त्यामुळे सदर कमर्शियल निविदा उघडून निर्णय होणेचा प्रस्ताव मा. उपसमिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी किंवा ब) कामी पुन्हा निविदा मागविण्यास मान्यता असावी. असा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यानुसार दि.१९/०७/२०१५ रोजीचे टिप्पणीन्वये सदर प्रस्तावावर "ब" प्रमाणे खरेदीकामी दुस-यांदा फेर ई निविदा मागविण्यात मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीची मुदत दि.१५/१०/२०१५ ते ०२/११/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.०५/११/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती.

परंतु, सदर खरेदीकामी एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे तिस-यांदा फेर ई -निविदा मागविणेस दि.०८/१२/२०१५ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये मान्यता मिळालेली होती .

त्यानुसार, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीची मुदत दि.१५/०२/२०१६ ते ०५/०३/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती.

परंतु, सदर खरेदीकामी एकही निविदा प्राप्त न झालेली नाही तसेच Fuji कंपनीचे मशिन असुन त्यासाठी त्याच कंपनीच्या कॅसेट स्क्रिनसह त्यामुळे सदर कॅसेट स्क्रिनसह थेट उत्पादक कंपनी Fuji यांचेकडून दर मागवून खरेदी करावे लागणार आहे.

त्यामुळे Fuji कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s. Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडून ईमेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.१८/०५/२०१६ रोजीचे ई-मेल पत्रान्वये खालील प्रमाणे दर कळविलेले आहे.

| **Sr. No.** | **Particular** | **Rate Per in Rs.** | **Total Amt. in Rs.** |
|---|---|---|---|
| 01. | 14x17 Cassettes with screen | 1,01,250.00 | 2,02,500.00 |
| 02. | 10x12 Cassettes with screen | 95,625.00 | 1,91,250.00 |
| 03. | 8x10 Cassettes with screen | 90,000.00 | 1,80,000.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | **5,73,750.00** |

तरी Fuji कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s. Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडून उपरोक्त CR System Cassettes with screen रक्कम रु.५,७३,७५०/- (अक्षरी रु.- पाच लाख त्रेहात्तर हजार सातशे पन्नास मात्र) इतक्या रक्कमेत खरेदी करण्यास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरीता आवश्यक असलेल्या C.R. System Cassettes screen एकाच कंपनीकडून न घेता, त्यासाठी वेगवेगळया ठिकाणच्या अधिकृत विक्रेत्यांकडून दर मागविणेसाठी विस्तृत प्रमाणात प्रसिध्दी देण्यात येऊन, विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०५ **विशेष लेखापरिक्षण अहवालाबाबत.**

दि.१४/०३/२०१५ पासून श्री.थोरात, श्री.औदिच्य व श्री.दिघे हे तीन कर्मचारी सेवानिलंबीत केलेले असून सेवा निलंबन आदेशानुसार त्यांचे कामकाजाबद्दल विशेष लेखापरिक्षण करणेबाबत मा. त्रिसदस्य समिती सभा दि. अन्वये ठरले होते.

त्यानुसार दि.०४/०३/२०१६ ते ११/०३/२१६ या कालावधीत श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मध्यवर्ती औषध भांडार विभागातील कामाकाजाचे संदर्भात विशेष लेखापरिक्षण शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कंपनी चार्टड अकौन्टन्स यांचे मार्फत करणेत आलेले आहे. शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कंपनी चार्टड अकौन्टन्स यांनी सादर केलेला अहवाल खालील प्रमाणे -

भाग अ- औषधे व सर्जिकल साहित्य

१) एकूण २४ Item मध्ये पुरवठा आदेशात दिलेल्या औषधे व सर्जिकल साहित्याचे Brand Name बदलून आलेले आहे तसेच काही औषधांमध्ये पुरवठा आदेशात दिलेली औषधांची क्षमता/ साईज व प्राप्त औषधांची क्षमता/ साईज वेगळी दिसते ती एकमेकांशी अजिबात जुळत नाही असे दिसते. वापर करणा-या डॉक्टरांचे सदर औषधाबाबत शिफारस न घेतल्यामुळे किंवा मा.वैद्यकीय संचालक यांचे शिफारस न घेतल्यामुळे तसेच पुरवठाधारकाचे त्याबाबतचे पत्र न घेतल्यामुळे या सर्व मटेरीयलचा संस्थानवर एकूण रक्कम रु.६,३४,४६८/- इतका आर्थिक परिणाम झाला आहे.

२) आपल्या पुरवठा आदेशाप्रमाणे मटेरीयल प्राप्त नसल्यामुळे ५२ प्रकारचे औषधे व सर्जिकल साहित्य सिलबंद रुममध्ये ठेवण्यात आले होते. त्यातील ०९ प्रकारचे औषधे व सर्जिकल साहित्य मुदत बाह्य झालेले असून सदर मटेरीयलमुळे संस्थानवर एकूण रक्कम रु. ३६४६५२/- इतका आर्थिक परिणाम झाला आहे.

३) सिलबंद रुम मधील ४ प्रकारचे औषधे व सर्जिकल साहित्य हे नजीकचे तारखेचे मुदतबाह्य असून सदर मटेरीयलमुळे संस्थानवर एकूण रक्कम रु.१०१३३७/- इतका आर्थिक परिणाम होण्याची शक्यता आहे.

४) सिलबंद रुम मधील ४६ प्रकारचे औषधे व सर्जिकल साहित्य हे पुरवठा आदेशातील Brand Name प्रमाणे नसल्याने त्यातील औषधांची क्षमता याबाबत वापर करणा-या डॉक्टरांचे सदर औषधाबाबत शिफारस न घेतल्यामुळे किंवा मा. वैद्यकीय संचालक यांचे शिफारस न घेतल्यामुळे तसेच पुरवठाधारकाचे त्याबाबतचे पत्र न घेतल्यामुळे या सर्व मटेरीयलचा आदेशाप्रमाणे नसल्यामुळे संस्थानवर एकूण रक्कम रु. ७२८९५३/- इतका आर्थिक परिणाम झाला आहे.

५) औषध भांडारातील प्रवेशव्दाराजवळ ठेवलेल्या औषधे व सर्जिकल साहित्यासाठी सन २०१५ - १६ च्या वार्षिक औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी प्रायोगिक तत्वाचा (Demo) वापर केल्यामुळे औषधांचा तुटवडा भासत असल्याने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून तत्कालीन वैद्यकिय संचालक यांचे तोंडी आदेशान्वये औषधे व सर्जिकल साहित्य मागविण्यात येऊन त्याकामी सन २०१३- १४ चे वार्षिक खरेदीतील मंजूर दराने काही औषधे व सर्जिकल साहित्याचा अतिरिक्त खरेदीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. परंतु, त्यावर त्रिसदस्य समिती सभेत सन २०१३- १४ चे वार्षिक खरेदीचे मंजूर दर व बाजार भाव यांची पडताळणी करुन् त्यांतील प्राप्त निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्या प्रमाणे खरेदी करण्यात यावेत असे ठरले तसेच त्याच वेळी प्रयोगिक तत्वावर सन २०१५- १६ मधील पुरवठा आदेश देण्यात आलेले होते त्यामुळे Annexure- ६ मध्ये दर्शविलेल्या ब-याचशा औषधे व सर्जिकल साहित्यांचा पुरवठा आदेशामध्ये समावेश असल्यामुळे नवीन पुरवठा आदेशाप्रमाणे मटेरीयल घेण्याचे ठरले व सन २०१३- १४ चे मंजूर दराने मागविलेली औषधे व सर्जिकल साहित्यामधील काही औषधे व सर्जिकल साहित्य पुरवठा धारकांना परत देण्यात आलेले आहे. तसेच त्यातील Apheresis Kit व Servo Humdifire हे वार्ड मधून परत आलेला असून त्याकामी पुरवठा धारकास परत करण्याची कार्यवाही चालू आहे. या सर्व बाबीं मा. लेखापरिक्षक यांचेशी चर्चा करुन त्यांचे अभिप्रायानुसार त्याकामी कार्यवाही करण्यात येत आहे. तेंव्हा त्यासाठी दाखविण्यात आलेले आर्थिक रक्कम रु.१७०६७०१/- अर्थिक परिणाम होणार नाही असे दिसते. तसेच Annexure No. ०२ ते ०५ मध्ये दर्शविलेले बरेचशे औषधे व सर्जिकल साहित्य लेखापरिक्षक यांचे अभिप्रायानुसार सध्याचे परचेस मॅनेजर स्वतः लक्ष घालून पुरवठा धाराकास परत करण्यात येत असून त्याकामी दाखविण्यात आलेल्या आर्थिक परिणाम कमीत कमी करण्याचे त्यांचे मार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

६) सन २०११-१२ ते २०१४-१५ च्या मे. त्रिलोक एजन्सी, श्रीरामपूर यांना दिलेल्या Denatured Sprit करीता पुरवठा आदेशात ७५० मि.ली. प्रती बॉटल असा पुरवठा ओदश देण्यात आलेला होता. परंतु, प्रत्यक्षात मे. त्रिलोक एजन्सी, श्रीरामपूर यांनी Denatured Sprit हे ७५० मि.ली. ऐवजी ६५० मि.ली. प्रती बॉटलचा पुरवठा केलेला असून तो स्वीकारण्यात आलेला आहे. त्यामुळे संस्थानवर एकूण रक्कम रु. ७७८५०/- इतका आर्थिक परिणाम झाल्याचे दिसते तसेच मागील ०६ वर्षापासून मे. त्रिलोक एजन्सी, श्रीरामपूर यांनी मि.ली. ऐवजी ६५० मि.ली. प्रती बॉटलचा पुरवठा केल्याचे दिसून येते. यामुळे संस्थानला आर्थिक नुकसान झाले आहे.

७) Denatured Sprit चे पुरवठा आदेशामध्ये मालाचा पुरवठा शिर्डी पोहच करणेबाबत स्पष्टपणे उल्लेख दिलेले असून सुध्दा सदर मटेरीयल श्रीरामपूर येथून आणणेकामी संस्थानचे वाहन प्रत्येक महिन्यातून एकदा गाडी पाठवून मटेरीयल आणले जात होते त्यामुळे १९६० किलो मीटरचा वाहतूक खर्चाचा आर्थिक परिणाम झाल्याचे दिसते. मागील ०६ वर्षापासून असेच चालू असल्याचे दिसते. ही बाब नियम बाह्य होती.

८) औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामीचे तुलनात्मक तक्ते पाहता ब-याच ठिकाणी प्राप्त एकाच पुरवठा धारकांचे दर स्वीकारण्यात आलेले आहे. मे. त्रिलोक एजन्सी, श्रीरामपूर यांनी Denatured Sprit ७५० मि.ली. करीता निविदेमध्ये तेच दर व तोच Item पाच वेळा भरलेला असून त्यामध्ये कोणताही फरक नसतांनासुध्दा फेर निविदा प्रक्रिया न करता ते खरेदी केल्याचे दिसते.

९) व १०) यामध्ये शासनाचे The Ministry of Health & Family Welfare यांनी दि.०१/११/२०११ व दि.२१/०३/२०१३ अन्वये ब-याच स्टेंन्टचे दर कमी झाले होते. संस्थानवर एकूण रक्कम रु.१६९९९३३/- इतका आर्थिक परिणाम झाल्याचे दिसते. परंतू लेखापरिक्षक यांचे अभिप्रायानूसार शासनाचे प्राप्त Circular पासून दर कमी करणेकामी मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घ्यावी असे मत आहे.

**भाग ब- मशिनरी / उपकरणे खरेदी**

१. मशिनरी / उपकरणे खरेदीकामी निम्नतम दर न स्वीकारता जास्तीचे दर स्वीकारण्यात येऊन आल्यामुळे संस्थानवर एकूण रक्कम रु.७६५२७२८/- इतका आर्थिक परिणाम झाल्याचे दिसते. त्यामध्ये न्यूरो सर्जरी इन्स्ट्रुमेंट, मॉरच्यूरी कॅबीनेट, Intra Aortic Balloon, 160 KVA UPS, Xenon Light Source 300 Watt, Pattent Warmar with Blanket, Heart Lung Machine, Fully Automatic Elisa System, Biochemistry Analyses, Battery Operated Hand Drill अशा प्रकारच्या मशिनरी उपकरणे / इन्स्ट्रुमेंट प्राप्त जास्त दराने खरेदी करण्यात आलेल्या आहेत. याकामी इतर प्राप्त निविदाधारकांचे दर यापेक्षा निम्या पटीने निम्नतम प्राप्त झाल्याचे दिसते.

२. काही मशिनरी / उपकरणे खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभेत ठरल्याप्रमाणे तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने खरेदी करण्यात आलेल्या असून त्यांनी निम्नतम दर न स्वीकारता जास्तीचे दर स्वीकारण्यात आल्याचे दिसते. त्यावरुन खरेदीकामी शासन नियमावलीव्दारे निम्नतम दराने खरेदी प्रस्ताव स्वीकारले नसल्याचे दिसते त्यामुळे संस्था नवर रक्कम रु.५१७८०२/- इतका आर्थिक परिणाम झाल्याचे दिसते.

३. काही ठिकाणी निविदा काढण्यात येऊन निवड करण्यात आलेल्या पुरवठाधारकास दोन ते तीन वर्षासाठी पुरवठा आदेश देण्यात आल्याचे दिसते. त्यामध्ये इतर प्राप्त पुरवठा धररकांचे दरांचा विचार केल्याचे दिसत नाही. निवड करण्यात आलेल्या पुरवठाधारकांचे दर हे प्रत्येक वर्षात वाढले असून त्याच वाढीव दराने ते स्वीकारण्यात आल्याचे दिसते त्यामुळे संस्थानवर रक्कम रु.५२६६१८/- इतका आर्थिक परिणाम झाल्याचे दिसते.

४. काही मशिनरी / उपकरणे खरेदीकामी निविदा प्रक्रियेव्दारे फक्त एकाच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले असून ते स्वीकारण्यात आलेले आहे. त्याकामी फेर निविदा काढण्यात आल्याचे दिसत नाही. त्यामुळे संस्थानवर रक्कम रु.१०२४२६२९/- इतका आर्थिक परिणाम झाल्याचे दिसते.

५. खरेदी प्रक्रियेमध्ये ब-याच ठिकाणी पुरवठा आदेश देतांनी निविड केलेल्या पुरवठा धारकांचे खरेदीसंबंधी लागणारे कागदपत्र तसेच शासनाचे दिलेले सर्टीफिकेट तपासून न घेता पुरवठा आदेश देण्यात आल्याचे दिसते तसेच हॉस्पिटलसाठी वापरण्यात येत असलेल्या Fire Extinguisher खरेदी करतांनी पुरवठा धारकांचे परवाना न तपासल्यामुळे पुरवठा धारकांने दिलेले Fire Extinguisher चे साहित्य खराब प्रतीचे असल्याचे निष्पन्न झाल्यावर त्यांचा परवाना व इतर कागदपत्रांची तपासणी केली असता ते खोटे असल्याचे दिसते आणि काही ठिकाणी पुरवठा आदेश दिल्यानंतर पूरवठाधारकांशी करण्यात आलेल्या करारनाम्यावर पुरवठा धाराकांच्या अधिकृत प्रतिनिधी व संस्थानचे अधिकृत प्रतिनिधींनी स्वाक्षरी केल्याचे दिसत नाही त्यामुळे संस्थानवर रक्कम रु.६४५६२/- इतका आर्थिक परिणाम झाल्याचे दिसते.

६. ब-याच खरेदी फाईलमध्ये कोटेशन्स / निविदा फॉर्म त्यांचा तुलनात्मक तक्ता, मा. व्यवस्थापन समिती सभा ठराव, त्यांचा पुरवठा आदेश इ. कागदपत्रे सापडले नाही त्यावरुन पुरवठाधारकांचे लेखापरीक्षण कामी आवश्यक कागदपत्रांची फाईलिंग व्यवस्थित झाल्याचे दिसत नाही.

७. काही मशिनरी / उपकरणे ही विदेशी कंपनीची खरेदी केलेली आहे परंतू सदर मशिनचे पेमेंट L/C द्वारे न केल्याने आपणास अप्रत्यक्षपणे त्यावरील Custom Duty अदा करावी लागल्र्ाने मशिनची किंमत सुध्दा जास्त अदा करावी लागली आहे.

८. काही मशिनरी / उपकरणे खरेदीकामी प्राप्त निम्नतम दराचे कोटेशन रद्द करुन फेर निविदा मागवून प्राप्त एकाच निविदाधारकांचीजास्त रक्कमेची निविदा स्विकारण्यात आलेली आहे. त्यामुळे संस्थानवर रक्कम रु.१६३९६०/- इतका आर्थिक परिणाम झाल्याचे दिसते.

९. संस्थान नियमावलीनुसार आपणाकडून दिलेला पुरवठा आदेश जर पुरवठा धाराकने पूर्ण केला नाही तर त्यास दिलेला पुरवठा आदेश दुस-याकडून पूर्ण करुन त्यासाठी लागणारी जास्तीची रक्कम प्रथमतः पुरवठा आदेश दिलेल्या पुरवठाधारकांकडून वसूल करावयाचा नियम आहे परंतु, काही ठिकाणी त्या नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याचे दिसते.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मध्यवर्ती औषध भांडार विभागाचे विशेष लेखापरिक्षण केले असता Part - A (औषध व सर्जिकल साहित्याकरिता) एकूण रक्कम रु. ५३,१३,८९४/- (अक्षरी रु. - त्रेपन्न लाख तेरा हजार आठशे चौ-याण्णव मात्र) व Part- B (Instrument, Equipment, & Machinery) एकूण रक्कम रु. ८९,९२,०५०/- (अक्षरी रु. – एकोणनव्वद लाख ब्याण्णव हजार पन्नास मात्र) अशी Part - A + Part – B ची

एकूण रक्कम रु. १,४३,०५,९४४/- (अक्षरी रु.– एक कोटी त्रेचाळीस लाख पाच हजार नऊशे चव्वेचाळीस मात्र) चे संस्थानवर आर्थिक परिणाम झाल्याचा दिसतो

तरी विशेष लेखापरिक्षणात निघालेल्या त्रृटींबाबतचा अहवाल पुढील निर्णयास्तव सविनय सादर .

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलकडील मध्यवर्ती औषध भांडार विभागामध्ये विशेष लेखापरिक्षण करत असताना श्री.मच्छिंद्र थोरात, प्र.खरेदी व्यवस्थापक, श्री.दिलीप औदिच्य, भांडार व्यवस्थापक व श्री.प्रकाश दिघे, फार्मासिस्ट यांना सहभागी करुन घेतलेले नाही, असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. याकरीता या तीन कर्मचाऱ्यांचे लेखी म्हणने ऐकल्याशिवाय सदरहू प्रस्तावावर निर्णय घेणे उचित होणार नाही. सबब श्री साईबाबा हॉस्पिटलकडील मध्यवर्ती औषध भांडार विभागामध्ये केलेल्या विशेष लेखापरिक्षण अहवालाची प्रत श्री.थोरात, श्री.औदिच्य व श्री.दिघे यांना देण्यात येऊन, त्यांचेकडून अहवालामधील त्रुटींबाबत लेखी खुलासा मागविण्यात यावा व त्यांच्या खुलाशासह फेरप्रस्ताव उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०६ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वैद्यकीय बिलात देण्यात येणा-या सवलतींची सुधारीत नियमावलीबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त्व्यवस्थेचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय अशी दोन रुग्णालये चालविली जात असुन, या दोन्ही रुग्णालयात रुग्णांना त्यांचे बिलामध्ये देण्यात येणारी सवलत मा.व्यवस्थापन मंडळाने वेळोवेळी घेण्या आलेल्या निर्णयांनुसार देण्यात येत आहे. रुग्णांना देणा-या सवलतीत सुसुत्रता असावी, दोन्ही रुग्णालयांसाठी एकच नियमावली असावी, त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन व्हावे, मा.धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयाकडुन येत असलेल्या या बाबतच्या विविध सुचनांचा अंतर्भाव व्हावा, या हेतुने रुग्णालयातील संबंधित विभागांकडुन अभिप्राय मागवुन वित्त विभागामार्फत सुधारीत नियमांची नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर सवलत नियमावली पुढीलप्रमाणे-

**श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वैद्यकीय बिलात देण्यात येणा-या सवलतींची सुधारीत नियमावली-**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांमध्ये उपचार घेत असतांना/घेतल्यानंतर रुग्णांना रुग्णालयाचे झालेल्या एकुण बिलांमध्ये सवलत देणेसाठी खालीलप्रमाणे नियमावली बनविणेत येत आहे. या नियमावलीचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे नियमबाह्य दिल्या गेलेल्या सवलतीस संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

1. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना द्यावयाच्या सवलतीसाठी हॉस्पिटलचे मेडीकल सोशल वर्कर यांनी रुग्णांची आर्थिक परीस्थिती जाणुन घेणेसाठी रुग्णांकडुन सवलतीस पात्र असलेले सर्व कागदपत्रे प्राप्त करुन त्याची माहिती विहीत नमुन्यात भरुन सदर फॉर्मवर स्वाक्षरी करुन मान्यतेसाठी मा.वैद्यकीय संचालक व उप वैद्यकीय संचालक यांचेकडे पाठवावेत. मंजुरी देण्यात आलेल्या रुग्णांनाच वैद्यकीय बिलात सवलत देण्यात यावी. तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सवलत घेणा-या रुग्णांच्या कागदपत्रांची तपासणी करण्याचे अधिकार मेडीकल सोशल वर्कर व कार्यालय अधिक्षक यांचे राहील, तसेच रु.५०००/- पर्यंतचे अधिकार तेथील वैद्यकीय अधिक्षक व त्यापुढील अधिकार प्रचलित पध्दतीनुसार वैद्यकीय संचालक यांना राहतील.
2. मा.वैद्यकीय संचालक/उप वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षक यांचे रजा सुट्टीचे दिवशी त्यांचा चार्ज ज्या अधिका-यांकडे सोपविणेत आला असेल, त्यांना तेवढ्या काळासाठी रुग्णांच्या बिलांमध्ये नियमाप्रमाणे सवलत देण्याचे अधिकार राहतील.
3. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या आस्थापनावर असलेल्या कायम कर्मचा-यांबाबत वैद्यकीय देखभाल नियम १९९९ नुसार सवलत यापुढेही लागु राहतील.
4. संस्थानचे आस्थापनेवर काम करत असलेल्या कायम अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे वेतनश्रेणीनुसार मा.व्य.स.निर्णय क्र.५२५/दि.२१.०६.२००९ अन्वये, पुढीलप्रमाणे हॉस्पिटलची रुमसेवा लागु राहतील, तसेच वेतनश्रेणीप्रमाणे लागु असलेल्या वार्डमध्ये ॲडमिट केल्यास त्या दोन्ही वार्डमधील सेवाकारातील असलेली तफावत कर्मचा-यांकडुन भरुन घेतली जाईल.

वेतनश्रेणी रुग्णालयात देण्यात येणारी रुमसेवा

| अ.नं. | ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी (वेतनबॅंड) | ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे ग्रेड पे | रुमसेवा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | वेतनश्रेणी ९३००-३४८०० | ग्रेड पे ५००० पासुन पुढे | डिलक्स रुम |
| २ | वेतनश्रेणी ९३००-३४८०० | ग्रेड पे ४३०० ते ४९०० | स्पेशल एसी रुम |
| ३ | वेतनश्रेणी ९३००-३४८००<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० | ग्रेड पे ४२००<br>ग्रेड पे १८०० ते ३५०० | व्टीन शेअरींग रुम |
| ४ | वेतनश्रेणी ४४४०-७४४० | ग्रेड पे १३०० ते १७०० | सेमी प्रायव्हेट/जनरल वार्ड |

5. कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणा-या मोफत वैद्यकीय सेवेसंबंधित नियमावली २०१२ जा.क्र.एसएसएसटी/ एसएसबीएच/वित्त-२८६/२०१२, दि.३१.०१.२०१२ प्रमाणे वैद्यकीय सवलती लागु राहतील. यामध्ये ज्या कंत्राटी कर्मचा-यांची सेवा ०१ ते ०५ वर्षापर्यंत झालेली असेल त्यांना वैद्यकीय बिलामध्ये जास्तीत जास्त रु.३०,०००/- पर्यंत *(सदर कर्मचारी किंवा त्यांचे कुटूंबिंय दुर्बल/निर्धन वर्गातील असतील तर त्यांना मा.उच्च न्यायालयाचे पीआयएल क्र.३१३२/२००४ प्रमाणे सवलत देण्यात यावी.)* व ज्या कंत्राटी कर्मचा-यांची संस्थानमधील सेवा ०५ वर्षाच्या पुढे झालेली असेल त्यांना दोन्ही रुग्णालयांत संपुर्णपणे मोफत वैद्यकीय सेवा देण्यात येईल, तसेच कंत्राटी कर्मचारी व त्यांचेवर अवलंबित असणा-या व्यक्तींना केवळ जनरल वार्डमध्येच भरती करण्यात येईल. त्याव्यतिरीक्त इतर वार्डमध्ये भरती करावयाचे झाल्यास रुमसेवाकार यांचा फरक संबंधित कर्मचा-यांना भरावा लागेल. *(कंत्राटी पध्दतीने घेतलेले डॉक्टर्स नर्सेस स्टाफ यांना त्यांचे ग्रेड नुसार वार्डमध्ये भरती करण्यात येईल)*

6. संस्थान सेवेत मानधन/नियमवेतन (Fix Pay) तत्त्वावर असणा-या कर्मचा-यांना ते संस्थान सेवेत असेपर्यंत दोन्हीरुग्णालयांमध्ये कायम कर्मचा-यांप्रमाणे केवळ मोफत वैद्यकीय सेवेचा लाभ देणेत यावा. त्याव्यतिरीक्त इतर कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

7. संस्थान कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर ते हयात असेपर्यंत संस्थानमधील कायम कर्मचा-यांप्रमाणे स्वतः, त्यांची पत्नी/पती व आई-वडील यांना श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पुर्णपणे मोफत औषधोपचार देण्यात यावेत, तसेच संस्थान रुग्णालयांतील डॉक्टरांचे शिफारशीनुसार बाहेरुन घेतलेल्या/ केलेल्या औषधोपचाराचा खर्च संस्थान सेवेतील कायम कर्मचा-यांप्रमाणेच देण्यात येईल.

8. संस्थान सेवेत असतांना कायम कर्मचा-यांचा मृत्यु झाल्यास, त्यांचेवर अवलंबित कुटूबियांना श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये पुर्णपणे मोफत उपचार व इतर रुग्णालयात घेतलेले उपचार संस्थान कायम कर्मचा-यांप्रमाणेच देण्यात यावेत. *(अवलंबित कुटुंबियांना सदर मयत अधिकारी/कर्मचारी संस्थान सेवानिवत्तीच्या तारखेपर्यंत व तद्नंतर मयत कर्मचा-याची पत्नी/पती व आई-वडील यांनाच केवळ ही सवलत लागु राहील)*

9. संस्थान कर्मचा-यांना संस्थानचे रुग्णालयात औषधे उपलब्ध न झाल्यास ती औषधे बाहेरुन विकत आणावी लागतात. याकामी कर्मचा-यांना दरवर्षी वैद्यकीय बिलाचा परतावा रु.२०,०००/- पर्यंत देण्यात यावा. त्यापुढील वैद्यकीय बिलाचा परतावा देणेसाठी रितसर मा.व्यवस्थापन समितीची मंजुरी घेण्यात यावी.

10. संस्थानचे शैक्षणिक संकुलात शिकणा-या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे वेळेत अचानक आकस्मात गंभीर आजार उद्भवल्यास, अपघात, मारहाण वगैरे प्रसंगी दोन्ही रुग्णालयात औषधांसह संपुर्ण मोफत उपचार देण्यात यावेत. तसेच इन्टर्नी डॉक्टर्स (BAMS/BHMS/MBBS) हे रुग्णांना मोफत सेवा देत असतात, त्यामुळे त्यांनाही दोन्ही रुग्णालयांत त्यांचे सेवाकाळात मोफत उपचार देणेत यावेत.

11. वृध्दाश्रमातील वृध्द, उपासणी महाराज देवस्थान, साकुरी येथील कन्या, संवत्सर येथील आश्रम, मतीमंद, अंध,पुर्णतः अपंग, माजी सैनिक, अनाथ/बालसुधारगृहातील मुले यांना दोन्ही रुग्णालयांत संपुर्णपणे मोफत उपचार देणेत यावेत. परंतु सदर रुग्ण हा संबंधित वर्ग/आश्रम/बालसुधारगृहातील असलेबाबतचा पुरावा जमा करणे आवश्यक राहील, तसेच रुग्णालयात काही अनोळखी रुग्ण (बेवारस) भरती झाल्यास त्यांची योग्यती माहिती घेऊन त्यानुसार अहवाल तयार करावा व सदर रुग्णांचे बिलात पुर्णपणे सवलत देणे आवश्यक राहील.

12. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे आजी मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त यांना दोन्ही रुग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा देणेत यावी.

13. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट याचीका (पीआयएल) क्र.३१३२/२००४ मधील दि.१७.०८.२००६ व दि.१५.०४.२००९ च्या आदेशाचे पालन करावे. त्यात निर्धन व दुर्बल घटकांसाठी देण्यात येणा-या सवलती त्यांचेकडुन उपलब्ध करुन घ्यावयाची कागदपत्रे यांचे पुर्णतः तंतोतंत पालन करण्यात यावेत. *(पिवळ्या/ केशरी रंगाची शिधापत्रिका, तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला व ओळखपत्र इ.ग्राह्य धरणेत येईल.)*

14. प्राणीदंश, सर्पदंश, कुत्रा चावणे, Unknown Bite, अचानक उद्भवलेली नैसर्गिक आपत्ती, डायलेसीस रुग्ण, थॅलेसिमिया, उस तोडणी कामगार *(उस तोडणी कामगार यांचेकरीता कारखान्याचे पत्र आवश्यक राहील)* यांना दोन्हीही रुग्णालयांत पुर्णतः मोफत वैद्यकीय सेवा/औषधोपचार देण्यात यावेत.

15. दोन्ही रुग्णालयात औषधोपचार चालु असतांना रुग्णांचा मृत्यु झाल्यास त्या रुग्णाचे नातेवाईकांकडुन रक्कम भरुन घेण्याचे प्रयत्न करावेत, परंतू त्यांचेवर सक्ती करु नये. अथवा उर्वारीत रक्कम सवलतीचा अर्ज रुग्णाचे नातेवाईकांकडुन भरुन घेऊन सवलत देण्यात यावी. तसेच मयत रुग्णांचा मृतदेह झाकुन देणेसाठी नविन सफेद कापड ५ मिटर रुग्णालय व्यवस्थापनाकडुन मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे. *(सदर सवलत देणेसाठी पिवळ्या/ केशरी रंगाची शिधापत्रिका व ओळखपत्र उपलब्ध असल्यास घेणे आवश्यक राहील)*

16. रुग्णांस कोणतेही कागदपत्रे उपलब्ध होऊ शकत नसल्यास *(उदा.दुरवरुन येणारे साईभक्त उत्पन्नाचे, दारीद्र रेषेचे दाखले, रेशनकार्ड इ. कागदपत्रे सोबत घेऊन येत नाहीत)* अनोळखी किंवा बेवारस रुग्ण, भटके/ विमुक्त *(उपजिविका/उदनिर्वाहार्थ कायम स्थलांतर करणारे त्यांना रेशनकार्डच नसल्याने उत्पन्नाचा दाखला मिळत नाही, दारिद्र रेषेच्या यादीत नावच समाविष्ट नाही असे रुग्ण)* इ. रुग्ण किंवा नातेवाईक यांचा सवलत

मागणीचा अर्ज ग्राह्य धरुन मेडीकल सोशल वर्कर यांनी त्या रुग्णांची समक्ष शहानिशा करुन वैद्यकीय संचालक, उप वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षक यांचेमार्फत त्यांना योग्य ती नियमाप्रमाणे सवलत देण्यात यावी.

17. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/विश्वस्त यांनी सवलत देणेसाठी लेखी शिफारस केल्यास सदर रुग्णांकडुन संस्थान नियमाप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे घेऊन सवलत देण्यात यावी. *(या सवलतीत संबंधित शिफारस करणा-यांच्या नावे नोंदविण्याची आवश्यकता नाही)* परंतु लेखी शिफारस येऊन संबंधित रुग्णांकडे आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध नसल्यास किंवा शिफारशीप्रमाणे देण्यात येणारी सवलत संस्थान नियमांपेक्षा जास्त असल्यास शिफारस करणा-यांचे नाव नोंदविणेत येऊन त्यांना तशी सवलत देण्यात येत असलेबद्दलची कल्पना देऊन त्यांचे नाव सवलतीसाठी शिफारस म्हणुन नोंदविणेत यावे.

18. स्पेशल रुम व डिलक्स रुममध्ये ॲडमिट असलेल्या रुग्णांना त्यांचे बिलामध्ये कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही.

19. रुग्णाने किंवा रुग्णाचे नातेवाईकाने Implant वापरण्याची मागणी केल्यास, त्या रुग्णाला Implant चे बिलामध्ये सवलत दिली जाणार नाही, तसेच उच्च प्रतीचे Implant वापरावयाचे झाल्यास Implant व हॉस्पिटलचे बिल यामध्ये कोणतीही सवलत लागु राहणार नाही.

20. सदरचे सर्व नियमांनुसार गरीब व गरजू रुग्णांना रक्तपेढीमार्फत मोफत रक्तपिशवी व गरजेनुसार रुग्णवाहीकाही मोफत करता येईल.

21. कंत्राटी आणि कायम कर्मचारी यांची यादी प्रत्येक वर्षी कामगार/आस्थापना विभागामार्फत अपडेट करुन दोन्ही रुग्णालयांमध्ये पाठविणेत यावीत.

22. **राजीव गांधी जीवनदायी आरोग्य** योजनेची नोंदणी व अमंलबजावणी करणेबाबत मा.त्रिसदस्यीय समिती सभा निर्णय क्र.८२१/दि.०८.१०.२०१२ अन्वये, मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य व MD India Healthcare Services, (TPA) Pvt. Ltd, Pune, National Insurance Company Ltd., Mumbai यांच्या वरीष्ठ प्रतिनिधींनी सदर योजनेअंतर्गत करावयाच्या रुग्णाला ती औषधे Memorandum of Understanding (MOU) करारातील अटी-शर्ती यावर सविस्तर चर्चा करणेत येऊन मंजुरी देण्यात आलेल्या महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे –

- मोफत केस पेपर्स् व मोफत ओपीडी तपासण्या करणे.
- प्रत्येक विभागात किमान २५ टक्के खाटा राखीव ठेवणे.
- प्रोसिजर्स्/सर्जरीज उपलब्ध् सोयी सुविधांनुसार करणे.
- रुग्णांस प्रवासासाठी परतीचे भाडे देणे.
- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णांलयांसाठी समान दर राहतील.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत उपचार घेणा-या रुग्णांना केवळ जनरल वार्डमध्येच भरती करावे.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकडुन पॅकेजच्या रकमेपेक्षा कमी रक्कम मंजुर झाल्यास उर्वरीत रक्कम रुग्णांकडुन भरुन घेण्यात येईल.
- ज्या रुग्णाला राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये उपचाराची रक्कम मिळणार असेल, अशा रुग्णाला राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये उपचारार्थ भरती करावेत.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत रुग्णांचे बिल पॅकेजच्या रकमेपेक्षा जास्त (रु.५,०००/-पर्यंत) झाल्यास ॲटो चॅरिटी बिलींग विभागामार्फत करावी.
- एखाद्या रुग्णांचे बाबतीत केस रद्द (Reject) झाल्यास किंवा त्यांचे Approval येणाच्या आतमध्ये रुग्ण दगावल्यास (Death) त्या रुग्णांचे बिल रु.५०००/- चे आत झाल्यास त्याची ॲटो चॅरिटी (Auto Charity) करणेत यावी.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये रुग्णांवर संपुर्ण उपचार केल्यानंतर बिल सादर केल्यास व राजीव गांधी आरोग्य योजनेकडुन सदर उपचाराची रक्कम प्राप्त होत नसेल किंवा संबंधित पॅकेज रद्द झाल्यास तर सदर बिलांवर सवलत देणे गरजेचे राहील.

उपरोक्तप्रमाणे नियमावलीमधील अ.नं.३ व ५ मध्ये प्रस्तावित सुधारणा ग्राह्य धरुन इतर नियमांबाबत पुर्वीची कासम व कंत्राटी कर्मचा-यांबाबतची नियमावली ग्राह्य धरणेत यावी, तसेच यापुर्वी वेळोवेळी करण्यात आलेले सवलतीविषयीचे सर्व नियम रद्द करण्यात येत असुन उपरोक्तप्रमाणे करण्यात येत असलेल्या नियमावलीनुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय या दोन्ही रुग्णालयांमध्ये रुग्णांना त्यांच्या वैद्यकीय बिलात सवलत देण्यात यावी.

तरी उपरोक्तप्रमाणे सवलतीचे नियमावलीस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वैद्यकीय बिलात देण्यात येणा-या सवलतींच्या सुधारीत नियमावलीचे रुग्णालय उपसमितीने अवलोकन केले व खालीलप्रमाणे सुचना केल्या.**

**बाहेरुन येणाऱ्या अथवा स्थानिक रुग्णाचा मृत्यु झाल्यास त्यांच्या बीलाबाबत काय करता येऊ शकेल. तसेच अनेकदा वैद्यकिय बीलात देण्यात येणाऱ्या सवलतीचा फायदा, ज्यांना आवश्यकता नाही, असेच रुग्ण घेतात, असे दिसून येते. याकरीता शुभ्र, केसरी व पिवळे रेशनकार्ड धारक रुग्णांना किती सवलत देता येईल. समिती सदस्यांबरोबर त्यांचे कुटुंबीयांनाही सदरहू सवलत देता येईल का, या व इतर अनुषंगीक बाबींचा समावेश करण्यात येऊन, सदरहू नियमावली उपसमिती सभेसमोर फेरसादर करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०७ **संस्थान रुग्णालयामधील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधन नियमावलीबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३(४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणुक करता येईल.

शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय मुंबई दि ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी च्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजुर आहे.

शासन मान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- सदर पदावंर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी तसेच अटी– शर्ती क्र.८ नुसार समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी, जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमुद केले आहे.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशातील अ.नं. ६ मधील D – मध्ये असे नमुद केले आहे की, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे पुर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदांवर कर्मचा-यांच्या नेमणूका करु नयेत.

श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात व्हिजीटींग पद्धतीने सेवा देणेकामी वेळोवेळी अर्ज येत असतात. आकृतीबंधानुसार मंजुर पदसंख्या, शैक्षणिक पात्रता, रिक्त पदे, व रुग्णसंख्या यानुसार व्हिजीटींग पद्धतीने नेमणुका देणेबाबत निर्णय घेण्यात येतो. सदर अर्जदाराची शैक्षणिक पात्रता, कोठून ये-जा करणार आहेत यावरुन त्यांना द्यावयाचा मोबदला ठरविला जातो. मात्र आता सर्व व्हिजीटींग डॉक्टरांसाठी एकच कायमस्वरुपी नियमावली बनविणे गरजेचे वाटते. सदरची नियमावली तयार करण्यापूर्वीच मा. त्रिसदस्य समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेत या विषयासंबंधीची तातडीची निकड लक्षात घेता आयत्या वेळेस या विषयावर चर्चा होऊन निर्णय क्र. ३७५(५) खालीलप्रमाणे झालेला आहे.

"संस्थान रुग्णालयांमध्ये व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन, त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरिता व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची इच्छा करणारे अर्ज आल्यास त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले".

उपरोक्त निर्णयानुसार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी समक्ष निर्देश दिल्याप्रमाणे उपवैद्यकीय संचालक, श्री साईबाबा संस्थान रुग्णालये दि. ०७/११/२०१५ रोजी शिर्डीचे जवळपासचे मोठ्या रुग्णालयात दुरध्वनीवरुन चौकशी केली असता तेथे व्हिजीटींग डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येत असलेबद्दल माहिती घेतली आहे.

सबब, श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशालिटी यावरुन पुढीलप्रमाणे नियमावली बनविता येईल.

| अ.नं. | स्पेशियालीटी | मानधन |
|---|---|---|
| ०१. | एमबीबीएस+डीप्लोमाधारक | ४००० |
| ०२. | पोस्ट ग्रॅज्युएट(एमडी. एमएस) | ५०००+ प्रोत्साहन भत्ता |
| ०३. | कार्डीओलॉजी | संस्थान नियमानुसार फक्त प्रोत्साहन भत्ता |
| ०४. | सुपर सर्जिकल ब्रॅंच (सीव्हीटीएस+युरो+न्युरो+आर्थो+जन.सर्जरी, प्लॅस्टिक सर्जरी, सर्जीकल गॅस्ट्रो (लेप्रोस्कोपी) इत्यादी) | संस्थान नियमानुसार फक्त प्रोत्साहन भत्ता |
| ०५. | इंटरव्हेशनल (रेडिओ, न्युरो) | ५०००+ प्रोत्साहन भत्ता |
| ०६. | मेडिसीन ब्रॅंच (ओपीडी) (मेडिसीन, नेफ्रो, रुमॅटोलॉजी, ग्रॅस्ट्रो, इ.) | ५०००+ प्रोत्साहन भत्ता |
| ०७. | श्री साईनाथ रुग्णालयासाठी प्रोत्साहन भत्ता लागु नसल्याने तेथील व्हिजीटींग पदविकाधारकांना रु. ४००० तर पदविकाधारकांना रु. ५००० मानधन देता येईल. | |

श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयामध्ये कार्यरत असलेल्या व येथुन पुढे नव्याने नेमणुक होणा-या व्हिजीटींग डॉक्टरांना उपरोक्त प्रमाणे मानधनाची नियमावली लागु करणेबाबत प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे दि. २८/११/२०१५ चे सभेसमोर सादर करणेत आला होता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय क्र. ५३४ झाला.

संस्थान रुग्णालयामधील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधनाची नियमावली ठरविणे अगोदर आज रोजी संस्थान रुग्णालयामध्ये किती व्हिजीटींग डॉक्टर आहेत त्यांना सध्या किती मानधन देण्यात येते व किती मानधन द्यावयाचे याच्या संपुर्ण तपशीलासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी रुग्णालयाचे कामकाजासंबंधी दि. १०/१२/२०१५ रोजी झालेल्या सभेत इतर रुग्णालयात व्हिजीटींग डॉक्टरांना देण्यात येत असलेल्या मानधनाबाबतचा अभ्यास करुन अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिले होते. सदरचे निर्देशाप्रमाणे उपवैद्यकीय संचालक यांनी दि. १९/१२/२०१५ अन्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात त्यांनी पुणे येथील दिनानाथ मंगेशकर, इनलेक्स बुद्रानी व रुबी हॉस्पिटलमधील कामकाजाविषयी माहिती सादर केली आहे. सदरहू हॉस्पिटलमध्ये व्हिजीटींग कन्सल्टंट काम करत असुन त्यांना कुठल्याही प्रकारची फिक्स व्हिजीटींग फी न देता फक्त प्रोत्साहन भत्ता दिला जात असल्याचे नमुद आहे.

संस्थानची रुग्णालये ही ग्रामीण भागात येत असल्याने येथील सुख सुविधेचा (शिक्षण, करमणुक) विचार करता बरेचशे नामवंत डॉक्टर्स येथील रुग्णालयात रुजू होण्यास तयार होत नाहीत. सबब नामवंत डॉक्टर्स फक्त शहरातुनच उपलब्ध होतात. शिर्डीच्या लगत नाशिक, औरंगाबाद, पुणे ही शहरे असुन ती साधारणतः १०० ते २०० किमी दुर आहेत. इतक्या दुरवरुन व्हिजीटींग पद्धतीने डॉक्टर्स बोलविण्याचे ठरल्यास त्यांना याकामी आपल्या रुग्णालयासाठी पुर्ण दिवसाचा वेळ द्यावा लागणार आहे तसेच त्यांच्या येण्या-जाण्याचा खर्च व त्यांचे शिक्षण विचारात घेता वर नमुद केलेप्रमाणे मानधन देण्यास मान्यता असावी. (दि. २८/११/२०१५ चे सभेतील निर्णय क्र.५३४ नुसार सध्या रुग्णालयामध्ये असलेले व्हिजीटींग डॉक्टर व त्यांना देण्यात येणारे मानधन याबाबतची तपशिलवार माहिती सोबत जोडली आहे.)

निर्णयास्तव सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या रुग्णालयामध्ये असलेले व्हिजीटींग डॉक्टर वेळेवर हजर होत नाही व रुग्णांची गैरसोय होते, असे समितीच्या निदर्शनास आले आहे. व्हिजीटींग डॉक्टरांना वेळेचे बंधन रहावे याकरीता त्यांना बायोमेट्रीक सिस्टीम बसविणेत यावी व त्या वेळेनुसार, त्यांचे मानधन काढणेत यावे. तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांकडून आकारण्यात येणाऱ्या दरामध्ये व डॉक्टरांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन भत्तयामध्ये बरीचशी तफावत आहे. याकरीता दोन्ही रुग्णालयामधील समान कार्य असणारे विभाग एकत्रित करणेत यावे. या व इतर अनुशंगीक बाबींचा अंतर्भाव करणेत येऊन, सदरहू मानधन नियमावली फेरसादर करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०८ **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत**

**आजचे रुग्णालय उपसमिती सभेमध्ये सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

**(१)** संस्थान रुग्णालयामध्ये गरीब/ दुर्बल अथवा परराज्यातील साईभक्त रुग्ण/ मयत व्यक्ती घरी सोडविणेसाठी, त्यांचे नातेवाईकांनी मागणी केल्यास ॲम्ब्युलन्स/ शववाहिका परिस्थितीनुसार तात्काळ विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व या बाबीचा प्रस्तावित नियमावलीमध्ये समावेश करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(२)** संस्थान रुग्णालयांमधील सर्व मशिनरी जास्त वापरामुळे खराब झालेल्या असून त्यांच्या दुरुस्ती/ देखभालीसाठी खुप खर्च होत आहे. याकरीता रुग्णालयांमधील सर्व मशिनरी बदलणेबाबतचा तौलानिक प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षक)

---

**विषय नं.०४** **दिनांक १९.०९.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६९१** दिनांक १९.०९.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.६६१-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, दरम्यानचे कालावधीमध्ये, प्रस्तावात नमुद केलेल्या तक्त्यामधील अ.नं.०१ चे उपवैद्यकिय संचालक या पदाच्या नियुक्तीसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये जनहित याचिका क्र.१२९/ २०१६ दाखल असलेबाबत माहिती मिळाली. त्यामुळे मा.खंडपीठाचा आदेश होईपावेतो उपवैद्यकिय संचालक पदावरील नेमणूकीस कायम करणेबाबत तुर्त निर्णय घेता येणार नाही.

तसेच अ.नं.०२, न्युरोसर्जन या पदावर नेमणूक केलेले डॉ.मयुर विलास म्हात्रे यांनी राजीनामा दिलेला असल्यामुळे ते सध्या संस्थान सेवेत नाहीत, याकरीता त्यांना संस्थान सेवेत कायम करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, याकरीता सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

यावर सविस्तर चर्चा होऊन, दरम्यानचे कालावधीमध्ये, प्रस्तावात नमुद केलेल्या तक्त्यामधील अ.नं.०१ चे उपवैद्यकिय संचालक या पदाच्या नियुक्तीसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये जनहित याचिका क्र.१२९/ २०१६ दाखल असलेबाबत माहिती मिळाली. त्यामुळे मा.खंडपीठाचा आदेश होईपावेतो उपवैद्यकिय संचालक पदावरील नेमणूकीस कायम करणेबाबत तुर्त निर्णय घेता येणार नाही व अ.नं.०२, न्युरोसर्जन या पदावर नेमणूक केलेले डॉ.मयुर विलास म्हात्रे यांनी राजीनामा दिलेला असल्यामुळे ते सध्या संस्थान सेवेत नाहीत, याकरीता त्यांना संस्थान सेवेत कायम करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. **त्यामुळे अ.नं.०१ व ०२ वगळता इतर कर्मचाऱ्यांचे बाबतीत संबंधित विभागप्रमुख/ प्र.वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय प्रशासक, वैद्यकीय संचालक यांचा अभिप्राय विचारात घेता, अ.नं.०३ ते १७ या कर्मचाऱ्यांना, त्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेचे दिनांकापासून संस्थान सेवेत कायम करणेत यावे. तसेच अ.नं.०१ व ०२ यांचा प्रस्ताव सभेसमोर फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०५** **संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकाषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेतील फीचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

शासन मंजुरी क्र.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६ जुलै, २००९ अन्वये विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी सदर योजना माव्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे. त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलीत पद्धतीने चालु राहील, अशी मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त शासन मंजूरीस अनुसरुन संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काच्या परताव्याबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.०९.२०१५ चे सभेतील निर्णय क्र.३०१ अन्वये सन २०१५-१६ चा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेसाठी रक्कम रु.३५,००,०००/- (अक्षरी रुपये पस्तीस लाख) मात्र खर्चास मान्यता दिलेली होती. त्यास अनुसरुन शैक्षणिक शुल्काच्या परताव्याकामी एकुण रु.३२,२०,४३४/- (अक्षरी रुपये बत्तीस लाख वीस हजार चारशे चौतीस) मात्र रुग्णालये विभागांसह प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

तसेच संस्थानचे शैक्षणिक संकुलामधील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात ज्या कर्मचा-यांचे पाल्य शिक्षण घेत आहेत, त्यांचेकडून प्रत्यक्ष शैक्षणिक शुल्क न घेता, सदरची रक्कम जमा नावे करण्यात येते. त्यानुसार उपरोक्त दोन्ही शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांची रक्कम रु.१५,७२,४७०/- (अक्षरी रुपये पंधरा लाख बहात्तर हजार चारशे सत्तर) मात्र जमा नावे करण्यात आलेली आहे.

आता सन २०१६-१७ या वर्षाच्या संस्थानाचे विविध विभागात स्थायी पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या अंदाजे ८७० (श्री साईनाथ रुग्णालय विभाग वगळता) पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे. (श्री साईनाथ रुग्णालय विभागाने पाल्यांची संख्या कळविलेले नाही, त्याबाबत त्यांना लेखी पत्राद्वारे तसेच वेळोवेळी दुरध्वनीद्वारे कळविलेले आहे.)

| **अ.क्र.** | **तपशिल** | **२०१५-१६ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च** | **२०१६-१७ मध्ये अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|
| ०१. | सर्व विभाग (रुग्णालये वगळता) | रु.२०,१०,७१८/- | रु.२८,००,०००/- |
| ०२. | रुग्णालये विभाग | रु.१२,०९७१६/- | रु.२२,००,०००/- |
| | **एकुण रक्कम** | **रु.३२,२०,४३४/-** | **रु.५०,००,०००/-** |
| ०३. | शैक्षणिक संकुलामध्ये शिक्षण घेत असलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा | रु.१५,७२,४७०/- | रु.१६,११,५५०/- |
| | **एकुण रक्कम** | **रु.४७,९२,९०४/-** | **रु.६६,११,५५०/-** |

ज्या कर्मचा-यांचे पाल्य संस्थानचे शैक्षणिक संकुलातील इंग्लिश मिडीयम स्कुल व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत, त्यांचेकडून शैक्षणिक शुल्क न घेता एकुण रक्कम रु.१५,७२,४७०/- मात्र जमा नावे करण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेणेस विनंती.

तसेच उपरोक्त शासन मंजुरीस अनुसरुन संस्थानचे प्रचलित पद्धतीप्रमाणे कर्मचा-यांच्या पाल्याचा सन २०१६-१७ या वर्षाच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख) मात्र व शैक्षणिक संकुलामध्ये शिक्षण घेत असलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांचे शैक्षणिक शुल्क रु.१६,११,५५०/- (अक्षरी रुपये सोळा लाख अकरा हजार पाचशे पन्नास) मात्र असे अंदाजे एकुण ८७० पाल्यांचा (श्री साईनाथ रुग्णालय विभाग वगळता) शैक्षणिक फी परतावा करणेकामी अंदाजे रक्कम रु.६६,११,५५०/- (अक्षरी रुपये सहासष्ट लाख अकरा हजार पाचशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात कर्मचा-यांच्या एकुण ८७० पाल्यांचा (श्री साईनाथ रुग्णालय विभाग वगळता) शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेकामी अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.६६,५०,०००/- (अक्षरी रुपये सहासष्ट लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर कणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या एकूण ८७० पाल्यांचा सन २०१६-१७ या वर्षातील शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचालित शैक्षणिक संकुलामधील श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती निता बबनराव चव्हाणके या दि.३१.१२.२०१५ रोजी विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे पदावर शाळा संहितेनुसार, पदोन्नतीने मुख्याध्यापक नेमणे आहे. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील ०४ सहा.शिक्षक, यांनी श्रीमती चव्हाणके यांचे सेवानिवृत्तीनंतर पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत अर्ज केलेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ) पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेकामी अर्ज केलेल्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील ०३ सहा.शिक्षक यांची सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदार शिक्षकाचे नांव | नेमणूक दिनांक व सेवा जेष्ठता क्रमांक | शिक्षण | पाच वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सन | प्रतवारी | |
| ०१. | श्री.वाणी बाजीराव कनलाल | दि.०४.०७.१९९४ (सेवा जेष्ठता क्रमांक १) | बी.एस्सी., बी.एड. | २०१०-११ | B | B+ |
| | | | | २०११-१२ | B+ | |
| | | | | २०१२-१३ | B+ | |
| | | | | २०१३-१४ | B+ | |
| | | | | २०१४-१५ | A | |
| ०२. | श्री.वरघुडे गंगाधर विश्वनाथ | दि.०४.०७.१९९४ (सेवा जेष्ठता क्रमांक २) | बी.ए., बी.एड. | २०१०-११ | A | A |
| | | | | २०११-१२ | A | |
| | | | | २०१२-१३ | A | |
| | | | | २०१३-१४ | A | |
| | | | | २०१४-१५ | A | |
| ०३. | श्रीमती मिरजकर जहॉआरा शहाबुद्दीन | दि.१७.०६.१९९६ (सेवा जेष्ठता क्रमांक ३) | एम.ए.बी.एड. (Phy.), एम.एड., डी.एस.एम., इंग्रजी टायपिंग ३० श.प्र.मि, MS-CIT | २०१०-११ | B+ | A |
| | | | | २०११-१२ | A | |
| | | | | २०१२-१३ | A | |
| | | | | २०१३-१४ | A | |
| | | | | २०१४-१५ | A | |

ब) तसेच पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेकामी अर्ज केलेल्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील ०१ सहा.शिक्षक यांची सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदार शिक्षकाचे नांव | नेमणूक दिनांक व सेवा जेष्ठता क्रमांक | शिक्षण | पाच वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सन | प्रतवारी | |
| ०१. | श्री.अरुण बाबुराव घोडके | दि.०१.०७.१९९६ (सेवा जेष्ठता क्रमांक २२) | बी.एस्सी., बी.एड. | २०१०-११ | - | A+ |
| | | | | २०११-१२ | A+ | |
| | | | | २०१२-१३ | A+ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१३-१४ | A+ | |
| | | | | २०१४-१५ | A+ | |

श्री.अरुण बाबुराव घोडके, सहा.शिक्षक हे सध्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे कार्यरत असून, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठता याद्या स्वतंत्र ठेवण्यात आलेल्या आहेत. श्री.घोडके हे कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठतायादीमध्ये २२ व्या क्रमांकावर आहेत.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी कामगार विभागामार्फत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचेकडून कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आला होता. ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

With reference to your letter dt.06/10/2015 seeking my opinion for appointment of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir I would like to invite your attention to rule No.3 (4) of MEPS Rules 1981 which provides that. In the case of girls Secondary School or Junior College of Education for women, the senior most lady teacher fulfilling the conditions laid down in clause (b) of sub rule (1) and having satisfactory record of service, shall be appointed as the Head of that school irrespective of her seniority vis-a-vis the male teachers

Therefore in my opinion Smt.Mirajkar though she is junior to male candidate needs to be promoted on the post of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir.
If required, it is also advisable to clarify the position by visiting the office of Deputy Director of Education.

उपरोक्त अभिप्रायामध्ये त्यांनी महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीकडे लक्ष वेधून, सदर तरतुदीनुसार श्रीमती मिरजकर यांना पदोन्नतीने मुख्याध्यापक नेमणेस हरकत नाही, असे कळविलेले आहे, मात्र गरज असल्यास मा.शिक्षण उपसंचालक यांचा अभिप्राय घेणेबाबत सुचित केलेले आहे.

ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी सुचित केलेनुसार इकडील कार्यालयाकडील दि.२५.०५.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार जा.क्र.एसएसएस/वशी-०१/११४६/२०१६ दि.१०.०६.२०१६ अन्वये शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी पत्रव्यवहार करुन त्यांना सर्व वस्तुस्थिती कळविण्यात येऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी सेवाज्येष्ठ शिक्षकाची नेमणूक करावी अगर जेष्ठतम महिला शिक्षिकेची नेमणूक करावी याबाबत अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.शिउसं/उमावि-२/पुवि/ १५६३९/२०१६ दि.०२.०७.२०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम-३(४) मधील तरतुदीनुसार मुलींच्या माध्यमिक शाळेच्या बाबतीत किंवा महिला विद्यालयाच्या बाबतीत पोटनियम-१ खंड (ब) मध्ये ठरवून दिलेल्या शर्ती पुर्ण करणा-या व समाधानकारक सेवा विषयक पुर्ववत असलेल्या जेष्ठतम शिक्षकेस पुरुष शिक्षकाच्या तुलनेने संबधित महिला कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता लक्षात घेऊन शाळेची/विद्यालयाची मुख्याध्यापक/ प्राचार्य म्हणून नियुक्ती करता येईल.

माध्यमिक शाळा संहिता नुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हेच उच्च माध्यमिक शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करत असतात. उच्च माध्यमिक विभागाकडील प्राचार्यांच्या कामासाठी संबधित मुख्याध्यापकाच्या वेतनच्या ग्रेड पे मध्ये १००/- (रु.शंभर) वाढ त्यांना दिलेली असते. त्यामुळे आपल्या संस्थेच्या श्री साईबाबा कन्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी वरील सर्व नियमांच्या अधीन राहुन सेवाजेष्ठता यादीतील सेवाजेष्ठ महिलेची नियुक्ती मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून करता येईल"

संस्थानमार्फत श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ही मुलींची शाळा चालविण्यात येते. मा.व्य.समितीचे मान्यतेने सन २००१ मध्ये कन्या शाळेस जोडून फक्त मुलींकरिता कनिष्ठ महाविद्यालय (इ.११ वी व १२ वी.) सुरु करण्यात आले. त्यानंतर सन २००५ पासून कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुले व मुलींसाठी सहशिक्षण प्रवेश देणेस मा.शिक्षण उपसंचालक यांनी मान्यता दिल्याने सन २००५ पासून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुले व मुली दोघेही सहशिक्षण घेत आहेत.

शाळा संहिता नियमानुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हेच माध्यमिक शाळेला जोडलेल्या उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक असतात. संस्थानचे मंजुर आकृतीबंधामध्ये कन्या शाळेस मुख्याध्यापक/प्राचार्य पद मंजुर असून, कनिष्ठ महाविद्यालयास उप प्राचार्य हे पद मंजुर आहे. दोन्ही विभागांच्या सेवाजेष्ठता याद्या स्वतंत्र ठेवण्यात आलेल्या आहेत.

तरी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सेवाजेष्ठता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, ॲड.अशोकराव पाटील, अहमदगनर यांचा अभिप्राय तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा अभिप्राय या सर्व बाबींचे अवलोकन करुन महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती)

नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडील जेष्ठतम शिक्षिका श्रीमती जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने नेमणूक करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास पदोन्नतीने मुख्याध्यापक/ प्राचार्य नेमणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा टिकून राहणेसाठी तेथे योग्य गुणवत्ता धारण करणारा मुख्याध्यापक असावा, असे समितीचे मत झाले, याकरीता येथील मुख्याध्यापक पद जाहिरात देऊन गुणवत्तेच्या आधारे भरणे शक्य आहे काय, याबाबत मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचा अभिप्राय घेण्यात यावा, तोपर्यंत सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०७** **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील नियुक्त असलेल्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ नेमणूका देणेबाबत.**

**प्रस्ताव-** ऑगस्ट २००८ मध्ये मा.व्यवस्थापन समितीने मुलाखती घेऊन प्रवर्गनिहाय आरक्षण विचारात घेऊन, त्यानुसार मुलाखतीमध्ये निवड झालेल्या खालील संबंधीत कर्मचाऱ्यांना संन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून इ.११वी विज्ञान शाखेची तिसरी तुकडी आणि सन २०१४-१५ पासून इ.११वी कला व वाणिज्य या शाखेची तिसरी तुकडी सुरु करण्यात आलेली आहे.

**अ)** सन २०१३- १४ मध्ये इ.११ वीच्या विज्ञान शाखेंच्या नवीन तुकडी वाढीस व सन २०१४ -१५ मध्ये १२ वी विज्ञान शाखेस नैसर्गिक वाढीने मान्यता मिळालेली आहे. सध्याच्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत आहे. मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ नुसार उपलब्ध अर्धवेळ शिक्षकांना पुर्ण वेळ कार्यभार देण्याचे प्रस्तावीत केले आहे. खालील तक्यात दर्शविले प्रमाणे नियुक्त असलेल्या अर्धवेळ संबंधीत शिक्षकांना पुर्णवेळ नेमणूका देता येईल

| अ. नं. | नाव, पदनाम, प्रवर्ग | | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे अर्धवेळ सहा.शिक्षिका एम.एस.सी., बी.एड. (जीवशास्त्र) (SC) १ | १. | श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे यांना सन२००८-०९,सन-२००९-१० मध्ये दोन वर्ष एप्रिल २०१०अखेर रु.७२ प्रती घडयाळी तासाप्रमाणे तासिका तत्वावर शिक्षण सेवक (जीवशास्त्र) म्हणून नेमणूक देणेत आलेली आहे |
| | | २. | २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाअखेर अर्धवेळ शिक्षण सेवक (जीवशास्त्र) म्हणून मानधनावर नेमणूक देण्यात आली. त्यांनी ३ वर्षे अर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून कार्यभार पुर्ण केला आहे |
| | | ३. | दि.०१ मे २०१३ पासून पुर्ण वेळ उच्च माध्यमिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबॅंड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबॅंड ४६५०-१७४००+ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ग्रेड वेतन २३०० नुसार) वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. |
| | | ४. | सन २०१३-१४ पासून इ.११वी विज्ञान शाखेचे तिसरी तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांनी मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार पूर्ण वेळ पदाचे काम केले आहे |
| | | ५. | श्रीमती बनसोडे यांनी सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या तीन शैक्षणिक वर्षांचे ( अर्धवेळ ३६ महीने ) पूर्णवेळ १८ महीने अधिक सन २०१३-१४ चे मानधनावर १२ महीने असे एकूण ३० महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे. |
| | | ६. | सन २०१३-१४ मध्ये त्यांना अर्धवेळ वेतनश्रेणीत वेतन अदा केलेले आहे. ते शिक्षणसेवकांच्या वेतनापेक्षा जादा आहे. त्यामुळे त्यांना सन २०१३-१४ मध्ये रु.९०००/- मात्र वेतन देऊन, जादा दिलेले वेतन समान हप्त्यात /वेतन फरकातून वसूल करता येईल. |
| | | ७. | श्रीमती बनसोडे यांचे काम समाधानकारक असलेबाबत प्र.उप प्राचार्य यांनी अभिप्राय दिलेला आहे. |
| | | | शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ (३४०/९९) माशि- २,मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने **त्यांना १ मे २०१४ पासून** पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल. |
| ०२ | श्रीमती उषा कोंडाजी गायके अर्धवेळ शिक्षिका एम.सी.एम. बी.एड. | १. | श्रीमती उषा कोंडाजी गायके यांना यांना सन२००८-०९,सन-२००९-१० मध्ये दोन वर्ष एप्रिल २०१०अखेर रु.७२ प्रती घडयाळी तासाप्रमाणे तासिका तत्वावर शिक्षण सेवक ( माहिती तंत्रज्ञान) म्हणून नेमणूक देणेत आली आहे |
| | | २. | सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाअखेर अर्धवेळ शिक्षण सेवक (माहिती तंत्रज्ञान) म्हणून मानधनावर नेमणूक देण्यात आली. त्यांनी ३ |

| | | |
|---|---|---|
| | **(माहिती तंत्रज्ञान)**<br>(OPEN) | वर्षेअर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून कार्यभार पुर्ण केला आहे.<br>३. दि. ०१ मे २०१३ पासून पुर्णवेळ पुर्ण वेळ उच्च माध्यमिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबॅंड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबॅंड ४६५०-१७४००+ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ग्रेड वेतन २३०० नुसार) वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे.<br>४. सन २०१३-१४ पासून इ.११वी विज्ञान शाखेचे तिसरी तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांनी मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार पूर्ण वेळ पदाचे काम केले आहे<br>५. श्रीमती उषा गायके यांनी सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या तीन शैक्षणिक वर्षांचे (अर्धवेळ ३६ महीने) पूर्णवेळ १८ महीने अधिक सन २०१३-१४ चे मानधनावर १२ महीने असे एकूण ३० महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे.<br>६. सन २०१३-१४ मध्ये त्यांना अर्धवेळ वेतनश्रेणीत वेतन अदा केलेले आहे. ते शिक्षणसेवकांच्या वेतनापेक्षा जादा आहे. त्यामुळे त्यांना सन २०१३-१४ मध्ये रु.९०००/- मात्र वेतन देऊन, जादा दिलेले वेतन समान हप्त्यात/ वेतन फरकातून वसूल करता येईल.<br>७. श्रीमती गायके यांचे काम समाधानकारक असलेबाबत प्र.उप प्राचार्य यांनी अभिप्राय दिलेला आहे.<br>शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ (३४०/९९) माशि- २, मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने **त्यांना १ मे, २०१४ पासून** पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल. |
| ०३ | श्री प्रमोद भिवसेन चौधरी<br>अर्धवेळ<br>सहा.शिक्षक<br>एम.एस्सी.<br>बी.एड.<br>(भौतिकशास्त्र)<br>(OBC) | १. श्री प्रमोद भिवसेन चौधरी यांना सन २००९-१० मध्ये एक वर्ष एप्रिल २०१० अखेर रु.७२ प्रती घडयाळी तासाप्रमाणे तासिका तत्वावर शिक्षण सेवक (भौतिकशास्त्र) म्हणून नेमणूक देणेत आली आहे.<br>२. सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाअखेर अर्धवेळ शिक्षण सेवक (भौतिकशास्त्र) म्हणून मानधनावर नेमणूक देण्यात आली. त्यांनी ३ वर्षेअर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून कार्यभार पुर्ण केला आहे.<br>३. दि.०१ मे २०१३ पासून पुर्णवेळ पुर्ण वेळ उच्च माध्यमिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबॅंड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबॅंड ४६५०-१७४००+ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ग्रेड वेतन २३०० नुसार ) वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे.<br>४. सन २०१३-१४ पासून इ.११वी विज्ञान शाखेचे तिसरी तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांनी मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार पूर्ण वेळ पदाचे काम केले आहे<br>५. श्री चौधरी यांनी सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या तीन शैक्षणिक वर्षांचे (अर्धवेळ ३६ महीने) पूर्णवेळ १८ महीने अधिक सन २०१३-१४ चे मानधनावर १२ महीने असे एकूण ३० महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे.<br>६. सन २०१३-१४ मध्ये त्यांना अर्धवेळ वेतनश्रेणीत वेतन अदा केलेले आहे. ते शिक्षणसेवकांच्या वेतनापेक्षा जादा आहे. त्यामुळे त्यांना सन २०१३-१४ मध्ये रु.९०००/- मात्र वेतन देऊन, जादा दिलेले वेतन समान हप्त्यात /वेतन फरकातून वसूल करता येईल.<br>७. श्री.चौधरी यांचे काम समाधानकारक असलेबाबत प्र.उपप्राचार्य यांनी अभिप्राय दिलेला आहे<br>शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ (३४०/९९) माशि- २, मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने **त्यांना १ मे, २०१४ पासून** पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल. |
| ०४ | श्री गणेश शिवाजी धाकतोडे<br>एम.एस्सी.<br>बी.एड.<br>(गणित)<br>(SC) | १. श्री गणेश शिवाजी धाकतोडे यांना दि. २८ जुलै २०१२ पासून ( सन २०१२-१३ ) पासून ३० एप्रिल २०१५ अखेर रू.४५००/- प्रती महा प्रमाणे अर्धवेळ शिक्षक (गणित) म्हणून या मानधनावर नेमणूक देण्यात आली.<br>२. त्यांनी ३ वर्षेअर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून कार्यभार पुर्ण केला आहे. सन २०१३-१४ पासून इ.११वी विज्ञान शाखेची तीसरी तुकडी सुरु करण्यात आली.<br>३. त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांना मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार दि.०१ जुलै २०१३ पासून ३० जून २०१५ अखेर रु.९०००/-प्रती महा प्रमाणे पुर्णवेळ शिक्षक (गणित) मानधनावर नेमणूक देता येईल.<br>४. श्री धाकतोडे यांनी दि. २८ जुलै २०१२ पासून ( सन २०१२-१३ ) अर्धवेळ काम केलेले आहे. त्यांचे सन २०१२-१३ मधील अर्धवेळ शिक्षण सेवक पदाचा कार्यकाळ १२ |

| | | |
|---|---|---|
| | | महीने म्हणजेच पूर्णवेळ पदाचे ६ महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे.<br>५. सन २०१३-१४ व २०१४-१५ मधील पूर्णवेळ कार्यभाराचे २४ महिने त्यांनी पूर्णवेळ काम केले. याकालावधीत त्यांना सन २०१३-१४ व २०१४-१५ चे रु. ९०००/- मानधन देता येईल. त्यांचा ३० महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे.<br>६. श्री.धाकतोडे यांचे काम समाधानकारक असलेबाबत प्र.उप प्राचार्य यांनी अभिप्राय दिलेला आहे.<br>शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ (३४०/९९) माशि- २, मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने **त्यांना २८ जुलै २०१५ पासून** पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल. |

**ब)** सन २०१४ - १५ मध्ये इ.११वी च्या कला व वाणिज्य या शाखेंची नवीन तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे सध्याच्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत आहे. खालील तक्यात दर्शविले प्रमाणे नियुक्त असलेल्या अर्धवेळ संबंधीत शिक्षकांना पुर्णवेळ नेमणूका देता येईल.

| अ. नं. | नाव, पदनाम, प्रवर्ग | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ०१ | श्री दत्तु अशोक लांडे<br>अर्धवेळ सहा.शिक्षक<br>एम.ए. बी.एड.<br>(अर्थशास्त्र)<br>(NT) | १. श्री दत्तु अशोक लांडे यांना सन २००८-०९,सन २००९-१०,सन-२०१०-११ शैक्षणिक वर्षाकरीता दरवर्षी एप्रिल अखेर अर्धवेळ शिक्षणसेवक (अर्थशास्त्र) म्हणून रु.२५०० या मानधनावर नेमणूक देण्यात आली.<br>२. त्यांनी सलग तीन वर्ष काम केल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून पुर्ण वेळ उच्च माध्यमिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबॅंड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबॅंड ४६५०-१७४००+ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ ग्रेड वेतन २३०० नुसार) वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे.<br>३. त्यांनी अर्धवेळ शिक्षक म्हणून सन २००८-०९ ते सन २०१३-१४ अखेर ६ वर्षे अर्धवेळ म्हणजेच ३ वर्षे पूर्णवेळ काम केले आहे.<br>४. पैकी ३ वर्षे मानधनानुसार वेतन आदा केलेले आहे व ३ वर्षे अर्धवेळ शिक्षकाचे वेतनश्रेणीत वेतन अदा केलेले आहे. अर्धवेळ शिक्षकांचे वेतनश्रेणीत आदा केलेले वेतन हे शिक्षणसेवकांच्या वेतनापेक्षा जादा आहे.<br>५. त्यामुळे मानधनापेक्षा आदा केलेले जादाचे वेतन समान हप्त्यात /वेतन फरकातून वसूल करता येईल.<br>६. सन २०१४-१५ मध्ये इ. ११ वी कला व वाणिज्य शाखेची नवीन तिसरी तुकडी सुरु करण्यात आली. या नवीन तुकडीमुळे श्री लांडे यांना अर्थशास्त्रविषयाचा पूर्णवेळ पदाचा कार्यभार उपलब्ध झाला.<br>७. श्री.लांडे यांचे काम समाधानकारक असलेबाबत प्रउप प्राचार्य यांनी अभिप्राय दिलेला आहे.<br>शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ ( ३४०/९९ ) माशि - २,मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने **त्यांना १६ जून २०१४ पासून** पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल |
| ०२ | श्री रंगनाथ चांगदेव रहाणे<br>अर्धवेळ सहा.शिक्षक<br>एम.ए. बी.एड.<br>(भूगोल)<br>(OPEN) | १. श्री रंगनाथ चांगदेव रहाणे यांना सन-२००९-१० मध्ये एक वर्ष एप्रिल २०१० अखेर रु.७२ प्रती घडयाळी तासाप्रमाणे तासिका तत्वावर शिक्षण सेवक (भूगोल ) म्हणून नेमणूक देणेत आली आहे.<br>२. सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षा अखेर अर्धवेळ शिक्षण सेवक (भूगोल ) म्हणून मानधनावर नेमणूक देण्यात आली.<br>३. तसेच सन २०१३-१४ मध्ये अर्धवेळ वेतनश्रेणी पदावर काम केले आहे. दि.०१ मे २०१४ पासून पुर्णवेळ उच्च माध्यमिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबॅंड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबॅंड ४६५०-१७४००+ ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ ग्रेड वेतन २३०० नुसार ) वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे.<br>४. सन २०१४ -१५ पासून इ.११वी कला शाखेची तिसरी तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांनी मा.व्यवस्थापन समिती दि.०५/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४२८ नुसार पूर्ण वेळ पदाचे काम केले आहे.<br>५. श्री रहाणे यांनी सन २०१०-११, सन २०११-१२,सन २०१२-१३ व २०१३-१४ या चार शैक्षणिक वर्षांचे ( अर्धवेळ ४८ महीने ) पूर्णवेळ २४ महीने अधिक सन २०१४ -१५ चे मानधनावर ६ महीने असे एकूण ३० महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे.<br>६. सन २०१३-१४ मध्ये त्यांना अर्धवेळ वेतनश्रेणीत वेतन अदा केलेले आहे. ते |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शिक्षणसेवकांच्या वेतनापेक्षा जादा आहे. त्यामुळे त्यांना सन २०१३-१४ मध्ये रु.९०००/- मात्र वेतन देऊन, जादा दिलेले वेतन समान हप्त्यात/ वेतन फरकातून वसूल करता येईल. |
| | | ७. | श्री.राहाणे यांचे काम समाधानकारक असलेबाबत प्र.उप प्राचार्य यांनी अभिप्राय दिलेला आहे. शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ ( ३४०/९९ ) माशि - २,मंत्रालय, मुंबई दि १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने **त्यांना १ जानेवारी २०१५ पासून** पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल. |

इ.११ वी व १२ वी वर्गांच्या नवीन तुकडी वाढीने सध्याच्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत आहे. वरील **"अ"** व **"ब "** तक्यात नमुद केलेल्या शिक्षकांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या वस्तुस्थितीनुसार व कालावधीनुसार पुर्णवेळ नेमणूक देता येईल.

अर्धवेळ शिक्षणसेवक पदाकरीता पूर्णवेळ पदाचे अर्धे मानधन देऊन नेमणुक देण्यात येते. अर्धवेळ शिक्षक म्हणजे पूर्णवेळ पदाचे वेतनश्रेणीच्या निम्मी अर्धी वेतनश्रेणी देऊन नेमणुक देण्यात येते. प्रस्तावातील नमूद केलेल्या सर्वांची नेमणुक शिक्षणसेवक नेमणुक ३ वर्षे अथवा ३० महीने होत आहे. संबंधीतांचे समोर स्पष्टीकरणात स्पष्ट उल्लेख आहे. प्रस्तावात नमुद केलेल्या शिक्षकांच्या अर्धवेळ (६० महीने)/ पुर्णवेळ ३० महीने ज्या दिवशी पुर्ण होतो आणि त्या संबंधीत शिक्षकाला पूर्णवेळ पदाचा कार्यभार उपलब्ध होतो तेथपासून पुढे त्यांना वेतनश्रेणी देय होते. तसे प्रस्तावात स्पष्टपणे नोंदविले आहे.

आकृतीबंधात श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयास ३० शिक्षक पदाची मंजूरी आहे यापैकी स्थायी पदसंख्या २६ व ४ कंत्राटी शिक्षक पदांची मान्यता आहे. २६ पैकी २२ पुर्णवेळ शिक्षकांची नियूक्ती करण्यात आलेली आहे. ०४ स्थायी शिक्षकांचे पदे रिक्त आहेत.

**क)** आकृतीबंधातील ०४ कंत्राटी शिक्षक पदांना, स्थायी पदामध्ये रुंपातरीत ( समाविष्ट ) करण्याचा प्रस्ताव तसेच सन २०१५-१६ मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या नवीन वाढीव तुकडया सुरु करण्यात आलेल्या आहे. यासाठी आवश्यक १० शिक्षक पदाचा व ०१ टंकलेखक लिपिक पदाचा समावेश सुधारीत आकृतीबंधात करुन विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी सादर करता येईल, असा प्र.उप प्राचार्य यांनी अभिप्राय दिलेला आहे.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील सन २०१४-१५ चे संच मान्यतेमध्ये शिक्षण संचालक यांनी २७ पुर्णवेळ, ३ अर्धवेळ व ३ तासिक तत्वावरील असे एकुण ३३ शिक्षकांच्या संचास मान्यता दिलेली आहे. तसेच सन २०१५-१६ ची संच मान्यता येणे अद्याप बाकी आहे. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे सद्यस्थितीमध्ये २२ पुर्णवेळ व ६ अर्धवेळ शिक्षक कार्यरत आहे. तसेच उर्वरीत जागेंवर कंत्राटदारामार्फत कंत्राटी कर्मचा-यांची पात्रतेनुसार कंत्राटी शिक्षक म्हणून नियुक्ती केलेली आहे.

वरीलप्रमाणे प्र.उप प्राचार्य श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडून प्रस्ताव/अभिप्राय सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील मंजुर आकृतीबंधानुसार ०४ स्थायी शिक्षकांचे पदे रिक्त आहेत. कनिष्ठ महाविद्यालयाकडील नैसर्गिक तुकडीवाढ, मा.शिक्षण संचालक यांचेकडील संच मान्यता व त्यानुसार आवश्यक शिक्षक संख्या विचारात घेता, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता उपरोक्त **"अ"** मध्ये नमुद ४ अर्धवेळ शिक्षक, **"ब "** मध्ये नमुद ०२ अर्धवेळ शिक्षक असे एकुण ०६ अर्धवेळ शिक्षकांना वरील तक्त्यात त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या कालावधी पासून पुर्णवेळ शिक्षक म्हणून नेमणूक देणेस व परिच्छेद **"क"** मध्ये नमुद केलेप्रमाणे आकृतीबंधामध्ये मंजुर ०४ कंत्राटी शिक्षक पदांना स्थायीपदांमध्ये रुपांतरीत करणे व वाढीव १० शिक्षक पदांना मंजुरी मिळणेकामी मा.विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०५.२०१६ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेला होता, त्यावर निर्णय क्र.३०० खालीलप्रमाणे पारित झालेला आहे.

*"श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील नियुक्त असलेल्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ नेमणूका देणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावामध्ये सदरहु शिक्षकांचे गोपनीय अहवाल कसे आहेत, तसेच त्यांचे काम समाधानकारक आहे का, याचा उल्लेख दिसून येत नाही. सबब तूयांच्या कामाच्या मुल्यमापनासह सविस्तर प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा"*

उपरोक्त मा.व्य.समितीचे सभेतील निर्णयानुसार सबंधीत अर्धवेळ शिक्षकांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे आहे. शासन निर्णयाप्रमाणे सबंधीत अर्धवेळ शिक्षकांचे लगतच्या पाच वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी किमान A असणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | शिक्षकाचे नांव | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौ.संगिता रंगनाथ बनसोडे | A+ | A+ | A+ | A+ | A+ | A+ |
| २ | सौ.उषा कोंडाजी गायके | A+ | A+ | A | A+ | A+ | A+ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | श्री.प्रमोद भिवेसन चौधरी | A+ | A+ | A+ | A+ | A+ | A+ |
| ४ | श्री.गणेश शिवाजा धाकतोडे | - | A | A | A+ | A+ | A |
| ५ | श्री.दत्तू अशोक लांडे | A+ | A | A | A+ | A+ | A |
| ६ | श्री.रंगनाथ चांगदेवराहणे | A | A | A | A+ | A+ | A |

उपरोक्त विवेचनास अनुसरुन प्र.उप प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

**(अ)** सन २०१३-१४ मध्ये इ.११ वी. विज्ञान शाखेची ३ री तुकडी सुरु झाल्याने या विज्ञान शाखेच्या वर्गांना शिकविणारे अर्धवेळ शिक्षक श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे, श्रीमती उषा कोंडाजी गायके, श्री.प्रमोद भिवसेन चौधरी व श्री.गणेश शिवाजी धाकतोडे यांना सन २०१३-१४ पासून पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध झालेला आहे. त्यांना प्रस्तावित केल्याप्रमाणे सन २०१३-१४ पासून पे-बॅन्ड रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४६०० ही वेतनश्रेणी व इतर अनुज्ञये भत्ते देऊन पुर्णवेळ सहाय्यक शिक्षक म्हणून नेमणूक द्यावी लागेल.

**(ब)** सन २०१४-१५ मध्ये इ.११ वी कला व वाणिज्य शाखेची तुकडी सुरु झाल्याने या कला व वाणिज्य शाखेच्या वर्गांना शिकवणारे अर्धवेळ शिक्षक श्री.दत्तात्रय अशोक लांडे व श्री.रंगनाथ चांगदेव राहणे यांना सन २०१४-१५ पासून पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध झालेला आहे. त्यांना प्रस्तावित केल्याप्रमाणे सन २०१४-१५ पासून पे-बॅन्ड रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४६०० ही वेतनश्रेणी व इतर अनुज्ञये भत्ते देऊन पुर्णवेळ सहाय्यक शिक्षक म्हणून नेमणूक द्यावी लागेल.

**(क)** मंजुर आकृतीबंधामध्ये कनिष्ठ महाविद्यालयात २६ स्थायी शिक्षक पदे मंजुर असून, सध्या २२ पदांवर पुर्णवेळ शिक्षक कार्यरत आहेत त्यामुळे उर्वरीत ४ पदांवर सन २०१३-१४ मध्ये पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध असलेल्या विज्ञान शाखेचे असलेले श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे, श्रीमती उषा कोंडाजी गायके, श्री.प्रमोद भिवसेन चौधरी व श्री.गणेश शिवाजी धाकतोडे यांना पुर्णवेळ शिक्षकांची रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४६०० ही वेतनश्रेणी व इतर अनुज्ञये भत्ते देऊन पुर्णवेळ सहाय्यक शिक्षक म्हणून नेमणूक देता येतील.

**(ड)** तसेच आकृतीबंधामध्ये ०४ कंत्राटी शिक्षक पदे मंजुर असून, या पदांचे स्थायी पदात रुपांतर करणेस आणि आणखी १० वाढीव स्थायी सहाय्यक शिक्षक पदांचे मंजुरीसाठी मा.विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा लागेल, असे मत आहे. सदरचे पदांना मजुरी मिळाल्यानंतर श्री.दत्तात्रय अशोक लांडे व श्री.रंगनाथ चांगदेव राहणे यांना पुर्वलक्षी प्रभावाने सन २०१४-१५ पासून प्रस्तावित केल्याप्रमाणे पुर्णवेळ शिक्षकांची रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४६०० ही वेतनश्रेणी व इतर अनुज्ञये भत्ते देऊन पुर्णवेळ सहाय्यक शिक्षक म्हणून नेमणूक देता येतील.

सबब प्र.उप प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांचे अभिप्रायानुसार उपरोक्त परिच्छेद **क** व **ड** मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, तसेच प्र.उप प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांचे अभिप्रायानुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामधील श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे, श्रीमती उषा कोंडाजी गायके, श्री.प्रमोद भिवसेन चौधरी, श्री.गणेश शिवाजी धाकतोडे, श्री.दत्तात्रय अशोक लांडे व श्री.रंगनाथ चांगदेव राहणे या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध झालेला आहे. परंतु पुर्णवेळ स्थायी शिक्षकांची चारच पदे रिक्त असल्यामुळे प्रस्तावातील अ तक्त्यामध्ये नमुद केलेल्या श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे, श्रीमती उषा कोंडाजी गायके, श्री.प्रमोद भिवसेन चौधरी व श्री.गणेश शिवाजी धाकतोडे यांना रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४६०० ही वेतनश्रेणी व इतर अनुज्ञये भत्ते देऊन पुर्णवेळ सहाय्यक शिक्षक म्हणून संस्थान सेवेत कायम करणेत यावे.**

**तसेच प्रस्तावातील ब तक्तयामध्ये नमुद केलेल्या उर्वरित श्री.दत्तात्रय अशोक लांडे व श्री.रंगनाथ चांगदेव राहणे या ०२ अर्धवेळ सहाय्यक शिक्षकांना पुर्णवेळ स्थायी सहाय्यक शिक्षक म्हणून संस्थान सेवेत कायम करणेसाठी, पुर्णवेळ स्थायी सहाय्यक शिक्षक पदास मंजुरी घेणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा.**

**पुर्णवेळ नेमणूका देण्यात येत असलेल्या उपरोक्त शिक्षकांना पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी व इतर अनुज्ञेय भत्ते देण्यात येऊ नये व श्री.दत्तात्रय अशोक लांडे व श्री.रंगनाथ चांगदेव राहणे यांना देण्यात आलेल्या जादा वेतनाची वसूली करण्यात येऊ नये.**

**तसेच सदरहू शिक्षकांकडून पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी व इतर अनुज्ञेय भत्त्यांची मागणी करण्यात येणार नाही, याबाबत लेखी स्वरुपात घेण्यात यावे व याच अटीवर त्यांना संस्थान सेवेत कायम करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०८** **संस्थानचे सिकंदराबाद, चैन्नई व बंगळूरु येथील माहिती केंद्रावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मासिक मानधन वाढीच्या दि.१४.०९.२०१६ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबांचे जीवन व कार्याचा प्रचार– प्रसार व्हावा या उद्देशाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत सिकंदराबाद, चेन्नई व बंगळूरु या तीन ठिकाणी माहीती केंद्र सुरु केलेले आहेत. त्या ठिकाणी संस्थानव्दारे प्रकाशीत केली जाणारे फोटो-पुस्तके विक्रीसाठी ठेवण्यात येतात, त्याचबरोबर देणगी स्वीकारणे, आरती पास, रुम बुकींग इ. प्रकारची कामे केली जातात. या कामासाठी एकत्रित मानधनावर खालीलप्रमाणे कंत्राटी कर्मचा-यांची नेमणूक ठेकेदारामार्फत करण्यात आलेली आहे.

| अ.नं | कर्मचा-यांचे नांव व पदनाम | माहीती केंद्र ठिकाण | नेमणूक केल्याचे वर्षे | एकत्रित मानधन रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री चंद्रकांत माणिकचंद सुराणा कार्यालय सहाय्यक | सिकंदराबाद | दि.२४/०८/२०१० ते दि.३१/१०/२०११<br>दि.०१/११/२०११ ते दि.२३/०८/२०१४<br>दि.०१/११/२०१३ ते दि.२३/०८/२०१४<br>दि.२४/०८/२०१४ ते दि.२३/०८/२०१५<br>दि.२४/०८/२०१५ ते दि.२३/०८/२०१६ | रु.५०००/-<br>रु.८०००/-<br>रु.१००००/-<br>रु.१२०००/-<br>रु.१२०००/- |
| ०२ | श्री व्ही कन्नन कार्यालय प्रमुख | चेन्नई | दि.०२/११/२०११ ते दि.०२/११/२०१३<br>दि.०३/११/२०१३ ते दि.०२/११/२०१४<br>दि.०३/११/२०१४ ते दि.०२/११/२०१५<br>दि.०३/११/२०१५ ते दि.०२/११/२०१६ | रु.८०००/-<br>रु.१००००/-<br>रु.१२०००/-<br>रु.१२०००/- |
| ०३ | श्री एस.कृष्णमूर्ती कार्यालय प्रमुख | बंगळूरु | दि.०३/११/२०११ ते दि.०२/११/२०१३<br>दि.०३/११/२०१३ ते दि.०२/११/२०१४<br>दि.०३/११/२०१४ ते दि.०२/११/२०१५<br>दि.०३/११/२०१५ ते दि.०२/११/२०१६ | रु.८०००/-<br>रु.१००००/-<br>रु.१२०००/-<br>रु.१२०००/- |

सध्या मा.त्रिसदस्य समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२८ नुसार, चेन्नई व बेंगलुरु येथे कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना मुदतवाढ देणेत आलेली असून त्यांचा मुदतवाढीचा कालावधी दि.०२/११/२०१६ रोजी संपुष्ठात येणार आहे. तसेच त्यांना प्रतिमहा रु.१२,०००/- (अक्षरी रुपये बारा हजार मात्र) एकत्रित मानधन देण्यात येत आहे. तसेच सिकंदराबाद येथील कर्मचा-यास मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२५ अन्वये रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली असून त्यांचे मुदतवाढीचा कालावधी दि.२३/०८/२०१६ रोजी संपुष्ठात आलेला आहे.

**ब)** मध्यंतरीचे काळात, श्री.आर.भास्करण, श्री साई मंडली ट्रस्ट, बंगलुरु यांनी दि.२६/०२/२०१६ चे अर्जाने, संस्थानमार्फत चालविण्यात येणा-या बंगलुरु, चेन्नई व सिबंदराबाद येथील माहिती केंद्रातून प्रतिवर्षी प्राप्त होणारे उत्पन्न, सध्याची वाढती महागाई व तेथील कर्मचा-यांचे कामाचे स्वरुप इ. बाबींचा विचार करता सदर माहिती केंद्रात कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या उपरोक्त कर्मचा-यांचे मानधनामध्ये योग्य ती वाढ करणेची विनंती केलेली होती.

श्री.आर.भास्करण, श्री साई मंडली, ट्रस्ट यांचे विनंतीबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.२३/०६/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्र.३७४ अन्वये पुढील प्रमाणे निर्णय संमत झालेला आहे. श्री.चंद्रकांत माणिकचंद सुराणा, कार्यालय सहाय्यक - सिकंदराबाद, श्री.व्ही.कन्नन, कार्यालय प्रमुख – चेन्नई व श्री.एस.कृष्णमुर्ती, कार्यालय प्रमुख – बंगळुरु यांना त्यांची मुदत संपत असलेल्या लगतच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.

तसेच वाढती महागाई व त्यांच्या कार्यालयाचे वार्षिक उत्पन्न याचा विचार करता, त्यांना मुदतवाढ देत असलेल्या तारखेपासून पुढे दरमहा एकत्रित रु.१५, ०००/- मानधन देण्यात यावे.

श्री.चंद्रकांत सुराणा, कार्यालय सहाय्यक, सिंकदराबाद यांचे मुदतवाढीचा कालावधी दि.२३/०८/२०१६ रोजी संपत असल्याने, त्यांनी मुदतवाढ मिळणेबाबत विनंतीअर्ज सादर केलेला होता. सदर अर्जाबाबत उपरोक्त संमत निर्णयानुसार श्री.सुराणा यांना दि.२४/०८/२०१६ ते दि.२३/०८/२०१७ अखेर मुदतवाढ देणे व त्यांचे सध्याचे मानधनामध्ये वाढ करुन त्यांना प्रतिमहा रु.१५,०००/- (अक्षरी पंधरा हजार मात्र) अदा करणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०१/१७२३/२०१६ दि.०३/०८/२०१६ अन्वये आदेश पारीत करणेत आलेला आहे.

**क)** आता, बेंगळुरु, चेन्नई व सिंकदराबाद येथे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर कार्यरत असलेल्या उपरोक्त तीन कर्मचा-यांनी दि.१४/०९/२०१६ रोजीचे वेगवेगळया अर्जांनी, त्यांचे सध्याचे मानधनामध्ये वाढ करुन प्रतिमहा रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) मानधन मिळणेची विनंती केलेली आहे. तसेच बेंगलुरु व चेन्नई येथील कार्यालयासाठी प्रत्येकी एक मदतनिस मिळणेची विनंती केलेली आहे. संबधीतांचे अर्जांवर प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी सध्याचे महागाईचा विचार करता संबधीतांना संस्थान नियमानुसार योग्य ती

पगारवाढ तसेच बेंगलुरु व चेन्नई येथील कार्यालयासाठी प्रत्येकी ०१ मदतनिस देणेस हरकत नाही, असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

मा.शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३(३७/०९) का.सोळा, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ दि.०७ ऑगस्ट, २००९ नुसार मान्यता दिलेली आहे. त्यात खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद केलेल्या आहेत.

अट-शर्त क्र.६ **– समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.**

अट-शर्त क्र.८**- समितीने शक्यतो आकतीबंधातील पदे ही एकत्रित मानधानावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.**

शासनाने संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता दिल्यानंतर उपरोक्त माहिती केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदर माहिती केंद्रासाठी लागणारा कर्मचारी वर्ग यांचा मंजुर आकृतीबंधात समावेश नाही. आकृतीबंधातील अटी-शर्तीस अनुसरुन उपरोक्त कर्मचा-यांची तात्पुरते स्वरुपात कंत्राटी पध्दतीने एकूण मानधनावर नेमणूक करणेत आलेली आहे.

**ड)** यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वेळोवेळी संबधीत कर्मचा-यांना मुदतवाढ व एकत्रीत मानधनामध्ये वाढ देणेत आलेली आहे. तसेच काही महिन्यांपूर्वीच श्री साई मंडली ट्रस्ट, बेंगलुरु यांचे दि.२६/०२/२०१६ रोजीचे पत्रास अनुसरुन मा.त्रिसदस्य समितीचे दि.२३/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७४ अन्वये संबधीत कर्मचा-यांना मुदत संपत असलेल्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देणेत आलेली आहे. तसेच मुदतवाढ देत असलेल्या तारखेपासून पुढे दरमहा एकत्रित रु.१५,०००/- मात्र मानधन देण्यात यावे असे ठरलेले आहे. आता, संबधीत कर्मचा-यांनी दि.१४/०९/२०१६ रोजीचे पत्राने एकूण मानधनामध्ये वाढ करुन प्रतिमहा रु.२५,०००/- एकत्रित मानधन मिळणेची विनंती केलेली आहे तसेच चेन्नई व बेंगलुरु येथील कार्यालयासाठी प्रत्येकी एक मदतनिस मिळणेची विनंती केलेली आहे.

तरी चेन्नई, बेंगलुरु व सिंकदराबाद येथे कंत्राटी पध्दतीने एकूण मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या मानधनामध्ये योग्य ती वाढ करणेस तसेच चेन्नई व बेंगलुरु येथील माहिती केंद्रामध्ये कंत्राटी पध्दतीने प्रत्येकी एक मदतनिस नेमणूक करणेच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे सिकंदराबाद, चैन्नई व बंगळूरु येथील माहिती केंद्रावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मासिक मानधन वाढ करणेपूर्वी व्यवस्थापन समिती सदस्य श्री.सचिन तांबे यांनी स्व:खर्चाने तीनही माहिती केंद्रांमधील कामकाज व कार्यपध्दती याची पाहणी करावी व त्यांच्या अभिप्रायानुसार तेथील कर्मचाऱ्यांचे मानधन व तेथे प्रत्येकी एक मदतनीस यांची नेमणूक करणेबाबत निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०९** **श्री रामनवमी उत्सव- २०१६ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री रामनवमी उत्सव २०१६ मधील खर्चाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०२.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.७९ नुसार एकूण रु. ७७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | तपशील | अंदाज पत्रकातील मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मंडप कमानी स्टेज | ११,५१,५२९.०० | ९२७८९७.०० | - | २२३६३२.०० |
| ०२ | कलाकार,कीर्तनकाराची बिदागी | ४,४०,०००.०० | १४७८१.०० | - | ४२५२१९.०० |
| ०३ | भक्तांना मिष्टान्न मजुरीसह | ७,९३,५८८.०० | ७८५२८८.०० | - | ८३००.०० |
| ०४ | विद्युत रोषणाई | १०,००,०००.०० | ९२६६७२.०० | - | ७३३२८.०० |
| ०५ | निमत्रंण पत्रिका छपाई, उदीप्रसादासह व जाहिरात | ४,००,०००.०० | ३१३५४०.०० | - | ८६४६०.०० |
| ०६ | पोस्टेज खर्च | १०,००,०००.०० | ९५२१५७.०० | - | ४७८४३.०० |
| ०७ | एल.ई.डी पडदा | ६,००,०००.०० | ० | - | ६०००००.०० |
| ०८ | फुल सजावट | २,००,०००.०० | ० | - | २०००००.०० |
| ०९ | जादा कामगार | ३,००,०००.०० | ३१३४८२.०० | १३४८२.०० | - |
| १० | पदयात्री,पालख्या,पिण्याचे पाणी.व्यवस्था | ४,३५,०००.०० | १८९०५२.०० | - | २,४५९४८.०० |
| ११ | आयत्या वेळचा प्रासंगिक खर्च (जादा टॅंकर भाडोत्री लावावयाचे झाल्यास) | ६,००,०००.०० | ० | - | ६०००००.०० |
| १२ | कुस्ती हंगामा | ७,००,०००.०० | ६९४८८०.०० | - | ५१२०.०० |
| १३ | इतर खर्च (वाहन भाडे, सभा नास्ता, कॅमेरा/ टी.व्ही.ई. दुरुस्ती.) | ७९८८३.०० | ० | - | ७९८८३.०० |
| | एकूण रुपये | **७७,००,०००.००** | ५१,१७,७४९.०० | १३४८२.०० | २५९५७३३.०० |

उपरोक्त तपशिल पाहता श्री रामनवमी उत्सव २०१६ करीता रक्कम रु. ७७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्याहत्तर लाख) मात्र मंजूर करण्यात आलेले आहे. या रकमेतून उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकूण रु.५१,१७,७४९/- (अक्षरी रुपये एक्कावन्न लाख सतरा हजार सातशे एकोणपन्नास) मात्र खर्च झालेला आहे.

तरी सदरचे प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१६ साजरा करणेसाठी झालेल्या रु.५१,१७,७४९/- मात्रचे प्रत्यक्ष खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

विषय नं.१० **साईनगर मैदानावर भजन संध्या कार्यक्रमासाठी व कोजागिरी पौर्णिमेच्या दमा शिबीराकरीता परवानगी देणेबाबत.**

प्रस्ताव- १) श्री.संदिप भिमाशंकर सोनवणे, अध्यक्ष व संस्थापक, साई संगम सेवाभावी संस्था, शिर्डी यांनी दि.३१.०१.२०१७ रोजी भव्य अशी साई भजन संध्या कार्यक्रमाचे दरवर्षीप्रमाणे आयोजन केलेले आहे. त्यांनी अर्जात नमुद केले आहे की, सन २०१८ साली श्री साईबाबांची समाधी शताब्दी महोत्सव साजरा होत आहे. हा दृष्टीकोण समोर ठेऊन या संपन्न होणा-या धार्मिक कार्यक्रमास सदर साईनगर मैदान उपलब्ध करुन देणेबाबत दि.२९.०८.२०१६ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे.

२) एच.एस.तांबोळी एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर ट्रस्ट , एकलहरे, नाशिक हे १५ वर्षापासून शिर्डी येथे कोजागिरी पौर्णिमेस दमा (अस्थमा) शिबीर आयोजित करतात सदर शिबीरात आयुर्वेदीक औषध रुग्णास तपासणी करुन मोफत देण्यात येते. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून दम्यासंबंधी मार्गदर्शनपर व्याख्याने दिली जातात. दि.१५.१०.२०१६ रोजी तांबोळी एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर ट्रस्ट, एकलहरे यांना दमा (अस्थमा) शिबीर घेण्याचा मानस आहे. सदर शिबीरासाठी साईनगर मैदान मिळणेबाबत दि.०९.०९.२०१६ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे.

अ) मा.त्रिसदस्यीय समितीचा दि.२८.०४.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.३६९ अन्वये सदर विषयावर चर्चा होऊन साईनगर परिसरात संस्थान कर्मचा-यांची निवासस्थाने व श्री साईबाबा हॉस्पिटल आहे. साईनगर मैदानात कार्यक्रमास परवानगी दिल्यास कार्यक्रमाचे लाऊड स्पिकरचे आवाजाने श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांना त्रास होतो. याकरीता येथून पुढे साईनगर मैदान संस्थानचे कार्यक्रमाव्यतिरिक्त कोणासही वापरण्यास देण्यात येऊ नये. तसेच मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि. १८.१०.२००८ चे सभेत निर्णय क्र.८०५ मध्ये येथून पुढे साईनगर मैदान कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास भाडोत्री देण्यात येऊ नये, याचे काटेकोर पालन करण्यात यावे असे ठरले आहे.

ब) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०३.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.३२७ अन्वये साईनगर मैदान संस्थानचे कार्यक्रमाव्यतिरिक्त कोणासही वापरात देऊ नये. त्यांना यापुढे साईनगर मैदान कार्यक्रमासाठी मिळणार नाही, असे लेखी पत्र पाठविणेत यावे व साईनगर मैदान कार्यक्रमासाठी मिळणेबाबत अर्ज आल्यास, त्वरीत या विषयी उलट टपाली कळविणेत यावे, असे ठरले आहे.

उपरोक्त '**अ**' व '**ब**' चे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईनगर मैदान सन २०१३ पासून कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास देण्यात आलेले नाही.

सबब श्री. संदिप भिमाशंकर सोनवणे, अध्यक्ष व संस्थापक, साई संगम सेवाभावी संस्था, शिर्डी यांना दि.३१.०१.२०१७ रोजी भव्य अशी साई भजन संध्या कार्यक्रमासाठी व एच.एस.तांबोळी एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर ट्रस्ट , एकलहरे, नाशिक यांना दि.१५.१०.२०१६ रोजी दमा (अस्थमा) शिबीरासाठी साईनगर मैदान द्यावे किंवा कसे याबाबत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६९७ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईनगर मैदान वापरास देणेबाबत यापुर्वी झालेले सर्व निर्णय रद्द करणेत यावे. तसेच यापुढे रुग्णालयामधील रुग्ण व साईनगर येथील रहिवाशी यांना कार्यक्रमाच्या आवाजाचा त्रास होणार नाही, या अटीवर राजकीय कार्यक्रम वगळता वैद्यकिय शिबीरे व धार्मिक कार्यक्रमासाठी साईनगर मैदान वापरासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे.**

**यानुशंगाने प्रस्तावात नमुद केलेल्या साई संगम सेवाभावी संस्था, शिर्डी यांना दि.३१.०१.२०१७ रोजी साई भजन संध्या कार्यक्रमासाठी व एच.एस.तांबोळी एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर ट्रस्ट, एकलहरे, नाशिक यांना दि.१५.१०.२०१६ रोजी दमा (अस्थमा) शिबीरासाठी साईनगर मैदान संस्थान नियमानुसार उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

विषय नं.११ **दि.२९ सप्टेंबर हा दिवस प्रतिवर्षी श्री साईबाबा समाधी मंदिर सुवर्ण कलशारोहण स्मृतीदिन म्हणून साजरा करणेबाबत तसेच शताब्दी वर्षात विष्णू महाराज पारनेरकर यांचे मार्गदर्शनाने पूर्णवाद तत्ववाद तत्वज्ञान व श्री साईबाबा यांचे तत्वज्ञान यावर कार्यक्रम ठेवणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १(झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल, व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व सर्व गोष्टी करील. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** श्रीसाईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबांचे ३४व्या पुण्यतिथी उत्सवाचे वेळी उत्सवाचे मुख्य दिवशी दि.२९सप्टेंबर,१९५२ रोजी श्रीसाईबाबांचे समाधी मंदिराचे कळसावर कलशारोहणाचा कार्यक्रम सादर करण्यात आला होता. सदर कलशारोहण मा.डॉ.रामचंद्र महाराज पारनेरकर महाराज यांचे शुभहस्ते करण्यात आलेले होते. याबाबतचा उल्लेख श्रीसाईबाबांचे ३४ व्या पुण्यतिथी उत्सवाचे श्रीसाईलिला अंकामध्ये उल्लेख आहे.

**प्रस्ताव-** श्री.सुनिल नारायण जोशी, रा.पंचवटी, नाशिक यांनी आपले अर्जामध्ये खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करणेबाबात विनंती केलेली आहे-

दि.२९ सप्टेंबर हा दिवस प्रतिवर्षी श्रीसाईबाबा समाधी मंदिर सुवर्ण कलशारोहण स्मृतिदिन म्हणून साजरा करणेबाबत व सन-२०१८ चे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात पूर्णवाद-वर्धिष्णू आदरणीय विष्णू महाराज पारनेरकर, रा.पारनेर, जि.अहमदनगर यांचे मार्गदर्शनाने "पूर्णवाद तत्वज्ञान" व "श्रीसाईबाबा यांचे तत्वज्ञान" यावर कार्यक्रम ठेवणेबाबत

**विभागाचे मत/ अभिप्राय-** श्री सुनिल ना. जोशी, रा. पंचवटी, नाशिक यांनी दोन प्रकारच्या मागणी केल्या आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे नियोजन करता येईल असे नम्र मत आहे-

१. श्रीसाईबाबांचे ३४व्या पुण्यतिथी उत्सवाचे मुख्य दिवशी दि.२९ सप्टें,१९५२मध्ये कलशारोहणाचे दिवशी सकाळी ११वाजता मंत्रजयघोषाने सुवर्ण कलशाची स्थापना करण्यात आली आहे. त्यावेळी कलश स्थापनेनंतर रेशमी निशाण समाधी मंदिराचे कळसावर फडकविण्यात आले होते. त्यामुळे त्याचप्रमाणे श्रीसाईबाबांचे समाधी शताब्दी वर्षाचे सुरुवातीस श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१७चे प्रथम दिवशी दि.२९ सप्टेंबर, २०१७ हाच दिवस आलेला आहे. या दिवशी सुवर्ण कलशारोहणला तारखेप्रमाणे ६४वर्षे पुर्ण होत आहे. त्याचे औचित्य साधुन श्रीसाईबाबा समाधी शताब्दीचे वर्षाची सुरुवातही याच दिवशी होत आहे. त्यामुळे दि.२९ सप्टेंबर,२०१७ रोजी सकाळी ११ वाजता संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय यांचे हस्ते श्रींचे समाधी मंदिराचे कळसावर नवीन रेशमी निशाण फडकविण्यात यावे व श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षाची सुरुवात झाली असे मोठ्या प्रमाणात कार्यक्रम केल्यास योग्य होईल, असे नम्र मत आहे. तरी याबाबत मोठ्या प्रमाणात प्रसार माध्यमांमध्ये प्रचार करुन हा सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा करता येईल. तसेच प्रति वर्षी श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव संस्थानमार्फत साजरा करण्यात येत आहे, त्यामुळे श्रींचा सुवर्ण कलशारोहणाचा प्रति वर्षी वेगळा कार्यक्रम करणे योग्य होणार नाही, असे नम्र मत आहे.

२. यापुर्वी दि.१३ जानेवारी,२००५ मध्ये ॲड. विष्णू महाराज पारनेकर यांचे श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत श्रीसाई व्याख्यानमाला सुरु करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे अर्जदार यांचे विनंतीनुसार सन-२०१८ चे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात समाधी शताब्दी कक्षाचे उपलब्ध तारखेप्रमाणे अनेक व्याख्यान व संमेलन घेण्यात येणार आहेत, त्यामध्ये पूर्णवाद-वर्धिष्णू आदरणीय विष्णू महाराज पारनेरकर, रा.पारनेर, जि.अहमदनगर यांचे मार्गदर्शनाखाली "पूर्णवाद तत्वज्ञान" व "श्रीसाईबाबा यांचे तत्वज्ञान" यावर कार्यक्रम ठेवणेस हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सुनिल नारायण जोशी, रा.पंचवटी, नाशिक यांचे विनंती मधील सन-२०१८ चे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात समाधी शताब्दी कक्षाचे उपलब्ध तारखेप्रमाणे पूर्णवाद-वर्धिष्णू आदरणीय विष्णू महाराज पारनेरकर, रा.पारनेर, जि.अहमदनगर यांचे मार्गदर्शनाखाली "श्रीसाईबाबा यांचे तत्वज्ञान" यावर कार्यक्रम ठेवणेस हरकत नाही, परंतु श्रीसाईबाबा समाधी शताब्दी कार्यक्रमास बराचसा कालावधी असल्यामुळे सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल डिजीटल रुम करीता प्रोजेक्टर व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतुद-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमामधील क्रमांक १७ (१) व १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक - नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक–** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल विभागात इयत्ता ज्यु. के. जी ते इयत्ता १० वी पर्यंत एकुण ५१ वर्ग तुकडया कार्यरत असुन २५०१ विदयार्थी/विदयार्थीनी शिक्षण घेत आहेत. मा. अध्यक्ष महोदय यांनी दिनांक ०२.०९.२०१६ रोजीचे राऊंडमध्ये इं.मि.स्कुल विभागाकरिता नविन प्रोजेक्टर खरेदी करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

प्रोजेक्टरच्या माध्यमातुन दृकश्राव्य अध्यापन प्रक्रीया परिणामकारक करता येते. त्याचे आकलन विद्यार्थ्यांना लवकर होते. त्यांची अध्यायनातील आवड वाढीस लागते. त्यासाठी डीजीटल क्लासरुम शाळेत असणे अनिवार्य आहे. श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शाळेतील विद्यार्थ्यांसाठी अदयावत प्रशिक्षण डिजीटल क्लासच्या माध्यमातुन दिल्यास विदयार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावेल त्यासाठी शाळेत सुरु करित असलेल्या डिजीटल क्लास रुम मध्ये संगणक तसेच एल.सी.डी. प्रोजेक्टर होम स्पिकर सिस्टीम आधारे शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्यास विदयार्थ्यांचा सर्वांगिण विकास होईल.

त्यासाठी खालील कन्फुगरेशनचा सोनी कंपनीचा प्रोजक्टर खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

| अ.नं. | तपशिल | मालाचे वर्णन | नग | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|
| 01 | Sony Projector VPL-DX142 | Display Size 0.63(16 mm)*3. Bright Era, Aspect ratio 4:3.<br>Pixels- 2, 359, 296 (1024*768*3) pixels,<br>Throw ratio – 1.37:1 to 1.80:1<br>Light source- Ultra high mercury lamp 2 low type,<br>Lamp replacement – 3000 H / 5000 H / 10000 H,<br>Filter Cleaning cycle – Max 1000 H,<br>Screen size – 30 to 300 (0.76m to 7.62m) | 01 | 80000 |
| 02 | F & D / Sony | 5.1 Speaker (6500 w pmpo) with 06 channel amplifier – F5019 – 11. One year warranty | 01 | 15000 |
| 03 | Other Accessory | Projector fitting and 20 mtr. HDMI & VGA cables. | 20 mtr. | 5000 |
| | | | Total | 100000 + Tax |

(अक्षरी रुपये एक लाख मात्र)

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार शासन निर्देश् तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान– याकरिता बजेट तरतुद करण्यात आलेली नसल्याने मा. व्य.मं.समितीचे मान्यतेनुसार बिलाची कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय–** उपरोक्त नमुद केलेले डीजीटल रुम करिता ०१ नग नविन प्रोजेक्टर व इतर साहीत्य खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

**मागणी–** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करिता सोनी कंपनीचा प्रोजेक्टर होम स्पिकर सिस्टीम व इतर साहीत्य खरेदी कामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,००,०००/- (एक लाख रुपये) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करिता नामांकित कंपनीचे प्रोजेक्टर होम स्पिकर सिस्टीम व इतर साहीत्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी जाहिरात प्रसिध्द करते वेळेस, त्यामध्ये विशिष्ट कंपनीच्या नावाचा समावेश न करता, फक्त तपशील देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.१३ श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता संगणक व लॅपटॉप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासन निर्णय क्र. भांखस- २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उद्योग-४, मंत्रालय, मुंबई-३२ दि. ३०/१०/२०१५.

**अधिनियम २००४ मधील तरतुदः-** क्र.१७ (१) व १७(२)(ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रः-** नवीन प्रस्ताव.

**प्रास्तविक-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविदयालयातील ११ वी विज्ञान शाखेच्या चार तसेच इ.१२ वी विज्ञान शाखेच्या चार तुकडया असून, या शाखेत एकूण ६४० विद्यार्थी संख्या आहे. विद्यार्थ्यासाठी संगणक प्रयोग शाळेत संगणकावर प्रात्यक्षिक करण्याचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यासाठी प्रात्यक्षिक करणेकामी यापूर्वी खरेदी करण्यात आलेले २५ नग संगणक अपुरे पडत आहे.

अ) विद्यार्थ्यासाठी संगणक प्रयोग शाळेत संगणकावर प्रात्यक्षिक करण्याचे शिक्षण दिले जाते.विद्यार्थी संख्या विचारात घेता संगणक खरेदी करणे आवश्यक आहे.

ब) विद्यार्थ्यासाठी लॅपटॉप प्रयोग शाळेत लॅपटॉपवर प्रात्यक्षिक करण्याचे शिक्षण द्यावयाचे आहे. विद्यार्थी संख्या विचारात घेता लॅपटॉप खरेदी करणे आवश्यक आहे. लॅपटॉपची किंमत कमी आहे. लॅपटॉपला फिटींगची आवश्यकता भासत नाही. संगणक मात्र एका जागेवरुन दुस-या जागेवर स्थलांतर करणेस कालावधी लागतो. त्यासाठी लॅपटॉप खरेदी करावयाचे आहेत.

**मागणीः- अ) संगणक तपशिल-** All In One Desktop Specification:- (DELL/HP/ ACER/ LENOVO)

| |
|---|
| All In One Desktop (QTY- 25 NOS. )<br>Processor :- Core i3 4th GEN. ( 3.3 GHZ, 4 MB Cache)/ H81 Chipset/4 GB DDR3 RAM/500 GB HDD/Bluetooth/ Wireless Keyboard & Wireless Optical Mouse/Wi-Fi/Media Card Reader/<br>DVD R-RW/ RJ- 45, Webcam/Win 10.1 SL 64 Bit/Screen size 20 Inch LED TFT /<br>Warranty:- 3 Years Parts/3 Years Onsite. |

वरील २५ नग संगणक अंदाजे प्रती नग दर रु. ३५,०००/- प्रमाणे खरेदी करणेकामी अंदाजे रुपये- ८,७५,०००/- (अक्षरी रुपये- आठ लाख,पंच्याहत्तर हजार ) मात्र खर्च अपेक्षित आहे. संगणक खरेदी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाकडून ई निविदा मागवून खरेदी करता येईल. सदरचा खर्च सन २०१६-१७ साठी संगणक साहीत्य खर्च खरेदी बजेट तरतूद रक्कम रुपये १०,००,०००/- मधून करता येईल.

**ब) लॅपटॉप तपशिल** Laptop Specification:- (DELL/HP/ACER)

| |
|---|
| Laptop- (QTY- 04 NOS )<br>Processor :- Core i3 4th GEN ( 3.3GHZ, 4 MB Cache)/ H81 Chipset/4 GB DDR3 RAM/500 GB HDD/ Bluetooth/ Wireless Keyboard & Wireless Optical Mouse/Wi-Fi/Media Card Reader/ DVD<br>R-RW/RJ- 45, Webcam/Win 10.1 SL 64 Bit/Screen size 15.6 Inch LED TFT/ Warranty:- 3 Years Parts/ 3 Years Onsite. |

वरील ४ नग लॅपटॉप अंदाजे प्रती नग दर रु. ३०,०००/- प्रमाणे खरेदी करणेकामी अंदाजे रुपये- १,२०,०००/- (अक्षरी रुपये- एक लाख, ऐंशी हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे. लॅपटॉप खरेदी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाकडून कोटेशन मागवून खरेदी करता येईल. सदरचा खर्च सन २०१६-१७ साठी संगणक साहीत्य खर्च बजेट तरतूद रक्कम रु.१०,००,०००/- मधून करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव या नुसार अनुमानः-** खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः- अ)** कनिष्ठ महाविद्यालयाकरीता २५ नग संगणक अंदाजे प्रती नग दर रु.८,७५,०००/- (अक्षरी रुपये- आठ लाख, पंच्याहत्तर हजार) मात्रचे खर्चास तसेच संगणक खरेदी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाकडून ई निविदा मागवून खरेदी करणेस मान्यता असावी.

**ब)** कनिष्ठ महाविद्यालयाकरीता ४ नग लॅपटॉप प्रती नग दर रु. ३०,०००/- प्रमाणे लॅपटॉप खरेदी करणेकामी अंदाजे रुपये- १,२०,०००/- (अक्षरी रुपये- एक लाख, ऐंशी हजार) मात्रचे खर्चास तसेच लॅपटॉप खरेदी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाकडून कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता संगणक/ लॅपटॉप खरेदी करणेकामी यापुर्वी त्रीसदस्य समिती सभेमध्ये झालेला निर्णय रद्द करणेत आला व सदरहू प्रस्ताव खरेदी उपसमितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्या, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.१४** **श्री पम्पाक्षेत्र स्वार्णहम्पि भक्तीसागरसंस्थानम भगवान वेदव्यासाश्रम स्वर्णहम्पी मठ यांचे दि.१२.०७.२०१६ रोजीचे पत्राबात.**

**प्रस्ताव-** श्री विरुपाक्ष, यांनी, श्री साईबाबा संस्थान, कार्यकारी अधिकारी, यांच्या नावे, दि.१२/०७/२०१६, रोजीचे पत्र पाठविलेले असुन, सदर पत्रातील तक्रारींचा तपशिल थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

प्राचीन भारतीय परंपरेनुसार व ऐतिहासीक संदर्भानुसार, श्री आदी शंकराचार्य, यांचा "कलाडी" येथे २५०० वर्षांपुर्वी सनातन धर्मचा, अवैधिक तत्वज्ञान आणि निषेधार्ह अशा ७१ बेकायदेशीर तत्वज्ञानांपासून आणि निर्षधार्ह रुढींपासून रक्षण करणेसाठी जन्म घेतला होता, मागील काही वर्षांपासुन, श्री श्री श्री गोविंदानंद सरस्वती स्वामीजी, यांनी, त्यांचे, गुरु (ज्योतीषापीठ आणि व्दारकापीठ जगद्गुरु शंकराचार्य, श्री श्री श्री स्वरुपानंद सरस्वती

(स्वामीजी), यांचे आदेशानुसार दक्षिण व उत्तर भारतामध्ये धर्मप्रचार सुरु केला, त्यांच्या प्रवासादरम्यान, असे निदर्शनास आले की, काही मोजक्या व्यक्ती स्वयंघोषीत गुरु, बाबा, हे शिर्डीच्या साईबाबांचे अवतार असल्याचे भासवून जनतेमध्ये सनातन धर्माविषयी गैरसमज पसरवत आहे, श्री स्वामीजींनी, शास्त्रानुसार प्रश्न केले, तेव्हा काही साई भक्तांनी विनाकारण वाद उपस्थीत केले आणि हे ऐतिहासीक सत्य आहे की, श्री शिर्डी साईबाबा, जन्माने मुस्लीम होते व संस्थानचे पब्लीकेशन केलेल्या पुस्तकांनुसार, (श्री साईसतचरित्र) ज्यामध्ये, श्री साईबाबांनी, स्वत: कथन केलेनुसार, ते जन्माने मुस्लीम होते त्यामध्ये असेही स्पष्ट केले की, ते मांस भक्षण करत व नमाज पढत होते आणि मशिदीत रहात होत आणि गोड (मिठा) प्रसाद स्वरुपात मांस भक्तांना वाटत होते, जेव्हा स्वयं घोषीत साई भक्तांना स्वामीजींनी प्रश्न विचारले, तेव्हा, त्यांनी, स्वामीजींवर हल्ले चालू केले आणि हिंदु सनातन धर्माच्या प्रमुखांची प्रतिमा मलिन करणे चालु केले, एवढेच नव्हे तर, हिंदुच्या देवता, कृष्ण, राम, हनुमान यांच्या बाबत शिवीगाळ चालु केली.

हिंदु धर्मांच्या परंपरेनुसार ३३ करोड देवतांच्या व्यतिरिक्त मुस्लीम फकिराची पुजा करण्याची प्रथा परंपरा नाही, त्यावर कडक निर्बंध घातला आहे, मुस्लीम फकिर साईबाबाची, हिंदु गुरु किंवा देवता म्हणुन पुजा करणे ,हे, हिंदु कायदा व परंपरांच्या विरुध्द् आहे, शिर्डी साईबाबांच्या नावाचा वापर करुन काही व्यक्ती व्यवसाय करतात, ते असे दावा करतात की, ते, फकीर मुस्लीम साईबाबांचे अवतार आहेत,अगदी, हिंदु देवता आणि गुरुंच्या पेक्षाही ते श्रेष्ठ आहेत आणि हिंदु लोकांची दिशाभुल करीत आहेत आणि पैसे कमवीत आहेत, ते हिंदु धर्माचे विरोधी असून, संपुर्ण भारतामध्ये कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण करीत आहेत, हे शिर्डी साईबाबा संस्थान फक्त हिंदुमध्येच नाही तर, हिंदु व मुस्लीमांमध्ये वैरभाव निर्माण करीत आहे. ही भारत देशासाठी धोकादायक बाब आहे. आणि शिर्डी साईबाबा संस्थानने, जनतेची धर्माच्या नावाने दिशाभुल करण्याचे थांबवावे, की ज्यामुळे, सर्व भारतभर समाजविरोधी शक्तींना निमित्त मिळते व त्यामुळे मुळ प्राचीन भारतीय संस्कृती व गुरुपरंपरांवर विरपरीत परिणाम होतो. आणि मागील वाईट अनुभवावरुन, समाज विरोधी शक्ती (जे,रामानंद महर्षी शिवशक्ती अनुग्रह महा पिठम आंध्र प्रदेश, तेलगंणा) हे, साईबाबांच्या नावाने लोकांना फसवितात आणि पैसा कमावतात (सुमारे ६०,०००) यामुळे, फक्त, आंध्र व तेलंगाणा मध्येच नव्हे तर महाराष्ट्रातही कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाले आहेत, हे सत्य आहे की, समाज विघातक शक्ती, श्री शिर्डी साई संस्थान बरोबर काम करतात (सोबत निमंत्रण पत्रीकेचा पुरावा), श्री शिर्डी साई संस्थानच्या मदतीने सर्व धर्म संमेलन मदतीने मुस्लीम , ख्रिश्चन मिशनरीच्या प्रतीनीधींचे संमेलन आयोजन करुन सनातन धर्माच्या प्रमुख्यांना आवाहन दिले, हे हिंदुसाठी धोकादायक आहे.

शिर्डी साईबाबा संस्थान व संस्थानचे समर्थक प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कायदा व सुव्यवस्थेचा सर्व राज्यांमध्ये प्रश्न निर्माण करीत आहेत आणि स्वामीजींना संस्थान व त्यांच्या समर्थकांकडुन श्री स्वामीजींना मोठा धोका आहे, भविष्यात जर, श्री गोविंदानंद स्वामीजींना किंवा त्यांच्या संस्थेला धमक्या आल्या तर, त्यास शिर्डी साई संस्थान व प्रशासनास जबाबदार धरण्यात येईल व त्यांचेवर क्रिमिनल केस करण्यात येईल.

आणि आम्ही शिर्डी साईबाबा व त्यांचा खरा इतिहास जनतेला संगण्यास विनंती करतो (कि ते मुस्लीम होते आणि त्यांची हिंदू देव किंवा गुरू सारखी पुजा केली जावू शकत नाही आणि त्यांच्यासाठी मंदीर बांधली जावू शकत नाहीत) समाजाच्या भल्यासाठी, की निष्कारण हिंदु आणि हिंदु-मुस्लींमांमध्ये तेढ निर्माण होते, दंगली घडतात, हे कायदच्या विरूध्द आहे. जर आपण साईबाबांच्या खऱ्या हकिगती आणि इतिहास सादर करू शकले नाहीत, तर, आम्ही आपल्याला विनंती करीतो की, शास्त्रार्थ चर्चेसाठी, आपण सांगाल त्या ठिकाणी मिटींग आयोजित केली जाईल, साईबाबा व त्यांची पुजा, ही, हिंदु कायदयाचे आंम्ही आपणास विनंती करीतो की, २ महिन्यांच्याआत (२९ सप्टेंबरच्या पुर्वी) आपण जिथे सुचवाल त्या ठिकाणी शासनाच्या सर्व अधिकारी व धार्मिक पुढा-यांच्या मदतीने कायदाचे व घटनेचे पालन केले जाईल, आपण जिथे सुचवाल त्या ठिकाणी, आंम्ही सर्व भक्तांच्या मदतीने समाजाच्या व जनतेच्या फायदयासाठी शांततापुर्व चर्चा करण्यासाठी सर्व तयारी करु, जर आंम्हाला संस्थानकडुन २ महिन्यांच्या आत (२९ सप्टेंबरच्या पुर्वी) कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही तर, शास्त्रार्थ चर्चेत आपण हरले आहात असे गृहीत धरण्यात येवुन, श्री शिर्डी साई संस्थानम व ट्रस्ट बोर्ड मेंबर्स्, विरुध्द् क्रिमीनल केस दाखल करु, असे पत्रात नमुद केले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** यापुर्वी, सन, २०१४, मध्ये शिर्डीतील सर्व पक्षीय साईभक्त यांनी शंकराचार्य यांचे गैर वक्तव्यावर, श्री साईबाबा संस्थान मार्फत संबंधीतांवर कायदेशीर कार्यवाही करणेबाबत व तिव्र स्वरुपात आंदोलन करणार असल्याचे निवेदन दिले होते, त्यावर, मा. व्यवस्थापन समितीच्या, दि. ३/८/२०१४, रोजीच्या सभेपुढे, विषय नं. ३४, सादर करण्यात आला होता, त्यावर, निर्णय क्र.६४४, अन्वये, प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, "या प्रकरणी संस्थानमार्फत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करणेत येऊ नये", असे ठरले आहे.

तसेच, मा.त्रिसदस्य समितीचे, दि.२५/०९/२०१४, रोजीचे सभेत विषय नं.३५, शंकराचार्य, श्री स्वरुपानंद सरस्वती, यांनी, श्री साईबाबांच्या विरुध्द् मा.उत्तराखंड उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचीकेत, इंटरव्हेंशन ॲप्लीकेशन दाखल करणेबाबत, श्री रमेश जोशी, विश्वस्त साईधाम चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, यांचे पत्राबाबत विषय ठेवणेत आलेला होता, त्यावर, निर्णय क्र.८४३, अन्वये, "यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रमेश जोशी, विश्वस्त साईधाम चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचे पत्राची दखल घेऊ नयें", असे समितीने ठरविले आहे.

तरी, श्री श्री श्री गोविंदानंद सरस्वती यांचे बरोबर श्री साईबाबांचे संदर्भात संस्थानचे प्रतिनिधी/ श्री साईचरित्राचे अभ्यासक यांची शास्त्रार्थ चर्चे करावी किंवा कसे? तसेच श्री श्री श्री गोविंदानंद सरस्वती यांना मा व्यवस्थापन समितीचा झालेला निर्णय कळविणे याबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पम्पाक्षेत्र स्वार्णहम्पि भक्तीसागरसंस्थानम भगवान वेदव्यासाश्रम स्वर्णहम्पी मठ यांचे दि.१२.०७.२०१६ रोजीच्या पत्राची दखल घेण्यात येऊ नये, सदरहू पत्र दप्तरी दाखल करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१५** **सन- २०१७ साठीचे श्री साईलिला द्वैमासिक अंक मराठी व हिंदी-इंग्रजी छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत. कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतुद आहे.

''श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील''

श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चे वतीने श्री साईलीला व्दैमासिक अंक छपाई करुन वर्गणीदारांना पाठविले जातात.

श्री साईलीला अंकात साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव, संस्थान मार्फत घेण्यात आलेल्या नवीन योजना, सुधारणा, संस्थानचे उत्सव आदी माहिती प्रकाशित करण्यात येते.

**प्रस्ताविक:-** माहे सप्टेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१६ या कालावधीसाठी ओरिएंट प्रेस लि., मुंबई यांना जा.नं.एसएसएस/ वशी/ प्रकाशने/२९३३/२०१५ दि.२२.०८.२०१५ अन्वये मराठी व हिंदी-इंग्रजी अंक छपाई कामाचा खालील प्रमाणे छपाई कार्यादेश देण्यात आलेला होता.

**सन २०१५-२०१६ चा श्री साईलीला व्दैमासिक अंक छपाईबाबत मागील मंजूर दर तपशिल**

| अ.नं. | तपशिल | व्दैमासिक छपाई संख्या | प्रती वार्षिक छपाई संख्या | मागील मंजूर दर रुपये पैसे | एकूण रुपये | किरकोळ विक्री |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी (५ अंक) ३२+४ पाने =३६ पाने | ९००० | ४५,००० | ११.०० | ४,९५,०००.०० | ८.०० |
| ०२ | दसरा विशेषांक मराठी (१अंक) ६४+४ =६८ पाने | ९००० | ९००० | १६.०० | १,४४,०००.०० | १५.०० |
| ०३ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (५ अंक) ३२+४ =३६ पाने | १४००० | ७०००० | ११.०० | ७,७०,०००.०० | ८.०० |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी (१अंक) ६४+४=६८ पाने | १४००० | १४००० | १६.०० | २,२४,०००.०० | १५.०० |
| | | | | **एकूण रु.** | **१६,३३,०००.००** | |

ओरिएंट प्रेस लि., मुंबई यांच्या कार्यादेशाची मुदत ऑगस्ट २०१६ मध्ये संपत असल्याने सन २०१६ साठी मुंबई कार्यालय यांनी वर्गणीदारांची संख्याकळविलेनुसार ०२ अंक छपाईसाठी प्रस्ताव सादर केलेला होता.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०७.०८.२०१६ रोजीच्या निर्णय क्र ४६० अन्वये "ओरियंट प्रेस लि. मुंबई यांचेकडूनश्री साईलीला नियतकालिक छपाई करुन मिळणेस विलंब व सदोष छपाई या बाबींचा विचार करता, माहे सप्टेंबर –ऑकटोबर व नोव्हेंबर- डिसेंबर २०१६ या साईलीला नियतकालिकांची ओरियंट प्रेस लि, मुंबई यांचे मंजूर दरात मे टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचेकडून छपाई करुन घेणेस मान्यता देण्यात आली आहे." त्यानुसार माहे सप्टेंबर- ऑक्टोबर-२०१६ व माहे नोव्हेंबर- डिसेंबर २०१६ छपाई कार्यादेश जा.नं.एसएसएस/ वशी/ प्रकाशने/ २९७१/२०१६ दि.१०.०९.२०१६ पारित केलेला आहे.

**प्रस्ताव:-** माहे जानेवारी २०१७ पासून पुढे ०६ अंक छपाईकामी मान्यता घेणे आहे. सदरचा तपशिल खालीलप्रमाणे.

**सन- २०१७ साठीचे अंदाजे श्री साईलीला व्दैमासिक अंक छपाई तपशिल.**

| अ.नं. | तपशिल | व्दैमासिक अंदाजे छपाई संख्या | एकूण वार्षिक छपाई संख्या | अंदाजे छपाई दर रुपये पैसे | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी ( ५ अंक)३२+४ पाने =३६ पाने | ९००० | ४५,००० | १६.०० | ७,२०,०००/- |
| ०२ | दसरा विशेषांक मराठी (१ अंक) ६४+४ =६८ पाने | ९००० | ९००० | २०.०० | १,८०,०००/- |
| ०३ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी ( ५ अंक) ३२+४ =३६ पाने | १७५०० | ८७५०० | १६.०० | १४,००,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी (१अंक) ६४+४ =६८ पाने | १७५०० | १७५०० | २०.०० | ३,५०,०००/- |
| | | | | **एकूण रु.** | **२६,५०,०००/-** |

(अक्षरी रुपये. सहवीस लाख पत्रास हजार मात्र.)

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई-निविदा मागवून, निम्नतम दराने छपाई कार्यादेश देणेत येईल. याकामी अंदाजे रु.२६,५०,०००/- (अक्षरी रुपये. सहवीस लाख पत्रास हजार ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

सन २०१६-१७ व सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात श्री साईलीला अंक छपाईसाठी केलेल्या रु.३००००००/- (अक्षरी रुपये तीस लाख) चे अंदाजपत्रकातील तरतूदीमधून उक्त कामासाठीचा छपाई खर्च करता येईल, सदर अंकासाठी भक्त वर्गणी देत असल्याने खर्चाची भरपाई होत असते.

**विभागाची मागणी:-** प्रस्तावित साईलीला अंक छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२६,५०,०००/- (अक्षरी रुपये. सहवीस लाख पत्रास हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

२) जनसंपर्क कार्यालयाव्दारा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

३) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून छपाई कार्यवाही करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१७ साठीचे श्री साईलिला द्वैमासिक अंक मराठी, हिंदी-इंग्रजी छपाईकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच जगभरातील साईभक्तांच्या सोयीसाठी श्री साईलिला मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिक अंक ई-बुक स्वरुपात संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी महोत्सवामध्ये श्री साईभक्तांना टी-शर्ट, रुमाल व टोपी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** परिपत्रक जा.नं.एसएसएस/वशी-काअ/ २१४७/२०१६ दि.०७.०९.२०१६ नुसार दि.३१.०८.२०१६ ते दि. ०२.०९.२०१६ अखेर मा. अध्यक्ष महोदय यांनी कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांचे समवेत मंदिर परिसरात व संस्थानचे इतर विभागांकडे घेतलेल्या राऊंडमध्ये तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये दिलेल्या सुचनांनुसार श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवी वर्षामध्ये संस्थानचा लोगो असलेले टी-शर्ट, रुमाल व टोपी उपलब्ध करावयाचा प्रस्ताव सादर करणेस निर्देश दिलेले आहेत.

टी-शर्ट, रुमाल व टोपी खरेदी करणेची कार्यवाही विहित पध्दतीने खालील तपशिलाप्रमाणे करता येईल.

| अ.नं. | खरेदी तपशिल | आकार | खरेदी संख्या | अंदाजे खरेदी दर | एकूण अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टी शर्ट | L 38 से. मी (पुरुषांसाठी) | २५,००० | १२५/- | ३१,२५,०००/- |
| ०२ | टी शर्ट | XL 40 से. मी. (पुरुषांसाठी) | २५,००० | १२५/- | ३१,२५,०००/- |
| ०३ | टी शर्ट | XXL 42 से. मी. (पुरुषांसाठी) | २५,००० | १२५/- | ३१,२५,०००/- |
| ०४ | टी शर्ट | XXL 44 से. मी. (पुरुषांसाठी) | १५,००० | १२५/- | १८,७५,०००/- |
| ०५ | टी शर्ट | Small (महिलांसाठी) | २५,००० | १२५/- | ३१,२५,०००/- |
| ०६ | टी शर्ट | Medium (महिलांसाठी) | २५,००० | १२५/- | ३१,२५,०००/- |
| ०७ | टी शर्ट | Large (महिलांसाठी) | २५,००० | १२५/- | ३१,२५,०००/- |
| ०८ | टी शर्ट | X Large (महिलांसाठी) | १०,००० | १२५/- | १२,५०,०००/- |
| ०९ | टोपी (कॅप) | Free Size | ५०,००० | २०/- | १०,००,०००/- |
| १० | रुमाल | १/२ मीटर | ५०,००० | १५/- | ७,५०,०००/- |
| | | | | **एकूण रुपये.** | **२,३६,२५,०००/-** |

(अक्षरी रुपये. दोन कोटी छतीस लाख पंचवीस हजार मात्र)

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवाचा लोगो असलेले टी-शर्ट, रुमाल व टोपी खरेदी करुन, श्री साईभक्तांना (पुरुष व महिला) उपलब्ध करुन देता येईल. सदर खरेदीकामी नमुने निवडून, निवडलेले उत्कृष्ट दर्जाचे कापड/ कंपनी/शिलई यांचे असलेले नमुने, कापडाचा नमुन्याबरहूकुम तपशिल (Purchase of Cloth Specification) रेडीमेड तयार करुन घेण्यास, यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये.२,३६,२५,०००/- खर्चास व विहीत पध्दतीने खरेदीकामी वर्तमानपत्रात/ संस्थान संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्याच्या येणा-या खर्चास, ई-निविदेची प्रक्रिया राबविणेकामी सदर विषय मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी महोत्सवामध्ये साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन द्यावयाचे टी-शर्ट, रुमाल व टोपी यांचे नमुने विविध पुरवठादार/ उत्पादक यांचेकडून दरांसहीत मागविणेत यावे व त्यानंतर निवडलेल्या नमुन्यांप्रमाणेटी-शर्ट, रुमाल तसेच टोपी खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१७** **मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसरात सध्या मंदिराचे आतील व बाहेरील बाजुस सीसीटीव्ही कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे असे एकुण १०१ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तसेच मंदिर परिसर व दर्शन रांगेतील श्री साईभक्तांकडे असलेल्या बॅगा, पर्स चेक करण्यासाठी ०२ बॅगेजेस स्कॅनर मशिन, डिएफएमडी, एचएचएमडी, टर्न स्टाईल, इत्यादी तांत्रिक साहित्य बसविण्यात आलेले आहे.

दि. ०९/०८/२०१६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली मा. श्री जाधव सो. (अप्पर पोलिस अधिक्षक), मा.कुंदन सोनवणे सो. (प्रांत अधिकारी), मा.डॉ. संदिप आहेर सो. (उपकार्यकारी अधिकारी), मा. श्री विवेक पाटील (उपविभागीय पोलिस अधिकारी), मा. श्री एस.व्ही.गमे (प्रशासकीय अधिकारी), श्री राजेंद्र पाटील (पोलिस निरीक्षक,वाहतुक शाखा), श्री पी.व्ही. इंगळे (पोलिस निरीक्षक,शिर्डी पोलिस स्टेशन), श्री वाय.बी.डांगे (मुख्याधिकारी, शिर्डीनगरपंचायत) यांचे उपस्थितीत मंदिर सुरक्षासंबंधी सभा आयोजित करणेत आलेली होती. सदर सभेमध्ये मंदिर परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक ठिकाणी तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे वाढविणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यास अनुसरुन, मंदिर सुरक्षेच्या दृष्टीने १६ नग सीसीटीव्ही कॅमेरे, ०१ नग NVR व इतर अनुषंगीक साहित्य तातडीने खरेदी करावे लागणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Description & Specification of Products | Qty | Price Rs. | Total Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | IP IR HD Camera - Outdoor, 4 MP, Resolution EXIR.IR illumation upto 50 mtr & POE | 16 Nos. | 16,000/- | 2,56,000/- |
| 2. | NVR - 16 Channel., 4 TB HDD, | 01 Nos. | 35,000/- | 35,000/- |
| 3. | POE Switch - Make D-Link 24 Port | 01 Nos. | 28,000/- | 28,000/- |
| 4. | Cat 6 Cable - Make D-Link | 04 Box | 8,000/- | 32,000/- |
| 5. | Media Convertor | 16 Nos. | 5,000/- | 80,000/- |
| 6. | Power Adopter | 16 Nos. | 800/- | 12,800/- |
| | Total **Rs.** | | | 4,43,800/- |
| | + Service Tax & Vat as per actual rate | | | -- |

उपरोक्त तपशीलात नमुद केल्याप्रमाणे १६ नग सीसीटीव्ही कॅमेरे, ०१ नग NVR व इतर अनुषंगीक साहित्य खरेदीकरीता रक्कम रु. ४,४३,८००/- + Tax मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी, मंदिर परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने १६ नग सीसीटीव्ही कॅमेरे, ०१ नग NVR व इतर अनुषंगीक साहित्य तातडीने खरेदीकरीता येणारे रक्कम रु.४,४३,८००/- + Tax मात्रचे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर परिसरातील १६ नग सीसीटीव्ही कॅमेरे, ०१ नग NVR व इतर अनुषंगीक साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,४३,८००/- + Tax मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच जुने, खराब झालेले सीसीटीव्ही कॅमेरे बदलणेत यावे व सीसीटीव्ही यंत्रणेवर झालेला खर्च, त्यांची सध्याची स्थिती याचे ऑडीट करणेत यावे. याकामी व्यवस्थापन समिती सदस्य डॉ.राजेंद्र सिंग यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.१८** **कार्यालयीन कामकाजासाठी वस्तु/ साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान परिसरात मंदिराचे आतील व बाहेरील बाजुस नविन कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे असे एकुण १०१ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तसेच मंदिर परिसर व दर्शन रांगेतील श्री साईभक्तांकडे असलेल्या बॅगा, पर्स चेक करण्यासाठी ०२ बॅगेजेस स्कॅनर मशिन, डिएफएमडी, एचएचएमडी, टर्न स्टाईल, इत्यादी तांत्रिक साहित्य बसविण्यात आलेले आहे. मंदिर परिसरात सदर सीसीटीव्ही कॅमे-यांचे साहाय्याने नियंत्रण ठेवणेकरीता सुसज्ज सीसीटीव्ही कंट्रोल रुम गुरुस्थान मंदिराजवळ कार्यान्वित करणेत आलेली आहे.

सदर कंट्रोल रुममार्फत मंदिर परिसरात काही अनुचित प्रकार घडल्यास त्याचे फुटेज तयार करणे, पोलिस विभागाचे मागणीनुसार सीसीटीव्ही फुटेज देवाण-घेवाण करणे, फोटाग्राफी, व्हिडीओ शुटींग, लाईव्ह दर्शन

(समाधी मंदिर) एलईडी स्क्रिन, टिव्हीबाबतचे कामकाज तसेच मंदिर परिसर, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह टाटा स्काय लाईव्ह दर्शन, द्वारावती भक्तनिवासस्थान, साईआश्रम- १, श्री साईनाथ हॉस्पीटल, श्री साईबाबा हॉस्पीटल, नविन प्रसादालय, टि.व्ही.९ या सर्व ठिकाणी श्रीं चे समाधी मंदिरातील लाईव्ह दर्शन दाखविले जाते. तसेच संस्थान अयोजित श्रीरामनवमी उत्सव, गुरुपोर्णिमा उत्सव, श्री साई पुण्यतिथी उत्सव, नाताळ उत्सव, शैक्षणिक संकुलाचे होणारे कार्यक्रम, तसेच साईच्चरीत पारायण सोहळा इ. सर्व कार्यक्रमांचे फोटोग्राफी व शुटींगची कामे करणे, सिने कलावंत, व्ही.व्ही.आय.पी. तथा इतर मान्यवर आरती किंवा दर्शनासाठी आल्यास त्यांचे फोटोग्राफी व शुटींग करणे याप्रकारची कामे विभागामार्फत केली जातात.

तसेच सध्याचे मंदिर परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणेचे अपग्रेडेशन तसेच व्दारावती भक्तनिवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईआश्रम-१, साई धर्मशाळा, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा रुग्णालय, श्री साईनाथ रुग्णालय, शैक्षणिक संकुल परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणे, सदरकामी निवीदा प्रक्रीया करणे, प्राप्त निवीदाधारकांना प्री-बीड, टेक्नीकल बीड मिटींगसाठी आमंत्रित करणे, प्राप्त निवीदाधाकांपैकी पात्र न्युनत्तम धारकांस कार्यादेश देवुन सर्व ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणेचे प्रस्तावित आहे. सीसीटीव्ही कंट्रोल सेलची व्याप्ती स्वतंत्र विभागासारखी होत आहे. करीता सीसीटीव्ही कंट्रोल कक्षाचे कामकाजात सुसूत्रता व कार्यालयीन दप्तर, वस्तु व्यवस्थितरित्या जतन करणेसाठी खालील वस्तु/साहित्य खरेदी करणे आवश्यकता आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | Office Chair | - ८ नग |
| २) | Executive Chair | - १ नग |
| ३) | Manager Table | - १ नग |
| ४) | Cupboard | - २ नग |
| ५) | Filling Cabinate 2 drawer | - ४ नग |

उपरोक्त वस्तु/ साहित्य खरेदीकामी एकत्रित रक्कम रु. २,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख) मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे. तरी, सीसीटीव्ही कंट्रोल सेलकरीता उपरोक्त वस्तु/ साहित्य खरेदीकामी एकत्रित रक्कम रु. २,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख) मात्रचे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सीसीटीव्ही कंट्रोल सेलकरीता कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या प्रस्तावित वस्तु/ साहित्य नवीन खरेदी करणेऐवजी या वस्तु/ साहित्य इतर विभागांमध्ये पडून असतील तर त्या वापरणेसाठी घेण्यात याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.१९** **सन २०१६-१७ करीता हमाली कामाचे निविदेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे गहू, तांदुळ, हरभरा, कडधान्ये व किराणा माल तसेच इतर वस्तु गोडावूनमध्ये उतरवून थप्पी मारणेचे हमाली काम श्री.बबन बन्सी तनपुरे, शिर्डी यांना देण्यात आलेले आहे.

हमाली कामासाठी मागील आर्थिक वर्षापर्यंत प्रचलित पद्धतीनुसार जनसंपर्क विभागामार्फत स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देउन परिसरातील हमालांकडुन निविदा मागवून मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेत येत होता. त्यानुसार सन २०१६-१७ चे हमाली कामाकरीता प्रचलित पद्धतीनुसार जनसंपर्क विभागामार्फत स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन परिसरातील हमालांकडून निविदा मागवून पुढील आवश्यक कार्यवाही करणेस तसेच उपरोक्त कामी अंदाजे रु. ७,००,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरचा विषय मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.०२.०२.२०१६ रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर केला असता, मा. समितीने सभेतील निर्णय क्र. २७ अन्वये सन २०१६-१७ चे हमाली कामासाठी ई-निविदा मागविणेचा निर्णय घेतलेला आहे.

मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेतील निर्णय क्र. २७ नुसार महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.१०.०३.२०१६ ते दि.२५.०३.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली. तथापि, विहित मूदतीत फक्त एकच ई-निविदा प्राप्त झाल्याने दि.२५.०३.२०१६ रोजीचे मंजूर टिप्पणी अन्वये फेर ई-निविदा मागविणेकामी कार्यवाही करणेत आलेली होती.

त्यानुसार दि.२८.०४.२०१६ ते दि.१०.०५.२०१६ या कालावधीत फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली आहे. त्यात तांत्रिक लिफाफा (Technical Bid) उघडणेची तारीख दि.१४.०५.२०१६ अशी निश्चित करणेत आलेली होती. शासनाचे ई-निविदेचे नियमावलीतील ४.४.३.१ चे तरतुदी नुसार दि.१६.०५.२०१६ रोजीचे उप समितीचे सभेत तांत्रिक लिफाफा (Technical Bid) उघडण्यात आले. तसेच दि.१८.०६.२०१६ रोजीचे उप समितीचे सभेत Financial Bid उघडण्यात आले. मात्र यावेळीही एकच ई-निविदा प्राप्त झालेली असल्याने मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १४.०७.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४१८ अन्वये हमाली कामाकरीता तिस-यांदा फेर ई-निविदा मागविणेत यावी, असे ठरलेले आहे.

त्यानंतर मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेतील निर्णय क्र. ४१८ नुसार दि.१७.०८.२०१६ ते दि. २९.०८.२०१६ या कालावधीत तीस-यांदा ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली. मात्र यावेळीही विहित मुदतीत फक्त दोनच ई-निविदा प्राप्त झालेल्या असल्याने इकडील दि.०६.०८.२०१६ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये

उपरोक्त ई-निविदेस दोन वेळा ८-८ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली, यावेळी ई-निविदा सादर करणेसाठी दि.१२.०९.२०१६ पर्यंतची अंतीम मुदत देण्यात आलेली होती, मात्र यानंतरही एकूण दोनच ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. ई-निविदेचे नियमावलीतील ४.४.३.१ चे तरतुदी नुसार दोन वेळा निविदा मागवूनही तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास त्यास एकदा मुदतवाढ देवून (एल-१) निविदाकारासोबत करार करता येईल, परंतु त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करुन किंमतीच्या वाजवीपणाची खात्री करावी लागेल.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०९ अन्वये यापुढे कोणत्याही खरेदीसाठी कमीत-कमी ०३ कोटेशन/ निविदा/ ई-निविदा असतील तरच त्या उघडण्यात याव्यात, तिस-यांदाची निविदा प्रक्रिया असेल तरीही, असा निर्णय झालेला आहे.

सन २०१६-१७ चे हमाली कामासाठी तीन वेळेस ई-निविदा मागवून व त्यानंतर दोन वेळा मुदतवाढ देवूनही हमाली कामाचे ई-निविदेस उचित प्रतिसाद मिळालेला नाही. हमाली करणारे लोक हे बहुदा अशिक्षित व कष्टकरी कामगार असतात. ई-निविदा त्यांना तांत्रिक दृष्ट्या अडचणीची वाटते, तसेच हमाली कामाची किंमत कमी असल्याने तसेच दररोज माल येणेची खात्री नसल्याने परिसराबाहेरील हमालांना यात सहभागी होणे गैरसोईचे वाटते. त्यामुळे ते ई-निविदेत सहभागी होण्यासाठी इच्छूक नसल्याचे दिसून येत असावेत. त्यामुळे यापुढेही वारंवार ई-निविदा मागवूनही त्यास उचित प्रतिसाद मिळण्याची शक्यता कमी आहे. याकरीता सदरचे हमाली कामासाठी चालू ई-निविदा प्रक्रिया रद्द करून खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे.

अ) महाराष्ट्र शासनाने दि.३०.१०.२०१५ रोजीचे आदेशानुसार रु. ३,००,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक रकमेचे कामासाठी ई-निविदा मागविणेचे बंधनकारक आहे. याकरीता २०१६-१७ या आर्थिक वर्षांचे हमाली कामासाठी वार्षीक ई-निविदा मागविणेऐवजी सन २०१६-१७ चे पुढील उर्वरित सहा महिन्यांकरीता रुपये- २,९०,०००/- इतक्या रकमेच्या हमाली कामासाठी कोटेशन/ दरपत्रक मागविता येतील.

ब) हमाली कामाची किंमत रु. ३,००,०००/- पेक्षा कमी असल्याने शासन आदेश व नियमपुस्तिकेतील ३.२.३ व ४.१ चे तरतुदीप्रमाणे वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा प्रक्रिया राबविणेची आवश्यकता नाही. संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिद्धी देवून स्थानिक हमालांकडून कोटेशन/ दरपत्रक मागविता येतील व त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार प्राप्त कोटेशन मधील न्युनतम दरधारकास पुढील सहा महिन्यांसाठी हमाली कामाचा कार्यादेश देत येईल.

क) हमाली कामासाठी मागील सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रु. १००/- निविदा फी व रु. ५,०००/- बयाणा रक्कम स्विकारणेत आलेली होती. मात्र आता निविदा विक्री ऐवजी कोटेशन मागविणे असल्याने फक्त बयाणा रक्कम रु. ५,०००/- कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेचे डीडी अन्वये स्विकारता येईल, असे नम्र मत आहे.

तरी हमाली कामाची ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन वरील **अ, ब** व **क** प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस्तव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ करीता हमाली कामाचे काम देणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत यापुर्वी झालेले निर्णय रद्द करणेत येऊन, याकामी प्रस्तावात नमुद केलेल्या अ, ब व क प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.२०** **लाडू प्रसादाकरीता आयडीया सेल्युलर लि. यांचेकडून देणगी दाखल प्राप्त प्रिंटेड प्लॅस्टीक पिशव्यांची विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०५.०४.२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.३७३ नुसार आयडिया सेल्यूलर कंपनीचे प्रस्तावामध्ये मागणी केलेल्या ८ मागण्या मान्य न करता फक्त मोतीचूर लाडु पॅकींग प्लॅस्टीक पिशवी व कॅरी बॅगवर आयडिया कंपनीचा लोगो प्रिंट करुन प्लॅस्टीक पिशवी व कॅरीबॅग पुरविणेस तयार असल्यास त्यांचेकडुन एक वर्षाकरीता लागणारी लाडू पॅकींग पिशवी व कॅरीबॅग विनामुल्य घेण्यात यावी असे ठरले होते.

त्यानुसार प्रसादालय विभागाचे पत्र जा.नं.एसएसएस/वशी-प्रसाद/५७५६/२००९ दि.०१.०५.२००९ अन्वये वरिष्ठ व्यवस्थापक, आयडीया सेल्युलरलि.तिसरा माळा, शारदा सेंटर, एरंडवना,पुणे-४११ ००४ यांना प्लॅस्टीक पिशवी, कॅरीबॅग मोफत पुरवठा करणेबाबत पत्र देण्यात आले होते. सदर पत्रानुसार आयडीया सेल्युलर लि. पुणे यांचेतर्फे असित सिंग यांनी दि२६.०६.२०१० रोजी ई-मेल व्दारे देणगी प्रसाद लाडु पिशव्यांचा पहिला टप्पा १५,००,००० नग पिशव्या ऑगस्ट महिन्याचे तिस-या आठवडयात पाठवित असलेबाबत कळविले होते. त्याप्रमाणे आयडीया सेल्युलर लि. चा लोगो असलेल्या श्री साईबाबा संस्थान प्रसाद लाडू, या नावाच्या ३,००,००० नग पिशव्या १५ गोण्यांमधुन चलन नं.६२२ अन्वये दि.२४.०८.२०१० रोजी प्राप्त झाल्या.

दि.२४.०८.२०१०रोजी तत्कालीन अध्यक्ष महोदय यांनी आयडीया सेल्युलर लि. यांना संस्थानने नमुन्या दाखल दिलेल्या व प्रत्यक्ष प्रिंट होवून आलेल्या पिशव्यांची समक्ष पहाणी केली असता, प्राप्त पिशव्या व नमुना यात तफावत आढळून आल्यामुळे त्या वापरण्यास अडचणीचे असल्याने पुरवठादार कंपनीस सध्या पुढील पिशव्या प्रिंट करु नये असे कळविणेस सांगुन यापुर्वी आयडीया कंपनीकडुन देणगी आलेल्या ३ लाख नग लाडु प्रसाद पिशव्यांचा अन्यत्र वापर न करणेचे निर्देश देवून त्या कंपनीस परत करणेचे सांगितले.

त्यानंतर आयडीया सेल्युलर लि. अहमदनगर यांनी दि.२४.०५.२०१२ चे पत्रानुसार ऑगस्ट २०१० मध्ये लाडुप्रसाद पिशव्या आपणास वापरण्यासाठी दिलेल्या आहेत. आपण काही कारणास्तव त्या बॅग वापरलेल्या नाहीत. तरी त्या बॅग आमचे प्रतिनिधी श्री अरिफ सययद, अहमदनगर यांना देण्यात याव्यात. सदर पिशव्यांचा इतर कोणत्याही ठिकाणी वापर केला जाणार नाही,असे लेखी कळविले आहे.

तथापि, प्रत्यक्षात सदर पिशव्या त्यांनी येथुन परत नेल्या नाहीत म्हणून जा.नं.एसएसएस/वशी-भांडार/५२५८/२०१५ दि.२२.१२.२०१५ रोजीचे पत्रानुसार आयडीया कंपनीस सदर पिशव्या घेवून जाणेबाबत कळविण्यात आले होते. सदर पत्रास अनुसरुन त्यांचे ब्रॅंड मॅनेजर, आयडीया सेल्युलर (महाराष्ट्र व गोवा) यांनी त्यांचे दि.१३.०१.२०१६ रोजीचे पत्रान्वये पर्यावरणास बाधा न होईल अशा पध्दतीने सदर पिशव्या नष्ट करणेबाबत कळविले आहे.

त्यानुसार मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०२.०४.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२३२ नुसार आयडीया सेल्युलर लि. यांचेकडून मोतीचुर लाडू प्रसाद पॅकींग करीता देणगी प्राप्त ३,००,००० नग प्रिंटेड प्लॅस्टीक पिशव्या मशिनव्दारे श्रेडींग करुन त्यांची अभिलेख कक्षामार्फत संस्थानचे उच्चतम मंजुर दरधारक यांना विक्री करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार उपरोक्त ३,००,००० नग पिशव्या भांडार विभागामध्ये फाडण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या १५ गोण्या भरणेत आलेल्या असुन त्यांचे एकत्रीत वजन ४०० किलो इतके आहे.

मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणेकरीता अभिलेख कक्षाकडे प्रस्ताव सादर केला असता संस्थानचे प्लॅस्टीक पिशवीचे खरेदीदार श्री.अकबर खॉ पठाण, कोपरगांव यांनी अभिलेख कक्ष प्रतिनिधी समवेत भांडार विभागात येवून फाडलेल्या उपरोक्त ४०० किलो पिशव्यांची प्रत्यक्ष पहाणी करुन समक्ष चर्चाही केली आहे.

तदनंतर अभिलेख कक्षाने दि.२९.०७.२०१६ रोजीचे पत्रान्वये त्यांचेकडील प्लॅस्टीक पिशव्यांचे वार्षीक टेंडरधारक श्री.अकबर खॉ पठाण, कोपरगांव यांचा फक्तदुधाच्या प्लॅस्टीक पिशव्यांचा खरेदीचा दर रु.२४/- प्रति किलो इतका मंजुर असल्याचे कळविले आहे. तथापि, निर्णयात नमुद केलेली आयडीया सेल्युलरची प्लॅस्टीक पिशवी ही दुधाचे पिशवीच्या तुलनेत अत्यंत कमी प्रतीची व पातळ असल्याने श्रीअकबर खॉ पठाण, यांनी टेंडरचे वार्षीक दराने उपरोक्त फाडलेल्या पिशव्या खरेदी करणेस असमर्थता दर्शविल्याचे कळविले आहे. त्यानंतर अभिलेख कक्षाचे प्रतिनिधी व श्री अकबर खॉ पठाण यांचेशी झालेल्या तोंडी चर्चेत श्री पठाण यांनी उपरोक्त फाडलेल्या प्लॅस्टीक पिशव्या जास्तीत जास्त ८/- रुपये प्रति किलो इतक्या दराने खरेदी करणेस तयार असल्याचे म्हटले आहे म्हणजेच सदर पिशव्यांची किंमत अंदाजे रु.३२००/- इतकी आहे.

तरी उपरोक्त ३,००,००० नग (४०० किलो) प्लॅस्टीक पिशव्यांची बाजार भावानुसार अंदाजे किंमत रु.३२००/- पर्यंत असल्याने सदर पिशव्यांची विक्री करणेकामी संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात देवून परिसरातील प्लॅस्टीकचे खरेदीदाराकडून कोटेशन मागवून प्राप्त कोटेशन मधील उच्चतम दरधारकास त्यांची विक्री करणेस मान्यता मिळणेस्तव सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये फेर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयडीया सेल्युकर लि. यांचेकडून देणगी दाखल प्राप्त झालेल्या ३,००,००० नग (४०० किलो) प्रिंटेड प्लॅस्टीक पिशव्यांची उच्चतम दराने विक्री करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.२१** **सन २०१५-१६ मधील पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक अॅलम, क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-**

**१)** पाणी पुरवठा विभागास सन २०१५-१६ करीता पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६२-१० नुसार रक्कम रु.६,२३,०००/- (अक्षरी रु.सहा लाख तेवीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. ऑनलाईन प्राप्त सहा ई-निविदा दि.३०/११/२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी (पाणी पुरवठा व खरेदी) व मा. मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या होत्या.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.०३, निर्णय क्रं.०३(११) नुसार सन २०१५-२०१६ मध्ये पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले ३५ मेट्रीक टन ब्लीचिंग पावडर खरेदी करणेकामी तुलनात्मक तक्त्यातील यश केमिकल्स, नाशिक यांचे एकत्रीत रु.५,२५,०००/- (रु.१५,०००/- प्रती मे.टन, व्हॅटसह) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येवून, त्यांना जा.नं.एसएसएस/ खरेदी-पापु/ ६७७५/२०१६, दि.०९/०३/२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

**२)** पाणी पुरवठा विभागास सन २०१५-१६ करीता पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक फेरीक ॲलम खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६२-०९ नुसार रक्कम रु.३,५०,०००/- (अक्षरी रु.तीन लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन पाणी पुरवठा विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. ऑनलाईन प्राप्त चार ई-निविदा दि.३०/११/२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी (पाणी पुरवठा व खरेदी) व मा. मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या होत्या.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.०३, निर्णय क्रं.०३(०९) नुसार सन २०१५-२०१६ मध्ये पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले ५० मेट्रीक टन फेरीक ॲलम खरेदी करणेकामी तुलनात्मक तक्त्यातील सार्क केमिकल्स, औरंगाबाद यांचे एकत्रीत रु३,३२,५००/- (रु.६,६५०/- प्रती मे.टन, व्हॅटसह) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येवून, त्यांना जा.नं.एसएसएस/पाणी पुरवठा/६५९०/२०१६, दि.०२/०३/२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

**३)** पाणी पुरवठा विभागास सन २०१५-१६ करीता पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक क्लोरीन गॅस सिंलेडर खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६२-११ नुसार रक्कम रु.१,६०,०००/- (अक्षरी रु.एक लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर वर्तमानत्रात जाहिरात प्रसिध्द करुन पाणी पुरवठा विभागामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. प्राप्त तीन निविदा दि.१९/०९/२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी (पाणी पुरवठा व खरेदी) व मा. मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या होत्या.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.०२, निर्णय क्रं.५२०(०३) नुसार सन २०१५-२०१६ मध्ये पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले ४० नग क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी तुलनात्मक तक्त्यातील जी.एस कमर्सियल कार्पोरेशन, मुंबई यांचे रु४,०००/- प्रती सिलेंडर, व्हॅटसह मात्र निम्नतम दर स्विकारणेत येवून, त्यांना जा.नं.एसएसएस/पाणी पुरवठा/६१५७/२०१६, दि.०८/०२/२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकरीता पाणी पुरवठा विभागाकडुन माहे एप्रिल-२०१५ मध्ये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आलेनंतर ब्लीचिंग पावडर करीता खरेदी विभागाकडुन व फेरीक ॲलम करीता पाणी पुरवठा विभागाकडुन ई-निविदा प्रक्रिया व क्लोरीन गॅस सिंलेडर करीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

सदरची ई-निविदा व निविदा प्रक्रिया पुर्ण झालेनंतर निम्नत्तम दरधारकांना माहे फेब्रुवारी व मार्च-२०१६ मध्ये पुरवठा आदेश देण्यात आले. सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकरीता संबंधीतांना पुरवठा आदेश देतेवेळी मार्च २०१६ पर्यंत कालावधी गृहीत न धरता माहे डिसेंबर-२०१६ पर्यंत कालावधी गृहीत धरणेत येवून पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

याबाबत लेखाशाखा विभागाकडुन आर्थिक वर्ष एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ करीता सदरची खरेदी प्रक्रिया गृहीत धरणेत यावी असे तोंडी सांगितलेवरुन याबाबत पाणी पुरवठा विभागाकडुन दि.०६/०७/२०१६ रोजीचे टिपणीन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. यावर मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी मुख्य वित्त व लेखाधिकारी यांचे अभिप्रायासह सादर करावे असे निर्देश दिले. मुख्यलेखाधिकारी यांनी उदयोग व उर्जा विभागाचा शासन निर्णय दि.३०/१०/२०१५ तील ३.३.२ नुसार पुर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुर्नप्रत्ययी

आदेश सुरुवातीचा आदेश दिल्यानंतर ६ महिन्यांचे आत देता येतो. मात्र सदर आदेशाचे मुल्य मुळ आदेशाच्या ५०% किंवा १० कोटी यापेक्षा जे कमी असेल ते असेल व खरेदी करावयाच्या वस्तुची बाजारातील किंमत कमी झालेली नसावी. या अटीची पुर्तता होत असल्यास सदर प्रकरणात खरेदी समिती व मा.व्यवस्थापन समितीच्या कार्योत्तर मान्यतेने मंजूरीसाठी विचार करणे योग्य राहील असे निर्देश दिले.

यावर मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी मार्च- २०१६ नंतर ई-निविदा प्रक्रिया नव्याने सुरु करणेबाबत कार्यवाही न केलेने तसेच मुदतवाढ मार्च २०१६ नंतर तात्काळ का मागितली नाही याबाबत खुलासा करणे गरजेचे आहे असे नमुद केलेले आहे.

**प्रस्ताव:-** सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठीची ई-निविदा व निविदा प्रक्रिया पुर्ण झालेनंतर निम्नतम दरधारकांना माहे फेब्रुवारी, मार्च-२०१६ मध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेने, संबंधीतांना पुरवठा आदेश देतेवेळी मार्च २०१६ पर्यंत कालावधी गृहीत न धरता माहे डिसेंबर-२०१६ पर्यंत कालावधी गृहीत धरणेत येवून पुरवठा आदेश देण्यात आलेले असलेने मार्च २०१६ नंतर ई-निविदा प्रक्रिया नव्याने सुरु करणेबाबत कार्यवाही करण्यात आली नाही तसेच मुदतवाढ मार्च २०१६ नंतर तात्काळ मागितली नाही.

तरी पाणी पुरवठा विभागाकडुन मार्च-२०१६ नंतर खरेदी करणेत आलेल्या ब्लीचिंग पावडर,फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर चे बीलांची रक्कम संबंधीतांना आदा करणे बाकी आहेत त्यांचेकडुन पुरवठा करणेत आलेल्या मालाचे बील आदा करणेसाठी वारंवार तगादा करणेत येत आहे. याकरीता मागील बीलांची रक्कम संबंधीतांनाआदा करणेबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने पुढील कालावधीसाठी माल बोलविणे गरजेचे आहे.

सद्यस्थितीत ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर यांची बाजारभावातील किमतीबाबत या मालाचे पुरवठादार यांचेकडुन दुरध्वनीव्दारे कोटेशनची मागणी केली असता, प्राप्त कोटेशनमधील किमती यापुर्वीचे पुरवठाधारकांपेक्षा जास्त असलेचे आढळून आलेले आहेत. सदरची कोटेशन माहितीस्तव सोबत जोडलेली आहेत.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** तरी सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठीची ई-निविदा व निविदा प्रक्रिया पुर्ण झालेनंतर निम्नतम दरधारकांना माहे फेब्रुवारी, मार्च-२०१६ मध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. संबंधीतांना पुरवठा आदेश देतेवेळी मार्च २०१६ पर्यंत कालावधी गृहीत न धरता माहे डिसेंबर-२०१६ पर्यंत कालावधी गृहीत धरणेत येवून पुरवठा आदेश देण्यात आलेले असलेने, माहे डिसेंबर २०१६ अखेरपर्यंत संबंधीत निम्नतम दरधारकांकडुन ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करता येईल व त्यापुढील कालावधीसाठी नव्याने ई-निविदा व निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही सुरु करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव स्वतंत्र सादर करता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच पाणी शुध्दीकरणाकरीता ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस यांचा किती प्रमाणात वापर करावयाचा याची माहिती, वापर करणाऱ्या संबंधीत कर्मचाऱ्यांना देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **गुरुस्थान मंदिरासमोरील शेड देणगी स्वरुपात करुन देणेकामी श्री.साईनाथुनी नारायणराव, शिर्डी यांचे प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. साईनाथुनी नारायणराव, शिर्डी यांनी दि.०६/०६/२०१६ रोजीचे पत्राव्दारे गुरुस्थान मंदीरात दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना उन्हाळा व पावसाळा या ऋतुंमूळे त्रास होतो याकरीता साईभक्तांचे ऊन व पावसापासून संरक्षण होण्यासाठी संस्थानकडून गुरुस्थम मंदिरासमोर दरवर्षी कापडी मंडप टाकला जातो. यासाठी गुरुस्थान मंदीरासमोर देणगीस्वरुपात शेड उभारणेची इच्छा व्यक्त केली असून त्यासाठी परवानगी मिळावी असे कळविलेले आहे.

यापुर्वी मंदीर परिसरात कायमस्वरुपी पीव्हीसी फ्रब्रीकचे शेड उभारणेबाबतचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे C.A.No 1776/2014, IN PIL No.18/2011 दि.१४/०१/२०१५ रोजी दाखल केला असता त्यावर न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

*"1. Heard this is an application for permission to spend an amount of Rs.1,46,18,120/- for the purpose of construction of temporary shed of M.S. structure and shed made up of pvc double coated tensile fabric in and around the temple premises.*

*2. The present application is rejected because request for permanent M.S. structure around temple would ruin not only its look but would be obstruction for the devotees. During festival time temporary structures are erected for shed and said practice appears to be proper.*

*3. The Civil Application stands rejected."*

याबाबत इकडील विभागामार्फत दि.२२/०८/२०१६ रोजीचे टिपणीव्दारे श्रींचे गरुस्थान मंदीर व संस्थान परिसरात आवश्यक ठिकाणी एम.एस.पाईप स्ट्रक्चरसह फॅब्रिकचे छत उभारणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर फेर सादर करणेत आलेला आहे. त्यावर निर्णय होणे अद्याप बाकी आहे.

तथापी शिर्डी येथे श्री साईचे दर्शनार्थ आलेल्या साईभक्तांची समाधी मंदीर, गुरुस्थान, व्दारकामाई व श्रींची चावडी येथे मोठया प्रमाणावर गर्दी होते. सध्या श्रींचे गुरुस्थान मंदीरासमोर दरवर्षी तिनही उत्सवांना तसेच उन्हाळा, पावसाळा व दिपावलीचे वेळी ठेकेदारांकडून सुमारे १५७५ चौ.फुट आकाराचा मंडप टाकला जातो. याकामी संस्थानकडून प्रतीवर्षी सुमारे रु.१ ते १.१० लाख मात्र इतका खर्च होतो. श्री गुरुस्थान मंदिरासमोरील धुनी रिती- रिवाजाप्रमाणे गुरुवार व शुक्रवार या दिवशी प्रज्वलीत असते. हजारो भक्त या दिवशी धुनीत लोबान व धुप जाळतात. त्यामुळे याठिकाणी मोठया प्रमाणावर धुरही निर्माण होतो. त्यामुळे सदर ठिकाणी कापडी मंडपाऐवजी कायमस्वरुपी शेड उभारणे गरजेचे आहे.

करीता गुरुस्थान मंदीरासमोर पॉलीकार्बोनेटचे छत असलेले शेड उभारावयाचे झाल्यास रु.६ लक्ष मात्र इतका तर टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारावयाचे झाल्यास यासाठी रु.९.७५ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम श्री. साईनाथुनी नारायणराव, शिर्डी यांचेकडून देणगीस्वरूपात करता येईल.

तरी श्रींचे गुरुस्थान मंदिरासमोर श्री.साईनाथुनी नारायणराव, शिर्डी यांचेकडून देणगीस्वरूपात पॉलीकार्बोनेट अथवा टेन्साईल फॅब्रीक छत असलेले शेड उभारणी करणेसाठी निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.७०९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, गुरुस्थान मंदिर येथे जागा कमी असल्यामुळे भक्तांची जास्त गर्दी होते व समोरच असलेल्या धुनीमध्ये लोबान जाळण्याची परंपरा असल्यामुळे धुरही होत असतो, त्यामुळे सदर ठिकाणी कायमस्वरुपी छत बनविणेऐवजी आवश्यक त्या वेळेसच छत टाकण्यात यावे. तसेच श्री.साईनाथुनी नारायणराव, शिर्डी यांना, ते देणगी स्वरुपात बनवून देत असलेले शेड गुरुस्थान मंदिराऐवजी लाडूप्रसाद वाटप केंद्र अथवा इतर ठिकाणी देणेबाबत कळविणेत यावे.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३** **श्री साईप्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे गट नं.८०,८५ मध्ये श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून दि.०८/०१/२००९ पासून साईभक्तांना तेथे प्रसाद भोजन वाटप करणेत येत आहे. दररोज सरासरी ३५ ते ४० हजार भाविक प्रसाद भोजनचा लाभ घेतात. सदर इमारतीचा वापर सूरू होऊन ०७ वर्षापेक्षा आधिक कालावधी झालेला आहे. सततच्या वापरामुळे इमारतीचे अंतर्गत भागातील रंग ब-याच ठिकाणी खराब झालेला आहे. यामध्ये मुख्य किचन, चपाती किचन, व बुंदी किचन मधील रंगकाम धुरामुळे बरेचखराब झालेले आहे. तसेच इमारतीचे बाहेरील बाजूस सिमेंट पेंन्टने रंगकाम करणेत आलेले आहे. वातावरणाच्या परीणामामुळे सदरचा रंग देखील खराब झालेला आहे. त्यामुळे प्रसादालय विभागाने त्यांचे दि.०२/०७/२०१५ रोजीचे पत्रान्वये इमारतीचे आतिल व बाहेरील बाजूने रंगकाम करून देणेस कळविले आहे.

यापुर्वी श्री साईप्रसादालय इमारतीचे बाहेरील बाजूस देणगीदाखल रंगकाम करणेसाठी इसेल पेंट प्रा.लि., मुंबई यांनी दि१८/१०/२०१४ रोजीच्या ई-मेलव्दारे इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार सदरहू साईभक्तांकडून देणगी स्वरुपात रंगकाम करुन घेणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९२७ अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार साईभक्त यांना संस्थानचे दि.१३/१२/२०१४ नुसार रंगकाम सुरु करणेस पत्र देण्यात आले होते. तसेच दि.२५/०२/२०१५ व दि.१५/०६/२०१५ अन्वये साईभक्त यांना सदरहू काम सुरु करणेबाबत स्मरणपत्र देण्यात आले होते. यावर त्यांनी दि.१५/०६/२०१६ रोजीच्या ई-मेलव्दारे लवकरच बाहेरील बाजूने रंगकाम करणेस सुरुवात करणार असल्याचे कळविले. तथापि अद्याप साईभक्त श्री.नरेंद्र पटेल, इसेल पेंट प्रा.लि., मुंबई यांनी रंगकामास सुरुवात केलेली नाही व याप्रकरणी त्यांचेकडून कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे श्री साईप्रसादालय इमारतीचे रंगकाम संस्थानमार्फत हाती घेणे योग्य होईल असे नम्र मत आहे.

संस्थानचे व्दारावती, साईआश्रम, साईधर्मशाळा, मंदिर परिसरातील इमारती व साईबाबा हॉस्पीटल या इमारतींना बाहेरीलबाजूने सिमेंट पेन्ट ऐवजी रिनोव्हा पेन्टने काम केले आहे. त्यामुळे या इमारतींना किमान १० वर्ष रंगकाम करण्याची आवश्यकता भासत नाही तसेच या इमारती आर्कषकही दिसतात. रिनोव्हा पेन्टने इमारतीचे रंगकाम केल्यावर पावसाळयात इमारतीचे भिंतीमधून पाणी सिपेज (पाझर) होत नाही. श्री साई प्रसादालय इमारतीला सध्या बाहेरीलबाजून रंगकाम केलेले आहे. आता सदर इमारतीचा बाहेरील रंग खराब झालेला असून रिनोव्हा पेन्टने काम करणे योग्य होईल असे नम्र मत आहे.

**प्रस्तावः-** श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील भिंतींना लस्टर रंग देणे व स्ट्रक्चरल स्टीलला ऑईल पेंट रंगकाम करणेसाठी जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार अंदाजे रक्कम रू.६४,८४,७१९/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच बाहेरील बाजूने रिनोव्हा पेंटने रंगकाम करणेसाठी रु.२०,९९,६२०/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील बाजुचे रंगकाम करणेसाठी येणारे रक्कम रू.८५,८४,३१९/- मात्रचे खर्चास तसेच सदरहू कामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया करुन निविदा मागविणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.७१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४** **बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामासाठी सिमेंट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधील तरतुद:-** *अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट– कलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन" करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडुन विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतुद आहे.*

**प्रस्तावना:-** बांधकाम विभागामार्फत संस्थान परिसरातील इमारतींची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती केली जाते. या दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामासाठी आवश्यक असणारे सिमेंट सध्या बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी केली जाते. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १६२(३८) अन्वये सन २०१५-१६ करीता दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी व विभागांतर्गत कामांसाठी १५०० सिमेंट गोण्या खरेदी करणेस व या कामी अंदाजीत रक्कम रु. ४,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आली होती. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या सिमेंट गोण्यापैकी ३१ मार्च २०१५ अखेर १३०.५० सिमेंट गोण्या शिल्लक होत्या. त्यानुसार सन २०१५-१६ करीता ४३ ग्रेड सिमेंट अल्ट्राटेक, ए.सी.सी., बिर्ला अे-१, बिर्ला गोल्ड व अंबुजा या कंपन्याचे अधिकृत विक्रेत्यांकडुन विहित पध्दतीने दरपत्रके मागवुन आवश्यकतेनुसार ९८० सिमेंट गोण्या टप्प्याटप्प्याने खरेदी करण्यात आल्या . सन २०१५-१६ मध्ये देणगी दाखल मिळालेल्या ६१९ अश्या सर्व मिळुन एकुण १७२९ सिमेंट गोण्या प्राप्त झाल्या आहेत.

०१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ अखेर विभागाकडील दैनंदिन देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी व विभागांतर्गत कामांसाठी १२२१.५० सिमेंट गोण्या वापरण्यात आल्या असुन याकामी रक्कम रु.३,१८,८२५/- मात्र इतका खर्च आलेला आहे. सदरील कामांसाठी महीन्याला सरासरी १०० गोण्या सिमेंट लागते. दि. ३१ ऑगस्ट २०१६ अखेर विभागाकडे १३० सिमेंट गोण्या शिल्लक असल्यामुळे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी तातडीने सिमेंट गोण्या खरेदी करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव:-** सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मागील वर्षाप्रमाणे अंदाजे ९०० गोणी सिमेंट विहित पध्दतीने दरपत्रके मागवुन आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करता येतील. याकामी अंदाजे रुपये ३००/- प्रति सिमेंट गोणी या दराने रक्कम रुपये २,७०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत:-** तरी बांधकाम विभागामार्फत करणेत येणा-या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी व विभागांतर्गत कामांसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी अंदाजे ९०० गोण्या सिमेंट वर नमुद केलेल्या कंपन्यांचे अधिकृत विक्रेत्यांकडुन दरपत्रके मागवुन आवश्यकतेनुसार टप्प्या टप्प्याने खरेदी करणेस व त्याकामी अंदाजित रक्कम रु.२,७०,०००/- मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामासाठी सिमेंट खरेदी करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **संस्थानमार्फत कार्यरत असलेल्या शैक्षणिक संस्थांकरीता नवीन संकुलाचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-**

अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय-**

१) मा. त्रिसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९४१ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

**------** "यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच, सदरहु कामी या क्षेत्रातील नामांकित व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करणेत यावी, असे ठरले."

२) मा. त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९६४ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

------ "यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालय (Senior College) सुरु करणेकरीता जागा निश्चित करणेत यावी व त्यानंतर वरीष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी शासनास काय आवश्यक आहे, यासह सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच तोपर्यंत शासनाचे बृहद आराखड्यामध्ये नोंद होणेसाठी ऑनलाईन अर्ज करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

३) मा. त्रिसदस्य समितीचे दि.२६/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५३१ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

------ "यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने निर्देशीत केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी असे ठरले "

**प्रस्तावना-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेतर्फे पुढीलप्रमाणे शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. १) श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल, शिर्डी २)श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी ३) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी ४)श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी यापैकी इंग्लिश मेडीयम, कन्या विद्या मंदीर व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या इमारती शिर्डी सर्व्हे नं. १०८, १०९ मधिल संस्थान मालकीचे जागेत आहेत. परंतु कनिष्ठ महाविद्यालयाला कायमस्वरूपी इमारत उपलब्ध नसल्याने त्याचे वर्ग सध्या मौजे निमगांव को-हाळे गट नं. १७२ मधील साईआश्रम भाग-२ चे एका इमारतीत भरविण्यात येत आहेत. तसेच सध्याचे शैक्षणिक संकुलातही वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे वर्गांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे इंग्लिश मेडीअम स्कुलचे वर्ग दोन सत्रात भरवावे लागत आहेत. या बाबींचा विचार करून संस्थान संचलित सर्व शैक्षणिक संस्थांकरीता एकाच ठिकाणी कायम स्वरूपी असे अद्यावत शैक्षणिक संकुल उभारणेसाठी प्रस्ताव सादर करावा अशी सूचना तात्कालीनमा.अध्यक्ष व मा. कार्यकारी अधिकारी यांनी दिल्याहोत्या. तसेच याकरिता जागा निश्चित करणेसाठी मा.अध्यक्ष, मा.सदस्य तथा- जिल्हाधिकारी, अहमदनगर, मा.कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांनी निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीच्या जमिनींची पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं. १८३ मधील जागा नियोजित शैक्षणिक संकुलासाठी निश्चित करणेत यावी असे ठरले होते.

मौजे निमगांव को-हाळे ता. राहाता येथिल संस्थान मालकीचे गट नं. १८३ मधील जागेचे क्षेत्र ५ हेक्टर ४० आर इतके आहे. या जागेत संस्थानच्या वरील सर्व शैक्षणिक संस्थांकरीता, वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सांस्कृतिक हॉल, क्रिडांगण, वाहनतळ इत्यादी पायाभूत सोयी-सुविधा अंतर्भूत असलेल्या नियोजित प्रकल्पाचे संकल्पन करणेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४१ अन्वये याकामासाठी सदरक्षेत्रातील नामांकीत व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करण्यात यावी असे ठरले.त्यानुसार आर्किटेक्ट डी. ओ. निकम यांना संस्थान जा.क्र.५३५८/२०१४ दि.२४/०२/२०१४ अन्वये विषयांकित प्रकल्पासाठी प्राथमिक नकाशे तयार करून, सदर प्रकल्पासाठी त्यांचे फीचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले होते.

याबाबत दिनांक ०१/०३/२०१४ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली व आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांचे उपस्थितीत मौजे निमगांव को-हाळे ता. राहाता येथील संस्थानचे गट नंबर १८३ मधील जागेत शैक्षणिक संकुलाचे बांधकाम करणेबाबत बैठक आयोजित केली होती. त्यावेळी चारही शैक्षणिक संस्थेच्या प्राचार्यांनी नियोजित प्रकल्पाबाबत त्यांच्या गरजाविषयी मत मांडले. त्यानुसार आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांनी सदरहू प्रकल्पासाठी प्राथमिक संकल्पन आराखडे तयार केले असून त्याचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे त्रिसदस्य समितीचे सभेपूढे सादरीकरण केले. यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

| **Sr.No.** | **Particular** | **Junior College** | **Saibaba English medium School** | **Saibaba Kanya Vidya Mandir** |
|---|---|---|---|---|
| 01. | Class Rooms | 30 | 77 | 30 |
| 02. | Office Cabin/Staff Room | 07 | 08 | 07 |
| 03. | Sports/Music Room | --- | --- | 02 |
| 04. | Store Room | 08 | 10 | 08 |
| 05. | Indoor Play Area/ Multipurpose Hall/Gymnasium/Workshop/ Cultural/Conference Hall | 06 | 09 | 05 |
| 06. | Lab/Library/Examination Center/Drawing Hall | 07 | 16 | 07 |
| 07. | Her Toilet Block | 04 | 10 | 08 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 08. | His Toilet Block | 04 | 10 | --- |
| 09. | Proposed built up area in sq.mtr. | 11860.12 | 25442.05 | 11860.12 |

याशिवाय जिमखान्यासाठी स्वतंत्र इमारत प्रस्तावीत आहे. यामध्ये स्विमिंग टॅंक (मिनी ऑलंपीक) बॅडमिंटन हॉल, ऑडीटोरीअम,जिमन्याशिअम, टेबल टेनीस हॉल, कॅरम रुम, पूल रुम, सेस रुम, इ. समाविष्ट असतील.सदरहू सभेतील निर्णय क्र. ५३१ अन्वये प्रस्तावितकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने निर्देशीत केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी असे ठरले.

त्यानुसार याकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे मान्यतेसाठी सिव्हील अर्ज दाखल करणेत आला होता. सदर अर्जावर दि.०४/१२/२०१५ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

PER COURT:-

1. Vide the present application, the applicant committee is seeking permission to take appropriate decision with regard to construction of educational complex in survey no.183 situated at NimgoanKorhaleTq. Rahata and for that purpose, permit the committee to spend necessary amount required for the purpose of construction of educational complex.

2. We have heard the learned counsel for the respective parties.

3. Firstly, the committee will have to arrive at a conclusion about the expenditure that is required for the same. At present, we allow the applicant committee to take appropriate decision with regard to construction of an educational complex in survey no.183 situated at NimgaonKorhale. If the same is permissible as per plan and as per rules and regulations of the Grampanchayat, then the applicant shall seek necessary permission of appropriate authority, prepare lay out plan of the construction, thereafter appoint architecture and also the approximate expenditure that would be required and before proceeding with any work shall seek permission of this Court with regard to expenditure to be made.

4. Civil application is disposed of.

मौजे निमगाव को-हाळे येथील भूसंपादनाने मिळालेल्या शेती महामंडळाच्या जमिनी (४५ हे. ६४ आर) या प्रादेशिक विकास योजनेत हरीत विभागात दर्शविलेल्या असल्याने त्या रहिवास विभागात समाविष्ट करणेकामी मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि२४/०१/२००८ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर जमिनीपैकी गट नं.१७२,१८३ व १८६ या जमिनी शासनाने ना विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेसाठी शासनाचे कलम २० पोटकलम ०३ अन्वये दि. ०३/०६/२००९ रोजी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्यावर अद्याप अंतिम शासन निर्णय झालेला नाही.

वरीलप्रमाणे निमगांव को-हाळे येथील जमीनीत शैक्षणिक संकूल उभारणेकामी प्रस्तावास मान्यता मिळाली. दरम्यान नव्याने बिरेगांव शिवारातील मंजूर विकास आराखडयातील संस्थान शैक्षणिक संकूलाकरीता ६ हे. ५५ आर. आरक्षीत आहे. या क्षेत्रापैकी आरक्षण नं.२२, सर्व्हे नं.२१२ पैकी व २१३ पैकी श्री.पतिंगराव शेळके, श्री.साहेबराव शेळके व श्री.बाजीराव शेळके यांचे मालकीची २ हे. १७ आर जमिन संस्थानने खरेदी केलेली आहे. याशिवाय या रिझर्वेशनमधील लगतच्या सर्व्हे नं.१९५, १९६ मधील खालील जमीन मालकांनी त्यांची जमीन खरेदी करणेस संस्थानकडे अर्ज दाखल केले आहे.

| अ.नं. | जमिन मालकाचे नाव | क्षेत्र (हे. आर. चौ.मी) |
|---|---|---|
| १ | श्री.आबासाहेब भास्कर कोते | ०.७१.३२ |
| २ | सौ.छबुबाई भास्कर कोते | ०.७९.३० |
| ३ | श्री.पतींगराव रंगनाथ शेळके | ०.१७.०० |
| एकूणः- | | १.६७.६२ |

उपरोक्तप्रमाणे एकुण १ हे. ६७ आर जमीन खरेदीसाठी मालमत्ता विभागामार्फत पुढील कार्यवाही करणेत येत आहे. रिझर्वेशन नं.२२ चे पश्चिमेस व उत्तरेस १५ मी. रुंदीचा विकास योजना रस्ते विकास आराखडयातदाखविलेला आहे. तसेच पूर्वेस व दक्षिणेस १८ मी. रुंदीचे रस्ते दाखविलेले आहेत. सध्या संस्थानने खरेदी केलेल्या क्षेत्रात जाणेसाठी रस्ता उपलब्ध नाही. मूळ जमीन मालक श्री.पतींगराव शेळके, श्री.साहेबराव शेळके व श्री.बाजीराव शेळके यांचे क्षेत्रातून २० फूट रुंदीचे रस्त्याची वहीवाट उपलब्ध करुन देणेबाबत त्यांनी खरेदी खतात लिहून दिलेले आहे. तसेच श्री.आबासाहेब भास्कर कोते यांचे क्षेत्र संस्थानने सध्या खरेदी केलेल्या क्षेत्राच्या पूर्वेस आहे. या क्षेत्राला लागून पूर्व व दक्षिण बाजूस १८ मी. रुंदीचा DP रस्ता आहे. त्यामुळे सदरहू क्षेत्र संस्थानने खरेदी केल्यास संपूर्ण भूखंडासाठी रस्ता उपलब्ध होईल.

निमगांव को-हाळे येथील शैक्षणिक संकूलासाठी प्रस्तावित असलेले क्षेत्र ५ हे. ४० आर साई गार्डन, साई धर्मशाळा व हेलिपॅड तसेच प्रसादालयापासून जवळ आहे. त्यामुळै शैक्षणिक संकुलाऐवजी इतर भक्त उपयोगी प्रकल्पांसाठी सदर क्षेत्राचा चांगला उपयोग होईल. तसेच शताब्दी करीता भक्तांचे तात्पुरते निवाराशेड करीता सदरहू जमीनीचा वापर प्रस्तावित करणेत आला आहे.

**प्रस्ताव-** नियोजित शैक्षणिक संकूलाचे एकुण बांधकाम क्षेत्रफळ ५२१७३ चौ.मी. आहे. यात श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल, श्री साईबाबा कन्या विदया मंदिर, श्री साईबाबा ज्यु. कॉलेज व जिमखाना इमारतीचा समावेश असेल. इमारतीचे बांधकाम, विदयुतीकरण, फर्निचर, रस्ते, लॅण्डस्केप व आर्किटेक्ट फी यासह प्रकल्पाकरीता प्राथिमक ढोबळ अंदाजानुसार रक्कम रू. १२९ कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे.

या सर्व बाबींचा साकल्याने विचार करता शिर्डी शहरापासून ३.५ कि.मी. अंतरावर असलेल्या विकास योजना आरक्षण क्र.२२ मधील बिरेगांव शिवारातील मंजूर विकास आराखडयातील संस्थान शैक्षणिक संकुलाकरीता आरक्षित ६ हे. ५५ आर क्षेत्रापैकी संस्थानने खरेदी केलेल्या सर्व्हे नं.२१२ पै. व २१३ पै. मधील २ हे. १७ आर क्षेत्रावर शैक्षणिक संकूलाचे बांधकाम करणे उचित होईल असे मत आहे. तथापि वरीलप्रमाणे सर्व शैक्षणिक संस्थांकरीता इमारतींचे बांधकामासाठी सदर जागा पुरेशी नाही. त्यासाठी टप्प्या-टप्प्याने बांधकाम हाती घेणेकरीता नियोजन करता येईल. सदर आरक्षणातील इतर जागांचे भूसंपादन/खरेदी झाल्यानंतर त्या प्रमाणात पुढील टप्प्याचे बांधकाम हाती घेता येईल.तसेच नियोजीत बांधकाम सुरु करणेपुर्वी या जागेपर्यंत पक्क्या स्वरुपातील पोहोच रस्त्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे.

यापूवी आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांनी मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.१८३ मधील जागेत शैक्षणिक संकुलाचे बांधकाम करणेसाठी नकाशे व अंदाजपत्रक तयार केले होते. तसेच मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.२६/०६/२०१४ रोजीच्या सभेपुढे त्यांचे सादरीकरण केले होते. आता मंजूर विकास आराखडयातील संस्थान शैक्षणिक संकुलाकरीता आरक्षित क्षेत्रापैकी संस्थानने खरेदी केलेल्या सर्व्हे नं.२१२ पै. व २१३ पै. जमिनीत शैक्षणिक संकुल उभारणेसाठी आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांची नेमणूक करुन त्यांच्याकडून आर्किटेक्चरल कामांकरीता सेवा घेता येतील. तरी सदरचे जमिनीत शैक्षणीक संकुल उभारणेसाठी येणा-या खर्चास व या प्रकल्पासाठी आर्किटेक्चरल सेवा घेणेकरीता आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांची नेमणूक करणेस मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.७१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान संचलित सध्याची शैक्षणिक संकुले तसेच भविष्यामध्येनियोजित शैक्षणिक संकुलांची एकाच ठिकाणी उभारणी करणेत यावी, असे समितीचे मत झाले. सबब सदरहू प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **मंदिर परिसरालगत एम.एस.स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रिकचे छत असलेल्या शेडस् उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-**

“21 (1) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईलः -

(ख) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन;

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.”

**प्रस्तावना-** मंदिर परिसरात व १६ गुंठे जागेत खालीलप्रमाणे सात ठिकाणी PVC Fabric Shed उभारणेकामी येणा-या एकूण रु.३.३० कोटी मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रीसदस्य समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता.

1. समाधी मंदिरातून बाहेर पडण्याच्या मार्गावर.
2. समाधी मंदिराचे उत्तरेकडील सभाकुंड येथील मोकळया जागेत.
3. समाधी मंदिराचे पूर्वेकडील (चे बाहेरील बाजूस गेट नं.०३ जवळ) १६ आर जागेत.
4. गेट नं.०२ जवळील उदी काउंटर समोर.
5. श्रीं चे गुरुस्थान समोरील मोकळया जागेत.
6. नंदादिप व दत्त मंदिर समोर.
7. समाधी मंदिराचे उत्तर बाजुकडील रस्ता

सदरहू प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्णय क्र.७५१ संमत झालेला आहे.

*“सध्या नविन दर्शन क्यु कॉम्प्लेक्स तयार करणेचे प्रयोजन आहे. तसेच मंदिर परिसरामध्ये मोकळी जागा कमी असल्यामुळे प्रस्तावीत छत उभारणी केल्यास खेळती हवा राहणार नाही व परिक्रमा मार्गास अर्थ उरत नाही, त्यामुळे मंदिर परिसरामध्ये एम.एस. स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रीकचे छत उभारणेत येऊ नये, फक्त गेट नं. ०३ समोरील संस्थानचे १६ गुंठे जागेत सदरहू छत उभारणी करणेसाठीचा प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले.”*

दरम्यान मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे दाखल C.A.NO1776/2014, IN PIL NO.18/2011 मध्ये दि.१४/०१/२०१५ रोजी खालीलप्रमाणेनिर्णय दिलेला आहे.

*" 1. Heard this is an application for permission to spend an amount of Rs.1,46,18,120/- for the purpose of construction of temporary shed of M.S. structure and shed made up of pvc double coated tensile fabric in and around the temple premises.*
*2. The present application is rejected because request for permanent M.S structure around temple would ruin not only its look but would be obstruction for the devotees. During festival time temporary structures are erected for shed and said practice appears to be proper.*
*3. The Civil Application stands rejected."*

त्यानंतर आता सन २०१६ मधिल उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव दि.२९/०२/२०१६ रोजीचे मा. त्रीसदस्य समिती सभेपुढे सादर केला असता त्यावर सदरहु सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.१८८ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०१६ मधील उन्हाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२४,६७,२१७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. तसेच लाडू काऊंटर व्दारकामाई व साई कॉम्पलेक्स शेजारी मोकळ्या जागेत साईभक्तांच्या सोयींसाठी कायमस्वरुपी मंडप टाकणेकामी त्रीसदस्य समितीसमोर सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले."*

मा.त्रीसदस्य समितीचे वरील निर्णयानुसार मंदिर परिसराचे पूर्वेकडील १६ आर जागेत व जुन्या प्रसादालय परिसरातील लाडू काऊंटरसमोर तसेच मा. कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेनुसार पिंपळवाडी रस्ता पश्चिम बाजू दर्शनरांग प्रवेशव्दार या ठिकाणी Removable Structure चे शेडस् करणेसाठी खालिल तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

**अ) मंदिर परिसराचे बाहेरील परिसरात उभारावयाचे पी.व्ही. सी. फॅब्रीक शेड-**

| Sr. No. | Location | Size | | Area | Unit | Approx. Rate | Amount | Say Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 16 R Area at east side of temple premises. | 210 | 80 | 16800 | Sq.ft. | | | |
| 2 | Laddu Counter Near Saiprasad | 75 | 58 | 4350 | Sq.ft. | | | |
| 3 | Darshan Queue @ start of Pimpalwadi Road | 46 | 15 | 690 | Sq.ft | | | |
| | **Total:** | | | **21840** | **Sq.ft.** | **650/-** | **1,41,96,000/-** | |
| | **Architects Fees @3.5%:** | | | | | | **4,96,860/-** | **1.47 Crores.** |
| | **Total Project Cost:** | | | | | | **1,46,92,860/-.** | |

**ब) मंदिर परिसरातील आवश्यक ठिकाणी उभारावयाचे पी.व्ही.सी. फॅब्रीक शेड-**

| Sr. No. | Location | Size | | Area | Unit | Approx. Rate | Amount | Say Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **A)** | **Removable Fixed Sheds:** | | | | | | | |
| 1 | Samadhi Mandir Exit | 200 | 10 | 2000 | Sq.ft. | | | |
| 2 | Sabha Kund Area at North of Samadhi Mandir. | 60 | 60 | 3600 | Sq.ft. | | | |
| 3 | Udi Counter Area. | 40 | 30 | 1200 | Sq.ft. | | | |
| 4 | In front of Gurusthan | 50 | 30 | 1500 | Sq.ft. | | | |
| 5 | In front of Datta Mandir at Lendi Garden. | 100 | 30 | 3000 | Sq.ft. | | | |
| | **Total:** | | | **11300** | **Sq.ft.** | **650/-** | **73,45,000/-** | |

| B) | Removable & Retractable Sheds: | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | North Side of Samadhi Mandir | 284 | 19 | 5396 | Sq.ft | 1100/- | 59,35,600/- | |
| | Architects Fees @3.5%: | | | | | | 4,64,821/- | 1.37 Crores. |
| | Total Project Cost: | | | | | | 1,37,45,421/- | |

सदरकामी उपरोक्त अ मधिल नमूद तपशिलाप्रमाणे रक्कम रु.१.४७ कोटी मात्रचा खर्च अपेक्षित आहे. तसेच ब मधिल नमूदतपशिलाप्रमाणे रक्कम रु.१.३७ कोटी मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरह खर्च मोठया स्वरुपाचे व मंदिर परिसराशी निगडीत असल्याने याकामी तपशिलवार नकाशे व अंदाजपत्रक मंदिर परिसर व दर्शनरांग पुर्न:विकास प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून तयार करुन घेता येईल.

लाडू काउंटर हे साईप्रसाद निवासस्थान परिसरात आहे व त्या इमारती दर्शन रांग प्रकल्पाचे वेळी काढण्यात येणार असल्याने, त्याठिकाणी उभारणी करावयाचे नियोजीत शेड दर्शन रांग प्रकल्पाचे काम सुरु करतेवळी काढून घेता येईल. लाडू काउंटरच्या नविन जागेत पुन्हा उभारता येईल. तसेच व्दारकामाई समोर सार्वजनिक रस्ता असल्याने व सदर ठिकाणी सध्या ऑनिंग शेड असल्याने या ठिकाणी नवीन शेड उभारणेचा समावेश या प्रस्तावात करणेत आलेला नाही.

*तसेच ब मध्ये नमूद केलेली सर्व शेड ही मंदिर परिसरातील असल्याने त्यास मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं. १७७६/२०१४, पी.आय.एल. नं.१८/११ वर दि.१४/०१/२०१५ रोजी निर्णय देऊन शेड उभारणेकामी व खर्चास परवानगी मिळणेबाबतचे ॲप्लीकेशन रद्द केलेले आहे. तथापी आवश्यक बाब म्हणून पुन्हा मा. उच्च न्यायालयात मंजुरीसाठी अर्ज सादर करता येईल असे मत आहे.*

**प्रस्ताव –** तरी याकामी उपरोक्त अ व ब मध्ये नमूद केलेप्रमाणे येणारे रु.२.८४ कोटी मात्रचे खर्चास तसेच सदर प्रकल्पासाठी तपशिलवार नकाशे, अंदाजपत्रक व निविदा आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून तयार करुन घेणेस तसेच पहिल्या टप्प्यात अ मध्ये दर्शविलेप्रमाणे शेड उभारणेकामी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे ई-निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील अ तक्तयामध्ये नमुद केलेल्या (१६ गुंठे, साईप्रसाद इमारतीजवळील लाडूप्रसाद विक्री काऊंटर, पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांग) जागेमध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी एम.एस.स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रिकचे छत बसविणेस व त्याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **मंदिर परिसरालगत गेट नं.१,२ व ४ चे ठिकाणी मल्टी स्टोअर चप्पल स्टॅण्ड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम– २१ (१) मधील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे दर्शन रांगेसाठी पिंपळवाडी रस्त्यावर पॉलीकार्बोनेटचे शेड उभारणेत आलेले आहे. सदरहू शेडचे पूर्व व पश्चिम बाजूकडून साईभक्तांना दर्शनासाठी सोडण्यात येते. तसेच मंदिर परिसरात येणेसाठी गेट नं.३ व गेट नं. ४ मधून प्रवेश दिला जातो. दि.३१ ऑगस्ट, १ व २ सप्टेंबर २०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी मा. कार्यकारी अधिकारी व उप कार्यकारी अधिकारी यांचे समवेत मंदिर परिसरात व संस्थानचे इतर विभागांची पाहणी केली. मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार मंदिर परिसरातील गेट नं.१,२ व ४ या ठिकाणी मल्टी स्टोअर चप्पल स्टॅण्ड तयार करणेबाबत मा. कार्यकारी अधिकारी कक्ष यांचेकडील जा.नं.२१४७/२०१६ दि.०७/०९/२०१६ रोजीचे परिपत्रकाअन्वये कळविणेत आलेले आहे.

त्यानुसार खालिल जागेवर सदरचे चप्पल स्टॅण्ड तयार येतिल.

१) **दर्शन रांग पश्चिम बाजू गेट नं.१ जवळ चप्पल स्टॅण्ड तयार करणे:-** सदरचे चप्पल स्टॅण्ड गेट नं.१ चे उत्तर बाजूस फुटपाथवर दर्शन लाईन गेट नं.१ चे जवळ ६.७५ मी.X२.४५ मी. या साईजमध्ये तयार करता येईल. सदरचे चप्पल स्टॅण्ड मेकॅनिकल विभागामार्फत रॅक तयार करुन त्वरीत सुरु करता येईल.

२) **दर्शनरांग पूर्वबाजू गेट नं २ लगत चप्पल स्टॅण्ड तयार करणे:-** सदरचे चप्पल स्टॅण्ड दर्शन रांग पूर्व बाजूकडील गेट नं.२ लगत १६ आर जागेच्या उत्तर बाजूकडील कंम्पाउंड भिंतीलगत ३०'X१०' या साईजचे बल्ल्यांचे स्ट्रक्चर उभारुन छतासाठी व बाहेरील बाजूने पत्रे बसविता येईल.

३) **गेट नं.४ जवळील चप्पल स्टॅण्ड सुरु करणे:-** मंदिर परिसराचे ४ नं.गेटचे बाहेरील बाजूस पश्चिमेकडील मोकळया जागेत कंम्पाऊंड भिंतीलगत फायबरची कॅबीन ठेवण्यात येवून तिचा वापर साईभक्तांचे चप्पल स्टॅण्डसाठी करण्यात येत होता. सदरचे चप्पल स्टॅण्ड श्री साईबाबा संस्थान एम्प्लाईज क्रेडीट को. ऑफ सोसायटी लि. शिर्डी यांचे मार्फत चालविण्यात येत होते. परंतू सदरहू चप्पल स्टॅण्डचा वापर बंद करणेत आलेला आहे. सदरचे चप्पल स्टॅण्ड सोसायटीमार्फत पुन्हा सुरु करणेकामी मालमत्ता विभागामार्फत उचित कार्यवाही करणेत यावी, असे त्यांना इकडील दि.१२/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

उपरोक्तप्रमाणे अ.नं.२ चे ठिकाणी चप्पल स्टॅण्ड तयार करणेकामी इकडील विभागामार्फत करावयाचे कामासाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | मटेरियलचा तपशिल | परिमाण/ एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जी. आय पत्रे ०.४५ एम एम जाडी साईज – १२'X४' | २४ नग | १११५/- प्र. नग | २६,७६०/- |
| २ | गोल्टे ४'' व्यासाचे १२' लांबी<br>१०' लांबी | २० नग<br>०७ नग | १२०/- प्र. नग<br>१००/- प्र. नग | २,४००/-<br>७००/- |
| ३ | नट बोल्ट १२ mm व्यासाचे ८'' लांबीचे | २० नग | ३५/- प्र. नग | ७००/- |
| | | | **एकूण रक्कम रु.** | **३०,५६०/-** |

उपरोक्तप्रमाणे दर्शनरांग पूर्व बाजू गेट नं. २ लगत चप्पल स्टॅण्डकरीता बल्ल्यांचे स्ट्रक्चर असलेले पत्राशेड उभारणेकामी रक्कम रु.३०,५६०/- मात्र खर्च येईल. तसेच दर्शनरांग पश्चिम बाजूकडील गेट नं.१ लगत असलेल्या फुटपाथवर पॉली कार्बोनेटचे शेड असल्यामुळे सदर ठिकाणी मेकॅनिकल विभागामार्फत रॅक ठेवून चप्पल स्टॅण्ड त्वरीत सुरु करता येईल.

तरी दर्शन रांग पूर्व बाजू गेट नं.२ जवळ चप्पल स्टॅण्डकरीता पत्रा शेड उभारणेकामी येणारे रक्कम रु.३०,५६०/- मात्रचे खर्चास व इकडील विभागासंबंधी कामे करणेसाठी आवश्यक्क मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणे विनंती.

**निर्णय क्र.७१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरालगत गेट नं.१,२ व ४ चे ठिकाणी मल्टी स्टोअर चप्पल स्टॅण्ड तयार करणेकामी आवश्यक असणारे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू चप्पल स्टॅण्ड सेवेकऱ्यांमार्फत चालविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **साईधर्मशाळा येथील कर्मचाऱ्यांचे दुचाकी वाहन पार्किंग व्यवस्थेसाठी शेडचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:**

अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे निमगांव को-हाळे येथील गट नं. १७२ मध्ये श्री साईधर्मशाळा इमारत साईभक्तांचे निवासाठी दि.१८/०७/२०१३ पासून वापरणेस खुली केली आहे. या इमारतीमध्ये पालखीधारक, पदयात्री, सहल तसेच इतर राज्यातून ट्रॅव्हल्सव्दारे शिर्डी येथे येणा-या साईभक्तांची निवासाची व्यवस्था केली जाते. याजागेत एकूण सहा इमारती असून कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत आहे. सहा इमारतीपैकी एक इमारत संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयासाठी वापरात आहे. साईधर्मशाळा येथील कार्यालयीन कामासाठी कायम व कंत्राटी (आऊट सोर्सिंग मार्फत) कर्मचारी असे १८० कर्मचारी कार्यरत आहेत. यापैकी बहुतांश कर्मचारी जवळच्या खेडेगांवातील असल्यामुळे दुचाकीवर येतात. सबब सर्व कर्मचारी आपली दुचाकी वाहने साई धर्मशाळेतील आर ब्लॉक इमारतीच्या उत्तर बाजूस पार्क करतात त्यासाठी प्र. अधिक्षक साईधर्मशाळा यांनी त्यांचे दि.१८/०५/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये कर्मचा-याचे दुचाकी वहानांसाठी उत्तम प्रकारे पार्कींग व्यवस्था करणेबाबत इकडेस कळविले आहे. तसेच अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी त्यांचे दि. २९/०८/२०१६ रोजीचे पत्रान्वये संस्थानचे विविध विभागामध्ये कार्यरत असणारे कर्मचारी सायकल, मोटार सायकल, किंवा चार चाकी वाहन घेऊन डयुटीवर येतात. त्यासाठी स्वतंत्र अशी पार्कींग व्यवस्था करणेत यावी अशी मागणी केली आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्तप्रमाणे साई धर्मशाळा परिसरातील इकडील विभागाचे प्रतिनिधी यांनी समक्ष पहाणी केली असून साईधर्मशाळा परिसरातील आर ब्लॉक या इमारतीचे उत्तर बाजूस उपलब्ध जागेनुसार ३९ मीटर लांब आणि ३.३० मीटर रुंद या मोजमापाचे दुचाकी वाहन पार्कींग शेडचे बांधकाम करता येईल या शेडमध्ये एकाच वेळी एकूण ४० दुचाकी वाहने पार्कींग करता येतील. त्यासाठी सन २०१५-२०१६ च्या प्रचलित जिल्हा दरसूचीनुसार सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकानुसार रुपये २,३७,५५९/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अपेक्षीत खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा येथील कर्मचाऱ्यांचे दुचाकी वाहन पार्किंग व्यवस्थेसाठी शेडचे बांधकाम करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **संस्थानचे मौजे निमगाव- कोऱ्हाळे गट नं.१९५ पै.मधील हेलीपॅड येथील वेटींग लाऊंज दुरुस्ती करणे व भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

२१ (१) विश्वस्तव्यवस्थेच्या निधी आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल.

(क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे. "

**मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:-** मा.त्रीसदस्य समितीचे दि.२३/०५/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र. ३०० खालीलप्रमाणे आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लाऊंज मधील दुरुस्तीची काम करणेसाठी येणा-या अंदाजे रु.१५,३८,८७०/- मात्रचे खर्चास, संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.*

*तसेच मा. खंडपीठाच्या आदेशास अधीन राहून उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना:-** शिर्डी येथे श्री साईचे दर्शनासाठी येणाऱ्या अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी संस्थानचे मौजे निमगांव- कोऱ्हाळे येथील गट नं. १९५ पै. मधे हेलीपॅड तयार करणेत आला आहे. तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू हेलीपॅडचे वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार संस्थानचे हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व वेटींग लाऊंज मधील खालील कामे करणेसाठी प्रस्ताव तयार करणेत आला होता.

०१. वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे
०२. वेटींग लाऊंज करीता अॅल्यु. स्लायडींग खिडक्या बसवणे
०३. अंतर्गत भिंतींना लस्टर पेंट करणे
०४. दरवाज्यांना आतिल व बाहेरील बाजुने लॅमीनेट लावणे
०५. जिप्सम बोर्ड फॉल्स सिलींग करणे.
०६. फ्लोरींग वर PVC मॅटीन टाकणे
०७. खिडक्यांना व्हिनीशिएन ब्लाईंडस् लावणे
०८. थ्रि सिटर सोफे खरेदी करणे
०९. अॅण्टी चेंबर बनविणे कामी एक्झिक्युटीव टेबल व खुर्ची खरेदी करणे.

मा. त्रीसदस्य समितीचे दि.२३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील अॅप्लीकेशन नं. ५०७३/२०१५ दि.०५/०५/२०१५ अन्वये अर्ज सादर करण्यात आला होता. तथापी शासनाने दि.२८/०७/२०१६ रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेसाठी नव्याने मा. व्यवस्थापन समितीची सदस्याची नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे, मा. उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१२ रोजीच्या आदेशाने गठित केलेल्या मा. त्रीसदस्य समितीचा कार्यकाल संपुष्टात आलेला आहे.

नव्याने गठीत झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा, विषय नं. ०२ निर्णय क्र. ५५६ अन्वये मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले ३३ सिव्हिल अर्ज मागे (Withdraw) घेणेबाबत निर्णय समंत झालेला आहे. सदरहू निर्णयानुसार विधी विभाग यांनी त्यांचे जा.क्र. एसएसएस/वशी-विधी/२१५८/२०१६, दि.०८/०९/२०१६ रोजीचे पत्राने सदरहू सिव्हील अॅप्लीकेशन मा. उच्च न्यायालयातून मागे घेण्यात (Withdraw) आले असल्याचे कळविले आहे.

**प्रस्ताव –** मौजे निमगांव को-हाळे गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड जवळील वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व वेटींग लाऊंज दुरुस्ती करणेसाठी जिल्हा दरसुची २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकानुसार रु.११,२८,१८१/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तसेच वेटींग लाऊंज करीता वरीलप्रमाणे फर्निचर खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,२९,७५२/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड जवळील वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लाऊंज मधील दुरुस्तीची कामे करणेसाठी विहित पध्दतीने ई- निविदा सूचना प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेकामी तसेच याकामी येणारे अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड जवळील वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लाऊंज मधील दुरुस्तीची कामे करणेसाठी विहित पध्दतीने ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **साईआश्रम भक्तनिवासस्थान येथील इमारतीचे संडास व बाथरुम खिडक्यांना अॅल्युमिनीअम फ्रेम असलेली मच्छर जाळी बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम – २१ (१) मधील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास येथे एकूण १२ इमारती असून त्यामध्ये १५३६ खोल्या निवासाकरीता उपलब्ध आहेत. प्रत्येक खोलीमध्ये स्वतंत्र स्नानगृह व प्रसाधनगृह असून त्यांना एकूण ३०७२ लोअर्स व्हेंन्टीलेटर लावण्यात आलेले आहेत. सदर लोअर्स, खिडक्यांद्वारे कचरा प्लंबींग शाफ्ट मध्ये टाकला जातो, असे साई आश्रम विभागाने कळविले आहे. त्यामुळे सदर खिडक्यांना ॲल्युमिनीअम मॉस्क्युटो मेश बसविणे आवश्यक आहे.

साईआश्रम भक्तनिवास विभागास ISO9001:2008 हे मानांकन प्राप्त झाले आहे. आय.एस.ओ. ऑडीटर यांनी विभागातील स्वच्छता व इतर कामाबाबतची पाहणी केली असता, खिडक्यांमधून डक्टमध्ये टाकण्यात आलेला कचरा पाहून संडास व बाथरुमचे खिडक्यांना जाळी बसविणेबाबत सुचना केली असल्याचे साई आश्रम भक्तनिवास यांनी कळविले आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्त विषयांकीत कामी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | Nos | Size | Quantity | Unit | Approx Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing & fixing in position alluminium fixed ventilator window of size as directed by engineer in charge having colour anodized section of 40mm x 18mm & 16 micron coated alluminium section, with alluminium SS Mosquito mesh fitted in it, including necessary fixtures & fastening etc. complete. | 3072 | 1’-6”x2’-0” | 9216.00 | Sq.ft | 150/- | 13,82,400/- |
| | | | | | | **Total Amount R/o-** | **13,82,400/-** |

तरी याकामी येणारे रु.१३,८२,४००/- मात्रचे अपेक्षित खर्चास व याकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई– निविदा मागविणेस सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासस्थान येथील इमारतीचे संडास व बाथरुम खिडक्यांना ॲल्युमिनीअम फ्रेम असलेली मच्छर जाळी बसविलेस, खोल्यामध्ये निवास करणारे भक्त स्नानगृह व प्रसाधनगृहामध्ये कचरा टाकतील यामुळे उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला व सदरहू डक्टची नियमीत साफ-सफाई करणेत यावी, अशा सुचना देण्यात आल्या.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३१** **संस्थानचे बांधकाम, पाणीपुरवठा व मेकॅनिकल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी Peer Review, निविदा मुल्यमापन (Bid Evaluation) व इतर अनुषंगीक सेवा घेणेकरीता सल्लागारांचे पॅनेल नेमणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-** सदर अधिनियमातील सुधारीत कलम १७ चे पोटकलम (2) मधिल खंड (झ) अन्वये वरील विषयाशी संबंधित खालिल तरतूद आहे.

“सर्वसाधारपणे विश्स्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.”

**मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय:-**

वरील विषयाबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.१२/०६/२०१४ रोजी झालेल्या सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र.४७७ संमत करण्यात आलेला आहे.

*“यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत सेवा प्राप्त करणेसाठी सल्लागारांचे पॅनल (Panel of Consultants) तयार करणेकामी वर्तमानपत्रातील जाहीरातीद्वारे अनुभवी व नामांकीत सल्लागारांकडून अर्ज सादर करणेविषयी कळविण्यात यावे, असे ठरले.”*

वरील विषयाबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.०२/०२/२०१६ रोजी झालेल्या सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र.३(६) संमत करण्यात आलेला आहे.

*“यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे बांधकाम, पाणीपुरवठा व मॅकेनिकल विभागामार्फत राबविण्यात येणा-या प्रकल्पांसाठी Peer Review निविदा मुल्यमापन (Bid Evaluation) व इतर अनुषंगीक*

*सेवा घेणेकरीता सल्लागारांचे पॅनेल नेमणेकामी प्राप्त झालेले ११ प्रस्ताव उपसमिती सभेत उघडणेत आले. या उघडण्यात आलेल्या प्रस्तावांमधील पात्र/ अपात्र सल्लागारांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली."*

1. वरील विषयाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/०७/२०१६ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्र.४१८(३) खालिलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे बांधकाम, पाणीपुरवठा व मॅकेनिकल विभागामार्फत राबविण्यात येणा-या प्रकल्पांसाठी Peer Review निविदा मुल्यमापन (Bid Evaluation) व इतर अनुषंगीक सेवा घेणेकरीता सल्लागारांचे पॅनेल नेमणेकामी उपरोक्तप्रमाणे उघडणेत आलेल्या फीचे देकारानुसार त्यांचे तांत्रिक व वाणिज्यीक प्रस्तावांचे संयुक्त मुल्यमापन करणेत येऊन, सल्लागारांचे संयुक्त मुल्यमापनाचा अहवाल मान्यतेसाठी त्रीसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली."*

**प्रस्तावना:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार बांधकाम, विद्युत, मॅकेनिलकल व पाणीपुरवठा या विभागाव्दारे राबविण्यात येणा-या Peer Review व निविदांचे तांत्रिक मुल्यमापन करणे या सल्ला सेवा घेणेसाठी Panel of Consultants नेमणेकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन अनुभवी व नामांकित सल्लागारांकडून अर्ज मागविणेकामी सदर विभागांकडून त्यांचेकडील काही मुद्दयांचा समावेश करावयाचा असल्यास दि.११/११/२०१४ अखेर बांधकाम विभागाकडे देणेचे करावे असे दि.०७/११/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यावर पाणी पुरवठा विभाग व मॅकेनिकल विभाग यांचकडून त्यांचेकडील अहवाल निरंक असल्याचे कळविण्यात आले.

विद्युत विभाग यांनी दि.२४/०१/२०१५ रोजीचे पत्राव्दारे उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथिल WP No.3196/2013 मधिल दि.१०/०४/२०१४ रोजीचे आदेशाचा संदर्भ देऊन विद्युत विभाग व बांधकाम विभाग यांची एकत्रित निविदा काढता येणार नाही. तसे केल्यास मा. न्यायालयाचे आदेशाचा अवमान होईल, असे कळविले आहे. त्यामुळे विद्युतविषयक कामांसाठी वरील विषयांकीत सल्ला सेवा देणे या निविदेच्या स्कोपमधून वगळण्यास इकडील विभागाचे दि.१०/१०/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार संस्थानचे बांधकाम, पाणी पुरवठा व मेकॅनिकल विभागाकडील प्रकल्पांसाठी सल्लागारांकडून खालील प्रमाणे सेवा घेणेसाठी निविदा मागविणेत आल्यात.

**Scope of Work:**

- **Approval Stage:**

a) Peer review of architectural drawings, designs and preliminary cost estimate.
b) Peer review of structural design.
c) Checking of detailed cost estimate.

- **Tender Stage:**

a) Checkimg of draft bid documents.
b) Evaluation of bids received.

- **Construction Stage:**

a) Conduct periodic quality audits at the construction site to ascertain the quality of materials and workmanship.
b) Conduct audit of running account and final bill of the contractor, to ascertain the quantity and value of work done.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी मोहत्सवानिमत्त संस्थान मार्फत विविध विकास कामे हाती घ्यावयाची असल्याने दि.१०/१०/२०१५ रोजीच्या टिपणी अन्वये विषयांकीत कामासाठी सल्लागारांकडून EOI Document मागविणेसाठी मुंबई, नाशिक व पुणे येथील वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन अनुभवी व नामांकीत सल्लागारांकडून दि ३०/११/२०१५ पर्यंत अर्ज मागविणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार ११ सल्लागारांचे अर्ज प्राप्त झालेले होते. सल्लागार यांनी सादर केलेले तांत्रीक लिफाफे दि.०८/०१/२०१६ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे उघडणे आले. इकडील विभागामार्फत सदरहू सल्लागारांचे कागदपत्रांची छाननी करणेत आली आहे. त्यानुसार सल्लागार यांचे गुणांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| Sr.No | Name of Consulting firm | Marks obtained (out of 100) |
|---|---|---|
| 01 | Tata Consulting Engineers Ltd, Mumbai | **100** |
| 02 | Fortress Infrastructure Advisory service, Mumbai | **98** |
| 03 | M/s. Shrikhande Consulting Pvt. Ltd. Navi Mumbai | **89** |
| 04 | Precision Precast Solutions Private Ltd., Pune | **85** |
| 05 | D.O. Nikam, Pune | **80** |

| | | |
|---|---|---|
| 06 | Mathur&Kapre Associates, New Delhi | **72** |
| 07 | EN Struct Consulting Engineers, Pune | **66** |
| 08 | Arham Constrotech pvt. Ltd, Nashik Road | 41 |
| 09 | Elegance Architects, Ar. Vishal Patil, Pune | 40 |
| 10 | Infinity Consulting Engineers, Pune | 32 |
| 11 | M/s Chougule Architects, Nashik | 15 |

वरीलपैकी अ.नं.१ ते ७ मध्ये नमूद केलेल्या सल्लागारांना तांत्रीक निविदेमधील कागदपत्रांनुसार किमान ६६ ते कमाल १०० असे गुण मिळालेले आहेत. तसेच अ.नं. ८ ते ११ मधील सल्लागारांना किमान १५ ते कमाल ४१ गुण मिळालेले आहेत. त्यामुळे वरीलपैकी ६० पेक्षा जास्त गुणधारक अशा फक्त अ.नं.१ ते ७ मधील सल्लागारांचे वाणिज्यीक लिफाफे उघडून त्यांचे अंतीम मुल्यमापनानुसार पुढील निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यानुसार अ.नं. १ ते ७ मधिल सल्लागारांचे वाणिज्यीक लिफाफे (Commercial Bid) दि.१८/०६/२०१६ रोजी मा. उपसमितीचे सभेत उघडणेत आले आहेत. त्यानुसार सविस्तर मुल्यमापनाचा तक्ता तयार करुन, यासोबत जोडला आहे.

सदरहू मुल्यमापन तक्त्यानुसार सल्लागार यांचे एकत्रित ( तांत्रिक व वाणिज्यीक) गुणांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

<table>
<tr><th>Sr.No</th><th>Name of Consulting firm</th><th colspan="6">Combined Score</th><th>Comparative Status</th></tr>
<tr><td>1</td><td>Precision Precast Solutions Private Ltd., Pune</td><td colspan="6">88.30</td><td>H1</td></tr>
<tr><td>2</td><td>Fortress Infrastructure Advisory service, Mumbai</td><td colspan="6">86.60</td><td>H2</td></tr>
<tr><td>3</td><td>D.O. Nikam, Pune</td><td colspan="6">86.00</td><td>H3</td></tr>
<tr><td>4</td><td>Tata Consulting Engineers Ltd, Mumbai</td><td colspan="3">79.00<br>(Project Cost > Rs.100 Cr.)</td><td colspan="3">76.86<br>( Project Cost < Rs.100 Cr.)</td><td>H4</td></tr>
<tr><td>5</td><td>Mathur&Kapre Associates, New Delhi</td><td colspan="2">62.74<br>(Project Cost < Rs.5Cr.)</td><td colspan="2">66.40<br>(Project Cost > Rs.5Cr. & < Rs.25Cr.)</td><td colspan="2">74.40<br>( Project Cost > Rs.25Cr.)</td><td>H5</td></tr>
<tr><td>6</td><td>M/s. Shrikhande Consulting Pvt. Ltd. Navi Mumbai</td><td colspan="6">67.38</td><td>H6</td></tr>
<tr><td>7</td><td>EN Struct Consulting Engineers, Pune</td><td colspan="6">52.79</td><td>H7</td></tr>
</table>

उपरोक्त प्रमाणे अ.नं १ ते ४ चे सल्लागार कंपन्यांना ७५ पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले असून, अ.न.५ ते ७ च्या सल्लागार कंपन्यांना किमान ५२.७९ ते कमाल ७४.४० गुण मिळालेले आहेत.

तसेच उपरोक्त चारही सल्लागार कंपन्यांचे वाणिज्यीक प्रस्तावांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

<table>
<tr><th>Sr. No</th><th>Name of Consulting firm</th><th>Total Fees in percentage</th><th>Financial Score</th><th>Comparative Status of financial score</th><th>Combined Score</th></tr>
<tr><td>1</td><td>Precision Precast Solutions Private Ltd., Pune</td><td>0.75%</td><td>96</td><td>L2</td><td>88.30</td></tr>
<tr><td>2</td><td>Fortress Infrastructure Advisory service, Mumbai</td><td>1.20%</td><td>60</td><td>L3</td><td>86.60</td></tr>
<tr><td>3</td><td>D.O. Nikam, Pune</td><td>0.72%</td><td>100</td><td>L1</td><td>86.00</td></tr>
<tr><td rowspan="2">4</td><td rowspan="2">Tata Consulting Engineers Ltd, Mumbai</td><td>2.40%<br>( Project Cost > Rs.100 Cr.)</td><td>30</td><td rowspan="2">L4</td><td>79.00<br>( Project Cost > Rs.100 Cr.)</td></tr>
<tr><td>3.15%<br>(Project Cost < Rs.100 Cr.)</td><td>22.86</td><td>76.86<br>( Project Cost < Rs.100 Cr.)</td></tr>
</table>

**प्रस्ताव:-** उपरोक्त प्रमाणे चारही सल्लागारांना ते निम्नतम ०.७२% या दराने काम करणेस तयार आहेत किंवा कसे? याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे त्यांना चर्चेसाठी बोलावून याबाबत निर्णय घेता येईल. तसेच या सल्लागारांपैकी जे या निम्नतम दरात काम करणेस तयार असतील त्यांचा पॅनलमध्ये समावेश करता येईल. तसेच संस्थानचे आगामी प्रकल्पाकरीता एकत्रित गुण क्रमांकानुसार प्राधान्यक्रमाने त्यांची सल्लागार म्हणुन सेवा घेता येईल.

तरी विषयांकीत कामासाठी सल्लागारांचे पॅनल तयार करणेस उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे बांधकाम, पाणीपुरवठा, मेकॅनिकल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी Peer Review, निविदा मुल्यमापन (Bid Evaluation) तसेच इतर अनुषंगीक सेवा घेणेकरीता सल्लागारांचे पॅनेल नेमणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले व ज्या वेळेस संस्थानला आवश्यकता भासेल, त्यावेळेस सल्लागारांचे पॅनेल नेमण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३२** **एअरपोर्ट लगेज ट्रॉली खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील:-** २१ (१) (ग) "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) " भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्तावना:-** या अधिनियमातील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व त्यातील सुविधा करण्यात येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवास साईभक्तांच्या निवास व्यवस्थेसाठी दि.११/०४/२०१३ पासून सुरु करण्यात आलेले असून या ठिकाणी १२ इमारतीमधून १५३६ खोल्या असून, दररोज ८० ते ९० % खोल्यांची बुकींग होत असते.

या ठिकाणी थांबणा-या साईभक्तांना त्यांच्या सोबतचे लगेज इमारतीपर्यंत नेणे/आणणे कामी एअरपोर्ट लगेज ट्रॉलीची सुविधा पुरविणेत येते. याकामी १२० नग लगेज ट्रॉलींचा वापर दररोज करणेत येतो. परंतू सदरच्या ट्रॉल्यांचा सातत्याने तीन वर्ष वापर झाल्यामूळे खराब/मोडतोड होत आहे. अनेकवेळा मेकॅनिकल विभागामार्फत ट्रॉल्यांची दुरुस्ती करुन घेतलेली आहे. परंतू सततच्या वापरामूळे ट्रॉल्या निकामी होत आहे.

सध्या चांगल्या स्थितीत ३७ नग एअरपोर्ट लगेज ट्रॉल्या शिल्लक असून, ज्या खराब झालेल्या आहेत त्या दि.२९ व ३०/०७/२०१६ या दोन दिवसात मेकॅनिकल विभागामार्फत २९ ट्रॉल्या दुरुस्त करुन त्या वापरात आणलेल्या आहेत. तसेच मेकॅनिकल विभागाने या व्यतीरिक्त ज्या नादुरुस्त ट्रॉल्या आहेत त्या दुरुस्ती कामी स्पेअरपार्ट खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेऊन सदरच्या विभागामार्फत राहिलेल्या नादुरुस्त ट्रॉल्या दुरुस्त करुन दिल्या जाणार आहे. तथापी भविष्यात १२० नग एअरपोर्ट लगेज ट्रॉली खरेदी करावे लागेल.

**प्रस्ताव:-** सदरच्या १२० नग ट्रॉल्या दि.११/०४/२०१३ पासून वापरण्यात असलेल्या असून त्यावेळीचा खरेदी दर सर्वकरासह प्रति ट्रॉली रु.६,१३१.२५/- असून, त्यावेळी रु.७,३५,७५०/- ऐवढा खर्च करण्यात आलेला आहे.

सतत ३ वर्ष ५ महिने ट्रॉल्यांचा वापर होऊन पुढील काळात ब-याच ट्रॉल्या निकामी होतील तसेच ई-निविदा प्रक्रियेसाठी बराच कालावधी लागणार आहे, त्यामूळे साईभक्तांना वापरणेकरीता १२० नग एअरपोर्ट लगेज ट्रॉली खरेदी करणेची आवश्यकता आहे.

मागील तीन वर्षापूर्वी रु.६१३१.२५ या दराने लगेज ट्रॉली खरेदी केलेली असून, त्यामध्ये दरवाढ संभाव्य आहे. तसेच देशात नवीन एल.बी.टी. कर लागू होणार असल्याने आज मितीला स्टेनलेस स्टीलचे दरवाढ होईल किंवा कमी होतील हे सांगता येणार नाही. यासाठी मागील खरेदी दरामध्ये अंदाजे संभाव्य २० % वाढ गृहीत धरुन रु.७,३५८/- प्रती नग खर्च अपेक्षीत असून १२० नग ट्रॉल्यांसाठी रु.८,८२,९६०/- संभाव्य खर्च लागेल.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात याकामी रु.८,८२,९६०/- रक्कमेची बजेट तरतूद नसून सदरची रक्कम सुधारीत बजेटमध्ये तरतुद करता येईल. तो पर्यंत मा.व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेऊन ई-निविदा पूर्ण करता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** यासाठी १) मेकॅनिकल विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून एअरपोर्ट लगेज ट्रॉल्या खरेदी करणेस,

२) उपरोक्त वर्णनानूसार १२० नग एअरपोर्ट लगेज ट्रॉली खरेदी करणेकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासमध्ये निवास करणाऱ्या साईभक्तांच्या सोयीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे १२० नग लगेज ट्रॉली विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.३३** **दि.१४.०६.२०१६ रोजी झालेल्या मा.त्रीदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३४६ लोखंडी कपाटे खरेदी करणेकामी झालेला निर्णय रद्द होऊन याबाबत नव्याने निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** सभाकामकाज विभाग जा.नं.एसएसएस/ वशी-०४/१७१५/२०१६ दि.०२/०८/२०१६ चे परिपत्रकामध्ये विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे दि२८/०७/२०१६ रोजीचे अधिसुचनेनूसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ नूसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे गठन करण्यात आलेले आहे. त्यानूसार समितीने कामकाज सुरु केले असून दि.३१/०७/२०१६ रोजी नवनियुक्त समितीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार स्विकारलेला आहे. यासाठी,

१) यापुढे सभेत विषय सादर करतांना त्यामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाचा उल्लेख करण्यात येऊ नये.

२) यापूर्वी ज्या ज्या विषयांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाची मंजूरी घेण्यासाठी सिव्हील अर्ज दाखल करणेबाबतचा निर्णय झालेला आहेत. परंतू आजतागायत सिव्हील अर्ज दाखल झालेले नाहीत, असे प्रस्ताव व,

३) मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल असलेले सिव्हील अर्ज माघे घेणेबाबतचे प्रस्ताव पूर्वीचा निर्णय रद्द करणेसाठी व नवीन निर्णय होणेसाठी तात्काळ व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावे असे परिपत्रक पारित झालेले आहे.

त्या अनुषंगाने लोखंडी कपाट ४ फुट ५ इंच उंचीचे (उंची ५४”) १,५३६ नग खरेदीकामी रु.१,०७,५२,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी सात लाख बावन्न हजार मात्र) येणा-या खर्चास दि.१४/०६/२०१६ रोजी झालेल्या मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.३४६,

“त्यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील खोल्यांमध्ये ठेवणेकरीता प्रस्तावात नमूद केलेल्या वर्णनाची १,५३६ नग लोखंडी कपाटे खरेदी करणेसाठी त्या क्षेत्रातील तज्ञांच्या सल्ल्याने नमुनादाखल कपाट तयार करण्यात यावे व त्या नमुन्याप्रमाणे कपाटे बनविणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्यात. त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,०७,५२,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.

तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. ” हा निर्णय रद्द होऊन, खालीलप्रमाणे नव्याने प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील:-** २१ (१) (ग) “भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.” व (२) पोट-कलम (१) (ख) “भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे. ”

**प्रस्ताव:-** या अधिनियमातील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व त्यातील सुविधा करण्यात येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवास साईभक्तांच्या निवास व्यवस्थेसाठी दि.११/०४/२०१३ पासून सुरु करण्यात आलेले असून या ठिकाणी १२ इमारतीमधून १५३६ खोल्या आहेत.

बरेच साईभक्त परप्रांतातून श्रींच्या दर्शनासाठी येतात तेव्हा त्यांच्या सोबत मोठया प्रमाणात पैसे, मौल्यवान वस्तू, मोठया किंमतीचे मोबाईल, एटीएम कार्ड, आयकार्ड इ. साहीत्य असते त्यांच्या साहीत्याची खोलीमधून चोरी होऊ नये अगर त्यांच्या कडून गहाळ होऊ नये तसेच मंदिरात जातांना खोलीत जर लॉकर असलेले कपाट असल्यास त्यांना त्यांच्या कडील पैसे व मौल्यवान वस्तू कपाटात सुरक्षित ठेवून जाता येईल. यासाठी,

या विभागातील १,५३६ खोल्यांसाठी २ ते ३ बॅग सामावतील अशा आकाराची सुरक्षिततेसाठी लॉकची सोय असलेली ४.५ फुटाचे १५३६ कपाटे खरेदी करावे लागणार आहे.

याकरीता, नामांक्ति कंपनीचे कपाटे खरेदी करावयाचे असल्यास एका कपाटाची अंदाजे प्रति नग किंमत रु.१३,५००/- असून १५३६ कपाटासाठी २ कोटी ७ लाख ३६ हजार एवढा अपेक्षित खर्च होईल,

परंतू कपाट खरेदीची संख्या जास्त असल्याने नामांक्ति कंपनीचे कपाट घेण्याऐवजी चांगल्या दर्जाचे लोकल ब्रॅन्डचे कपाट बाजार पेठेत उपलब्ध असून खालील तक्त्यात दर्शविलेल्या वर्णनानूसार खरेदी केल्यास त्याचा खर्च कमी होईल.

| तपशील | साईज/वर्णन | नग | अंदाजे प्रति नग सर्व करासह दर रु. | एकूण अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|
| लोखंडी कपाट चांगला दर्जा असलेले कोणत्याही लोकल ब्रॅन्डचे | पत्रा १८ गेज<br>कपाटाची रुंदी ३६” (३ फुट)<br>खोली २०” (१ फुट ८ इंच)<br>उंची ५४” (४ फुट ५ इंच)<br>कलरः- स्प्रे प्रिंटेड TA GRAY | १५३६ | ७,०००/- | १,०७,५२,०००/- |

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** यासाठी, १)दि.१४/०६/२०१६ रोजी झालेल्या मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.३४६ लोखंडी कपाटे खरेदी करणेकामी झालेला निर्णय रद्द होऊन खालीलप्रमाणे नव्याने निर्णय होणेस,

२) लोकल ब्रॅन्डचे उपरोक्त वर्णनानूसार १५३६ नग लोखंडी कपाटे खरेदी करणेस व त्याकामी रु.१,०७,५२,०००/-(अक्षरी रुपये एक कोटी सात लाख बावन्न हजार मात्र) चे खर्चास,

३) ई-निविदा मागवितांना प्रत्येक ई-निविदाधारकाकडून संस्थानने दिलेल्या साइज व वर्णनानुसार कपाटाचा नमुना मागविण्यास व जो निविदाधारक L-1 ठरेल अशा निविदाधारकाचा नमुना त्या क्षेत्रातील तज्ञाकडून तपासून घेणेस,

४) मा.व्यवस्थापन मंडळ समितीचे मान्यतेनंतर खरेदी विभागामार्फत दैनिक वर्तमान पत्रामध्ये ई-निविदा सूचना जाहिरात देऊन ई-निविदा मागणी करणेस.

उपरोक्त १ ते ४ चे प्रस्तावास मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.७२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासकडील खोल्यांकरीता लोखंडी कपाटे खरेदी करणेकामी यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत आला. त्याठिकाणच्या खोल्यांची प्रत्यक्ष पहाणी करुन निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.३४ मे.पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श, मुंबई यांचे पेस्ट कंट्रोल/ रोडंट कंट्रोल तथा फॉगिंग ट्रिटमेंट कामाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद –** १) १४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

२) २१- ग – भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय-** मा. त्रिसदस्यिय व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेमधील विषयनं. ५८ व निर्णय क्र.५८७.

**प्रस्तावना–** साईबाबा संस्थान अधिनस्त साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान व साईप्रसाद निवासस्थान या विभागाकडील खोल्यांमध्ये पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल व फॉगिंग ट्रिटमेंन्ट करणेचे कामासाठी दि.२३/०२/२०१२ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागवून तथा चर्चा वाटाघाटी करुन तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन मे.पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श, मुंबई यांचा पेस्ट/रोडंन्ट कंट्रोलचा दर रु.२.२० पैसे प्रती चौ.फुट प्रमाणे तसेच रुपये १४००/- व रुपये १२००/- याप्रमाणे फॉगिंग ट्रिटमेंन्टचा दर दि.२५/०८/२०१२ रोजीचे सभेत मान्य करुन प्रस्तुत कामाचा कालावधी दि.१३/०७/२०१२ ते दि.१२/०७/२०१३ अखेर निश्चित करुन, निर्णयानुसार ०१ वर्षाचा कार्यादेश पारीत करण्यात आला होता.तत्कालीन परिस्थितीचा व आलेल्या निविदांचा विचार करुन चर्चा वाटाघाटी करुन मे.पेस्ट कंट्रोल एम वॉल्श, मुंबई यांना खालीलप्रमाणे पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल व फॉगिंग ट्रिटमेंन्टचे काम दिले होते.

**अ) पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल-**

| अ.नं | विभाग | इमारतीचे नाव | खोल्या व हॉल मिळून एकूण क्षेत्रफळ चौरस फुटामध्ये | इमारतीनिहाय वार्षीक रक्कम प्रती चौरस फुटाप्रमाणे रु. ०२ .२० पै. |
|---|---|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवासस्थान | साईबाबा भक्तनिवासस्थान | १,७३,२६८.०० | ३,८१,१८९.६० |
| २ | साईप्रसाद निवासस्थान | साईप्रसाद निवासस्थान | ९१,३८१.११ | २,०१,०३८.४४ |
| ३ | द्वारावती निवासस्थान | द्वारावती इमारत | २,०५,११७.०० | ०४,५१,२५७.४० |
| | | **एकूण** | **४,६९,७६६.११** | **१०,३३,४८५.४४** |

**ब) फॉगिंग ट्रिटमेंन्ट–**

| **अ.नं** | **विभाग** | **इमारतीचे नाव** | **फॉगिंग ट्रिटमेंन्ट (धुरीकरण) आठवडयातुन एकदा (महिन्यात ४ फवारणी ) एक वर्षासाठी** |
|---|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवासस्थान | साईबाबा भक्तनिवासस्थान व परीसर | रु. १४००/- प्रती फवारणी X ०४ फवारण्या प्रती महिना X १२ महिने = ६७,२००/- |
| २ | साईप्रसाद निवासस्थान | साईप्रसादनिवासस्थाने इमारत परीसर | रु. १२००/- प्रती फवारणी X ०४ फवारण्या प्रती महिना X १२ महिने =५७,६००/- |
| ३ | द्वारावती निवासस्थान | द्वारावती निवासस्थान व परीसर | रु. १२००/- प्रती फवारणी X ०४ फवारण्या प्रती महिना X १२ महिने = ५७,६००/- |
| **एकूण रुपये – ०१,८२,४००/-** | | | |

अ) पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल - रुपये १०,३३,४८५.४४

ब) फॉगिंग ट्रिटमेंन्ट - रुपये ०१,८२,४००.००

एकूण रु. १२,१५,८८५.४४

सदर कामाची मुदत दि.१२/०७/२०१३ रोजी संपल्याने व प्रस्तुतचे कंपनीचे दि.०४/०६/२०१३ चे विनंती पत्रानुसार दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेमध्ये दि.१३/०७/२०१३ ते दि.१२/०७/२०१८ अखेर ०५ वर्षासाठी आहे त्याच दरामध्ये व पुर्वीचे अटी/शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देण्यात आली. प्रस्तुतचे निर्णयामध्ये संस्थान नियमानुसार मे.एम वॉल्श,मुंबई या कंपनी बरोबरच्या करारनाम्याचे प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्यात यावे असे ठरल्याने सदरबाबत मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची C.A.NO.8691 OF 2014 IN P.I.L. NO. 18 OF 2011 अन्वये संस्थान तर्फे दाखल करण्यात आलेल्या याचीके मधील नमुद सर्व बाबींसाठी मंजुरी मागितली होती. सदरकामी मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठाने मान्यता दिली. संमत निर्णयामध्ये तथा मंजुर नं. C.A.NO.8691 OF 2014 IN P.I.L. NO. 18 OF 2011 मध्ये प्रस्तुतचे काम ०५ वर्षासाठी देण्यात आलेले होते तथापी संस्थान नियमानुसार कराराचे प्रत्येक वर्षी नुतनीकरण करुन घेण्यात यावे असे नमुद असल्याने पुढील वर्षे क्र.०४ साठीची दि.१९/०५/२०१६ रोजीची टिपणी क्र.०३/२४ नुसार दि.१३/०७/२०१६ ते दि.१२/०७/२०१७ अखेर ०१ वर्ष कालावधीसाठीची प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केली होती.

**विभागाची मागणी–** सदर टिपणी वर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संबंधित फर्मचा दर वाजवी वाटत नाही संस्थानमध्ये इतर कंपनी साईआश्रम -०१ व ०२ साठी कार्यरत आहे, त्यांचे दर घेण्यात यावे व सविस्तर टिपणी मा.समिती समोर सादर करावी असे निर्देश असल्याने संबंधित ठिकाणच्या ठेकेदारांकडून त्यांचे मंजुर दर घेण्यात आले. तपशीलवार विवरण खालीलप्रमाणे, साईआश्रम ०१ व ०२ या भक्तनिवासी संकुलामधील हॉलमध्ये पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंन्ट व डास आदी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti larval) करावयाचे वार्षिक, त्रैवार्षिक कॉन्ट्रॅक्ट मे.जी टी पेस्ट कंट्रोल प्रा.लि पुणे व मे.स्टर्लीग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि. ठाणे यांना खालील नमुद दरात दिले आहे.

| अ.नं | करावयाच्या कामाचा तपशिल | मे.स्टर्लीग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि. ठाणे यांचा साईआश्रम ०२ साठीचा दर (वार्षिक कॉन्ट्रॅक्ट) दर रुपये/पैसे | मे.जी टी पेस्ट कंट्रोल प्रा.लि पुणे यांचा साईआश्रम०१ साठीचा दर (त्रैवार्षिक कॉन्ट्रॅक्ट ) दर रुपये/पैसे |
|---|---|---|---|
| १ | पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल (वर्षात ०६ फवारण्या) | **००.६३ पैसे (प्रती चौ.फुटास)** | रु.१.०१ पैसे (प्रती चौ.फुटास) |
| २ | फॉगिंग ट्रिटमेंन्ट (१५ दिवसांसाठी ०१ फवारणी) | **रु.१११.०० (प्रति फवारणी)** | रु.२,४९४.०० (प्रति फवारणी) |
| ३ | डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti larval) (१५ दिवसांसाठी ०१ फवारणी) | **रु.५१.०० प्रती फवारणी** | रु. ८९९ .०० प्रती फवारणी |

वरीलप्रमाणे मे.पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श,मुंबई व मे.स्टर्लीग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि. ठाणे यांचे दराचे तुलनात्मक अवलोकन केले असता,खालीलप्रमाणे बाब निदर्शनास येते.

**अ) पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल-**

| अ.नं | विभाग | इमारतीचे नाव | खोल्या व हॉल मिळून एकूण क्षेत्रफळ चौरस फुटामध्ये | मे.पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श मुबई यांचे इमारतीनिहाय वार्षीक रक्कम प्रती चौरस फुटाप्रमाणे रु. ०२.२० पै. | मे. स्टर्लीग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि. ठाणे यांचे इमारतीनिहाय वार्षीक रक्कम प्रती चौरस फुटाप्रमाणे रु. ००.६३ पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवासस्थान | साईबाबा भक्तनिवासस्थान | १,७३,२६८.०० | ३,८१,१८९.६० | १,०९,१५८.८४ |
| २ | साईप्रसाद निवासस्थान | साईप्रसाद निवासस्थान | ९१,३८१.११ | २,०१,०३८.४४ | ५७,५७०.०९ |
| ३ | द्वारावती निवासस्थान | द्वारावती इमारत | २,०५,११७.०० | ०४,५१,२५७.४० | १,२९,२२३.७१ |
| | | **एकूण** | **४,६९,७६६.११** | **१०,३३,४८५.४४** | **२,९५,९५२.६४** |

**ब) फॉगिंग ट्रिटमेंन्ट / Anti larval ट्रिटमेंन्ट**

| अ.नं | विभाग | इमारतीचे नाव | पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श मुबंई, फॉगिंग ट्रिटमेंन्ट (धुरीकरण) आठवडयातुन एकदा (महिन्यात ४ फवारणी ) एक वर्षासाठी | मे.स्टलिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस, प्रा.लि ठाणे फॉगिंग ट्रिटमेंन्ट दर | मे.स्टर्लीग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस, प्रा.लि ठाणे डास आळी प्रतिबंधक फवारणी Anti larval |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवास स्थान | साईबाबा भक्तनिवास स्थान व परीसर | रु. १४००/- प्रती फवारणी X ०४ फवारण्या प्रती महिना X १२ महिने= ६७,२००/- | रु.१११/- प्रती फवारणी X ०४ फवारण्या प्रती महिना X १२ महिने ५,३२८/- | रु.५१/- प्रती फवारणी X ०२ फवारण्या X ०५ महिने = ५१०/- |
| २ | साईप्रसाद निवासस्थान | साईप्रसाद निवासस्थाने इमारत परीसर | रु. १२००/- प्रती फवारणी X ०४ फवारण्या प्रती महिना X १२ महिने = ५७,६००/- | रु.१११/- प्रती फवारणी X ०४ फवारण्या प्रती महिना X १२ महिने= ५,३२८/- | रु.५१/- प्रती फवारणी X ०२ फवारण्या X ०५ महिने = ५१०/- |
| ३ | द्वारावती निवासस्थान | द्वारावती निवासस्थान व परीसर | रु. १२००/- प्रती फवारणी X ०४ फवारण्या प्रती महिना X १२महिने = ५७,६००/- | रु.१११/- प्रती फवारणी X ०४ फवारण्या प्रती महिना X १२ महिने ५,३२८/- | रु.५१/- प्रती फवारणी X ०२ फवारण्या X ०५ महिने = ५१०/- |

अ) पेस्ट/रोडंन्ट कंट्रोल - रुपये २,९५,९५२.६०

ब) फॉगिंग ट्रिटमेंन्ट - रुपये १५,९८४.००

Anti larval Treatment - रुपये १,५३०.००

**एकूण रु. ३,१३,४६६.६०**

**खर्चाचा तुलनात्मक तक्ता** दि.१३/०७/२०१६ ते दि.१२/०७/२०१७ अखेर १२ महिन्यासाठी

| अ.नं. | कंत्राटदाराचे नावाचा तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | मे.पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श मुबंई | १२,१५,८८५.४४ |
| २ | मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस, प्रा.लि ठाणे | ३,१३,४६६.६० |

वरील तुलनात्मक तक्ताचे अवलोकन केले असता,मागील व वर्तमानातील दरामध्ये मोठया प्रमाणावर तफावत असल्याचे निदर्शनास येते.

**छाननी करुन अनुमान -** महाराष्ट्र शासनाने संमत केलेला अधिनियम, मा.व्यवस्थापन समितीचा मंजुर ठराव व वर्तमान काळातील सदरकामी कमी झालेले दर याचा विचार करता सन २०१७/२०१८ (दि.०२/०१/२०१७ ते दि.०१/०१/२०१८ अखेर) याकामी अंदाजे खर्च रु.३,१३,४६६.६० (पुर्णाकींत करुन रु.४,००,०००/- मात्र) अपेक्षित आहे. सदर खर्चाची तरतुद सन २०१६/२०१७ चे अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय -** वरीलप्रमाणे वाचणा-या रक्कमेचा विचार केल्यास वर्तमान काळातील दर कमी आहेत दि.२५/०८/२०१२ रोजीचा विषय नं.४४ व निर्णय क्र.६९९ हा तत्कालीन परिस्थितीचा व आलेल्या निविदांचा विचार करुन मा.त्रिसदस्यिय व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये यावर सविस्तर चर्चा होऊन संमत करण्यात आलेला होता.

परंतु वर्तमान परिस्थितीत प्रस्तुत कामाचे दरामध्ये मोठी घसरण झालेली आहे, त्यामुळे पुर्वीच्या मंजुर दराने प्रस्तुतचे काम करुन घेतल्याने संस्थानला जादा आर्थिक भुर्दंन्ड (रु.९,०२,४१८.८४ इतका) पडत असल्याने त्याबाबत पुर्नविचार करुन नव्याने पेस्ट / रोडंट कंट्रोल व फॉगिंग तथा Anti larval Treatment करणेकामी निवीदा मागवून येणा-या अंदाजे खर्चास तथा मागील प्रस्तुतचे कामाचे मुदत दि.१२/०७/२०१६ अखेर संपल्याने साईभक्तांची होणारी गैरसोय विचारात घेऊन साईधर्मशाळेकडील सदरकामाचे न्युनतम दर करार ठेकेदार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस, प्रा.लि ठाणे यांचेकडून त्यांचे दि.१८/०४/२०१६ चे कार्यादेशातील मंजूर दराने आहे, त्याच अटी/शर्ती कायम ठेऊन त्यांचे दि.२८/०६/२०१६ चे विनंतीपत्रानुसार दि.०१/०९/२०१६ व दि.०१/११/२०१६ अशा दोन फवारण्या करुन घ्याव्या लागतील. याकामी साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवास व साईप्रसाद निवासस्थान या तीनही निवासस्थानांमध्ये उपरोक्त नमुदप्रमाणे ०२ किटनाशक औषध फवारणी करणेकामी येणा-या अंदाजे खर्च रु.१,१०,०००/- (अक्षरी रु.एक लाख दहा हजार) मात्रला मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे तरी

**१)** साईभक्तांचे सुविधेसाठी दि.०१/०९/२०१६ व दि.०१/११/२०१६ या कालावधीसाठी ०२ किटकनाशक औषध फवारणी साईधर्मशाळा ०२ कडील न्यूनतम दरधारक मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस, प्रा.लि ठाणे यांचेकडून दि१८/०४/२०१६ चे कार्यादेशातील मंजूर दर रु.०.६३ पैसे प्रती चौ.फुट या दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारी रक्कम रु.१,१०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख दहा हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस

**२)** सन २०१७/२०१८ (दि.०२/०१/२०१७ ते दि.०१/०१/२०१८ अखेर) सदरकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा प्रक्रीयद्वारे ई - निविदा मागविणेस

**३)** मे.पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श मुंबई यांना त्यांचे काम दि. १२/०७/२०१६ रोजी अखेर पासुन संपुष्टात आणलेबाबत कळविणेस

**४)** साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवास व साईप्रसाद निवासस्थान या भक्तनिवासी संकुलामधील दि.०२/०१/२०१७ ते ०१/०१/२०१८ अखेर सहा किटकनाशक औषध फवारण्या व फॉगिंग ट्रिटमेंन्ट तथा Anti larval Treatment करणेकामी येणा-या अंदाजे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी,

सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.३५** **मंदिर परिसरातील साफसफाईची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करणेबाबत.**

**प्रस्ताव-** आरोग्य विभागामार्फत साफसफाईचे काम ३ शिफ्ट मध्ये २४ तास चालू असते त्यामध्ये मंदिर व मंदिर परिसर, पिंपळवाडी रोड दर्शन रांग आतील बाजू, शांतीनिवास, भक्तीनिवास इमारत, साईप्रसाद निवासस्थान इमारत व परिसर, साईबाबा भक्त निवासस्थान इमारत व परिसर, वाहन विभाग परिसर, शैक्षणिक संकुले, साईउद्यान, मंगल कार्यालय इमारत व परिसर, कर्मचारी/अधिकारी निवासस्थाने परिसर या ठिकाणांची साफसफाई केली जाते. तसेच शिर्डी नगर पंचायत यांचे मागणीनुसार नगर पंचायत हद्दीतील पिंपळवाडी रोड(मनोजकुमार पथ) नगर-मनमाड रोड (लक्ष्मीनगर ते साईआश्रम पर्यंत) येथे कर्मचारी नेमून साफसफाई केली जाते.

दि. १६/०७/२०१६ रोजी मा.का.अ.सो. यांनी मंदिर परिसरात राऊंड घेतला त्यावेळी मंदिर परिसररतील साफ सफाईची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करणेबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन

**आऊटसोर्स पध्दतीने करावयाचे कामाबाबतचे तपशिलवार विवरण-**

| **बांधकामाचे क्षेत्रफळ (१३५४०.७१ चौ.मी.)** | **मोकळया जागेचे क्षेत्रफळ(१४६०९.९७ चौ.मी.)** |
|---|---|
| **समाविष्ट ठिकाणे**<br>समाधी मंदिर, नंदी समोरील हॉल्स (सभामंडप ते नंदीपर्यंत) भुयारी दर्शनरांग, दर्शन हॉल (भक्ती निवास इमारत तळमजला, १ ला मजला, शांती निवास इमारत तळमजला, १ला मजला, २ मजला) लेखाशाखा कार्यालय (भ. नि. ३ रा मजला) , मंदिर परिसरातील मिटींग हॉल, सर्व काऊंटर्स व कार्यालये (टॉयलेट बाथरुम सह) | **समाविष्ट ठिकाणे**<br>गुरुस्थान परिसर ( समाधिमंदिर पश्चिम गेट ते ध्यानमंदिर पर्यंत) समाधि मंदिर उत्तर रोड, कारंजा पिरसर,लेंडीबाग परिसर, दत्त मंदिर परिसर, मिटींग हॉल परिसर, मुंजाबा रोड, देणगी काऊंटर नं.२ परिसर शांती निवास रोड, शनि मंदिर रोड, जुनी मराठी शाळा रोड-१६ गुंठे मारुती मंदिर परिसर, चावडी परिसर,व्दारकामाई रोड ते गेट नं.४ पर्यंत, पिंपळवाडी रोड दर्शन रांग(गेट नं. १ ते २ पर्यंतची दर्शन रांग) गेट नं. १ ते ५ पर्यंतचा फुटपाथ. |

**अ) आरोग्य विभागाकरिता मंजूर आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे**

| अ.नं. | पदनाम | मंजूर पदसंख्या | | भरलेली पदसंख्या | | | रिक्त पदसंख्या | | एकुण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | कंत्राटी | स्थायी | कंत्राटी | आऊटसोर्स | स्थायी | कंत्राटी | |
| १ | ३ | ४ | | ५ | | | ६ | | ७ |
| ०१ | विभाग प्रमुख | १ | - | - | - | - | १ | - | १ |
| ०२ | उप विभाग प्रमुख | १ | - | - | - | - | १ | - | १ |
| ०३ | कनिष्ठ पर्यवेक्षक | ५ | २ | १ | - | - | ४ | २ | ६ |
| ०४ | लिपीक-टंकलेखक | ३ | - | २ | - | - | १ | - | १ |
| ०५ | मुकादम | १० | १० | - | ५ | - | १० | ५ | १५ |
| ०६ | सफाई कामगार | १७३ | २९० | १५२ | २१५ | - | २१ | ७५ | ९६ |
| | **एकूण** | **१९३** | **३०२** | **१५५** | **२२०** | **-** | **३८** | **८२** | **१२०** |

सध्या आरोग्य विभागाकडे १५५ कायम कर्मचारी व २१५ कंत्राटी अकुशल व ५ कुशल कर्मचारी कार्यरत आहेत. मंजूर आकृतीबंधातील ज्या इमारतीची साफसफाईची कामे आऊटसोर्समार्फत चालू आहेत. ती कर्मचारी संख्या २१७+४ मुकादम अशी एकुण २२१ इतकी आहे. मंदिर व त्याजवळील परिसर साफसफाईकामी प्रतिदिनी १०७ कायम कर्मचारी कार्यरत असून त्यांचे रजा/सुट्टया सोडवणेकामी १८ असे एकुण १२५ कायम कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांचे वेतनापोटी खालीलप्रमाणे खर्च येतो.

**कर्मचारी वेतनावरील खर्च**

| अ.नं. | मंदिर व त्याजवळील परिसर सफाईकामी नेमण्यात येणारी कर्मचारी संख्या | दरमहा वेतन (जून २०१६) | वेतनावरील वार्षिक खर्च १२+१ (सानुग्रह अनुदानासह ) |
|---|---|---|---|
| १. | १२५ | २३,७१,९३१/- | ३,०८,३५,१०३/- |
| | | एकुण रुपये | **३,०८,३५,१०३/-** |

**ब ) स्वच्छता साहित्य कामी झालेला खर्च (सन २०१५-२०१६)**

| अ. नं. | तपशिल | वार्षिक खर्च |
|---|---|---|
| १. | मंदिर व त्याजवळील परिसर सफाईकामी वापरण्यात येणा-या साहित्याकामीचा खर्च | **रु. ७०२०४१/-** |

**अ+ ब मिळून एकुण खर्च**

| अ. नं. | तपशिल | एकुण खर्च |
|---|---|---|
| १. | अ) कर्मचारी वेतनावरील खर्च | ३,०८,३५,१०३/- |
| २. | ब ) स्वच्छता साहित्य कामीचा खर्च | **७,०२,०४१/-** |
| | **एकुण वार्षिक खर्च** | **३,१५,३७,१४४/-** |

**एकुण वार्षिक खर्च रु. ३,१५,३७,१४४/- (अक्षरी रुपये तीन कोटी पंधरा लाख सदतिस हजार एकशे चव्वेचाळीस मात्र)**

मंदिर परिसर, दर्शन हॉल्स व पिंपळवाडी रोडची दर्शन रांग येथील साफसफाईची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे प्रस्तावित आहे. कामाचे पॉईंटनुसार प्रतिदिनी कायम कर्मचारी संख्या तपशिलवार विवरण खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कामाचे ठिकाण | ४ ते १२ | १२ ते ८ | ८ ते ४ | जनरल | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | **अ) मंदिर परिसर** | | | | | |
| १. | समाधी मंदिर (नंदी ते स्टेज पर्यंत समाधि मागील बाजु) | ४ | ४ | २ | - | १० |
| २. | गुरुस्थान परिसर (समाधी मंदिर पश्चिम गेट ते ध्यानमंदिर पर्यंत) | २ | २ | १ | - | ५ |
| ३. | मेन रोड समाधी मंदिर उत्तर रोड (गेट नं.३ ते दिक्षीतवाडा) | २ | २ | १ | - | ५ |
| ४. | नारळी गेट (गुरुस्थान उत्तर बाजू ते गेट नं. ४ पर्यंत) | १ | १ | - | - | २ |
| ५. | कारंजा परिसर (गेट नं.४ आतील बाजु ते समाध्या परिसर) | २ | २ | १ | - | ५ |
| ६. | लेंडीबाग (धबधबा ते नंदा दिप पर्यंत व गेट नं. ४ ते गुरुस्थान पर्यंत बाहेरील बाजू) | २ | २ | - | - | ४ |
| ७. | दत्त मंदिर परिसर (पारायण कक्ष ते नंदादिप) | १ | १ | - | - | २ |
| ८. | मिटींग हॉल व परिसर (गेटनं. १, ५ परिसर) | २ | २ | १ | - | ५ |
| ९. | गेट नं.१ ते ५ समोरील जाळी | १ | १ | - | - | २ |
| १०. | मुंजाबा परिसर (गेट नं.२ ते देणगी काऊटंर नं.२ पर्यंत) | २ | २ | १ | - | ५ |
| ११. | देणगी काऊटंर नं. २ व मार्बल परिसर | १ | १ | - | - | २ |
| १२. | शांती निवास रोड (बुक स्टॉल ते महादेव मंदिर पर्यंत) | १ | १ | १ | - | ३ |
| १३. | शनि मंदिर रोड (शनि गेट ते समाधि मंदिर दक्षिण व्दार पर्यंत) | १ | १ | - | - | २ |
| १४. | सरंजामे बाग (अभिषेक हॉल व स्टेजपर्यंत) | १ | १ | - | - | २ |
| १५. | जुनी मराठी शाळा रोड (१६ गुंठे) साई कॉम्लेक्स समोर | १ | १ | - | - | २ |
| १६. | मारुती मंदिर,चावडी व व्दा.रोड | ४ | ४ | २ | - | १० |
| १७. | कचरा वाहतुक (कचरा कुंडीतील कचरा गोळा करणे) | २ | २ | - | - | ४ |
| १८. | किटकनाशक औषध फवारणी | - | - | - | १ | १ |
| १९. | ॲसीड पावडर/ ड्रेनेज साफसफाई कामी | - | - | - | ३ | ३ |
| | | **३०** | **३०** | **१०** | **४** | **७४** |
| **ब** | **दर्शन रांग** | ४ ते १२ | १२ ते ८ | ८ ते ४ | जनरल | एकुण |
| | मागील पानावरील बेरीज | **३०** | **३०** | **१०** | **४** | **७४** |
| | १) शांती निवास तळमाळा (टॉयलेट ब्लॉकसह) | ४ | ४ | १ | - | ९ |
| | २) शांती निवास १ ला माळा (टॉयलेट ब्लॉकसह) | १ | १ | - | - | २ |
| | ३) शांतीनिवास इमारत प्रशासकीय कार्यालय (टॉयलेट ब्लॉकसह) | २ | २ | - | - | ४ |
| | ४) भक्त निवास दर्शन रांग तळमाळा (टॉयलेट ब्लॉकसह) | २ | २ | १ | - | ५ |
| | ५) भक्त निवासदर्शन रांग १ ला माळा (टॉयलेट ब्लॉकसह) | १ | १ | - | - | २ |
| | ६) पिंपळवाडी रोड दर्शन रांग( आतील बाजू) | ३ | ३ | - | - | ६ |
| | **एकुण -** | ४३ | ४३ | १२ | ४ | १०२ |
| **क** | **मुकादम** | | | | | |
| | मुकादम अ करीता (अ. नं.१ ते १९) | १ | १ | १ | - | ३ |
| | मुकादम ब करीता (अ. नं.१ ते ६ ) | १ | १ | - | - | २ |
| | **एकुण -** | **४५** | **४५** | **१३** | **४** | **१०७** |
| | **रजा/सुट्टया सोडवणे कामी प्रमाण ६.१** | | | | | **१८** |
| | **एकुण -** | | | | | **१२५** |

उपरोक्त प्रमाणे कामे आऊट सोर्सिंगने दिल्यास कर्मचा-यांचे वेतनावर खालील प्रमाणे खर्च येईल.

**अ) कर्मचारी वेतन खर्च (सर्व करांसहित)**

| अ.नं. | एकूण कुशल/अकुशल कर्मचारी | किमान वेतन दर प्रति दिन | प्रति दिन वेतन खर्च | वार्षिक वेतन खर्च (३६५ दिवसांकरिता) |
|---|---|---|---|---|
| १. | ५ कुशल कर्मचारी | ४०८.८१ | २०४४.०५ | ७,४६,०७८.२५ |
| २. | १०२ अकुशल कर्मचारी | ३६८.७० | ३७६०७.४० | १,३७,२६,७०१.०० |
| | | एकुण | | **१,४४,७२,७७९.२५** |

**ब) कंत्राटदाराने स्वच्छतेकामी करावयाचा अंदाजे आवश्यक वार्षिक स्वच्छता साहित्य खर्च-**
रु. ७,७२,२००/- कंत्राटदाराने स्वच्छतेकामी आवश्यक यंत्रसामुग्री खर्च तपशिलवार विवरण खालीलप्रमाणे
**क) स्वच्छतेकरिता आवश्यक मशिनरी खर्च**
**ड) स्वच्छतेकरिता आवश्यक मशिनरी साहित्य खर्च**

| अ.नं. | तपशील | कंपनीचे नाव | मशीन किंमत/ प्रति नग |
|---|---|---|---|
| १ | ऑटो स्क्रबर ड्रायर | ४५५ Taski | ३,००,०००=०० |
| २ | स्मॉल ऑटो स्क्रबर | ३५० Taski | १,७५,०००=०० |
| ३ | हाय प्रेशर जेट | LMX | २,००,०००=०० |
| ४ | वेट ॲण्ड ड्राय स्कबर | Taski | ६५,०००=०० |
| ५ | सिंगल डिस्क स्क्रब | Taski | १,५०,०००=०० |
| ६ | ड्राय व्हॅक्युम क्लिनर | Indian made | ४०,०००=०० |
| | | **एकुण-** | **९,४६,०००=००** |
| १ | ग्लास क्लिनिंग किट | ०१ | ९००=०० |
| २ | टेलीस्कोपीक पोल | ०१ | ५,८००=०० |
| ३ | सेफ्टी लॅडर (३५ फुटी) | ०१ | २५,०००=०० |
| ४ | गारबेज ट्रॉली | ०१ | ६,०००=०० |
| ५ | स्कॅब बिन्स (मोठे) | ०१ | ८४०=०० |
| ६ | स्कॅब बिन्स (लहान) | ०१ | ६००=०० |
| | | **एकुण-** | **४३०५४=००** |

**अ, ब, मिळून एकुण येणारा खर्च –**

| अ. नं. | तपशिल | एकुण खर्च |
|---|---|---|
| १. | अ) वेतनावरील खर्च | १,४४,७२,७७९.२५ |
| २. | ब) स्वच्छता साहित्यावर येणारा अंदाजे वार्षिक खर्च | ७,७२,२००.०० |
| | **एकुण खर्च** | **१,५२,४४,९७९.२५** |
| | **एकुण पुर्णांकित खर्च** | **१,५२,४४,९७९.००** |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–** मंदिर परिसर, दर्शन हॉल्स व पिंपळवाडी रोडची दर्शन रांग येथील साफ सफाईची कामे करण्यासाठी सध्या येत असलेला खर्च व आऊटसोर्सिंग पध्दतीने केल्यास येणारा खर्च यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**वेतनावरील खर्चाचा तुलनात्मक तक्ता**

| अ.नं. | सध्याचा तपशिलवार खर्च वार्षिक | रुपये | आऊट सोर्सिंग नंतरचा तपशिलवार खर्च (वार्षिक) | रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | कायम कर्मचारी | ३,०८,३५,१०३/- | कुशल कर्मचारी | ७,४६,०७८.२५ |
| | --- | --- | अकुशल कर्मचारी | १,३७,२६,७०१.०० |
| | एकुण- | **३,०८,३५,१०३/-** | | **१,४४,७२,७७९.२५** |

**<u>वरील तक्त्याचे अवलोकन केले असता</u>**

| अ. नं. | तपशिल | खर्च रक्कम रपये |
|---|---|---|
| १. | संस्थान मार्फत साफसफाईची कामे केल्यास होणारा वेतनावरील खर्च | ३,०८,३५,१०३.०० |
| २. | आऊट सोर्सिंगने दिल्यानंतर होणारा वार्षिक खर्च | १,४४,७२,७७९.२५ |
| | **एकुण होणारी बचत** | **१,६३,६२,३२३.७५** |

तरी सध्या मंदिर परिसर साफसफाईकामी रुपये ३,०८,३५,१०३/- खर्च येतो. व सदर ठिकाणची साफसफाईची कामे आऊट सोर्सिंगला दिल्यास त्यासाठी रुपये १,४४,७२,७७९/- इतका खर्च येईल. तथापि सदर कामे आऊटसोर्सिंगने करावयाची झाल्यास या विभागाकडील सफाई कर्मचारी इतर विभागाकडे वर्ग करावे लागतील. तसेच सन २०१६-२०१७ चे सुधारित अंदाजपत्रकात बजेट तरतूद करता येईल.

**अ)** प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यालयीन कर्मचा-यांव्यतीरीक्त १२५ सफाई कर्मचारी आस्थापना/कामगार विभागामार्फत इतर विभागात वर्ग करण्यास

**ब)** मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन ई-टेंडर पध्दतीने निविदा मागवाव्या लागतील.

**क)** मंदिर परिसरातील साफसफाईची कामे आऊट सोर्स पध्दतीने करण्यास व त्यासाठी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी मा. व्य. समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील साफसफाईची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला. तसेच सध्या मनुष्यबळ व्यवस्थापनाचे काम चालू असून त्याबाबतचा अहवाल आल्यानंतर आवश्यकता भासल्यास फेर-प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.३६** **काकडी विमानतळावर विमानाने येणाऱ्या प्रवाशाची दर्शन व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात “समितीची कर्तव्य व अधिकारी” या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये “राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.” अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.०५.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ३११.

**प्रस्ताविक–** श्री.विश्वास पाटील, व्हाईस चेअरमन व मॅनेजींग डायरेक्टर, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि., मुंबई यांनी त्यांचे दिनांक २४.०८.२०१६ रोजीचे पत्रात, “शिर्डी विमानतळ दिनांक १ नोव्हेंबर २०१६ रोजी सुरु करावयाचे असल्याने मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हे विमातळाच्या कामाबाबतची माहिती घेणार आहे. यासाठी दिनांक २६.०८.२०१६ रोजी सह्याद्री गेस्ट हाऊस, मलबार हील, मुंबई येथे सकाळी ११.०० सभेचे आयोजन केलेले असून आपल्याशी निगडीत माहितीसह सभेस उपस्थित राहणेबाबत विनंती केलेली आहे.” तसेच सोबत सभेचा अजेंडा जोडलेला आहे. सदर अजेंडयावरील विषय नं. १४ मधील दर्शन व्यवस्थेचा विषय जनसंपर्क विभागाशी निगडीत असून विमानाने शिर्डीस येणा-या प्रवाशांपैकी साईबाबांचे दर्शनासाठी इच्छुक असणा-या प्रवाशांची श्री साईबाबा संस्थानमार्फत दर्शनाची काय व्यवस्था करता येईल असे विचारले आहे.

याबाबत मा.खा.हेमंत गोडसे यांनी त्यांचे दिनांक १४.०४.२०१६ रोजीचे पत्राने, एअर इंडियाच्या दि १ मे, २०१६ पासुन सुरु होत असलेल्या मुंबई-नाशिक (ओझर) विमानाने प्रवास करणा-या साईभक्तांना विमान प्रवासाच्या बोर्डीगपासवर संस्थानच्या नियमानुसार थोडया प्रमाणावर शुल्क आकारुन श्री साईबाबांचे व्ही.आय.पी दर्शन पास सुविधा सुरु करणेबाबत कळविले होते. याबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.०५.२०१६ चे सभेत सादर केला असता सदर विषयावर, “यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शन/आरतीचे व्ही.आय.पी.पासेस संस्थानने सर्व साईभक्तांकरीता संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेले असल्यामुळे एअर इंडीयाचे विमानाने येणा-या साईभक्तांसाठी बोर्डीगपासवर व्ही.आय.पी.दर्शनपास उपलब्ध करुन देणे उचित होणार नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.” असा निर्णय झालेला आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १२१ अन्वये दिनांक ०१.०३.२०१६ पासून दर्शन पासेससाठी प्रति व्यक्ती रुपये २००/-, काकड आरती पासेससाठी प्रति व्यक्ती रुपये ६००/- तसेच माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी प्रति व्यक्ती रुपये ४००/- याप्रमाणे दर्शन/आरती पासेसचे देणगीशुल्क आकारण्यात येत आहे.

**मागणी–** विमानाने शिर्डीस येणा-या प्रवाशांपैकी साईबाबांचे दर्शनासाठी इच्छुक असणा-या प्रवाशांची श्री साईबाबा संस्थानमार्फत दर्शनाची व्यवस्था करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** संस्थानचे www.sai.org.in या संकेतस्थळावर दर्शन आरतीपास सुविधा सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच संस्थानचे जनसंपर्क विभागाचे पासेस वितरण काऊंटरवरुन महत्वाच्या/अतिमहत्वाच्या, मान्यवर व्यक्ती, केंद्र व राज्य शासनाचे विविध अधिकारी, पदाधिकारी, श्री साईबाबा संस्थानचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.विश्वस्त यांचेकडून येणाऱ्या व्यक्ती, देणगीदार साईभक्त आदींना नियमाप्रमाणे सशुल्क दर्शन पास देण्याची व्यवस्था केली जात आहे. तथापि, मा.खा.हेमंत गोडसे यांनी त्यांचे दिनांक १४.०४.२०१६ रोजीचे पत्राने एअर इंडीयाच्या मुंबई-नाशिक (ओझर) विमानाने प्रवास करणा-या साईभक्तांसाठी व्ही.आय.पी.दर्शन पास सुविधा मिळणेबाबत विनंती केली होती. मात्र मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.०५.२०१६ सभेत सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यातआलेला आहे. तथापि, श्री.विश्वास पाटील, व्हाईस चेअरमन व मॅनेजींग डायरेक्टर, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि., मुंबई यांनी त्यांचे दिनांक

२४.०८.२०१६ रोजीचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे काकडी विमानतळावर विमानाने येणा-या प्रवाशांपैकी साईबाबांचे दर्शनासाठी इच्छुक असणा-या प्रवाशांची दर्शनाची व्यवस्था श्री साईबाबा संस्थानमार्फत काकडी विमातळावर कंपनीकडून मिळालेल्या जागेत दर्शन पासेसचे काऊंटर सुरु करुन देता येईल. सदरचा विषय धोरणात्मक असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, आजचे सभेत सर्वसामान्य साईभक्तांसाठी सशुल्क व्ही.आय.पी. दर्शन पास विनाशिफारस सुरु करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे विमान प्रवासाने श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांनाही सदरहू सशुल्क दर्शन पास सुविधेचा लाभ घेता येईल. सबब उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली व विमान प्रवासाने दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना दिल्या जाणाऱ्या सशुल्क दर्शनपासची रक्कम त्यांच्या विमान तिकिटाच्या रकमेमध्येच समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि., मुंबई यांचेबरोबर चर्चा करणेत यावी.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.३७** **साईनिवास अतिथीगृह इमारतीमध्ये व्हीआयपी सुटस्मधील बाथरुमचे एक्झॉस्ट फॅन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ – रु.५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत. आहे. साईनिवास अतिथीगृह या इमारतीमध्ये २४ वातानुकुलीत सुटस् तसेच एक मिटींग हॉल आहे. या सर्व सुटस् मध्ये तसेच मिटींग हॉल मध्ये Attached संडास-बाथरुम आहेत. या इमारतीमधील सुटस् मध्ये व्हीआयपींची निवासव्यवस्था केली जाते. साईनिवास अतिथीगृहाचे सुटसमधील Attached संडास-बाथरुम मध्ये एअर व्हेंटीलेशन करीता खिडक्यांना काचेचे व्हेंटीलेटर्स बसविण्यात आलेले आहेत. व्हेंटीलेटर्सच्या काचा बंद केल्यानंतर संडास-बाथरुममधील गरम पाण्याची वाफ बाहेर फेकली जात नाही. याकरीता सदर ठिकाणी हवा खेळती रहावी म्हणून साईप्रसाद निवासस्थान विभागाने संडास-बाथरुममध्ये एक्झॉस्ट फॅन बसवून मिळणेबाबत कळविले आहे. सदर संडास-बाथरुम मधील खिडक्या कमी उंचीवर असल्यामुळे सदरील खिडक्यांमध्ये एक्झॉस्ट फॅन बसविल्यास बाथरुमचा वापर करणा-या व्यक्तीच्या डोक्याला फॅन लागण्याची शक्यता असल्याने या खिडक्यांमध्ये फॅन बसविणे योग्य होणार नाही. याकरीता एक्झॉस्ट फॅन बसविणे करीता खिडक्यांचे वरील बाजूस अथवा खिडक्यांचे शेजारी साधारण ६` उंचीवर बांधकाम विभागामार्फत १` X १` या साईजचे छिद्र पाडून त्यानंतर त्याठिकाणी एक्झॉस्ट फॅन बसवावे लागतील. सदरील कामी लागणारे एक्झॉस्ट फॅन संस्थानचे मुख्य भांडार व विद्युत विभागाचे सबस्टोअरमध्ये शिल्लक नसल्याने ते खरेदी करुन बसवावे लागणार आहे. खरेदी कराव्या लागणा-या एक्झॉस्ट फॅन व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| Sr. no. | Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Crompton Greaves Make, Exhaust Fan, Sweep=22.5cm, RPM=1400, 1 Phase, 45 Watt Insulation Class = E (Double Ball Bearing) | 30 Nos. | Rs.1,400/- | Rs. 42,000/- |
| | | | **Total :-** | **Rs. 42,000/-** |

उपरोक्तप्रमाणे साईनिवास अतिथीगृह इमारतीमध्ये व्हीआयपी सूटस् मधील बाथरुममध्ये एक्झॉस्ट फॅन खरेदी करुन बसविणेकामी शासन निर्णयानुसार संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध करणेस व कोटेशनधारकांना पोस्टाव्दारे कोटेशन पत्र पाठवून कोटेशन मागविणेस व येणा-या अंदाजे रक्कम रु.४२,०००/- इतक्या खर्चास व कामास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहाकडील व्हीआयपी सुटस् मधील बाथरुमचे एक्झॉस्ट फॅन बसविणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८** **आयएसओचे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींग करणेबाबत फेरसादर.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र. ४.१– खरेदी किंमत रु.३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत. आयएसओचे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींग करणेबाबत मा.त्रीसदस्य समितीसमोर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव व त्यावर झालेला निर्णय पुढीलप्रमाणे.

दि.२९-११-२०१४ रोजीचे ISO 9000:2008 मानांकन संदर्भात मा.ऑडिटर यांनी काही सुचना केल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे. साईआश्रम भक्तनिवास विभागातील ए.सी.रुम मधील ए.सी.यंत्रणेचे बटन रुममध्ये असून प्रत्येक रुमला कि-टॅगची सुविधा आहे. तथापी काही भक्त कि-टॅगचे बटणाला काडी वगैरेचा अटकावा करुन किंवा कि-टॅग मधील चावी काढून बटनामध्ये कि-टॅग टाकून रुममधील लाईट व ए.सी.चालू ठेवतात. पर्यायाने रुम बंद असताना विनाकारण ए.सी.चालू असल्याने इलेक्ट्रीसिटी खर्च होते. तरी याकामी खोली बंद असताना बाहेरुन आतील उपकरणे बंद करण्यासाठी रुमच्या बाहेरील बाजूस कन्ट्रोल स्विच असावा याकामी योग्य ती कार्यवाही विद्युत विभागामार्फत करावी असे साईआश्रम भक्तनिवास विभागाने कळविले आहे.

साईआश्रम भक्तनिवास येथे निवासस्थानासाठी एकुण १५३६ रुम असून त्यापैकी A, B, C या बिल्डींगमधील सर्व रुम (एकुण रुम ३८४) ए.सी.केलेल्या आहेत. भविष्यात आणखी जादा रुम ए.सी.बनविण्याचा साईआश्रम भक्तनिवास यांचा प्रस्ताव आहे. त्यामुळे ए.सी.रुमची संख्या वाढणार आहे. यासाठी सध्याच्या ए.सी.रुम व वाढीव ए.सी.रुम यांची मागणी विचारात घेऊन तसेच राहिलेल्या साध्या रुम यांनाही दरवाज्यावर बाहेरुन सप्लाय बंद करण्यासाठी मास्टर स्विच बसविणे योग्य होईल. मास्टर स्विच बसविणे काम एकाच वेळेस केल्यास राहिलेल्या रुमचे बाबत वारंवार तक्रार येणार नाही.

रुममधील साईभक्त रुममधील कि-टॅगला अटकावा करुन रुममधील ए.सी.व लाईट चालू ठेऊन बाहेर जातात. अशा वेळेस रुमच्या बाहेरुन सप्लाय बंद करण्यासाठी रुमच्या दरवाजावर मास्टर स्विच बसवावा लागणार आहे. त्यासाठी रुमच्या दरवाज्याच्या बाजूला भिंतीवर झरी घेऊन त्यामध्ये वायरींग पाईप फिट करणे, सप्लाय कंट्रोलसाठी आयसोलेटर डि.बी.सह कन्सील्ड करणे, वायरींग करणे इत्यादि कामे झाल्यावर भिंतीवर मारलेली झरी ही घेतलेल्या ठिकाणी बांधकाम विभागामार्फत बंद करणे इत्यादि कामे एकाच वेळेस होणार आहे.

विद्युत विभागाचे वायरींग काम झाल्यावर झरी मारल्याचे ठिकाणी बांधकाम विभागामार्फत फिनिशींग करुन कलर काम करावे लागणार आहे. साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींग काम करणेसाठी मटेरीअल खरेदी करणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate in Rs. | Total in Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-2-8 | Supplying and erecting rigid PVC conduit 25mm. dia with PVC accessories on wall / ceiling / concealed in wall as per specification No: WG-MA/CON, para no.1.1.1 | 3000 Mtr. | 79.80 | 2,39,400.00 |
| 02) | 1-2-12 | Supplying and erecting rigid PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. with accessories on wall/ceiling as per specification No: WG-MA/CON, para no.1.1.2 | 1500 Mtr. | 45.15 | 0,67,725.00 |
| 03) | 1-3-4 | Supplying and erecting mains with 2x1.5 F.R.L.S. copper PVC insulated wire laid in provided conduit/ trunking/ inside pole/ Bus bars or any other places as per specification No.WG-MA/ BW | 2000 Mtr. | 38.85 | 0,77,700.00 |
| 04) | 1-3-14 | Supplying & erecting mains with 3x2.5 sq.mm F.R.L.S. copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 9000 Mtr | Rs. 81.90 | 7,37,100.00 |
| 05) | 1-8-25 | Supplying and erecting modular type blanking plate one module ISI mark approved make duly erected on provided plate & box | 1536 Nos. | 24.15 | 0,37,094.40 |
| 06) | 1-8-26 | Supplying and erecting modular type blanking plate two module ISI mark approved make duly erected on provided plate & box. | 3072 Nos. | 33.60 | 1,03,219.20 |
| 07) | 1-8-48 | Supplying and erecting PVC surface modular double mounting plate 1 module complete duly erected in an approved manner. | 1536 Nos. | 55.65 | 0,85,478.40 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 08) | 5-3-20 | Supplying erecting and marking Double pole isolators only switch version of miniature circuit breaker (Confirming to IS:8828 of 1996) of 40A with required wiring connections and lugs etc. in provided distribution board. | 1536 Nos. | 332.85 | 5,11,257.60 |
| 09) | 5-4-17 | Supplying and erecting concealed type single pole and neutral distribution board (SPNDB) with door surface/flush mounted with 2 ways for incoming and 4 ways for outgoing SP MCB's on iron frame / wooden board / concealed in wall as per specification No. SWSWR/ MCBDB | 1536 Nos. | 1111.95 | 17,07,955.20 |
| | | | | **Total Rs.:-** | **35,66,929.80** |
| | | | | **Round Up Total Rs.:-** | **35,66,930.00** |

उपरोक्तप्रमाणे आयएसओचे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींगचे काम करुन घेणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३५,६६,९३०/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेकरीता सदर प्रस्ताव मा.त्रीसदस्य समिती समोर मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला होता. त्यावर झालेला निर्णय पुढीलप्रमाणे.

मा.त्रीसदस्य समितीचे दि.१८-०२-२०१५ चे सभेतील निर्णय क्र.५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, आयएसओचे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींगचे काम करुन घेणेकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन, ई-निविदाची मागणी करणेस व याकामी येणा-या रु.३५,६६,९३०/- मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली.

तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, सदरहू खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेत यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

मा.त्रीसदस्य समितीचे सभेतील झालेल्या निर्णयानुसार सदर प्रस्तावास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळवून देणेकामी सदर विषय जा.नं.एसएसएसटी/ विद्युत/ ३३३/ २०१५ दि.२८-०३-२०१५ अन्वये संस्थानचे विधी विभाग यांचेकडे सादर करण्यात आला होता. संस्थानचे विधी विभागामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी संस्थानचे वकीलामार्फत दि.२१-०४-२०१५/ ४७४४/ २०१५ अन्वये सिव्हिल ॲप्लीकेशन सादर करण्यात आले होते.

परंतू आता दि.२८-०६-२०१६ रोजी मा.व्यवस्थापन समितीची नियुक्ती महाराष्ट्र शासनामार्फत झालेली असल्याने आता मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेची आवश्यकता लागणार नसल्याने तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०८-२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०२ निर्णय क्र.५६६ अन्वये तत्कालीन त्रीसदस्य समितीमध्ये वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाचे परवानगी साठी दाखल केलेले ३३ सिव्हिल अर्ज मागे घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार संस्थानचे विधी विभागामार्फत सदर विषयाचे मा.हायकोर्टात दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन परत घेतले आहे. त्यामुळे आयएसओचे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींगचे काम करुन घेणेकामी दि.१८-०२-२०१५ चे सभेतील निर्णय क्र.५७ मधील मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेची परवानगीची अट रद्द होऊन सदर कामाकरीता येणा-या रक्कम रु.३५,६६,९३०/- इतक्या खर्चास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेस तसेच दिलेल्या मुदतीत जर तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्या तर त्यानंतर सात-सात दिवसाच्या मुदतीने सलग दोनदा निविदा मागविणेकरीता मुदतवाढ मिळणेकामीचे फेर प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक खोलीमध्ये कि-टॅग बसविणेत आलेले असल्यामुळे या ठिकाणी मास्टर स्वीच बसविणेची आवश्यकता वाटत नाही, सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३९** **संस्थान परिसरात वृक्षारोपन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागामार्फत संस्थान परिसरात झाडे, फुलझाडे, लॉन लावुन परिसर सुशोभीत करण्यात आलेला आहे. प्रत्येक बागेला/ झाडांना पाणी देणे, बागेची साफ-सफाई करणे, झाडांना वेळो-वेळी खते व औषधांचा डोस देणे, झाडांची कटींग करणे, झाडांच्या आळे चाळणी करणे, संगोपन करणे इ. कामे विभागामार्फत करण्यात येतात.

साई सेवा फाऊंडेशन, शिर्डी यांचे आवक नं.10070 दि.02/09/2016 रोजीच्या पत्रान्वये, संस्थान परिसरातील उपलब्ध जागेत आवश्यकतेनुसार 12 ते 15 फुट उंचीची झाडे खड्डे खोदाई करुन लावुन देणार

असलेबाबात कळविलेले आहे. वृक्षारोपनासाठी येणारा सर्व खर्च हा ते स्वत: करणार असुन संस्थानमार्फत जागा उपलब्ध करुन देण्यात यावी असे सुचविलेले आहे.

| अ.नं | ठिकाण | एकुण झाडे संख्या |
|---|---|---|
| 01 | कर्मचारी हौसिंग निमगाव कोऱ्हाळे | 60 |
| 02 | साई आश्रम नं.2 | 167 |
| 03 | प्रसादलय पार्कीग | 25 |
| 04 | साईनगर | 57 |
| 05 | साईनाथ हॉस्पीटल | 24 |
| 06 | मध्यवर्ती भांडार | 25 |
| 07 | साई आश्रम नं.1 | 60 |
| 08 | नविन शेतजमिनी | 1000 |

तरी साई सेवा फाऊंडेशन यांच्या आलेल्या पत्राचा विचार करता त्यांचेकडुन संस्थानच्या उपलब्ध जागेत साईआश्रम नं.1, साई आश्रम नं.2, नविन भक्तनिवास, साईनगर, हॉस्पीटल परिसर, प्रसादलय, पार्किंगच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार खड्डे खोदाई करुन शोभेची व सावलीची झाडे लावुन परिसर सुशोभीत करता येईल. वृक्षारोपन करणेकामी येणारा सर्व खर्च हा साई सेवा फाऊंडेशन मार्फत करण्यात येणार आहे. तरी संस्थानमार्फत सदर झाडांची देखभाल व संगोपन करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात लोकसहभागातून प्रतिकूल परिस्थितीमध्ये टिकाव धरणारी व कमी संगोपन करावे लागणाऱ्या वृक्षांचे रोपन करणेत यावे तसेच याकामी स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४०** **सन २०१६-१७ गावरान तूप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसादालय, लाडु निर्मिती, व मंदीर विभागासाठी सन २०१६-१७ करीता गायीचे गावरान तूप १०,२०० क्विंटल ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१६ चे सभेत निर्णय क्रं.२० अन्वये रक्कम रू.३५,७०,००,०००/- (रुपये पसतीस कोटी सत्तर लाख) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

सदरचा प्रस्ताव सिव्हिल ॲप्लिकेशन नं.३४९०/२०१६ अन्वये मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी सादर केला असता त्यावर दि.३१.०३.२०१६ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले होते.

1 Heard.

2 The Civil Application is allowed in terms of prayer **clause 'B'** of the application.

(गावरान तुपासाठी Civil Application No.3490/2016 मधील **Clause 'B' खालीलप्रमाणे-**

**B.** The applicant may please be permitted to purchase Cow Ghee for the financial year 2016-2017 through E-tender process by spending the amount of Rs. 35,70,00,000/-.)

वरील मा.उच्च न्यायालयाचे निर्देशास अनुसरून, सन २०१६-१७ सालासाठी गाईचे गावरान तूप खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया दिनांक २१.०४.२०१६ ते दिनांक १२.०५.२०१६ या कालावधीत राबविण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेमध्ये एकूण ०६ निविदाधारकांनी गावरान तूपाचे नमुन्यांसह निविदा सादर केलेल्या होत्या, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे–

१. मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् प्रा.लि., फलटण
२. मे.एस.आर थोरात मिल्क प्रॉडक्टस् प्रा.लि., संगमनेर
३. मे इंदापुर डेअरी ॲण्ड.मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी
४. मे.व्हीएसपी कॉर्पोरेशन, उमरगांव, वलसाड (गुजरात)
५. मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर
६. मे.अजंताराज प्रोटीन्स लि., आग्रा

वरील निविदाधारकांच्या तांत्रिक निविदा दि.१८/५/२०१६ रोजी उघडण्यात आलेल्या होत्या. मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांची तांत्रिक निविदा केवळ तांत्रिकदृष्ट्या सर्व निविदा उघडणे अपरिहार्य असल्याचे संबंधित तांत्रिक कर्मचाऱ्यांनी सांगितल्यामुळे उघडण्यात आली होती. यामध्ये वरील अ.नं.१ ते ५ निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या होत्या. तर वरील अ.नं.६ मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांची निविदा ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीत तूपाचा मॉईश्चरयुक्त पुरवठा केल्यामुळे ई-निविदा अट क्रं.२ नुसार अपात्र ठरविण्यात आली होती.

सदर पात्र पाच निविदाधारकांचे तूपाचे नमुने कोडींग करुन मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंटस्, नाशिक यांचेकडे दि.२४/५/२०१६ रोजी लॅब तपासणीकामी पाठविले होते.

तसेच उपरोक्त निविदाधारकांचे ई-निविदांचे Commercial Bid दि.२७.०५.२०१६ रोजी मा.उपसमितीचे सभेत उघडण्यात आलेले होते. सदर Online तुलनात्मक तक्त्यांमधील गावरान तूपासाठी प्राप्त दरांचा तपशील खालीलप्रमाणे–

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | मागणी क्विंटल | दर प्रती क्विंटल | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण** | १०,२०० | **३५,४००.००** | **३६,१०,८०,०००.००** |
| २ | मे.एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., संगमनेर | | ३६,६६७.०० | ३७,४०,०३,४००.०० |
| ३ | मे.इंदापूर मिल्क् ॲन्ड डेअरी प्रॉडक्टस लि., गोखळी | | ३७,९८०.०० | ३८,७३,९६,०००.०० |
| ४ | मे.एस.पी.कॉर्पोरेशन, उमरगांव, वलसाड (गुजरात) | | ३७,९४९.०० | ३८,७०,७९,८००.०० |
| ५ | मे.कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर | | ४५,७००.०० | ४६,६१,४०,०००.०० |

वरील Online ई-निविदा मा.उपसमितीच्या दि.२७/५/२०१६ रोजीच्या सभेत तुलनात्मक तक्त्यामध्ये मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचे दर तुलनात्मकदृष्टया इतर निविदाधारकांचे दरांपेक्षा न्युनतम होते. त्यामुळे मा.उपसमितीने सदर सभेत मे.गोविंद मिल्क् ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि. यांचे प्रती किवंटल रु.३५,४००/- मात्र निम्नतम दर स्वीकारणेची शिफारस केली होती.

मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कंन्सलटंन्ट्स, नाशिक यांचेकडून वरील सर्वच ५ निविदाधारकांचे लॅब तपासणी अहवालही दि.२८/५/२०१६ रोजी प्राप्त झालेले होते. सदर सर्वच निविदाधारकांचे गावरान तूप अहवाल Food Safety and Standards Regulations 2011 चे पॅरामीटरनुसार खाण्यास योग्य असल्याचे त्यांनी कळविले होते.

मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी दि.२/६/२०१६ रोजी मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचे Vendor Audit करुन घेणेबाबत समक्ष निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन दि.४/६/२०१६ रोजी सदर व्हेंडॉर ऑडिटसाठी मुख्य लेखा अधिकारी, प्र.अधीक्षक, खरेदी विभाग, फुड लॅब टेक्निशियन्स, संस्थान प्रसादालय आचारी गेले होते. यामध्ये लेखाविषयक कागदपत्रांची तपासणी, कर्मचारी हायजिन, उपलब्ध मशिनरी, दूधाचे कलेक्शन, दूधाची लॅब व तपासणी व्यवस्था, तूपाची आचारी यांचेमार्फत तपासणी, तूपाची बी.आर.टेस्ट, बटर, तूप युनिटची तपासणी, तांत्रिक बाबींचे रेकॉर्ड वगैरे सर्व बाबी व्यवस्थित आढळून आलेल्या होत्या.

एकंदरीत मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् प्रा.लि., फलटण यांचे कामकाज समाधानकारक आढळून आले होते. मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांनी संस्थानच्या प्रतिनिधींनी मागीतलेली सर्व माहिती व रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यात आली होती. फुड लॅब टेक्निशियन्स यांचा व आचारी यांनी प्रत्यक्षात केलेली तूपाची वापराची तपासणी याबाबतचा अहवाल एकत्रित दिलेला होता. तसेच प्र.अधीक्षक, खरेदी व मुख्य लेखा अधिकारी यांनी त्यांचा अहवाल स्वतंत्र सादर केला होता. सदर दोन्हीही अहवाल सकारात्मक होते.

गाईचे गावरान तूपाचे १५ किलोचे डब्याचे बाजारातील दराबाबत दि.५/६/२०१६ रोजी इंटरनेटवर जे दर उपलब्ध झाले होते. त्याची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | फर्मचे नांव | ब्रॅन्ड नेम | १५ किलो डब्याचे दर | १ किलोचे दर |
|---|---|---|---|---|
| १. | श्री वेंकटेश्वरा डेअरी प्रॉडक्ट, हैदराबाद | कावेरी गोल्ड | ६,०००/- | ४००.०० |
| २. | अमूल डेअरी | अमूल | ६,५००/- | ४३३.३३ |
| ३. | सुरभी | सुरभी | ५,७००/- | ३८०.०० |
| ४. | पतंजली | पतंजली | ६,३००/- १५ लिटर. | ४६१.५४ |
| ५. | कृष्णा | कृष्णा | ५,४५०/- | ३६३.३३ |
| ६. | तामिळनाडू को.ऑप.मिल्क प्रो.फेड.लि. | आविन | ६,०७०/- | ४०४.६६ |

सदर दरांचे इंटरनेटवर उपलब्ध झालेले दरांबाबतचे माहिती तक्ते सोबत अवलोकनार्थ सादर केले होते.

मा.अध्यक्षमहोदय व मा.कार्यकारी अधिकारीमहोदय यांचेमध्ये दि.८/६/२०१६ रोजी दूध्वनीवरुन झालेल्या चर्चेमध्ये मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण हे तिरुपती देवस्थानला गाईचे गावरान तूप पूरवित असल्यामुळे त्यांचेकडूनही अभिप्राय घेणेबाबत व गोविंद मिल्कचे वेबसाईटवरुन त्यांची माहिती घेणेबाबत ठरले होते. मा.उच्च न्यायालयाचे उच्च प्रतीचे तूप खरेदी करण्याचे व उच्च प्रतीच्या तूपासाठी जास्त किंमत असली तरी त्याचाही विचार करावा असे दि.१३/३/२०१४ चे निर्देश होते. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दि.१३/३/२०१४ चे निर्देशात नमूद असलेले ६ ब्रॅन्डपैकी एक असलेले मागील पुरवठाधारक व सध्याचे प्रक्रियेत भाग घेतलेले निविदाधारक मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर यांचे गोकुळ

ब्रॅन्डचे तूपाचा नमुना व मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांचे गोविंद ब्रॅन्ड्चे तूपाचा नमुना मे.अश्वमेघ लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठवावा असे ठरले होते.

त्यास अनुसरुन तिरुपती तिरुमला देवस्थानलाही मे.गोविंद डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण यांचे गोविंद ब्रॅन्ड तूप पुरवठा Rate, Quantity, Supply & Overall Experience बाबत इकडील जा.नं.एसएसएसटी/ वशी-खरेदी/३५४/२०१६ दि.८/६/२०१६ अन्वये अभिप्राय मागविण्यात आला होता. तसेच वेबसाईटवरुन माहिती घेऊन तीही मा.अध्यक्षमहोदय यांना सादर करण्यात आली होती. तसेच मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांचे गोविंद ब्रॅण्ड्चे गावरान तूप व मे.कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर यांचे गोकुळ ब्रॅण्डचे गावरान तूप जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/११९२/२०१६ दि.११.०६.२०१६ अन्वये नमुने कोडींग करुन मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कंन्सलटंन्ट्स, नाशिक यांचेकडे लॅब तपासणीसाठी पाठवून, सदर नमुन्यांची Food Safety and Standards Regulations, 2011 नुसार योग्य त्या सर्व तपासण्या करुन वरील दोन नमुन्यांपैकी उत्तम प्रतीचा नमुना कोणता याबाबतचा स्पष्ट अहवाल अभिप्रायासह इकडील कार्यालयास सीलबंद पाकीटामध्ये सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचेकडून १०,२०० क्विंटल गावरान तूप प्रती क्विंटल रु.३५,४००/- या दराने वार्षिक खरेदी करणेसाठी एकूण रक्कम रुपये ३६,१०,८०,०००/- मात्र एवढा खर्च अपेक्षित होता. परंतु गावरान तूप खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २० अन्वये रुपये ३५,७०,००,०००/- एवढ्या खर्चास मान्यता मिळालेली होती व सदर खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.उच्च न्यायालयापुढे सादर केला होता. त्यामुळे मा.उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनीही तेवढयाच खर्चास दि३१.०३.२०१६ रोजीचे निर्देशान्वये मान्यता दिलेली होती. त्यामुळे वार्षिक पुरवठा आदेश देतांना १०,२०० क्विंटलऐवजी प्रत्यक्षात १०,०५० क्विंटल गाईचे गावरान तूप खरेदी करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले होते व याकामी एकूण रक्कम रु.३५,५७,७०,०००/- खर्च अपेक्षित होता.

वरील नमूद सर्व बाबी विचारात घेता, सन २०१६-१७ (जून-२०१६ ते मार्च-२०१७ अखेर) या वर्षाकरीता उपरोक्तप्रमाणे मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचेकडून १०,०५० क्विंटल गावरान तूप प्रती क्विंटल रु.३५,४००/- (रु.पस्तीस हजार चारशे) या दराने खरेदी करणेस मान्यता मिळणेकामीचा विषय मा.व्यवस्थापन समितीसमोर Circulatory Agenda करुन सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर दि.१०/६/२०१६ रोजी खालीलप्रमाणे निर्णय झाला होता.

निर्णय- "सदर प्रस्तावाचे अनुषंगाने मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण कंपनीसंदर्भात वेबसाईटवरुन माहिती काढली असता, असे दिसून आले की, सदरील कंपनी ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नामांकित आहे. संस्थानला अशीही माहिती मिळाली की, सदर गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण ही सध्या श्री तिरुमला तिरुपती देवस्थान, तिरुपती या संस्थानला गाईचे गावरान तूपाचा पुरवठा करीत आहे व त्यांची पुरवठा सेवा व्यवस्थित आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता व लाडू प्रसाद निर्मिती विभागाचे काम विना अडथळा सुरळीत चालण्यासाठी मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण कंपनीला १ महिन्यासाठी प्रायोगिक तत्वावर गावरान तूप खरेदीकामी पुरवठा आदेश देणे उचित होईल, असे समितीला वाटते. सबब संबंधित खरेदी विभागाने अंदाजे १ महिन्याकरीता आवश्यक असणारे सुमारे १००० किवंटल गाईचे गावरान तूपाचा पुरवठा आदेश प्रती किवंटल रु.३५,४००/- दराने मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस लिमिटेड, फलटण यांना दयावा असे समितीने एकमताने ठरविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली."

वरील निर्णयानुसार मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण यांना प्रायोगिक तत्वावर एक महिन्यासाठी १,००० क्विंटल (एक हजार क्विंटल) गाईचे गावरान तूप रु.३५,४००/- प्रती क्विंटल दराने खरेदीबाबत जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/११९०/२०१६ दिनांक ११.०६.२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

मा.उपसमितीने दिनांक २७.०५.२०१६ रोजीचे सभेमध्ये केलेली शिफारस दि.१४/६/२०१६ रोजीचे सभेत कायम होतांना खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

निर्णय क्रं.३२३ (८) यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ करीता संस्थानसाठी गायीचे गावरान तूप खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रोडक्टस प्रा.लि. यांचे प्रती किवंटल रु.३५,४००/- मात्र निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच उपरोक्त प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे मे.अजंता राज प्रोटीन्स लि, आग्रा यांचा पुढील ०३ वर्षासाठी काळया यादीत समावेश करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.

मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण यांनी संस्थानचे एक महिन्यासाठीचे पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानला १००० क्विंटल गाईचे गावरान तूपाचा पुरवठा दिनांक ०७.०७.२०१६ रोजी पूर्ण केलेला होता. सदर तूप वेळोवेळी बॅचनुसार मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कंन्सलटंन्ट्स, नाशिक यांचेकडे लॅब तपासणीसाठी पाठविले असता, सर्व बॅचचे लॅब तपासणी अहवाल Food Safety and Standards Regulations 2011 नुसार योग्य असल्याचे कळविले होते.

मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कंन्सलटंन्ट्स, नाशिक यांचेकडे लॅब तपासणीसाठी पाठविलेले गोविंद व गोकुळ ब्रॅण्डचे तूपाचे नमुन्यांची Food Safety and Standards Regulations, 2011 नुसार योग्य त्या सर्व तपासण्या करुन तपासणीचे रिपोर्टस Ref:AEC/NS/Letter/June/P-5 दि.२८/६/२०१६ चे पत्रासह, दि.२९.०६.२०१६ रोजी बंद पाकीटामध्ये प्राप्त झालेले होते. सदर अहवाल बंद पाकीट मा.कार्यकारी अधिकारीमहोदय यांचेसमक्ष दि.८/७/२०१६ रोजी उघडले होते. यामध्ये मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कंन्सलटंन्ट्स, नाशिक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले होते.

"We have Analysed 02 Nos of Ghee Samples Batch No.088 & 099 on 11/6/2016 from Sai Baba Sansthan Shirdi. Both the Analysed Ghee samples comply with Food Safety and Standards Regulaltions 2011 with respect to the tested parameters which includes Moisture, RM Value, Rancidity, other Physico-Chemical, Contaminants, Toxins and Residue analysis."

सदर दोन्हीही सॅम्पलचे ॲनालिसीस रिपोर्टबाबत श्री.चंद्रकांत हांडगे मॅनेजर, अश्वमेघ लॅब यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी सदर दोन्हीही तूपाचे रिपोर्टमध्ये फारसा फरक नसल्याचे सांगीतले होते.
लाडू विभागातील प्रत्यक्ष सदर तूप वापरणारे लाडू कंत्राटदार दि यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पादक संस्था मर्यादित, नाशिक यांनी दि.४/७/२०१६ चे पत्राने, त्यांचेकडील दोन आचा-यांनी गोविंद कंपनीचे तूपाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले होते.

मोतीचूर लाडू व बुंदीप्रसादकरीता सध्या वापरण्यात येत असलेले गोविंद तूप चांगल्या प्रतीचे असून कुठल्याही प्रकारचा कडवट वास येत नाही. तूप फेसळत नाही, धूर होत नाही. सदर गावरान तूपात बनविलेली बुंदी व लाडू कडवट लागत नाही. सदर तूप हे चांगल्या प्रतीचे आहे.

दि.११/७/२०१६ रोजी संस्थानकडे २८० क्विंटल तूप शिल्लक होते व हे तूप साधारण ८ दिवस पुरेल एवढेच शिल्लक असल्यामुळे याबाबत तातडीने निर्णय होणे गरजेचे होते.

वरील नमूद सर्व बाबी विचारात घेता, सन २०१६-१७ (जूलै-२०१६ ते मार्च-२०१७ अखेर) या कालावधीकरीता उपरोक्तप्रमाणे मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचेकडून ९,०५० क्विंटल गावरान तूप प्रती क्विंटल रु.३५,४००/- (रु.पस्तीस हजार चारशे) या दराने खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/७/२०१६ चे सभेत सादर केला होता.
गावरान तूपाची तातडीने आवश्यकता असल्यामुळे, गावरान तूपाबाबत सभेमध्ये झालेले निर्णयाबाबत दि.१५/७/२०१६ रोजी सभा कामकाज विभाग लिपीक व प्रशासकीय अधिकारी, खरेदी विभाग यांचेकडून माहिती घेतली असता, त्यांनी सदर विषय मंजूर झाला असल्याचे सांगितले होते. त्यास अनुसरुन खरेदी विभागाकडून दि.१५/७/२०१६ रोजी तातडीने मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् लि., फलटण यांना जुलै २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीकरीता ९,०५० किवंटल गावरान तूप रु.३५,४००/- प्रतीकिवंटल दराने एकूण रक्कम रु.३२,०३,७०,०००/- मात्रचे तूप खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत टिपणी सादर करण्यात आली होती. त्यासोबत मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस लि., फलटण यांना दयावयाचा पुरवठा आदेशही सादर केलेला होता. त्यास मान्यता मिळालेनंतर सदर पुरवठा आदेशही मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रायव्हेट लि., फलटण यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/१८६७/२०१६ दि.१६/७/२०१६ अन्वये देण्यात आलेला होता.

तिरुमला तिरुपती देवस्थानने दि.३/८/२०१६ चे पत्राने मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांनी जुलै २०१५ ते ३/८/२०१६ या जवळपास १ वर्षाचे कालावधीत २०,५७४.५५ किवंटल गाईचे गावरान तूप ॲगमार्क स्पेशल ग्रेड प्रतीचे समाधानकारकरित्या पुरविल्याचे कळविलेले होते.

संस्थानने दिलेले मार्च २०१७ पर्यंतचे पुरवठा आदेशातील अटी-शर्तीस अनुसरुन संस्थान व मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांच्यामध्ये दि.१७/८/२०१६ रोजी गावरान तूप पुरविणेबाबतचा करारनामाही करण्यात आलेला आहे. तसेच सदर कंपनीने शासन खरेदी नियमावलीनुसार एकूण पुरवठा आदेशाच्या ३ टक्के रक्कम रु.९६,११,१००/- संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणून जमा केलेली आहे.

तथापि दि.१४/७/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४३० खालीलप्रमाणे झालेला आहे.

निर्णय क्रं.४३०- यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे, मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचे गावरान तूपाचा तपासणी अहवाल तसेच प्रत्यक्ष तूप वापरणारे लाडू कंत्राटदार यांचेकडील आचा-यांचा अभिप्राय या बाबींचा विचार करता मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचेकडून तीन महिने कालावधीसाठी आवश्यक असणारे गावरान तूप प्रती किवंटल रु.३५,४००/- मात्र या दराने खरेदी करण्यात यावे, असे ठरले.

संस्थानने मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांना दिलेले ९०५० क्विंटल गावरान तूपापैकी २३०० क्विंटलचे पुरवठा चलने देण्यात आलेली आहेत. त्यापैकी त्यांनी आजअखेर सुमारे १९०० क्विंटल गावरान तूप पुरविलेले आहे.

सदर गावरान तूपाबाबत झालेले मागील मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांबाबत मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी समक्ष चर्चा केली असता, सन २०१६-१७ चे गाईचे गावरान तूप खरेदीबाबतचे

प्रकरणाची संपूर्ण वस्तुस्थिती नवीन मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन वरीलप्रमाणे गावरान तूप खरेदी सन २०१६-१७ ची वस्तुस्थिती वरीलप्रमाणे सविस्तर सादर केली आहे. वरील वस्तुस्थिती विचारात घेता खालील बाबींचा विचार होणेस विनंती आहे.

१. संस्थानने एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी तूप खरेदी करण्याकरीता ई-निविदा मागविली होती.

२. मे.गोविंद मिल्क अॅण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण या कंपनीचे तूप संस्थान प्रथमच घेत असल्यामुळे प्रायोगिक तत्वावर एक महिन्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आला होता. सदर एक महिना कालावधीत पुरविलेल्या तूपाबाबत वापर करणा-या आचा-यांनी दिलेले अभिप्राय चांगले आहेत तसेच पुरविलेल्या तूपाचे सर्व बॅचचे लॅब रिपोर्ट्स Food Safety and Standards Regulaltions 2011 नुसार योग्य आहेत.

३. सदर कंपनीचे Vendor Audit करण्यात आले होते. त्याबाबतचे सर्व अहवाल सकारात्मक होते.

४. तिरुपती देवस्थाननेही सदर कंपनीबाबत लेखी पत्राव्दारे कळविलेले अभिप्राय चांगले आहेत.

५. मा.उच्च न्यायालयाचे दि.१३/३/२०१४ चे निर्देशात नमूद केलेले सहा ब्रॅण्डपैकी एक गोकुळ ब्रॅण्ड व सध्याचे ई-निविदेतील गोविंद ब्रॅण्डचे तूपाचे दर्जामध्ये लॅब रिपोर्ट्समध्ये फारसा फरक नाही.

६. संस्थानने विहित पध्दतीने राबविलेल्या ई-निविदेमध्ये पात्र ठरलेल्या पाच निविदाधारकांमध्ये मे.गोविंद मिल्क अॅण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण यांचे दर सर्वांत न्युनतम आहेत.

७. जुन-२०१६ पासून आतापर्यंत मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस, फलटण यांनी तूपाचा पुरवठा संस्थानच्या गरजेप्रमाणे व समाधानकारकरित्या केलेला आहे.

८. टप्प्याटप्प्याने पुरवठा आदेश दिल्यास सुरक्षा अनामत रकमेवर मिळणारे व्याजाचे नुकसान होते.

संस्थानकडून मे.गोविंद मिल्क अॅण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/१८६७/२०१६ दिनांक १६.०७.२०१६ अन्वये, गाईचे गावरान तूप ९,०५० क्विंटल खरेदीकामी प्रतीकिवंटल रु.३५,४००/- दराने जुलै २०१६ ते मार्च २०१७ साठी पुरवठा आदेश दिलेले आहेत. तर निर्णय क्रं.४३० नुसार तीन महिन्यांची मुदत १५/१०/२०१६ रोजी संपत आहे व अजूनही ७०० क्विंटल तूप खरेदी करणे बाकी आहे.

तरी वरील वस्तुस्थिती विचारात घेता, ऑक्टोबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीकरीता संस्थानने विहित ई-निविदा पध्दतीनुसार मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांना दिलेले प्रती क्विंटल रु.३५,४००/- दरानुसार, वरील पुरवठा आदेशाप्रमाणेच गाईचे गावरान तूप खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, गावरान तूपाच्या खरेदीसाठी मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांचे मंजूर दर हे सध्याचे बाजारभावाच्या दरापेक्षा जास्त आहेत, याकरीता मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांना उर्वरित गावरान तूपाचा पुरवठा आदेश देणेपूर्वी दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा करणेत यावी तसेच याकामी व्यवस्थापन समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग )

---

**विषय नं.४१** **एक कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम-२००४ मधील तरतुद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (१)मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच कलम २१ (१) (ग) मध्ये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही भक्तांना धार्मीक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, असे नमुद आहे.

**प्रास्ताविक-** दि.०२.०४.२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. २४२ अन्वये, श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता उत्पादीत कंपनीने बॉडीबांधणी तसेच अंतर्गत सर्व कार्डीयाक उपकरणांसह एकA/C कार्डियाक रुग्णवाहीका देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारण्यात यावी. याकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार वाहन विभागाकडील दि.०७/०५/२०१६ रोजीचे पत्राने,श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पिटल मध्ये उपचार घेणा-या गरीब व गरजु रुग्णांना पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी एक सुसज्ज कार्डीयाक रुग्णवाहीकेची आवश्यकता आहे. ज्या कोणी साईभक्तांना देणगी स्वरुपात देण्याची इच्छा असेल अशा साईभक्तांनी संपर्क करावा,अशी जाहिरातमाहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात आली होती. परंतु आज पावेतो,कोणत्याही साईभक्तांमार्फत प्रतिसाद मिळालेला नाही.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-**श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी वापरात असलेली कायार्डीक रुग्णवाहीकेचा वापर करण्यात येत आहे. सदर रुग्णवाहीका दि.२३/०९/२०१० रोजी खरेदी करण्यात आलेली असुन आजपावेतो सदर

वाहनाचा एकुण १,७०,००० कि.मी. प्रवास झालेला आहे. कार्डीयाक रुग्णवाहीका पेशंट घेवुन बाहेरील दुस-या हॉस्पिटलमध्ये गेल्यास किंवा दुरुस्ती करावयाचे असल्यास तातडीच्या वेळी रुग्णांना बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी कार्डीयाक रुग्णवाहीका उपलब्ध होत नसल्याने रुग्णांची गैरसोय विचारात घेता आणखी एक कार्डीयाक रुग्णवाहीकेची आवश्यकता आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता उत्पादीत नामांकित कंपनीने बॉडीबांधणीसह अंतर्गत सर्व कार्डीयाक उपकरणांसह एक A/C कार्डियाक रुग्णवाहीका ई-निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करता येईल. या कामी अंदाजे रु.३५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.पस्तीस लाख) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. रुग्णवाहीका खरेदी करीता श्री साईबाबा हॉस्पिटलने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता रु.७०,००,०००/- मात्र अंदाजपत्रकीय तरतुद केलेली आहे.

तरी नवीन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी कामी नामांकित कंपनीकडून ईनिविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस मान्याता मिळणे कामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ तथा निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, नवीन कार्डीयाक रुग्णवाहीका देणगी स्वरुपात मिळणेसाठी देणगीदार साईभक्तांना आवाहन करणेत यावे. तसेच विशिष्ट कालावधीमध्ये देणगीदार साईभक्तांचा प्रतिसाद न मिळाल्यास नवीन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव खरेदी उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.४२** **संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. २०/०८/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये आवश्यक असणा-या वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल पदांवर वेतनबॅन्ड देऊन एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी नेमणूका करणेत आलेल्या होत्या त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ. नं. | नाव व हुद्दा | वेतनबॅन्ड | नेमणूक तारीख | हजर तारीख | एक वर्ष पुर्ण होत असलेची तारीख | तात्पुरते नेमणूकीचे कालावधीत घेतलेल्या रजा | परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| ०१. | डॉ. कविता शंतनु सरवार ज्यु. पॅथॉलॉजिस्ट | १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | २६/०८/२०१५ | ०१/०९/२०१५ | ३१/०८/२०१६ | अर्जित रजा २० + विनावेतन १ = २१ | २१/०९/२०१६ |
| ०२. | श्री. बाबासाहेब लहानु म्हस्के, परफ्युजनिस्ट | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | २६/०८/२०१५ | ०१/०९/२०१५ | ३१/०८/२०१६ | अर्जित रजा २४ | २४/०९/२०१६ |
| ०३ | श्री. संतोष अर्जुन सिरसट, एक्स-रे टेक्निशियन | ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | २६/०८/२०१५ | ०१/०९/२०१५ | ३१/०८/२०१६ | अर्जित रजा ११ | ११/०९/२०१६ |

उपरोक्त कर्मचा-यांचा परिविक्षाधिन कालावधी त्यांचे नावासमोर स्तंभ क्र. ८ मध्ये दर्शविलेल्या दिनांकास पूर्ण होत आहे. सदरहू कर्मचा-यांची सेवा पुढे चालु ठेवणेकामी संबंधीत विभागप्रमुख यांनी खालीलप्रमाणे शिफारसी केलेल्या आहेत.

१) डॉ.कविता शंतनु सरवार, ज्यु.पॅथॉलॉजिस्ट यांचेबाबत सिनीअर पॅथॉलॉजिस्ट यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"त्यांची वागणूक चांगली आहे, त्या हुकुमाप्रमाणे, योग्य रितीने काम करतात, त्यांचेबाबत काही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावित नाही. त्यांना संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही."

२) श्री. बाबासाहेब लहानु म्हस्के, परफ्युजनिस्ट यांचेबाबत डॉ. आशिष आग्रवाल, कार्डीयाक सर्जन यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"Shri Babasaheb Mhaske is a well mannered, polite and Humble obedient person. He follows all the instructions sincerely and does his work correctly and carefully and is obedient. He will be a asset to our institution we must follow the Sansthans rules and regulations and do the needful."

श्री.बाबासाहेब लहानु म्हस्के, परफ्युजनिस्ट यांचेबाबत डॉ.विजय नरोडे, सिनीअर इंटेसिव्हिस्ट (सीव्हीटीएस, सीआरयु विभागप्रमुख) यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"I will like to state that he is good and sincere vegaries his work. He is obedient and listen to orders of seniors surgeons and has got cordial relations with other collegues also. He is competent honest and good at his work. He is not facing any enquiry and is eligible to get permanent order as soon as probation period is over."

३) श्री संतोष अर्जुन सिरसट, एक्स रे टेक्निशियन यांचेबाबत सिनीअर रेडिओलॉजिस्ट यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"श्री.संतोष अर्जुन सिरसट हे आपल्या साईबाबा संस्थानच्या साईबाबा रुग्णालयातील क्ष-किरण विभागात गेल्या वर्षभरापासुन ते आजतागायत वरिष्ठ क्ष-किरण तंत्रज्ञ या पदवार कार्यरत आहे. नेमून दिलेले सर्व काम अचुक व योग्य पद्धतीने करतात. त्याचप्रमाणे संबंधीत व्यक्तीची वर्तणूक एकंदरीत समाधानकारक आहे व ते वरिष्ठांच्या आज्ञेचे काटेकोरपणे पालन करतात. सदर कर्मचा-याबाबत कोणत्याही स्वरुपाचे प्रकरण चालु अथवा प्रस्तावित नाही, तरी त्यांची शैक्षणिक अर्हता, कामाचे स्वरुप इ. गोष्टीचा विचार करुन संस्थान कर्मचारी नियमावलीनुसार आपल्या साईबाबा रुग्णालयातील क्ष-किरण विभागात वरिष्ठ क्ष-किरण तंत्रज्ञ या पदावर कायम करणेबाबत विचार व्हावा."

तरी उपरोक्त कर्मचा-यांना त्यांचे नावासमोर स्तंभ क्र.८ मध्ये दर्शविलेल्या लगतचे दिनांकापासून संस्थान सेवेत कायम करावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.७२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या ०३ कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेमुळे संबंधीत विभागप्रमुखांचा अभिप्राय विचारात घेता, परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेचे दिनांकापासुन त्यांना संस्थान सेवेत कायम करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा संस्थानचे सेवाप्रवेश नियम अंतीम करणेपूर्वी संस्थानचे रुग्णालयातील पदनामांची शैक्षणिक, वेतन व इतर पात्रता ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १३(४) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था समिती यांच्या आस्थापनेवर आवश्यक कर्मचा-यांच्या आकृतीबंधास (श्री साईबाबा हॉस्पिटलकडील आकृतीबंधासहीत) शासन निर्णय क्रमांक – सासंवि-२००९/४३३/(३७/९) का. सोळा मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. ०७/०८/२००९ नुसार काही अटी व शर्तींच्या अधीन राहुन मंजुरी दिलेली आहे.

मंजूर आकृतीबंधातील तरतुदीस अनुसरुन संस्थान आस्थापनेवरील विविध पदे, त्यांची शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी, अनुभव याबाबत आवयक त्या दुरुस्त्या करुन मा. व्यवस्थापन समितीचे दि. १२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयान्वये जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४ दि. २६.०६.२०१४ पत्रान्वये सेवा प्रवेश नियम (Recruitment Rule) शासनास मान्यतेसाठी सादर करणेत आलेले आहेत.

परंतु सदरचे सेवानियम हे अधिनियमातील तरतुदीनुसार पुर्व प्रसिद्ध न करता तयार करणेत आलेले होते. सबब, दि. २७/०७/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधानुसार तयार केलेले सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अधिनियमातील तरतुदीनुसार पुर्वप्रसिद्ध करुन, हरकती मागविणेत आल्या असुन सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अंतिम करणेबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन शाखा (आस्थापना) यांचेमार्फत चालु आहे

संस्थान रुग्णालयात येणा-या रुग्णांवर उपचाराची आवश्यकता विचारात घेता जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/ २०१४ दि. २६.०६.२०१४ पत्रातील सेवा प्रवेश नियमानुसार शैक्षणिक व इतर पात्रतेनुसार जाहिरातील प्रसिद्ध करुन रिक्त पदांवर पदभरती करण्यात येते यासाठी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. १७ एप्रिल २०१५ रोजीचेआदेशान्वये १) डीन, गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेज, २) संबंधितविषयातील तज्ञ, ३) सिव्हील सर्जन, अहमदनगर या तज्ञ व्यक्तींची निवड समिती गठीत केलेली आहे.

तथापि, उपरोक्त जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४ दि. २६.०६.२०१४ अन्वये शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेत आलेल्या सेवाप्रवेश नियमात नमुद केलेली शैक्षणिक पात्रता, वेतन,अनुभव तसेचआरक्षण इत्यादी कारणांमुळे जाहिरातील हवा तसा प्रतिसाद मिळत नाही त्यामुळे वैद्यकीय अधिकारी प्राप्त होत नाहीत. त्यामुळेसंस्थानचा जाहिरात, मुलाखती व त्यास अनुषंगिक बाबींवर विनाकारण खर्च होत आहे तसेच वेळही वाया जात आहे. सबब, स्थायी स्वरुपात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी अथवा व्हिजीटींग पद्धतीने नेमणूका देऊन वैद्यकीय अधिकारी घेतले जातात मात्र सदरचे वैद्यकीय अधिकारी हे आठवडा/ पंधरवाडा/ महिन्यातील एक दिवसच येतात त्यामुळे रुग्णांवर तात्काळ उपचार होऊ शकत नाही.

रुग्णालयातील रिक्त पदांवर भरती करणेकामी मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीसमोर दि. २४/०५/२०१६ रोजी वैद्यकीय अधिका-यांच्या मुलाखती घेणेत आल्या होत्या मात्र शैक्षणिक पात्रता, वेतन, अनुभव व आरक्षण यामुळे ब-याच जागा रिक्त राहिल्या आहेत.

सध्या सेवाप्रवेश नियमाम असलेली पात्रता, अनुभव व वेतन इत्यादींचा फेरआढावा घेऊन आवश्यक बदल केल्यास स्थायी स्वरुपात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होऊ शकतील असे मा. डॉ. चंदनवाले, डीन, बीजेएमसी, पुणे यांनी सुचविले आहे सदरची बाब त्यांनी मा. जिल्हाधिकारी साहेब यांचेशी दि. २४/५/२०१६ रोजी समक्ष झालेल्या चर्चेत निदर्शनास आणुन दिली आहे. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे फेरआढावा घेऊन आवश्यक ते बदल करणेकामी काम करणेची त्यांनी तयारी दर्शविली आहे परंतु याकामी त्यांनी योग्य ते मानधन मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

संस्थानचे श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात सध्या १४५ प्रकारची पदनामे असुन त्यांची शैक्षणिक पात्रता, वेतन संरचना, अनुभव तसेच संस्थानचे रुग्णालयात असलेले विभाग व खाटांच्या (Bed) संख्येनुसार किती कर्मचारी वर्ग असावा इत्यादी ठरविणेकामी दि. ११/०७/२०१६ रोजी मा. डीन, बीजेएमसी, पुणे यांचेशी दुरध्वनीवर चर्चा केली असता, त्यांनी याकामी त्यांचे कार्यालयीन कामकाजाची वेळ सोडून इतर वेळेत हे काम करावे लागेल त्यासाठी अधिष्ठाता, उपअधिष्ठाता, कार्यालय अधिक्षक, २ सल्लागार, लिपीक अशा पाच-सहा जणांकडून हे काम करुन घ्यावे लागेल त्यासाठी कमीत कमी रक्कम रुपये तीन लाख व जास्तीत जास्त संस्थान व्यवस्थापन जो निर्णय घेईल ते मानधन मिळणेची अपेक्षा व्यक्त केली आहे.

मा. डीन, बीजेएमसी,पुणे यांना एच आर विभाग जा.नं.१०२७ दि. १३ ऑगष्ट २०१६ रोजी उपरोक्त कामी पत्र पाठविले होते त्यास अनुसरुन मा. डीन, बीजेएमसी, पुणे यांचा दि १९/०८/२०१६ रोजीचा ई-मेल प्राप्त झाला आहे. त्यातही त्यांनी संस्थानचे रुग्णालयात असलेले विभाग व खाटांच्या (Bed) संख्येनुसार किती कर्मचारी वर्ग असावा इ. ठरविणेकामी अधिष्ठाता, उपअधिष्ठाता, कार्यालय अधीक्षक, २ सल्लागार, लिपीक अशा पाच-सहा जणांकडून हे काम करुन घ्यावे लागेल त्यासाठी कमीत-कमी रक्कम रु. तीन लाख व जास्तीत-जास्त संस्थान व्यवस्थापन जो निर्णय घेईल ते मानधन मिळणेची अपेक्षा व्यक्त केली आहे.

सबब, संस्थानचे सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अंतिम करणे अगोदर संस्थानचे श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातअसलेले विभाग व खाटांच्या (Bed) संख्येनुसार कर्मचारी वर्ग, त्यांची पदनामे, शैक्षणिक पात्रता, वेतन संरचना,अनुभव इ. मा. डीन, बीजेएमसी, पुणे यांचेकडून ठरविणेकामी तसेच याकामी त्यांना कमीत कमी रक्कम रु. तीन लाख व जास्तीत जास्त संस्थान व्यवस्थापन जो निर्णय घेईल ते मानधन देणेकामी मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.७३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अंतिम करणेपुर्वी श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील विभाग व खाटांच्या (Bed) संख्येनुसार कर्मचारी वर्ग, त्यांची पदनामे, शैक्षणिक पात्रता, वेतन संरचना, अनुभव इ. बाबी मा.डीन, बीजेएमसी, पुणे यांचेकडून निश्चित करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४४** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकरीता अत्याधुनिक संगणकीकृत साहित्य संस्थानचे विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४५** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदीकामी चौथ्यांदा फेर ई-निविदा मागविणेबाबत.**

**विषय नं.४६** **श्री साईनाथ रुग्णालयातील Surgical ward No.2 या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.४७** **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-I या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.४८** **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-I या विभागातील Ventilator मशीनसाठी Humidifire खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.४९** **श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty विभागाकरीता Ventilator (Servo-1) खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.५०** **सन २०१५-१६ मधील औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी पुरवठा आदेश देण्यात आलेल्या M/s Surya Surgi Pharma, Nashik यांची सुरक्षा रक्कम कमी करणेबाबत.**

**विषय नं.५१** **श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता जुने Platelet Agitator & Incubator Machine Buyback (परत) करुन नविन Platelet Agitator & Incubator Machine खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.५२** **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine खरेदी करुन जुने Konelab मशिन Buyback करणेबाबत.**

**विषय नं.५३** **श्री साईबाबा रुग्णालयातील Dialysis Unit या विभागाकरीता जुने Dialysis Machine Buyback (परत) करुन नविन Dialysis Machine खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.५४** **श्री साईबाबा रुग्णालयातील FSW या विभागाकरीता जुने ECG Machine Buyback (परत) करुन नविन ECG Machine खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.५५** **श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU या विभागाकरीता 10 KVA UPS खरेदी करुन जुना 10 KVA UPS परत (Buyback) करणेबाबत.**

**निर्णय क्र.७३१** उपरोक्त विषय नं.४४ ते ५५ रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५६** **दिनांक ०७.०८.२०१६, दिनांक १६.०८.२०१६ व दिनांक ३१.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.**

दिनांक ०७.०८.२०१६, दिनांक १६.०८.२०१६ व दिनांक ३१.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अहवालाच्या प्रती सर्व मा.विश्वस्तांना पुरविणेत आल्या होत्या.

**निर्णय क्र.७३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ०७.०८.२०१६, दिनांक १६.०८.२०१६ व दिनांक ३१.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दिनांक ०१.१०.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७३३** दिनांक ०१.१०.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये लॉनचे पुर्वेस पेव्हींग ब्लॉक बसविणे कामाचे ई-निविदांचे लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) उघडून निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम- २१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतुद आहे".

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-** दि.०२/०२/२०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र.३० संमत करण्यात आलेला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमधील लॉनचे पुर्वेस पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.४,५९,१४८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार इकडील विभागामार्फत ई-निविदा फॉर्म तयार करण्यात आले. त्यानुसार दि.१६/६/२०१६ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहू कामाची ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती. निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Activity | Date & Time |
|---|---|---|
| 1) | Tender publishing date: | 16/06/2016 |
| 2) | Tender document download start date: | 16/06/2016 from 11:00 Hrs. |
| 3) | Tender document download end date: | 25/06/2016 upto 17:00 Hrs. |
| 4) | Bid submission start date: | 16/06/2016 from 12:00 Hrs. |
| 5) | Bid submission closing date: | 25/06/2016 upto 17:00 Hrs. |
| 6) | Bid opening date (Technical): | 05/07/2016 at 11:00 Hrs. |

उपरोक्त नमुद तारखांनुसार लिफाफा क्र.१ (Technical Bid), दि.०५/०७/२०१६ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचेसमोर उघडण्यात आली असून खालील ०३ ठेकेदार यांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.

१) मे.एन.एस.बनकर पा. ॲण्ड कं., श्रीरामपुर
२) अभिषेक कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद
३) श्री. रविंद्र एस. शिंदे, कोल्हार

सदर ई-निविदांची तांत्रीक छाननी करण्यात आली असुन त्याचा अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला होता. ठेकेदार श्री. रविंद्र एस. शिंदे, कोल्हार यांनी किमान पात्रता निकषातील अ.क्र.०५, "Bidder should submit undertaking that he is not barred/ not blacklisted by any client including state/ Central Govt. Department/ PSU's." या संदर्भातील अंडरटेकींग जोडलेले नव्हते.

त्यावर छाननी अहवालात खालीलप्रमाणे नमूद करणेत आले होते,

"....Shri. Ravindra S. Shinde, Kolhar fulfils the minimum qualifying criteria under S. No.01 to 04. They have not submitted the required document mentioned under S.No.05. Hence he does not fulfil the only item of minimum qualifying criteria as above. So the

required document i.e. undertaking may be called from him to avoid repeatation of tender process and thereby saving the time. Submitted for approval please."

त्यानुसार सदर छाननी अहवालास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर ठेकेदार श्री. रविंद्र एस. शिंदे, कोल्हार यांनी आता अंडरटेकींग जोडलेले आहे

वर नमुद केलेप्रमाणे प्राप्त ०३ निविदांचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | ई-निविदे मधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | मे.एन.एस.बनकर पा. ॲण्ड कं., श्रीरामपुर | ३,७१,६९१/- |
| २ | अभिषेक कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | **३,३८,८५१/-** |
| ३ | श्री. रविंद्र एस. शिंदे, कोल्हार | ३,९३,५९८.९० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये लॉनचे पुर्वेस पेव्हींग ब्लॉक बसविणे कामी अभिषेक कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे रु.३,३८,८५१/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**०२ श्री साईबाबा संस्थानचे कर्मचारी व अधिकारी निवासस्थानाकरीता सोलर सिस्टीम संयंत्र आस्थापित करणेकामी पात्र ई-निविदा कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानचे कर्मचारी व अधिकारी निवासस्थानाकरीता सोलर सिस्टीम सयंत्र आस्थापित करणेसाठी येणा-या अंदाजे रुपये 52,50,000/- मात्रचे खर्चास तसेच सयंत्र आस्थापित करणेसाठी ई-निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 05/06/2015 रोजी झालेल्या सभेतील निर्णयानुसार मान्यता मिळालेली आहे. सदर निर्णयास मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ई निविदा मागविणेकामी दिनांक 27/5/2016 रोजी महारष्ट शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती. निविदा अपलोड करण्याची अंतिम दिनांक11/06/2016 अशी देणेत आली होती. या मुदतीत खालील आठ निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झाल्या आहेत :

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | जैन इरिगेशन सिस्टीम लि. जळगाव | 2 | कोसल हिरामृत एनर्जी प्रा. लि., अहमदाबाद |
| 3 | बिपीन इंजिनिअर्स प्रा. लि., पुणे | 4 | रेडरेन एजर्नी प्रा. लि., मोरबी, गुजरात |
| 5 | इकोशाईन सोलर एनर्जी प्रा. लि., औरंगाबाद | 6 | जय रिनेव्हेबल एनर्जी प्रा. लि., मिरज |
| 7 | स्पेस सोलर शॉपी, औरंगाबाद | 8 | सनझोन सोलर सिस्टीम, बंगलोर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त आठ ई-निविदा दिनांक 17/06/2016 रोजी मा. प्रशासकीय अधिकारी, मेकॅनिकल विभाग, लेखाधिकारी यांचेसमक्ष उघडण्यात आल्या. सदर आठ कंपन्यानी सादर केलेले ई-निविदाचे टेक्नीकल बीड तपासून त्यावर अभिप्राय/ अहवाल पाठविणेबाबत प्रकल्पाचे सल्लागार मे. महाराष्ट ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांना जा. नं. एसएसएसटी/वशी-मेकॅनिकल/1536/2016 दिनांक 30/06/2016 रोजी पत्र देण्यात आले होते. तसेच सदर टेक्नीकल बीड कागदपत्रे त्यांचेकडे पोहोच करण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी टेक्नीकल बीड कागदपत्रे तपासून त्यांचा अहवाल/ अभिप्राय दिनांक 8/9/2016 रोजी पाठविला आहे. सदर अहवालात.

1) *मे. स्पेस सोलर शॉपी, औरंगाबाद यांचे सैर उष्णजल संयंत्रासाठीचे BIS valid Certificate, निविदेमध्ये नमूद केल्यानुसार कामाचा अनुभव व एका ठिकाणी 30,000 लिटर्स प्रति दिन क्षमतेचे आस्थापना प्रमाणपत्र आढळूण आले नाही.*

*2) मे. इकोशाइन प्रा.लि. औरंगाबाद यांचे निविदेमध्ये नमूद केल्यानुसार कामाचा अनुभव व एका ठिकाणी 30,000 लिटर प्रति दिन क्षमतेचे आस्थापना प्रमाणपत्र आढळून आले नाही.*

*वरील दोन निविदाधारकांच्या कागदपत्रांसंदर्भात आपल्या स्तरावर पुन:श्च खातरजमा करून घ्यावी. उर्वरित प्राप्त सहा निविदाधारकांनी कागदपत्रांची पूर्तता केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्टया परिपूर्ण निविदाधारकांचे आर्थिक लिफाफे उघडण्यास हरकत नसावी. याबाबतचा आवश्यक तो अंतिम निर्णय आपण आपल्या स्तरावर घ्यावा.*" असे नमूद केले आहे.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) यांचे पत्रात नमुद केलेप्रमाणे मे. स्पेस सोलर शॉपी, औरंगाबाद व मे. इकोशाईन सोलर एनर्जी प्रा. लि., औरंगाबाद यांनी ऑनलाईन सादर केलेल्या टेक्नीकल बीड व कार्यालयात पाठविलेल्या हार्ड कॉपी कागदपत्रांची तपासणी केली असता,

(अ) मे. इकोशाईन सोलर एनर्जी प्रा. लि., औरंगाबाद यांनी एका ठिकाणी 30,000 लिटर प्रतिदिन क्षमतेचे संयंत्र आस्थापना केल्याचे प्रमाणपत्र आढळुन आले, मात्र निविदेमध्ये नमुद केल्यानुसार खालीलप्रमाणे कागदपत्रे आढळून आलेली नाही :

1) एकुण 1,00,000 लिटर क्षमतेचे सयंत्र बसविलेले (आस्थापित) असलेचे आस्थापना प्रमाणपत्र

2) मागील आर्थिक वर्षात कंपनीची उलाढाल रुपये 1 कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असल्याचे सी.ए. यांचेकडून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र

3) ले-आऊट ड्राईग

(ब) तसेच मे . स्पेस सोलर शॉपी, औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे कागदपत्राची पुर्तता केलेली नाही :

1) सौर उष्णजल संयत्रणासाठीचे BIS Valid Certificate

2) निविदेमध्ये नमूद केल्यानुसार कामाचा अनुभव एकूण 1,00,000 लिटर क्षमतेचे सौर उष्णजल संयत्रण आस्थापना प्रमाणपत्र

3) एकाच ठिकाणी 30,000 लिटर प्रतीदिन क्षमतेचे आस्थापना प्रमाणपत्र

4) बॅक सॉलवन्सी सर्टिफिकेट

उपरोक्तप्रमाणे मे. इकोशाईन सोलर एनर्जी प्रा. लि., औरंगाबाद व मे . स्पेस सोलर शॉपी, औरंगाबाद हे निविदाधारक निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करीत नसलेने ते अपात्र ठरत आहेत. त्यामुळे सदरचे दोन्ही निविदाधारक वगळता उर्वरित सहा पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड मा. उप-समितीचे सभेपुढे उघडून पुढील निर्णय घ्यावा लागणार आहे.

श्री साईबाबा संस्थानचे कर्मचारी व अधिकारी निवासस्थानाकरीता सोलर सिस्टीम संयत्र आस्थापित करणेकामी पात्र ०६ ई-निविदाचे कमर्शियल बीड आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थिती निविदा धारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **ई-निविदेमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| 1 | जैन इरिगेशन सिस्टीम लि. जळगाव | ६२,८८,६८२/- |
| 2 | कोसल हिरामृत एनर्जी प्रा. लि., अहमदाबाद | **५८,२६,७५०/-** |
| 3 | बिपीन इंजिनिअर्स प्रा. लि., पुणे | ८२,८९,७७२/- |
| 4 | रेडरेन एजर्नी प्रा. लि., मोरबी, गुजरात | ७१,५४,१००/- |
| 5 | जय रिनेव्हेबल एनर्जी प्रा. लि., मिरज | ७४,६९,३५०/- |
| 6 | सनझोन सोलर सिस्टीम, बंगलोर | ९५,४८,५००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे कर्मचारी व अधिकारी निवासस्थानाकरीता सोलर सिस्टीम संयंत्र आस्थापित करणेकामी कोसल हिरामृत एनर्जी प्रा. लि., अहमदाबाद यांचे रु.५८,२६,७५०/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्त वाचुन कायम करत असताना, सदरहू प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**०३ श्री साई प्रसादालय व परिसरात असलेल्या विभागातील कर्मचाऱ्यांची वाहने पार्किंग जागेस कंपाऊंड करणेकामी प्राप्त कोटेशन्स उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालय व परिसरात असलेल्या विभागातील कर्मचाऱ्यांचे वाहने पार्किंग जागेस कंपाऊंड करणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स या अंदाजे रुपये-वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा/ ,272,7 -/00 मात्रचे खर्चाचे प्रस्तावास दिनांक 050/5201/5 रोजीचे मापन समितीचे सभेतीन निर्णय वस्थाव्य . .क्र143(16) नुसार मान्यता मिळालेली आहे29/मेकॅनिकल/एसएसएसटी .नं.नुसार जात्या .26 2016/दिनांक 8 सप्टेंबर, 2016 अन्वये 7 फॅब्रिकेटर्स वर्कशॉपधारक यांचेकडून/कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होती. या पत्रामध्ये कोटेशन संस्थानकडे पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक 2016/09/19अशी देण्यात आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 5 फॅब्रिकेटर्स यांचेकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत :

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव** | **आवक क्रमांक** | **दिनांक** |
|---|---|---|---|
| 1. | P.S. Tembhurnikar, Aurangabad | 10989 | 19/09/2016 |
| 2. | Ravindra Rubber Products & Fabrication, Shrirampur | 10890 | 17/09/2016 |
| 3. | Super Fabrication & Furniture, Sakuri | 11000 | 19/09/2016 |
| 4. | Apurva Engineering Works, Aurangabad | 11010 | 19/09/2016 |
| 5. | Press-Vac Steel Industries, Nashik | 11013 | 19/09/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे 5 फॅब्रिकेटर्स वर्कशॉपधारक यांचेकडून/विषयांकित कामांकरीता कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

श्री साई प्रसादालय व परिसरात असलेल्या विभागातील कर्मचाऱ्यांचे वाहने पार्किंग जागेस कंपाऊंड करणेकामी प्राप्त ०५ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थिती कोटेशनधारकासमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळदर रु. |
|---|---|---|
| 1. | P.S. Tembhurnikar, Aurangabad | ३,७५,२००/- |
| 2. | Ravindra Rubber Products & Fabrication, Shrirampur | २,९३,३७२/- |
| 3. | Super Fabrication & Furniture, Sakuri | ३,२२,६८०/- |
| 4. | Apurva Engineering Works, Aurangabad | **२,५२,१५०/-** |
| 5. | Press-Vac Steel Industries, Nashik | २,५२,३७०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय व परिसरात असलेल्या विभागातील कर्मचाऱ्यांच्या वाहन पार्किंग जागेस कंपाऊंड करणेकामी Apurva Engineering Works, Aurangabad यांचे रु.२,५२,१५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्त वाचुन कायम करत असताना, सदरहू प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०४ **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे पॅसेजमधील मजल्यांच्या रिलींगची उंची वाढविणेकामी प्राप्त कोटेशन्स उघडणेबाबत.**

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये निवास करणा-या साईभक्ताच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने सदरहु इमारतीच्या पॅसेजमधील मजल्यांच्या रिलींगची उंची वाढविणेसाठी नविन रेलींग तयार करुन बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 81,444/- मात्रचे खर्चाचे प्रस्तावास दिनांक 07/08/2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतीन निर्णय क्र. 485 नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/2957/2016 दिनांक 9 सप्टेंबर, 2016 अन्वये 7 फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होती. या पत्रामध्ये कोटेशन संस्थानकडे पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक 19/09/2016 अशी देण्यात आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 5 फॅब्रिकेटर्स यांचेकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Ravindra Rubber Products & Fabrication, Shrirampur | 10889 | 17/09/2016 |
| 2. | P.S. Tembhurnikar, Aurangabad | 10991 | 19/09/2016 |
| 3. | Super Fabrication & Furniture, Sakuri | 10998 | 19/09/2016 |
| 4. | Apurva Engineering Works, Aurangabad | 11009 | 19/09/2016 |
| 5. | Press-Vac Steel Industries, Nashik | 11014 | 19/09/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे 5 फॅब्रिकेटर्स यांचेकडून विषयांकित कामांकरीता कोटेशन्सप्राप्त झालेली आहेत.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे पॅसेजमधील मजल्यांचे रिलींगची उंची वाढविणेकामी प्राप्त ०५ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उपस्थित कोटेशनधारकासमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळदर रु. |
|---|---|---|
| 1. | Ravindra Rubber Products & Fabrication, Shrirampur | १,५७,०६२/- |
| 2. | P.S. Tembhurnikar, Aurangabad | १,९५,९६०/- |
| 3. | Super Fabrication & Furniture, Sakuri | २,०७,६७२/- |
| 4. | Apurva Engineering Works, Aurangabad | १,८५,०७६/- |
| 5. | Press-Vac Steel Industries, Nashik | **१,३०,८७२/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे पॅसेजमधील मजल्यांच्या रिलींगची उंची वाढविणेकामी Press-Vac Steel Industries, Nashik यांचे रु.१,३०,८७२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०५ **श्री साई प्रसादालयाचे किचनमधील भाजी, दाळ बनविणेचे पातेल्यांवर ठेवणेकरीता स्टेनलेस स्टील जाळीची झाकणे बनविणेकामी प्राप्त कोटेशन्स उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालयाचे किचनमधील भाजी, दाळ बनविणेचे पातेलेवर ठेवणेकरीता स्टेनलेस स्टील जाळीचे झाकणे बनविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 92,300/- मात्रचे खर्चाचे प्रस्तावास दिनांक 07/08/2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतीन निर्णय क्र. 484 नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/2958/2016 दिनांक 9 सप्टेंबर, 2016 अन्वये 8 फॅब्रिकेटर्सकडून कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होती. या पत्रामध्ये कोटेशन संस्थानकडे पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक 19/09/2016 अशी देण्यात आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 6 फॅब्रिकेटर्स यांचेकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | P.S. Tembhurnikar, Aurangabad | 10990 | 19/09/2016 |
| 2. | Super Fabrication & Furniture, Sakuri | 10997 | 19/09/2016 |
| 3. | Sai Enggineers, Nashik | 11006 | 19/09/2016 |
| 4. | Apurva Engineering Works, Aurangabad | 11007 | 19/09/2016 |
| 5. | Ravindra Rubber Products & Fabrication, Shrirampur | 10906 | 19/09/2016 |
| 6. | Press-Vac Steel Industries, Nashik | 11016 | 19/09/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे 6 फॅब्रिकेटर्स यांचेकडून आवश्यक्त कामांकरीता कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

श्री साई प्रसादालयाचे किचनमधील भाजी, दाळ बनविणेचे पातेलेवर ठेवणेकरीता स्टेनलेस स्टील जाळीचे झाकणे बनविणेकामी प्राप्त ०६ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उपस्थित कोटेशनधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | Ravindra Rubber Products & Fabrication, Shrirampur | १,२२,१५७/- |
| 2. | Apurva Engineering Works, Aurangabad | १,१३,२५०/- |
| 3. | P.S. Tembhurnikar, Aurangabad | १,२२,६००/- |
| 4. | Super Fabrication & Furniture, Sakuri | ९८,१५०/- |
| 5. | Sai Enggineers, Nashik | १,०३,७००/- |
| 6. | Press-Vac Steel Industries, Nashik | **६८,६५०/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे किचनमधील भाजी व दाळ बनविणेचे पातेल्यांवर ठेवणेकरीता स्टेनलेस स्टील जाळीची झाकणे बनविणेकामी Press-Vac Steel Industries, Nashik यांचे रु.६८,६५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०६ **शांतिनिवास दर्शन हॉलमधील गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट तयार करणेकामी प्राप्त कोटेशन्स उघडणेबाबत.**

शांतीनिवास दर्शन हॉलमधील गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट तयार करुन बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 2,97,110/- मात्रचे खर्चाचे प्रस्तावास दिनांक 16/08/2016 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतीन निर्णय क्र. 543 नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/2959/2016 दिनांक 9 सप्टेंबर, 2016 अन्वये 10 फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होती. या पत्रामध्ये कोटेशन संस्थानकडे पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक 19/09/2016 अशी देण्यात आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 6 फॅब्रिकेटर्स यांचेकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Ravindra Rubber Products & Fabrication, Shrirampur | 10907 | 17/09/2016 |
| 2. | Apurva Engineering Works, Aurangabad | 10988 | 19/09/2016 |
| 3. | P.S. Tembhurnikar, Aurangabad | 10992 | 19/09/2016 |
| 4. | Super Fabrication & Furniture, Sakuri | 10996 | 19/09/2016 |
| 5. | Sai Enggineers, Nashik | 11008 | 19/09/2016 |
| 6. | Press-Vac Steel Industries, Nashik | 11015 | 19/09/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे 6 फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारक यांचेकडून आवश्यक कामांकरीता कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

शांतीनिवास दर्शन हॉलमधील गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट तयार करुन बसविणेकामी प्राप्त ०६ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उपस्थित कोटेशनधारकासमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | Ravindra Rubber Products & Fabrication, Shrirampur | ३,६४,९०८/- |
| 2. | Apurva Engineering Works, Aurangabad | **२,४४,५८०/-** |
| 3. | P.S. Tembhurnikar, Aurangabad | ३,०२,१८०/- |
| 4. | Super Fabrication & Furniture, Sakuri | २,४५,१४५/- |
| 5. | Sai Enggineers, Nashik | २,९२,०००/- |
| 6. | Press-Vac Steel Industries, Nashik | २,६२,६२०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतिनिवास दर्शन हॉलमधील गेटसमोरील रिलींगमध्ये स्टेनलेस स्टीलचे आपत्कालीन स्लायडींग गेट तयार करणेकामी Apurva Engineering Works, Aurangabad यांचे रु.२,४४,५८०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०७ **बकेट इलेव्हेटर खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघणेबाबत.**

लाडू निर्मिती विभागाकरीता डाळ निवडणेसाठी डिस्टोनर मशिन असूनही उंची जास्त असलेमुळे डाळ मशिन मध्ये टाकणेसाठी बकेट इलेव्हेटर सिस्टीम बसविणे आवश्यक आहे. डाळ डिस्टोनर मशिनकरीता बकेट इलेव्हेटर सिस्टीम विहीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु. 60,000 -/मात्रचे खर्चाचे प्रस्तावास दिनांक 7/08/2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. 482 नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा/मेकॅनिकल/एसएसएसटी .नं.2961/2016 दिनांक बरसप्टें 9, 2016 अन्वये 7 पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होतीनकडे कोटेशन संस्थाया पत्रामध्ये . पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक 22/09/2016 अशी देण्यात आली होती .या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 3 फॅब्रिकेटर्स यांचेकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्सप्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | जय नवनाथ इंजिनिअरींग वर्क्स, कोल्हापूर | 11012 | 19/09/2016 |
| 2. | श्री राम इंजिनिअरींग वर्क्स, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर | 11264 | 22/09/2016 |
| 3. | ओम श्री चैतन्यप्रसाद मेटल इंडस्ट्रीज, कोल्हापूर | 11265 | 22/09/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे 3 दरपत्रकधारक यांचेकडून बकेट इलेव्हेटर खरेदी कामांकरीता कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

डाळ डिस्टोनर मशिनकरीता बकेट इलेव्हेटर सिस्टीम खरेदी कामी प्राप्त ०३ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती समोर उपस्थित कोटेशनधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | जय नवनाथ इंजिनिअरींग वर्क्स, कोल्हापूर | **७३,८७५/-** |
| 2. | श्री राम इंजिनिअरींग वर्क्स, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर | ७७,५००/- |
| 3. | ओम श्री चैतन्य प्रसाद मेटल इंडस्ट्रीज, कोल्हापूर | ८१,८७५/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डाळ डिस्टोनर मशिनकरीता बकेट इलेव्हेटर खरेदीकामी जय नवनाथ इंजिनिअरींग वर्क्स, कोल्हापूर यांचे रु.७३,८७५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०८ **श्री साई प्रसादालयाकरीता वॉटर कुलर खरेदीकामी प्राप्त कोटेशन्स उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालयाकरीता 5 नग वॉटर कुलर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 2,60,000/- मात्रचे खर्चाचे प्रस्तावास दिनांक 07/08/2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतीन निर्णय क्र. 486 नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/

मेकॅनिकल/ 2960/ 2016 दिनांक 9 सप्टेंबर, 2016 अन्वये 9 पुरवठादारांकडून कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होती. या पत्रामध्ये कोटेशन संस्थानकडे पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक 23/09/2016 अशी देण्यात आली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे 4 पुरवठादार यांचेकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत:

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Works, Mumbai | 11172 | 21/09/2016 |
| 2. | Cool Breeze, Pune | 11173 | 21/09/2016 |
| 3. | Classic Cool Airconditioning, Mumbai | 11337 | 23/09/2016 |
| 4. | A.J Enterprises, Mumbai | 11340 | 23/09/2016 |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे 4 पुरवठादार यांचेकडून वॉटर कुलर खरेदी करणेकरीता कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

श्री साई प्रसादालयाकरीता ०५ नग वॉटर कुलर खरेदी करणेकामी प्राप्त ०४ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती समोर उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Works, Mumbai | २,४०,०००/- |
| 2. | Cool Breeze, Pune | **२,२०,७५०/-** |
| 3. | Classic Cool Airconditioning, Mumbai | २,६०,०००/- |
| 4. | A.J Enterprises, Mumbai | २,५२,५००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकरीता ०५ नग वॉटर कुलर खरेदी करणेकामी Cool Breeze, Pune यांचे एकत्रित रु.२,२०,७५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.**

(कार्यवाही-मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०९ **श्री पुण्यतिथी उत्सव- २०१६ कीर्तनकार व कलाकार निश्चिती करणे, बिदागी निश्चिती करणे बाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ सोमवार दि.१०/१०/२०१६ ते गुरुवार, दि.१३/१०/२०१६ असा ०४ दिवस साजरा होणार आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रम:-** उत्सवात नारदीय पध्दतीने कीर्तनकार्यक्रम होत असतात. मागील श्री गुरुपौर्णिमा उत्सवात ०३ दिवसाचे कीर्तनासाठी रु.९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. त्याच प्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ या उत्सवासाठी ही कीर्तनकार रु.९००१ /-मानधन देता येईल.

दि.११/९/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र-७५५ "श्रींच्या वर्षातील तीनही उत्सवांकरिता किर्तनकारांचे पॅनल तयार करणेत यावे, त्यामध्ये श्री रामनवमी उत्सवाकरिता सालाबाद प्रमाणे श्रीमद् सदगुरु श्री.दासगणु महाराज प्रतिष्ठान, गोरटे, ता.उमरी, जि.नांदेड यांचे प्रतिनिधी यांना, श्री गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता ह.भ.प.माधवराव तुकारामपंत आजेगांवकर यांना तसेच हभ.प.गंगाधर नरहर व्यासबुवा अथवा ह.भ.प. मंदार गंगाधर व्यास यांना श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) करिता कायमस्वरुपी पॅनलवर ठेवण्यात यावे. श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) करिता जर दोन्हीही किर्तनकार उपलब्ध नसतील तर ज्या किर्तनकारांचे अर्ज येतील त्यामधील किर्तनकाराची निवड करणेत यावी.

श्री पुण्यतिथी उत्सव -२०१६ साठी ह.भ.प.गंगाधर नरहर व्यासबुवा व ह.भ.प मंदार गंगाधर व्यास यांचेशी दुरध्वनीवरुन संर्पक केला असता त्यांनी नवरात्री उत्सवासाठी कार्यक्रम घेतलेले असल्याने ते पुण्यतिथी उत्सवासाठी येवू शकणार नाही. त्याऐवजी सौ.प्राची मंदार व्यास ह्यांना किर्तन सेवेसाठी पाठवू इच्छितो असे सांगितले आहे.

सौ.प्राची मंदार व्यास ह्या गेल्या १२ वर्षापासून कीर्तन सेवेत असून कीर्तनाचे सर्व शिक्षण ह.भ.प.श्री गंगाधर बुवा व्यास यांच्याकडे घेतलेले आहे.

पुण्यतिथी उत्सवात कीर्तन सेवेसाठी कीर्तनकारांचे अर्ज प्राप्त झालेले नाही.

**ब) कलाकार कार्यक्रम-** पुण्यतिथी उत्सव ०४ दिवसाचा असल्याने किमान दररोज ०२ प्रमाणे ४ दिवसात ८ कार्यक्रमाचे आयोजन करावे लागेल. पुण्यतिथी उत्सव-२०१६ चे उत्सवात

| अ.नं. | कलाकाराचे नाव | कार्यक्रमाचा तपशिल | कलाकार संख्या | बिदागी | |
|---|---|---|---|---|---|
| १ | शाहीर – किशोर सुदाम सासवडे, लोणी मो. ९९२२२५७०५९ | श्री साईपोवाडा व साईभजन गंगा | १० | रु.११,०००/- | |
| २ | श्री.विजय साखरकर, मुंबई मो.९८२१३९३३२३ | साई स्वर नृत्योत्सव (मराठी गीतांचा नृत्य मिमिक्री सहित सदाबहार | ३५ | रु.२५०००/- (येणे- जाणे गाडी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कार्यक्रम) | | भाडे) | |
| ३ | पं. डॉ. पराग चौधरी, योगीराज संगीत अकादमी, औरगाबाद मो.८२७५०१२६९१, ९४२२७१२०५२ | श्री समोर सांगीतिक कार्यक्रम | १० | रु.५००००/- (येणे- जाणे + साथीदार + वाद्यवृंद) | |
| ४ | रेखा नाला, हैद्राबाद मो.९८८५०४५४२९,९२४६३९१२२२ | कुचिपुडी नृत्य कार्यक्रम | १५ | रु.१५०००/- (येणे -जाणे भाडे) | |
| ५ | श्री.के.व्ही सत्यनारायणा, इल्युरु आंध्रप्रदेश मो.९८४८१२२४१३, ८९८५१०४५०० | कुचिपुडी नृत्य कार्यक्रम | ३० | रु.३२०००/- | |
| ६ | श्री. आर.के.सक्शेना , दिल्ली मो.९८११२६४३६,९७११००३४३६ | साई भजन संध्या | १० | १३५००/- (येणे- जाणे भाडे) | |
| ७ | श्री राम उध्दवराव कोठेकर हिवरा आश्रम (आकाशवाणी व दुरदर्शन कलावंत) मो.९६०४३१७६१८,९५२७४५८२३३ | भक्ती संगीत गायन | १० | १६०००/- (साथीदार, येणे- जाणे गाडी खर्च) | |
| ८ | श्रीमती दिपीका गील, दिल्ली मो.९८९९५५१८०२ | साई भजन संध्या कार्यक्रम | १२ | २१०००/- (येणे - जाणे भाडे) | गुरुपौर्णिमा उत्सव २०१६ मध्ये कार्यक्रम सादर केलेला आहे. |
| ९ | ह.भ.प. देवरावजी कुळमेथे महाराज, नाशिक मो.९२२५७३८६५० | साईचरित्रावर आधारित गायनाचा कार्यक्रम | ०६ | संस्थान नियमानुसार बिदागी मिळावी | पुण्यतिथी उत्सव २०१५ मध्ये कार्यक्रम सादर केलेला आहे. |
| १० | सौ.काशमिरा पी.त्रिवेदी (तक्षशिला नृत्यकला मंदिर), ठाणे | रंगू किर्तनाचे रंगी, साधू नव-विधा भक्ती (भरतनाट्यम) | २५ | विनामुल्य | |
| ११ | अनिलकुमार पी.मीस्कीन हुसली (कर्नाटक) मो.९५३८२४३९९९, ९८८०३९१४१८ | एक शाम साई के नाम श्री साई भजन संध्या आणि भक्ती संगीत | १० | विनामुल्य | गुरुपौर्णिमा उत्सव २०१६ मध्ये कार्यक्रम सादर केलेला आहे. |
| १२ | श्री.पंकज श्रीवास्तव, दिल्ली मो.९८११२७४१४८ | साईभजन संध्या | १० | विनामुल्य | |
| १३ | श्री.रंगनाथ बापू वैद्य,शिर्डी रंगभुमी (नाट्य संस्था) | सही द्या सही नाटक | १५ | विनामुल्य | |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. १ ते ९ या कलाकारांनी मानधनाची मागणी केली आहे. व अ.नं. १० ते १३ या कलाकारांनी विनामुल्य कार्यक्रमाची सेवा देण्याची तयारी दर्शविली आहे.

श्री पुण्यतिथी उत्सवातील कीर्तन कार्यक्रम हा समाधी मंदीराचे उत्तर बाजूला व निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम हे साईनगर येथील मैदानावर सायं ७.३० ते रात्रौ.१०.३० वाजे पर्यत आयोजित करण्यात येतात. मागील श्री पुण्यतिथी-२०१५ उत्सव कालावधीत तीन दिवसासाठी प्रत्येक दिवशी २ कलाकारांचे कार्यक्रम निश्चित करण्यात आलेले होते.

उपरोक्तप्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव -२०१६ करिता संस्थानकडे प्राप्त झालेल्या अर्जामधून कलाकार, यांची नावे निश्चिती करता येईल दररोज २ कार्यक्रम प्रमाणे ४ दिवसासाठी ८ कार्यक्रम निश्चित करावे लागतील. व सौ.प्राची मंदार व्यास यांना श्री पुण्यतिथी उत्सव २०१६ मध्ये ४ दिवस कीर्तन करणेस तयार असलेबाबत ई-मेलव्दारे कळविले असल्याने त्यांना कळविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव- २०१६ मध्ये कीर्तनकार म्हणून सौ.प्राची मंदार व्यास यांची ०४ दिवसाच्या किर्तन सेवेसाठी नेमणूक करणेत येऊन, त्यांना रु.९००१/- मात्र बिदागी देण्यात यावी व प्रस्तावात नमुद केलेले किर्तनकारांचे पॅनेल यापुढे रद्द करणेत यावे तसेच सदरहू उत्सवामधील कार्यक्रमांसाठी कलाकारांची/ त्यांना द्यावयाच्या मानधनाची प्रशासकीय स्तरावर निश्चिती करण्यात यावी. त्यामध्ये स्थानिक कलाकारांना प्राधान्य देण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**१० मंदिर विभागामार्फत होणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवर निश्चितीबाबत.**

संस्थानमार्फत श्री पुण्यतिथी उत्सव २०१६ मध्ये मंदिर विभागामार्फत वीणा, साईसच्चरित पोथीची मिरवणूक, श्रींच्या प्रतिमा (फोटोची) मिरवणूक, अध्याय वाचन,श्रींची पाद्यपुजा, भिक्षाझोळी, आराधना विधी कार्यक्रम, गुरुस्थान येथे रुद्राभिषेक पुजा अशा कार्यक्रमाचे आयोजन मान्यवरांचे हस्ते करणे असल्याने. मान्यवरांची नावे निश्चित झाल्यानंतर वीणा कोणी घ्यावा, पोथी कोणी घ्यावी, श्रींचा फोटो कोणी घ्यावा, अध्यायाचे वाचन कोणी करावे, श्रींची पाद्यपुजा, कोणी करावी, भिक्षाझोळी कोणी घ्यावी, आराधना विधी कार्यक्रम रुद्राभिषेक पुजा कोणी करावी याबाबत रुपरेषा निश्चित करता येईल.

**आजचे उपसमिती सभेमध्ये श्री पुण्यतिथी उत्सव- २०१६ मध्ये श्रींची पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मान्यवरांची निश्चिती करण्यात आली.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| १०/१०/२०१६<br>सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>**पोथी–** मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**प्रतिमा-** मा.ॲडमोहन मोतीराम जयकर, सदस्य व मा.डॉ.राजेंद्र राजा बाली सिंग, सदस्य (मा.डॉ.राजेंद्र सिंग अनुपस्थित असल्यास मा.डॉ.संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी प्रतिमा धरतील) |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन –**<br>अध्याय क्र.०१- मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य<br>अध्याय क्र.०२- मा.सौ.अनिताताई विजयराव जगताप, सदस्या<br>अध्याय क्र.०३- मा.सौ.सरस्वती भाऊसाहेब वाकचौरे<br>अध्याय क्र.०४- मा.ॲडमोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>अध्याय क्र.०५- मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा –** मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष व इतर इच्छुक सदस्य |
| ११/१०/२०१६.<br>मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी–** मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| | | **प्रतिमा-** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष व इतर इच्छुक सदस्य |
| | सकाळी ९.०० वाजता | **भिक्षा झोळी कार्यक्रम–** सर्व सदस्य (इच्छेनुसार) |
| | सकाळी १०.४५ वाजता | **आराधना विधी कार्यक्रम-** मा.अध्यक्ष महोदय व उपस्थित सदस्य |
| १२/१०/२०१६.<br>बुधवार | सकाळी ६.०० वाजता | **तृतीय दिवस** |
| | | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| १३.१०.२०१६<br>गुरुवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.४५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक –** मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी |

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**११ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन लेखापरिक्षीत लेख्यांसह शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम-२००४ संस्थानसाठी लागु केला असुन, त्या अनुसार संस्थानचे कामकाज सुरु आहे. अधिनियम-२००४ मध्ये **कलम १७(२)(ग)** मधील तरतुदीनुसार, "विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची, राज्यशासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील. व **कलम २९(१)** मधील तरतुदीनुसार समिती, त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक साहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारणाऱ्या संस्थांची (संपुर्ण पत्त्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक साहाय्य मागण्यामागील उददेश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल,

यांसह वार्षिक अहवाल तयार करवुन घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्ताला, त्या वर्षाच्या ३० जूनच्या आत सादर करील'' अशी तरतुद आहे.

त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्य विधी व न्याय विभाग यांनी जा.क्र.लेखाप-२०१६/३४९/प्र.क्र.७५/का.सोळा. दि.१६ मे,२०१६.अन्वये मे.शिंदे चव्हाण गांधी अॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंट्स लातुर, यांचेकडून वैधानिक लेखापरिक्षण करुन घेण्याचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन त्यांनी वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण करुन त्याचा अहवाल दि.१४.०९.२०१६ रोजी संस्थानला सादर केला आहे. सदर अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्तांना सादर केल्यानंतर त्यामधील दोष दुरूस्ती बाबतचा अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल

तरी सदर अहवालाची नोंद घेणेस व लेखापरिक्षित लेख्यांसह शासनाकडे सादर करणेस त्याचप्रमाणे संस्थानचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करणेस, तसेच संस्थान अधिनियम-२००४ मधील कलम २९(२) नुसार दरवर्षी संस्थानचा वार्षिक अहवाल (प्रशासकीय अहवाल व लेखापरिक्षण अहवाल) नागपुर येथे होणा-या हिवाळी अधिवेशनात विधीमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे बंधनकारक आहे. त्यासाठी सदर अहवालाच्या ५०० प्रती छपाई व ९०० CD तयार करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.९०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नव्वद हजार मात्र) च्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.उपसमितीचे सभेपुढे सादर.

**मे.शिंदे चव्हाण गांधी अॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंट्स, लातुर हे आजचे स्थानिक उपसमिति सभेसमोर लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणेसाठी हजर होते. उपसमितीने विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. लेखापरिक्षण अहवालातील काही मुद्दयांवर खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.**

**(१) कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे ही कंपनी संस्थानमध्ये साईटेक प्रकल्पांतर्गत सॉफ्टवेअर विकसीत करणेचे काम करत असून यामध्ये करारानुसार त्यांचे काम झालेले नाही. तरी सदरहू अपुर्ण काम त्यांचेकडून मार्च- २०१७ पर्यंत पुर्ण करुन घ्यावे व काम पुर्ण होईपर्यंत त्यांच्या माहे मे- २०१६ पासूनच्या नियमीत बीलाची रक्कम आदा करणेत येऊ नये.**

**(२) साईगार्डन प्रकल्पामध्ये उभारणेत येत असलेल्या लेझर शो साठी आवश्यक असलेल्या पॉन्डचे सिव्हील वर्क बरेचसे झालेले असून हे काम सिव्हील वर्क करणारी के.आर.आर. इन्फ्रा. प्रोजेक्ट, हैद्राबाद ही कंपनी पुढील काम करणेस असमर्थ असल्याने, त्यांचेकडून सदरहू काम काढून घेण्यात येऊन, या कंपनीवर सिव्हील सुट दाखल करण्यात यावे. तसेच लेझर व्हिजीन, हाँगकाँग ही कंपनी दुसऱ्या कंपनीमध्ये विलीन होत असलेने लेझर शो साठी आवश्यक असलेले उर्वरित सिव्हील वर्क संस्थानच्या बांधकाम विभागामार्फत त्वरीत पुर्ण करुन घेण्यात यावे.**

**(३) श्री साईबाबा हॉस्पिटलकडील जीवनदायी योजनेमधील अंदाजे रु.२२ करोड मात्र रक्कम शासनाकडे प्रलंबीत असून ती रक्कम मिळणेसाठी शासनाकडे पाठपुरावा करणेत यावा.**

**(४) मंदिर विभागाकडे दैनंदिन वापरातील सोने-चांदीच्या वस्तुमध्ये मोठया प्रमाणात झीज झालेली दिसून येते, मंदिर विभागाने याचा सविस्तर अहवाल व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करावा.**

**(५) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत व पुर्व लेखापरिक्षकांची नेमणूक मार्च- २०१७ पुर्वी करणेत यावी. यामध्ये स्थानिक लेखापरिक्षकांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच त्यांची फी विहीत परिमाण (Standard) प्रमाणे ठरविण्यात यावी.**

**(६) लेखापरिक्षण अहवालामधील त्रुटी कमी होणेसाठी कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, वैधानिक लेखापरिक्षक, अंतर्गत व पुर्व लेखापरिक्षक तसेच संबंधीत विभागांचे प्रशासकीय अधिकारी व विभागप्रमुख यांची लेखापरिक्षण समिती गठीत करणेत यावी.**

**उपरोक्तप्रमाणे सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवाल हा सध्याच्या समितीच्या कार्यकालामधील नसल्यामुळे यास ही व्यवस्थापन समिती जबाबदार नाही, अशी टिपणी केली. मात्र सदरहू अहवालास वेळेचे बंधन असल्यामुळे त्याची नोंद घेऊन सदरहू अहवाल लेखापरिक्षीत लेख्यांसह मा.धर्मदाय आयुक्त व महाराष्ट्र शासन यांना सादर करणेस मान्यता देण्यात यावी. तसेच हिवाळी अधिवेशनात विधीमंडळ सभागृहाच्या पटलावर ठेवणेसाठी या अहवालाच्या ५०० प्रतींची छपाई व ९०० CD तयार करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९०,०००/- मात्रचे खर्चासही मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ मंदिर/ बांधकाम / माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ वैद्यकिय संचालक)

---

**१२ साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व लेखाशाखा विभागातील ERP कार्यप्रणालीचे System Audit व Migration Audit बाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:** कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-**

**१)** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २३४.

**२)** मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे दि. २२/०८/२०१६ रोजीचे सभेपुढील विषय क्रं. ०५

**प्रास्ताविक:** साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व अकाऊंट विभागात कार्यान्वीत केलेल्या ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit करणेकामी संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून, न्युनतम दरधारकास कार्यादेश देण्याच्या व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २३४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

विषयांकीत प्रकरणी ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. ई-निविदेअंतर्गत प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा दि. २५/०७/२०१६ रोजी उघडण्यात आलेल्या आहेत. त्यातील पात्र निविदाधारक पुढीलप्रमाणे आहेत.

1. K.K. Chanani & Associates, Kolkata
2. Suma Soft Pvt.Ltd., Pune
3. AAA Technologies Private Ltd., Mumbai
4. R S P H & Associates, Nashik
5. Digital Age Strategies Pvt. Ltd. Bangalore

उपरोक्त प्राप्त निविदाधारकांच्या व्यावसायीक ई-निविदा उघडणेकामी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे दि. २२/०८/२०१६ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत. "साईटेक प्रकल्पाचे System Audit या प्रकल्पाअंतर्गत अकाउंट विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ईआरपी कार्यप्रणाली Migration Audit करणेकामी पात्र निविदाधारकांच्या व्यावसायिक निविदा आजचे स्थानिक उपसमितीचे सभेसमोर उघडणेस मान्यता देण्यात आली व या उघडणेत आलेल्या व्यावसायीक निविदांमधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, तो पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच या सभेमध्ये आय.टी. विभागाचे तांत्रिक सल्लागार श्री.रतिश तावडे, मुंबई व श्री.विजय नायडु, कोपरगाव यांना आमंत्रित करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यातआली."

उपरोक्त निर्देशान्वये उघडण्यात आलेल्या ई-निविदांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारक नाव | दर | एकुण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | K.K. Chanani & Associates, Kolkata | 14,60,100.00 | 14,60,100.00 | |
| 2 | Suma Soft Pvt.Ltd., Pune | 29,90,000.00 | 29,90,000.00 | |
| **3** | **AAA Technologies Private Ltd., Mumbai** | **4,69,200.00** | **4,69,200.00** | **निम्नतम निविदाधारक** |
| 4 | R S P H & Associates, Nashik | 19,55,000.00 | 19,55,000.00 | |
| 5 | Digital Age Strategies Pvt. Ltd. Bangalore | 13,50,000.00 | 13,50,000.00 | |

उपरोक्त मा.उपसमितीचे शिफारसीनुसार साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींचे System Audit व ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit करणेकामी प्राप्त व्यावसायीक निविदांमधील मुळदरांचा तुलनात्मक तक्ता मा. उपसमिती सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेस, तसेच आय.टी. विभागाचे तांत्रिक सल्लागार श्री. रतिश तावडे, मुंबई व श्री. विजय नायडु, कोपरगाव यांना सदर विषयी चर्चेकामी आमंत्रित करणेस सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उपसमिती सभेपुढे सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit तसेच लेखाशाखा विभागातील ERP कार्यप्रणालीचे System Audit व Migration Audit करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील AAA Technologies Private Ltd., Mumbai यांचे रु.४,६९,२००/- + टॅक्स मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच ERP कार्यप्रणालीचा प्रभावीपणे वापर होणेस व कर्मचाऱ्यांच्या अडचणींचे निरसण करणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेत यावी व माहिती तंत्रज्ञान विभागामधील मंजुर आकृतीबंधानुसार सर्वरिक्त तांत्रिक पदे कायमस्वरुपी भरणेकामीचा सविस्तर प्रस्ताव पुढील व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**१३ मा.सदस्यांच्या सुचनांबाबत**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** संस्थानमधील सर्व विभागांकरीता SOP (Standard Operation Practice) मार्च- २०१७ पर्यंत चालू करणेत यावी व सर्व प्रकारच्या ठेकेदार/ पुरवठादारांचे रजिस्ट्रेशन करुन घेण्यात यावे. तसेच स्थानिक ठेकेदार/ पुरवठाधारक यांना प्राधान्य देण्यात यावे.

(कार्यवाही- खरेदी/ बांधकाम/ विद्युत/ पाणीपुरवठा/ मेकॅनिकल/ विभागप्रमुख/ वैद्यकिय संचालक)

---

**(२)** दि.०४ डिसेंबर, २०१६ रोजी शिर्डी येथे होणारा ग्लोबल साई सम्मीट कार्यक्रम व्यवस्थीत पार पाडणेकामी मार्गदर्शन घेणेसाठी डॉ.रघुनाथ रेड्डी, तिरुपती यांना दि.०९.१०.२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर बोलविणेत यावे. तसेच श्री.सत्पथी गुरुजी, दिल्ली यांनी अनेक देशांमध्ये साईमंदिरांचे निर्माण केलेले आहे. याकरीता त्यांनाही या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यात यावे.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**(३)** संस्थानमधील फायर ऑडिट करणेसाठी नेमणूक करण्यात आलेले फायर सल्लागार श्री.उंडे यांनी त्यांच्या अहवालामध्ये सुचविलेप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही सुरक्षिततेच्या दृष्टीने तात्काळ करणेत यावी. याकामी आवश्यकता भासल्यास व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**(४)** संस्थानच्या विविध विभागामधील कामकाजाच्या सोयीचे दृष्टीने मार्गदर्शन होणेसाठी शासकीय सेवेतील सेवानिवृत्त तज्ञांची नेमणूक करणेत यावी. तसेच संरक्षण विभागासाठी निवृत्त पोलिस उपअधिक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करणेत यावी.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(५)** संस्थानमार्फत विकसीत करणेत आलेल्या शिर्डी बसस्थानकामध्ये प्रवाशी/ साईभक्तांसाठी आर.ओ. वॉटर प्लॅन्ट, वॉटर कुलर व अग्निशमन यंत्रणा संस्थानमार्फत करणेत यावी.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.०२** **श्री साईबाबा संस्थानच्या छाननी समितीवर अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त न्यायाधिशांची नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अधिनियम-२००४, (२००४, चा महा.१४) कलम ५, मधील पोटकलम (१) आणि त्यासोबत पोटकलम (२) अन्वये व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) नियम-२०१३, मधील तरतूदीनुसार राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाचे, दि.२८ जुलै, २०१६, रोजीचे अधिसूचनेनुसार, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती गठीत करणेत आलेली असून, या समितीने कार्यभार स्विकारुन कामकाजास सुरुवात केलेली असून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अधिनियम-२००४ मधील कलम २१, पोट-कलम (२) (दोन) मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली, असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य, अशा एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील आणि या छाननी समितीचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल, अशी तरतुद आहे. (सोबत परिशिष्ट-अ)

यानुषंगाने व्यवस्थापन समितीच्या दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६५ अन्वये व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष हे छाननी समितीचे सदस्य म्हणून निवड केलेली व तसे जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २६२७/ २०१६, दि.२७.०८.२०१६ रोजी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेत आले होते. (सोबत परिशिष्ट-ब)

आता, सासंवि- २०१६/ १३१४/ प्र.क्र.१६५/ का.१६, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, दि.०५.१०.२०१६ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाने खालील नमुद मुद्यांबाबतची माहिती शासनास तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी, असे कळविले आहे. (सोबत परिशिष्ट-क)

A- Honorarium to be paid and facilities to be given the High Court Judge to work on the Scrutiny Committee at Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.

B- Whether the Committee is full time or on part time basis, then how many sittings will be in a month.

C- Tenure of the said Committee.

D- Whether accommodation will be provided to the Hon'ble High Court Judge.

उपरोक्त मुद्यांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

A- याबाबत यापुर्वीच्या व्यवस्थापन समितीचे सन- २००४ ते २०१२ या कालावधीमध्ये अस्तित्वात असलेल्या छाननी समितीच्या अध्यक्षांना, मा.महा. प्रबंधक उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र.ए-१२१५/ २००५, दि.१५.१२.२००५ अन्वये दरमहा मानधन रु.१०,०००/- व कामाच्या दिवशी प्रतिदिनी रु.५००/- दैनिकभत्ता तसेच प्रवास भत्यापोटी दरमहा रु.४०००/- मात्र रक्कम देण्यात यावी, असे आदेशीत केलेले होते (सोबत परिशिष्ट-ड) व त्यावर तत्कालीन व्यवस्थापन समितीचे दि.०४.०३.२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५९ अन्वये उपरोक्त मानधन ठरविणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेशी चर्चा करुन अंतीम निर्णय घ्यावा, असे ठरले होते (सोबत परिशिष्ट-इ) व त्यानुसार छाननी समितीचे अध्यक्षांना मानधन आदा करणेत येत होते.

B- यापुर्वीच्या छाननी समिती अध्यक्षांना दरमहा मानधन आदा करणेत येत होते, म्हणजेच छाननी समिती ही पुर्णवेळ राहील. तसेच यापुर्वीच्या छाननी समितीच्या कार्यकाळामध्ये फक्त ६ बैठका झालेल्या होत्या.

C- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अधिनियम-२००४ मधील कलम २१, पोट-कलम (२) (दोन) मध्ये छाननी समितीचा कालावधी व्यवस्थापन समितीच्या कालावधीबरोबरच संपेल, अशी तरतूद आहे.

D- छाननी समिती अध्यक्षांनी मागणी केल्यास, त्यांची निवासव्यवस्था संस्थान निवासस्थानांमध्ये विनामुल्य करता येईल.

तरी श्री साईबाबा संस्थानच्या छाननी समितीवर अध्यक्ष नेमणूकीसाठी महाराष्ट्र शासनास आवश्यक असलेली माहिती सादर करणेसाठी उपरोक्त मुद्यांवर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीच्या कालावधीबरोबरच छाननी समितीचा कालावधी संपुष्टात येईल, अशी अधिनियम- २००४ मध्ये तरतूद आहे व मागील व्यवस्थापन समितीच्या कालावधीमध्ये छाननी समितीच्या फक्त ०६ बैठका झालेल्या आहेत, यावरुन संस्थानच्या छाननी समितीवर पुर्णवेळ अध्यक्षांची आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे छाननी समिती अध्यक्षांना मासिक मानधन देण्याऐवजी प्रती बैठक रु.१०,०००/- मात्र मानधन व येणे-जाणे करीता वाहनव्यवस्था तसेच शिर्डी येथे निवास, भोजन व्यवस्था मोफत करणेत यावे, असे ठरले व याप्रमाणे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **साईभक्तांना दर्शनाव्यतिरिक्त मंदिर परिसरात दररोज धार्मिक कार्यक्रम (साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन) चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष महोदय यांनी साईभक्तांना दर्शनाव्यतिरिक्त इतर वेळेमध्ये मंदिर परिसरात दररोज धार्मिक कार्यक्रम किर्तन, प्रवचन इत्यादी आयोजित करुन तो कार्यक्रम अगोदरच वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार त्याबाबतची व्यवस्था सुरु करणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ चे सभेत आयत्या वेळचा विषय नं.१५, निर्णय क्र.६७२ नुसार खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे- प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, मंदिर परिसरामध्ये दररोज धार्मिक कार्यक्रमाचे (साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन) आयोजन करणे व तसे संस्थानचे संकेस्थळावर प्रसिध्द करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. मंदिर परिसरामध्ये दररोज धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणेचे काम मंदिर विभागाने आहे त्याच कर्मचा-यांकडून करुन घ्यावे व श्री.सुधांशु प. लोकेगांवकर, संगीत व कला मार्गदर्शक यांनी त्यांचे काम संभाळून याकामी मंदिर विभागाने सुचविलेले काम करावे, त्यासाठी श्री.लोकेगांवकर यांना वेगळा भत्ता देण्यात यावा, असे ठरले. तसेच सदरहू ठिकाणी सादर होणारे कार्यक्रम श्रीसाईबाबांच्या विचारांशी सुसंगत असावेत, आक्षेपार्ह नसावेत, याकरीता कार्यक्रम सादर करणा-या कलाकारांना तसे कळविणेत यावे, अशा सुचना दिल्या.

**प्रस्ताव-** सदर निर्णयानुसार माहे-ऑक्टोबर-२०१६ पासुन दररोज दुपारी ४ ते सायं.६ असे ०२ तास (धुपारतीचे नियोजनानुसार त्या अगोदर) व सायं.७.३० ते रात्रौ १०.०० असे २.३० तास समाधी मंदिराचे उत्तरेकडील सारंजम बाग याठिकाणी धार्मिक कार्यक्रम (साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन) असे विविध प्रकारचे कार्यक्रम सुरु करण्यात आलेले आहेत. त्याकामी विविध कलाकारांना दुरध्वनी, ई-मेल व पत्राव्दारे त्यांची उपलब्ध तारीख, वेळ व मानधन इत्यादी माहिती घेण्यात आली आहे व त्यानुसार यादी माहे-ऑक्टोबर-२०१६ची यादी तयार करणेत आलेली आहे. परंतु, त्यामध्ये काही उर्वरित दिवसांकरीता कार्यक्रमाबाबतही विचारणा करण्यात येत आहे. तरी प्राप्त झालेल्या माहितीनुसार कलाकारांचे मानधन व उर्वरित दिवसांकरीता लागणारे मानधन इ. कामी माहे-ऑक्टोबर-२०१६ करीता अंदाजे खर्च रक्कम रु.४,५०,०००/- (अक्षरी रु.चार लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**विभागचा अभिप्राय-** तरी माहे-ऑक्टोबर -२०१६ साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन असे विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणेकामी आलेल्या कालकारांचे मानधन आदा करणेकामी माहे-ऑक्टोबर-२०१६ करीता अंदाजे **रु.४,५०,०००/-** (रुपये चार लाख पंन्नास हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. तरी दैनंदिन होणा-या

कलाकार हजेरीच्या कार्यक्रमाकरीता निमंत्रीत केलेल्या कलाकारांना सदर खर्चाची रक्कम लेखाशाखेतुन घेऊन आदा करणेकामी सदर विषय मा.व्यवस्थापन समितीची मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.७३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू कार्यक्रमांसाठी विनामुल्य कार्यक्रम सादर करणाऱ्या कलाकारांना प्राधान्य देण्यात यावे व तसे आवाहन करणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री.आर.पी.हजारे, एअरपोर्ट डायरेक्टर, शिर्डी एअरपोर्ट, म.वि.वि.कं. यांचे दिनांक २४.०९.२०१६ रोजीचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २१.०६.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ५२९.

**प्रस्ताविक-** श्री.आर.पी.हजारे, एअरपोर्ट डायरेक्टर, शिर्डी यांनी त्यांचे दिनांक २४.०९.२०१६ रोजीचे पत्रात "शिर्डी विमानतळ दिनांक १ नोव्हेंबर २०१६ रोजी सुरु होणार असून सुरक्षा कर्मचारी आणि परिचालन कर्मचारी नेमण्यात आले आहेत. सदर कर्मचा-यांना विविध प्रशिक्षण देण्यासाठी झिरो नंबर कॉन्फरन्स रुम आवश्यकतेनुसार देण्यात यावा. कॉन्फरन्स रुमसंबंधी विनंती आगाऊ देण्यात येईल. सदर प्रशिक्षण संपूर्ण वर्षभर सुरु राहणार असल्यामुळे वेळोवेळी आवश्यकता भारणार आहे. आवश्यकतेनुसार कॉन्फरन्स हॉल उपलब्ध करुन देण्यात यावा ही विनंती." असे कळविलेले आहे.

श्री.आर.पी.हजारे, एअरपोर्ट डायरेक्टर, शिर्डी यांनी शिर्डी विमानतळ दिनांक १ नोव्हेंबर २०१६ रोजी सुरु होणार असून सुरक्षा कर्मचारी आणि परिचालन कर्मचारी नेमण्यात आले असून सदर कर्मचा-यांना विविध प्रशिक्षण देण्यासाठी झिरो नंबर कॉन्फरन्स रुम आवश्यकतेनुसार देण्यात यावा. सदर प्रशिक्षण संपूर्ण वर्षभर सुरु राहणार असल्यामुळे वेळोवेळी आवश्यकता भारणार आहे यासाठी आवश्यकतेनुसार कॉन्फरन्स हॉल उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे.

मात्र याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २१.०६.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ५२९ (४) मध्ये, "शिर्डी येथे विविध क्षेत्रातील मान्यवर श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येतात. त्यावेळी संस्थानच्या लेंडीबागेतील सभागृहामध्ये पत्रकार परिषद घेत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. संस्थानशी संबंधित नसलेल्या विषयांबाबत कोणतीही पत्रकार परिषद संस्थान आवारात घेता येणार नाही. असे सर्व पत्रकारांना कळविण्यात यावे. सभागृहाचे वापरासाठी जनसंपर्क अधिकारी यांनी प्रथम वरिष्ठ अधिका-यांची पुर्व परवानगी घ्यावी जनसंपर्क अधिकारी यांचे सुचने शिवाय सभागृह उघडून न देणेबाबत तेथील कर्मचा-यांना सक्त सुचना द्याव्यात." असा निर्णय झालेला असून त्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे. श्री.हजारे यांनी विमानतळावर नेमलेल्या कर्मचा-यांचे प्रशिक्षणासाठी वर्षभर आवश्यक्तेनुसार झिरो नबंर कॉन्फ्रन्स रुम मिळाणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच लेंडीबागेतील झिरो नंबर सभागृहात वेळोवेळी संस्थानच्या विविध सभा, कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे श्री.हजारे यांनी मागणी केल्यानुसार त्यांना संस्थानचा झिरोनंबर हॉल वर्षभरात आवश्यक्तेनुसार प्रशिक्षणासाठी देणे उचित होणार नाही. तरी श्री.हजारे यांना विमानतळावर नेमलेल्या कर्मचा-यांना वर्षभर आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणेसाठी शासकीय विश्रामगृह शिर्डी येथील कॉन्फरन्स हॉल घेणेबाबत कळवावे असे मत आहे.

**मागणी-** श्री.आर.पी.हजारे, एअरपोर्ट डायरेक्टर, शिर्डी यांना विमानतळावर नेमलेल्या कर्मचा-यांना वर्षभर आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणेसाठी झिरो नंबर कॉन्फ्रन्स रुम देणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे साईनिवास येथील झिरो नंबर सभागृहात वेळोवेळी संस्थानच्या विविध सभा, कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २१.०६.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ५२९ (४) नुसार संस्थानशी संबंधित नसलेल्या विषयांबाबत कोणतीही पत्रकार परिषद संस्थान आवारात घेता येणार नाही असा निर्णय झालेला आहे. तरी श्री.हजारे यांना विमानतळावर नेमलेल्या कर्मचा-यांना वर्षभर आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणेसाठी शासकीय विश्रामगृह शिर्डी येथील कॉन्फरन्स हॉलची मागणी करावी असे कळविता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.आर.पी.हजारे, एअरपोर्ट डायरेक्टर, शिर्डी यांना विमानतळावर नेमलेल्या कर्मचा-यांना वर्षभर आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणेसाठी झिरो नंबर कॉन्फरन्स हॉल उपलब्ध करुन न देता त्यांनी याकामी इतरत्र जागेची पहाणी करावी, याबाबत त्यांना कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **साईभक्तांच्या सुविधेसाठी खोल्यांमध्ये ठेवणेत येणारे प्लॅस्टीक साहित्य खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील:-** २१ (१) (ग) "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्तावना:-** या अधिनियमातील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व त्यातील सुविधा करण्यात येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवास साईभक्तांच्या निवास व्यवस्थेसाठी दि.११/०४/२०१३ पासून सुरु करण्यात आलेले असून या ठिकाणी १२ इमारतीमधून १५३६ खोल्या आहेत.

साईभक्तांच्या सुविधेसाठी खोल्यांमध्ये विविध प्रकारचे प्लॅस्टिक साहीत्य ठेवणेत आलेले आहे. त्यामध्ये प्लॅस्टिक खुर्ची, जग, मग, डस्टबीन व बादली अशा प्रकारच्या वस्तू आहे. तसेच प्रत्येक इमारतीच्या लिफ्टमध्ये लिफ्ट ऑपरेटर, प्रशासकीय इमारतीमध्ये सिक्युरिटी गार्ड व कार्यालय शिपाई यांना बसणेकरीता प्लॅस्टिक स्टूल ठेवणेत आलेले आहे.

इकडील विभाग चालू होऊन तीन वर्ष पुर्ण झाले असुन सदरचे साहीत्य खराब होत आहे. तसेच या वस्तू सततच्या वापरामूळे फुटतूट व निरुपयोगी होत आहेत. जून्या वस्तूच्या जागेवरती नवीन वस्तूची आवश्यकता असल्याने सदरच्या वस्तू खरेदी करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव:-** दि.०४/१२/२०१६ रोजी साईआश्रम भक्तनिवास येथे देश विदेशातील साईचे मंदिराचे प्रतिनिधी यांचे चर्चासत्र आयोजीत करण्यात येणार असुन, त्यांची निवासाची व्यवस्था साईआश्रम भक्तनिवास येथे करण्यात येणार आहे.

सध्या वापरास असलेले प्लॅस्टिक साहीत्याच्या वापरास ३ वर्ष ५ महिने होऊन गेलेले आहेत. सदरचे साहीत्य खराब झालेले असल्याने साईभक्तांच्या सुविधेसाठी खोल्यांमध्ये ठेवणे योग्य नाही. तरी सदरचे साहित्य तातडीने खेरदी करणे गरजेचे आहे.

खालील तपशीलात नमुद केलेले साहीत्य खरेदीकामी बाजारभाव गृहीत धरुन अंदाजे रुपये २,९३,२५०/- इतका खर्च अपेक्षित असुन सदरच्या खर्चाची तरतुद सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात करण्यात आलेली नाही. परंतु सदरच्या वस्तु तातडीने खेरदी करणे गरजेचे असल्याने सन २०१६-१७ च्या सुधारित अंदाजपत्रकात रु.२,९३,२५०/- खर्चाची तरतुद करता येईल.

| अ.नं. | तपशील | वर्णन / क्षमता | कंपनी | मागणी नग |
|---|---|---|---|---|
| १ | प्लॅस्टिक जग | २ लिटर | नामांकीत कंपनीचे | १,२०० |
| २ | प्लॅस्टिक मग | १ लिटर | नामांकीत कंपनीचे | २,१०० |
| ३ | प्लॅस्टिक बादली | ११ लिटर | नामांकीत कंपनीचे | १,४५० |

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** विभागामार्फत विहीत पध्दतीने दरपत्रके मागणी करुन प्लॅस्टिक साहीत्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सुविधेसाठी साईआश्रम भक्तनिवास इमारतींमधील खोल्यांमध्ये प्रस्तावात नमुद केलेले प्लॅस्टीक साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६** **संस्थान प्रकाशित श्री साई सच्चरित- मराठी पोथीमधील ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे रंगीत फोटो दर्शन लाईनमध्ये लावणेकरीता देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक-** उपरोक्त विषयानुसार श्री. अतुल श्रीकांत राखे, बडोदा (गुजरात) यांनी संस्थान प्रकाशित कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर कृत मुळ मराठी श्री साई सच्चरित या ग्रंथातील प्रत्येक अध्यायातील वर्णनानुसार ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे फोटो ब्लॅक एण्ड व्हाईट मध्ये आहेत. सदरच्या फोटोवरुन त्यांना (ऑईल- ऑन केनवास) कलरमध्ये फोटो तयार करणेस संस्थानमार्फत जा.न.एसएसएस/वशी/प्रकाशने/१७६/२०१६ दि. ११.०४.२०१५ नुसार परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी फोटो व सीडी संस्थानला जमा केल्या आहेत.

सदर चित्रांची रंगीत २.५'X३.५' आकारात पेन्टीग स्वरुपात फ्रेममध्ये त्यांनी फोटो तयार केले आहे. फोटो दर्शन लाईनमध्ये लावल्यास भक्तांना चित्राचे अवलोकन होईल व साईबाबांच्या जीवन व कार्याची माहिती मिळू शकेल. ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे पेन्टींग स्वरुपात फ्रेममध्ये असलेले फोटो संस्थानने देणगी स्वरुपात स्वीकारणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

**प्रस्ताव-** संस्थान प्रकाशित कै. गोविंद रघुनाथ दोभाळकर कृत मराठी श्री साईसच्चरित्र हा मुळ ग्रंथ आहे. या ग्रंथातील प्रत्येक अध्यायातील वर्णनानुसार ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे फोटो ब्लॅक एण्ड व्हाईट वरुन श्री. अतुल श्रीकांत राखे यांनी २.५'X३.५' आकारात पेन्टींग स्वरुपात फ्रेममध्ये फोटो तयार केले आहे. सदरचे फोटो दर्शन लाईनमध्ये लावल्यास दर्शनलाईन मधील भक्तांना वर्णनानुसार रेखाटलेल्या चित्रांचे अवलोकन होईल व साईबाबांच्या जीवन व कार्याची माहिती मिळु शकेल. त्यामुळे ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे पेन्टींग स्वरुपात फ्रेममध्ये असलेले फोटो संस्थानने देणगी स्वरुपात स्वीकारणेस हरकत नाही असा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०७.०८.२०१६ रोजीच्या सभेत निर्णयार्थ सादर केलेला होता.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णयः-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०८.२०१६ रोजीचे सभेत "श्री साई सच्चरित मराठी पोथीमधील ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे फोटो देणगी स्वरुपात स्विकारणेस मान्यता देण्यात आली परंतू सदरहू ५२ फोटो दर्शन लाईनमध्ये लावणेकामी श्री साई सच्चरित- मराठी पोथीमधील अध्यायाच्या आशयाचे आहेत का, याची खात्री करावी व तसा प्रस्ताव समिती समोर सादर करावा "असा निर्णय क्र. ४५४ नुसार झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** "श्री.अतुल श्रीकांत राखे, बडोदा (गुजरात) यांनी २.५'X३.५' आकारात पेन्टींग रंगीत फ्रेममधील फोटो व साई सच्चरित- मराठी पोथीमधील ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे फोटो अध्यायामधील आशयाचे कथेमधील प्रसंग चित्रावर असून ते नमुन्या बरहुकूम आहेत याची खात्री झाली असून दर्शन रांगेत लावणेकामी सदर फ्रेम फोटो देणगी दाखल स्विकारावेत असा प्रकाशने विभागाचा अभिप्राय आहे."

सदर ५२ फ्रेम फोटो नमुने व संस्थान प्रकाशित श्री साई सच्चरित- मराठी पोथीमधील कृष्णधवल फोटो एकच आहेत, फक्त सदर फोटो केनवास प्रकारत ०४ रंगात रंगीत (ऑईल ऑन केनवास) करुन चित्रे रंगविली आहेत, तसे नमुने मा. व्यवस्थापन समिती सभेच्या प्रसंगी समोरील हॉलमध्ये ५२ फ्रेम फोटो आपल्या अवलोकनार्थ प्रत्यक्ष सादर करीत आहोत.

सबब श्री.राखे, बडोदा यांनी तयार केलेले २.५'X३.५' आकारातील पेन्टींग स्वरुपात फ्रेममधील ५२ फोटो दर्शन लाईनमध्ये लावणेकामी देणगी स्वरुपात स्वीकारणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.राखे, बडोदा यांनी तयार केलेले २.५'X३.५' आकारातील पेन्टींग स्वरुपात फ्रेममधील ५२ फोटो हे श्री साईचरित्र ग्रंथामधील अध्यायांशी सुसंगत आहेत का, याची पुरातत्व विभागाचे श्री.गोरक्षकर यांचेकडून खात्री करुन घेण्यात यावी, त्यानंतर देणगी स्वरुपात स्विकारणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **श्री साईबाबा संस्थान शिर्डीकरीता निळवंडे उद्धव घेऊन, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-** संस्थानचा WTP हा १९९२ साली तयार करणेत आलेला असून तो ६.६० MLD क्षमतेचा आहे. प्रस्तावित WTP हा २३ MLD क्षमतेचा आहे व साठवण तलावाची क्षमता ही ३३२ ML आहे. सदरहू साठवण तलावातील पाणीसाठा हा साधारणत ४० ते ४५ दिवस पुरतो. सदरची पाणी पुरवठा योजना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी अशी संयुक्त पाणी पुरवठा योजना आहे. सदर योजनेतून श्री साईबाबा संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी या गावांसाठीही पाणी पुरवठा करण्यात येतो.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ. कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दि.१३/०१/२०१४ रोजी शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोवतालची २ गांवे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे या योजनेची एकुण किंमत रु.२१५.९७ कोटी असून, त्यापैकी योजनेतील २ गावांसाठी किंमत रु.१९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु.२१५.९७ – रु.१९.०४ **= रु.१९६.९३ कोटी** इतकी किंमत येते. सदर योजनेत संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना मंडळ, अहमदनगर यांचे मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण नागरी व ग्रामीण, ठाणे यांना अग्रषित दि.०७/०२/२०१३ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार, या योजनेचे सर्वेक्षणाचे वेळी खात्रीशीर उदभव म्हणून प्रामुख्याने १) निळवंडे धरण. २) मुळा धरण. ३) गोदावरी उजवा तट कालवा यांचा विचार करण्यात आलेला असून, निळवंडे धरणाचे अंतर जरी जास्त असले तरी पाणी हे गुरुत्ववाहिनीने येत असल्याने योजना तयार करणे किफायतशीर होणार आहे हे गृहीत धरुन निळवंडे धरणात पाणी आरक्षण प्रस्ताव पाटबंधारे खात्याकडे पाठविण्यात आलेला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्भव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणांतून पाणी आरक्षणास पाटबंधारे खात्याची तत्वत: मान्यता आहे. पाटबंधारे खात्याच्या दि.१०/०४/२०१३ च्या पत्रान्वये सदरहू प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेसाठी १४.६५ दलघमी (५१७.२९ दलघफु) आरक्षणाचा प्रस्ताव असून, रु.१८३.९३ कोटी हिस्सा शिर्डी संस्थानने उचलावा, असे कळविण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे योजनेची किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी मात्र इतकी रक्कम होते.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे **दि.१७/०७/२०१४** रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

**"** *श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीकरीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन आणणेच्या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे संस्थान आणि शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायसवरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरीकांबरोबरच साईभक्तांनाही याचा लाभ होणार आहे. तसेच श्री साईबाबा शताब्दी महोत्सवापुर्वी याबाबत कार्यवाही होणे गरजेचे असल्याने सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घेवून स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक व आवश्यक लोकवर्गणी उपलब्ध करुन देणे समितीला आवश्यक वाटते.*

*यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावित बाब धोरणात्मक व मेजर फायनान्शीयल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.* **"**

वाढीव शिर्डी संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी संयुक्तीक प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेविषयी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन ॲड. आर.एन.धोर्डे यांचेमार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. १२३४६/२०१४ दाखल करण्यात आलेले होते.

प्रस्तुत सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये मे.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी व दि.२१/०४/२०१६ रोजी तारीख नेमलेली होती. उपरोक्त सिव्हील अर्जामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दि.२२/१२/२०१४ व दि.२१/०४/२०१६ रोजीचे आदेशान्वये सदर प्रकरणी शासनास त्यांचे म्हणणे त्वरीत सादर करणेबाबत आदेश दिलेले होते.

मा.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी सदर योजनेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत दिलेल्या आदेशान्वये मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे जा.क्रं.एसएसएस/ वशी/पाणीपुरवठा/४०२६/२०१५, दि.१९/१०/२०१५ व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/१३९०/२०१६, दि.२२/०६/२०१६ अन्वये प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.१५/०७/२०१६ रोजी दिलेले आदेशात सरकारी वकील यांनी सादर केलेल्या म्हणण्यानुसार या प्रकरणी या तारखेपासून पुढील चार आठवडयात पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांची तांत्रिक मान्यता घेवून पुढील दोन आठवडयात प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येईल असे आदेशात नमुद आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रंसासंवि-२०१५/१००७/ प्र.क्र.१७७/ का.१६ दि.१९/०७/२०१६ रोजीचे प्राप्त पत्रानुसार प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निर्देशास अनुसरुन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने सुचित केल्याप्रमाणे या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थानमार्फत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे सादर करावा तसेच या संदर्भात व्यक्तिश: पाठपुरावा करुन अधिकाधिक तीन आठवडयाच्या कालावधीत तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेवून मान्यता प्राप्त प्रस्ताव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी या विभागास सादर करण्यात यावा असे कळविण्यात आलेले होते.

याबाबत महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रंसासंवि-२०१५/१००७/ प्र.क्र.१७७/ का.१६, दि.१९/०७/२०१६ अन्वये प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निर्देशास अनुसरुन जा.नं.एसएसएस/ वशी/ पाणी पुरवठा/२०१६, दि.२७/०७/२०१६ अन्वये या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग नाशिक यांना सादर करणेत आलेला होता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत जा.क्रं/मुअ/नाशिक/तांशा-२/१५२७/२०१६, दि.१२/०८/२०१६ रोजीचे पत्रान्वये प्राप्त झालेले आहे. त्यानुसार रु.१६३४२.९६ लक्ष निव्वळ व रु.१९१९१.४० लक्ष ढोबळ (९% ETP Charages सह ) किमतीचे सविस्तर अंदाजपत्रक व आराखडयांना बाब क्रं.३० माहे ऑगस्ट २०१६ पत्र क्रं.मजीप्रा/तांमा/१५३२, दि.१२/०८/२०१६ नुसार तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये लाखो साईभक्त श्री साईचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील. त्यावेळी साईभक्तांची गैरसोय होवू नये यासाठी सदरहू योजना तातडीने पूर्ण होवून कार्यान्वित होणे गरजेचे असलेने महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७/का.१६ दि.१९/०७/२०१६ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार, तांत्रिक मान्यता घेवून योजना तांत्रिक मान्यतेसह विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावी असे निर्देश दिलेले असलेने, जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/२५७३/२०१६, दि.२३/०८/२०१६ अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत आलेला होता.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/ प्र.क्र.१७७/का.१६, दि.३१ ऑगस्ट, २०१६ अन्वये पुढीलप्रमाणे शासन निर्णय पारीत झालेला आहे.

*" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था येथे सध्या असणारी पाण्याची कमतरता विचारात घेता श्री साईबाबा महासमाधी शताब्धी महोत्सवाच्या कालावधीत शिर्डीमध्ये येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये व त्यांना मुबलक स्वरुपात पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मुख्य अभियंता (प्रभारी) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव शिर्डी संस्थान, पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) या योजनेच्या रु.१६३,४२,९५,५५५/- निव्वळ व रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ (९% ETP Charges सह तसेच रु.१८३९३.०० लक्ष निळवंडे धरण हिस्सा वगळून) किमतीच्या अंदाजपत्रकासह सदर योजनेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. "*

१. *सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.*

२. *सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर निधी पूर्ण ठेव पध्दतीने ठेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाव्दारे ही योजना केवळ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थानसाठी राबविण्यात येईल.*

३. *योजनेसाठी आवश्यक उद्भव प्रमाणपत्र, पाणी आरक्षण, पाणी गुणवत्ता तपासणी अहवाल उपांगासाठी लागणा-या जमिनीची संमतीपत्रे व अनुषंगिक परवानग्या प्राप्त झाल्याशिवाय योजनेचे कार्यादेश देण्यात येऊ नयेत.*

४. *योजनेची अंमलबजावणी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार ई-निविदा मागवून पारदर्शक पध्दतीने करण्यात यावी.*

५. *सदर योजनेच्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटींची काटेकोरपणे पुर्तता करण्यात यावी.*

६. *योजनेचा उद्भव विकसीत केल्याशिवाय इतर कामे करु नयेत. योजनेचा उद्भव भूपृष्ठीय व शाश्वत असल्यास अधिक्षक अभियंतांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतरच पुढील सर्व कामे हाती घेण्यात यावीत.*

७. *योजनेची अंमलबजावणी करताना समाज व्यवस्थापन तत्वांचा अवलंब करणे तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग परिपत्रक दि.०५/०८/२०१४ व्दारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील*

८. *योजनेची कामे नियोजनानुसार विहीत कालावधीत पूर्ण करण्यात यावीत. योजनेचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल त्रैमासिक बार चार्ट स्वरुपात विधी व न्याय विभाग व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत शासनास सादर करण्यात येईल.*

९. *योजनेची १०० % कामे पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदार, कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान यांनी जिल्हा तांत्रिक समितीच्या सदस्यासह योजनेची संयुक्त पाहणी करावी. तदनंतर कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर योजना भौतिक दृष्टया पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच योजना पूर्ण झाली असे समजण्यात येईल.*

१०. *भौतिकदृष्टया पूर्ण झालेली योजना अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे त्वरीत हस्तांतरीत करण्यात येईल.*

११. *पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-७, दि.१५/०७/२०१५ नुसार योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणे अनिवार्य राहील.*

१२. *पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-७, दि.०७/०७/२०१४ नुसार सदर योजना पूर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष ही योजना राबविणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. तदनंतर योजनेच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील.*

१३. *सदर योजनेच्या प्रगतीप्रमाणे खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे व योजनेच्या पुर्णत्वाचे दाखले संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांकडून प्राप्त करुन घेऊन शासनास सादर करण्याची जबाबदारी कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील."*

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/का.१६, दि.३१ ऑगस्ट, २०१६ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेस वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदरहू शासन निर्णयाची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडली आहे.

तरी विषयांकित योजनेबाबत वर नमूद शासन निर्णयास अनुसरुन पुढील कार्यवाही करणेसाठी सर्वप्रथम खालील बाबींविषयी निर्णय होणेकरीता मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

१. सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करणे.

२. सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत करणे.

३. श्री साईबाबा समाधी महोत्सव कालावधीत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये याकरीता योजनेतील WTP, RCC MBR Pure Water Gravity Mains, Pure water Rising Main, Automation, Pumping Machinery, ESR, Distribution Network या उपांगांची कामे पहिल्याटप्प्यात हाती घेणेकामी कार्यवाही करणे .

४. शासन निर्णयातील इतर अटी-शर्तीबाबत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेशी चर्चा करुन पुढील कार्यवाहीची रुपरेषा ठरविणे.

तरी सदरहू प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान शिर्डीकरीता निळवंडे उद्भव घेऊन, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेचे काम संस्थानमार्फत करावे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत करावे याबाबतचा तौलानिक प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्प बांधकामासाठी कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा.बां.) अहमदनगर यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्पाचे बांधकाम परवानगीसाठी संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडे दि.२१/०७/२०१६ रोजी अर्ज करण्यात आलेला आहे. शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत दि२५/०७/२०१६ रोजी मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचेकडे सुधारीत बांधकाम विकास व नियंत्रण नियमावली २०१३ नुसार तांत्रिक तपासणी होऊन अभिप्राय मिळणेसाठी प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांनी काही त्रुटी कळविलेल्या आहेत. त्यामुळे बांधकाम

परवानगी देता येत नाही असे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी कळविले आहे. मा. सहाय्यक संचालक नगररचना, अहमदनगर यांचेकडील दि.०६/०८/२०१६ रोजीचे तांत्रीक छाननी अहवालात, मुद्दा क्र. ११ *"अहमदनगर-मनमाड रस्ता आता सिन्नर-अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रं.१६० झाल्याने सदर रस्त्याची प्रस्तावित आखणी शिर्डी शहरातून जात असल्यास त्या अनुषंगाने सदर रस्त्यास ६० मी. रुंद प्रस्तावित करावा लागेल याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभागाचे स्पष्ट पत्र व रस्ता आखणीबाबतचे अभिप्राय आवश्यक आहेत. तसेच सेवा रस्त्याबाबतचा अभिप्राय आवश्यक आहेत"* याप्रमाणे नमूद केलेला आहे. त्यानुसार रेखांकन नकाशानुसार बांधकाम करणेबाबत ना हरकत दाखला मिळणेकामी मा. कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां) विभाग अहमदनगर यांना जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५६३/२०१६, दि.२२/०८/२०१६ रोजीचे पत्रान्वये विनंती करण्यात आली होती.

याबाबत मा.कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां)विभाग अहमदनगर यांचे कार्यालयाकडून उपरोक्त विषयांकित कामाबाबत संस्थानतर्फे हमीपत्र करणेसाठी खालील मसूदा बांधकाम विभागाचे प्रतिनिधीकडे समक्ष देण्यात आलेला आहे.

***हमीपत्र***

***हमीपत्र लिहून देणारः-*** *कार्यकारी अधिकारी,*
*श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.*

***हमीपत्र लिहून घेणारः-*** *कार्यकारी अभियंता,*
*जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां.) विभाग,*
*अहमदनगर.*

*मी/ आम्ही कार्यकारी अधिकारी हमीपत्र लिहून देतो की, आमचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे सर्व्हे नं./ गट नं.२/४, ३०/१, ३/७ क्षेत्र हेक्टर (२५५००चौ.मी.) ही जमीन आपले खात्याच्या अखत्यारीतील रस्ता कोपरगाव, अहमदनगर रस्ता प्र. रा. मा. ८ (नविन रा. म. मा. १६०) वरील सा. क्र.९२/२०० वर रस्त्याचे डाव्या बाजूस येत असून, सदर जमीन/क्षेत्रामध्ये प्रस्तावित दर्शन रांगेचे बांधकामासाठी परवानगी साठीचे प्रस्तावाकरीता खालील शर्ती व अटी मला मान्य असलेचे हमीपत्र लिहून देत आहे.*

*१. प्रस्तावित दर्शन रांगेचे कोणतेही बांधकाम रस्त्याच्या मध्यापासून नियंत्रण रेषा ३७ मीटर अंतराच्या आत करणार नाही.*

*२. सध्यस्थितीत रस्त्याचे डाव्या बाजूस रस्ता मध्यापासून २५ मीटर अंतरावर असलेले आर.सी.सी. बांधकाम आम्ही स्वखर्चाने काढून घेणार असून प्रस्तावित दर्शन रांगेचे बांधकाम नियंत्रण रेषेच्याबाहेर नकाशात दर्शविल्याप्रमाणे करण्यात येणार आहे.*

*३. सदर कोपरगाव-अहमदनगर रस्ता प्रामा ८ (जूना रा. मा. १०) हा रा. म. मा. १६० असा दर्जोन्नत झालेला असून भविष्यात रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यकता भासल्यास सदरचे बांधकाम स्वखर्चाने काढून घेण्यास आम्ही तयार आहोत. याबाबत आम्ही कोणतीही नुकसान भरपाई सा.बां. खात्याकडे मागणार नाही. तसेच कोणताही वाद न्यायालयात उपस्थित न करता रस्ता रुंदीकरणास जागा उपलब्ध करुन देऊ.*

*४. सदर जागेत जाण्या-येण्यासाठी या मार्गास समांतर रस्त्याचे हद्दीबाहेर सेवा रस्त्याची तरतूद करेन. त्यासाठी आपले खात्याची वेगळी परवानगी घेऊ.*

*५. सदर जागेत जाण्यासाठी राज्य मार्गावरील रस्त्यावरील दुभाजक खंडीत (गॅप) करणार नाही.*

*६. सदर क्षेत्रामध्ये बांधकाम करण्यापूर्वी महसूल विभागाची ज्या प्रयोजनासाठी बांधकाम करावयाचे आहे त्या प्रयोजनासाठीची अकृषीक परवानगी तसेच योग्य ती अंतिम परवानगी घेणे ही आमची जबाबदारी राहील.*

*७. सदर जागेत बांधकाम करण्यापूर्वी तसेच बांधकामातील बदल करावयाचे झाल्यास आपले खात्याची स्वतंत्र परवानगी घेऊ. तसेच जाहीराती बोर्ड/ फलक पूर्व परवानगीशिवाय लावणार नाही.*

*८. सदर जमीनीच्या लगत/ जवळपास जिल्हा परिषद/नगरपरिषद/नगररचना/सा.बां.विभाग/ग्रामपंचायत यांचे अखत्यारीतील रस्ते असल्यास त्याची स्वतंत्र परवानगी घेऊ.*

*९. सदरील क्षेत्र हे रस्त्यालगत असल्याने जोडरस्ता व त्यावरील नळकांडी पूल स्वखर्चाने बांधेल. जोड रस्त्याचे/ अथवा सदर जागेवर कोणतेही बांधकाम किंवा वापर करण्यापूर्वी खात्याची पूर्वपरवानगी भाडेपट्टा, पुलाचे नकाशे व अंदाजपत्रके मंजूर करुन घेणे आमचेवर बंधनकारक राहील.*

*१०. रस्त्यालगत अथवा रस्ता हद्दीत साईडपट्टीवर रस्ता पातळीपेक्षा जास्त उंच भराव करणार नाही व पावसाचे पाणी अथवा सांडपाणी रस्त्यावर सोडणार नाही. राज्य मार्ग व सदर जागा यामध्ये साईड गटार ठेवण्यात येईल.*

*११. नगररचना विभाग यांच्याकडून मंजुर नकाशाप्रमाणे काम पुर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या आत पोहच मार्गाचा प्रस्ताव आपले कार्यालयास सादर करुन मंजुरी घेऊन शासन निकषानुसार भु-भाडे वेळोवेळी अदा करणेत येईल.*

*१२. महाराष्ट्र शासनD:\Sai Shatabdi\Hamipatra..docx निर्णय क्र. आरबीडी/१०८१/८७१/रस्ते-७, मंत्रालय, मुंबई दि.०९ मार्च, २००१ अन्वये रिबन डेव्हलपमेंट रुल्स व अर्बन डेव्हलपमेंट नियमात वेळोवेळी होणा-या सर्व दुरुस्ती सहीतचे तसेच रस्ता दर्जोन्नत झालेस लागु होणा-या नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल.*

*१३. विषयांकित मिळकतीची मालकी/ हद्द/ क्षेत्राबाबत पडताळणीची जबाबदारी महसूल विभागाची असेल तसेच चर्तु:सिमा बाबत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी आमची व आमचे वास्तुविषारदाची राहिल.*

*१४. वर नमुद केलेल्या अटींपैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन/ भंग झाल्यास किंवा सादर केलेली कागदपत्रे खोटी आढळल्यास ना हरकत पमाणपत्र रद्द करणेस आमची संमती आहे.*

***हमीपत्र लिहून देणार***

तरी श्री साईबाबा मंदीर दर्शनरांग प्रकल्प बांधकामाबाबत कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां.) विभाग, अहमदनगर यांचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेकामी संस्थानतर्फे वरील मसुद्याप्रमाणे हमीपत्र मा. कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने करणेसाठी सदहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदीर दर्शनरांग प्रकल्पबांधकामाबाबत कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां.) विभाग, अहमदनगर यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणेकामी, संस्थानतर्फे प्रस्तावित मसुद्याप्रमाणे हमीपत्र मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने सादर करणेत यावे.**

**तसेच, सध्याच्या दर्शन रांगेमधील फरशी, भिंती, प्रसाधनगृह खराब झालेले असून, ते व इतर अनुषंगीक दुरुस्ती तातडीने करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **सन २०१६-१७ करीता बिस्कीटे खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१६-१७ चे किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे Circulatory Agenda व्दारे सादर केलेले प्रस्तावात संस्थानला बिस्कीटे पुरविणेसाठी फक्त एका निविदाधारकाने प्रतिसाद दिला होता. परंतु तो तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरला होता, त्यामुळे त्याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया करण्याचे व तूर्त मागील निविदाधारकाकडून १ महिना आवश्यक असलेली बिस्कीटे खरेदी करण्याचे निर्देश दि.१०/६/२०१६ रोजी झाले होते.

त्यास अनुसरुन बिस्किटे खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२३.०६.२०१६ ते दि.०५.०७.२०१६ या कालावधीत दुस-यांदा फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. तसेच तांत्रीक निविदा व नमुने (Technical Bid) स्विकारणेचा कालावधी दि.०६.०७.२०१६ ते दि.०७.०७.२०१६ असा ठेवण्यात आलेला होता. सदर ई निविदेमध्ये बिस्किटासाठी २ ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे, त्यास मा.प्रशासकीय अधिकारी यांचे पूर्व मान्यतेने पुन्हा ७ दिवसांची म्हणजेच दि.१२/७/२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. याकामी दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्रथम एकत्रित निविदा, दुस-यांदा फेरनिविदा व तिस-यांदा ७ दिवसांची मुदतवाढ दिल्यामुळे याकामी आलेल्या दोन ई-निविदांच्या तांत्रिक निविदा दि.२५.०७.२०१६ रोजी उघडण्यात आल्या होत्या.

सदर दोन्हीही निविदा तांत्रीक दृष्ट्या पात्र ठरल्यामुळे या दोन ई-निविदांचे कमर्शियल बीड दि.२२.०८.२०१६ रोजीचे मा.उपसमितीचे सभेत उघडणेकामी प्रस्ताव सादर केला असता, दोनच निविदा असल्याने सदर खरेदी प्रक्रिया रद्द करुन पुन्हा ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी तसेच यामध्ये श्री रामदेव बाबा यांचे पतंजली बिस्कीट शिर्डी येथे संस्थानचे कॅन्टीनवर उपलब्ध करण्यासाठी त्यांचेशी संपर्क करणेत यावा, असा निर्णय झालेला आहे.

सध्या एक महिन्यासाठी (सप्टेंबर-२०१६) बिस्कीटे खरेदी करणेबाबत मागील पुरवठादार मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/२६७५/२०१६ दि.३०.०८.२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तसेच याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया करण्यात येत आहे. तथापि फेर ई-निविदा प्रक्रियेस कमीत-कमी दोन महिने कालावधी लागणेची शक्यता असल्यामुळे, अजून एक महिन्यासाठी (ऑक्टोबर-२०१६) खालीलप्रमाणे आवश्यक असणारी बिस्कीटे खरेदी करावे लागतील.

| अ.नं. | मालाचे नांव | कंपनी | मागणी | दर प्रती पुडा (रुपयांमध्ये) | एकूण रक्कम (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बिस्किटे ग्लुकोज लहान | पारले | ५८,५०० पुडे | ३.७८ | २,२१,१३०.०० |
| २ | बिस्किटे ग्लुकोज मोठा | पारले | ५,००० पुडे | ७.५६ | ३७,८००.०० |
| ३ | बिस्किटे नमकिन लहान | पारले | २५,००० पुडे | ३.७० | ९२,५००.०० |
| ४ | बिस्किटे स्नॅक्स लहान | पारले | ४१,७०० पुडे | ३.७० | १,५४,२९०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | बिस्किटे मारी लहान | पारले | १६,७०० पुडे | ३.७० | ६१,७९०.०० |
| | | | | **एकुण रक्कम रु.** | **५,६७,५१०.००** |
| **रुपये पाच लाख सदुसष्ट हजार पाचशे दहा मात्र** | | | | | |

तरी उपरोक्तप्रमाणे एक महिन्याकरीता (ऑक्टोबर-२०१६) कॅन्टीनमार्फत साईभक्तांना बिस्कीटे पुरविणेची सेवा देण्यात अडचण निर्माण होऊ नये म्हणून वरील नमूद तपशीलाप्रमाणेच एक महिन्या करीता रक्कम रु.५,६७,५१०/- (रु.पाच लाख सदुसष्ट हजार पाचशे दहा) मात्रची बिस्किटे मागील पुरवठाधारक मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांचेकडून नमूद मंजुर ईनिविदा दराने खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ करीता बिस्कीटे खरेदी करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** **महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहीकांचा प्रकल्प राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.७४२** **सदरहू प्रस्ताव रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **एम.आर.आय. मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत प्रस्ताव फेरसादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागाकरीता वरील संदर्भीय पुरवठा आदेशान्वये मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून Magnetom Avanto मशीन एकुण रू. 5,05,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदरचे मशिन दि. 1/06/07 रोजी कार्यान्वित करण्यात आलेले आहे. कंपनीने मशीनकरीता दिलेला दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 31/05/2009 रोजी संपला आहे. सदर मशिनची दि. 31/03/2016 ची घसारा वजा किंमत रू. 28,43,832.48/- इतकी आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी झालेला ठराव, कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट आणि कंपनीस दिलेल्या पुरवठा आदेशातील अटीनुसार पुढील कालावधीतील दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे

'मशिनचा वॉरंटी कालावधी दोन वर्षाचा असून तो संपुष्टात आल्यानंतर कंपनीकडे CMC कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात यावे. तसेच याकामी कंपनीस पहिल्या वर्षी 20 लाख रूपये व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षास 20 लाख अधिक 5 टक्के याप्रमाणे दरवर्षी 5 टक्के वाढ करून सदर CMC साठी आगाऊ रक्कम देण्यात यावी आणि सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा असे ठरले आहे.'

वरील अटीनुसार आजपावेतो मे. सिमेन्स हेल्थकेअर मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दि. 31/05/2016 पर्यंत करणेत आले आहे. सदर कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी संपुष्टात आलेमुळे पुढील कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे गरजेचे आहे.

सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता मे. सिमेन्स हेल्थकेअर मुंबई यांनी पुरवठा आदेशातील अटीनुसार दि. 01/06/2016 ते दि. 31/05/2017 या कालावधीसाठी सर्व करांसहीत एकुण रु.32,36,332/- (अक्षरी रु.बत्तीस लाख छत्तीस हजार तीनशे बत्तीस मात्र) इतक्या रक्कमेचा CMC करीता करारनामा पाठविला आहे.

उपरोक्त कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्य.समितीच्या दि. 31/08/16 सभेत सादर करणेत आला असता निर्णय क्र.632 अन्वये- श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी नवीन अद्ययावत एम.आर.आय.मशिन खरेदी करणेत यावे. तसेच जुन्या एम. आर. आय मशिनचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट न करता त्यांची दुरूस्ती देखभाल विभागांतर्गत करून घेणेत यावी असे ठरले.

परंतु सदर एम. आर. आय मशिन चे स्पेअर पार्ट हे मोनोपॉली या प्रकारचे असल्यामूळे ते खुल्या बाजारात उपलब्ध् होत नाहीत. तसेच सदर मशिन दुरूस्ती देखभाल करणे करीता विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षणाची देखील आवश्यकता असते. त्याप्रमाणे प्रशिक्षण बायोमेडीकल इंजिनीअर्स यांना प्राप्त नाही. त्यामूळे सदर मशिनची दुरूस्ती देखभाल विभागांतर्गत करून घेणे शक्य नाही.

तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलचे खरेदी विभागाने नवीन MRI खरेदी करणेसाठी दि. 16/08/2016 चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा होउन जुने मशिन बायबॅक न करता नवीन MRI मशिन ई- निविदा मागवुन खरेदी करणेस मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर ई-निविदा प्रक्रिया (निवीदा, निर्णय, पुरवठा आदेश,प्रत्यक्ष पुरवठा इ.) पुर्ण होउन नवीन मशिन कार्यान्वीत होणेस अंदाजे सहा महिन्यांपेक्षा

अधिक कालावधी लागु शकतो. सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत व त्यानंतरही सध्याचे मशिन वापरायोग्य ठेवणे गरजेचे आहे.

MRI मशिन 8 वर्षापासून नियमित वापरात असल्यामुळे त्याची नेहमी नियमित व तातडीची दूरूस्ती व देखभाल करणे अत्यावश्यक असते. सदर मशिनचा वापरायोग्य कालावधी (As per WHO Guidelines अंदाजे 8 वर्ष) देखील संपला आहे. परंतू पुरवठाधारक कंपनीने दि. 03/08/2016 चे इ-मेल अन्वये मे 2017 पर्यंत कंपनी स्पेअरपार्टसचा पुरवठा करुन दूरूस्ती व देखभाल करणार असल्याचे कळविले आहे यापुढील काळात मशिन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मध्ये नसल्यास व एम.आर.आय. मशिनची जर दूरूस्ती व देखभाल वेळेत न झाल्यामुळे मशिन नादुरुस्त होउन काही महागडे स्पेअर पार्टस् (उदा. हेलीयम गॅस रिफीलींग व कोल्ड हेड, यु.पी.एस. व चिलर प्लॉट) बदलणे आवश्यक असतील अशा वेळी सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चे खर्चास मान्यता घेणेकरीता विविध पार्टस्करीता आवश्यकतेनुसार वेगवेगळे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावे लागतील. तसेच प्रस्ताव सादर करून प्रत्यक्षात मान्यता मिळून तदनंतर पुरवठाधारकास कार्यादेश देणेस व प्रत्यक्षात दुरूस्तीस अंदाजे महिन्याचा किंवा अनिश्चित कालावधी लागू शकतो. दरम्यानच्या मशिन नादूरूस्त असण्याच्या कालावधीमध्ये अत्यवस्थ रूग्णांना अत्यावश्यक सेवा देणे शक्य होणार नाही.

त्याकरीता सदर मशिनचे यापुढील कालावधीकरीता दूरूस्ती देखभाल करणेकरीता पुरवठाधारक कंपनीकडे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे अधिक योग्य राहील असे नम्र मत आहे.

तरी MRI मशीनचे मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडे दि.01/06/2016 ते दि.31/05/2017 या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच CMC चे एकुण रकमेपैकी 50% रक्कम सहा महिन्यांनंतर व उर्वरीत 50 % रक्कम वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधी पुर्ण झालेनंतर अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली., मुंबई यांचेकडून दि.०१.०६.२०१६ ते दि.३१.०५.२०१७ या कालावधीसाठी MRI मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस मान्यता देण्यात आली. तसेच कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा दर ठरविणेसाठी संबंधीत कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीस पुढील रुग्णालय उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२** **सी.टी. स्कॅन (64 Slice) मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत प्रस्ताव फेरसादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागात मे. सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे Somatom Sensation 64 CT Scanner हे मशीन संदर्भ क्र. 1 अन्वये एकुण रू. 3,98,37,835/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 16/07/2006 रोजी पूर्ण झालेला आहे. सदर सि. टी. स्कॅन मशिनची दि. 31/03/2016 रोजी घसारा वजा किंमत रू. 16,82,556.38/- इतकी आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी मा. व्यवस्थापन समितीच्या दि. 13/03/2004 च्या सभेतील निर्णय क्र.95 अन्वये पुढील कालावधीतील सि. टी. स्कॅन मशिनसह खरेदी करण्यात आलेल्या सर्व ॲक्सेसरीजसह (Medrad Pressure Injector, Colour Printer, 150 KVA Stabilizer & Kodak Dryview 8150 Laser Imager) यांचे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार कंपनीस देण्यात आलेल्या दि. 15/03/2005 च्या पुरवठा आदेशातील अ.क्र.15 अन्वये-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the second year is Rs. 30 Lacs. For subsequent years the escalation of 5% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes even the Tube of the CT. Under this contract all parts & labor will be given free of cost. Payment for CMC to be done at start of each year after the demand of company.

वरील अटीनुसार मे. सिमेन्स लि., मुंबई, यांचेशी वॉरंटी कालावधी संपलेनंतर आजपावेतो आठ वर्षात वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट चा करार करून रक्कम अदा करण्यात आली आहे.

मे.सिमेन्स ली. मुंबई यांनी पत्र क्र. West/HIM/CT/May 16/4314/R1, (रुग्णालये प्राप्त दि. 25/07/16) अन्वये दि. 17/07/2016 ते दि. 16/07/2017 या कालावधीसाठी CT Scan मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता करारनामा पाठविला आहे. कंपनीने दि.17/07/2016 ते दि. 16/07/2017 या कालावधीसाठी पुर्णांकित एकुण रु. 55,26,498/- (पुर्णांकित एकुण अक्षरी रु. पंचावन्न लाख सव्वीस हजार चारशे अठयान्नव मात्र) इतक्या रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

उपरोक्त कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्य.समितीच्या दि. 31/08/16 सभेत सादर करणेत आला असता निर्णय क्र.633 अन्वये- श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी नवीन

अद्ययावत सी.टी. स्कॅन मशिन खरेदी करणेत यावे. तसेच जुन्या सी.टी. स्कॅन मशिनचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट न करता त्यांची दुरूस्ती देखभाल विभागांतर्गत करून घेणेत यावी असे ठरले.

परंतु सदर सी.टी. स्कॅन मशिन चे स्पेअर पार्ट हे मोनोपॉली या प्रकारचे असल्यामूळे ते खुल्या बाजारात उपलब्ध् होत नाहीत. तसेच सदर मशिनची दुरूस्ती देखभाल करणे करीता विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षणाची देखील आवश्यकता असते. त्याप्रमाणे प्रशिक्षण बायोमेडीकल इंजिनीअर्स यांना प्राप्त नाही. त्यामूळे सदर मशिनची दुरूस्ती देखभाल विभागांतर्गत करून घेणे शक्य नाही.

तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलचे खरेदी विभागाने नवीन सी.टी. स्कॅन खरेदी करणेसाठी दि. 16/08/2016 चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा होउन जुने मशिन बायबॅक न करता नवीन सी.टी. स्कॅन मशिन ई- निविदा मागवुन खरेदी करणेस मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर ई-निविदा प्रक्रिया (निवीदा, निर्णय, पुरवठा आदेश,प्रत्यक्ष पुरवठा इ.) पुर्ण होउन नवीन मशिन कार्यान्वीत होणेस अंदाजे सहा महिन्यांचा कालावधी लागु शकतो. सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत व त्यानंतरही सध्याचे मशिन वापरायोग्य ठेवणे गरजेचे आहे.

सी.टी. स्कॅन मशिन 11 वर्षापासून नियमित वापरात असल्यामुळे त्याची नेहमी नियमित व तातडीची दुरूस्ती व देखभाल करणे अत्यावश्यक असते. सदर मशिनचा वापरायोग्य कालावधी (As per WHO Guidelines अंदाजे 8 वर्ष) देखील संपला आहे. परंतू पुरवठाधारक कंपनीने दि. 03/08/2016 चे इ-मेल अन्वये मे 2017 पर्यंत कंपनी स्पेअरपार्टसचा पुरवठा करुन दुरूस्ती व देखभाल करणार असल्याचे कळविले आहे यापुढील काळात मशिन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मध्ये नसल्यास व सी.टी. स्कॅन मशिनची जर दुरूस्ती व देखभाल वेळेत न झाल्यामुळे मशिन नादुरुस्त होउन काही महागडे स्पेअर पार्टस् (उदा. एक्स-रे टयुब-किंमत-रु.46 लाख, डिटेक्टर मॉडयुल-रु.60 लाख, ई-बॉक्स-रु.17 लाख, IRS TOWER-रू. 15 लाख इ.) बदलणे आवश्यक असतील अशा वेळी सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चे खर्चास मान्यता घेणेकरीता विविध पार्टस्करीता आवश्यकतेनुसार वेगवेगळे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावे लागतील. तसेच प्रस्ताव सादर करून प्रत्यक्षात मान्यता मिळून तदनंतर पुरवठाधारकास कार्यादेश देणेस व प्रत्यक्षात दुरूस्तीस अंदाजे एक महिन्यांचा किंवा अनिश्चित कालावधी लागू शकतो. दरम्यानच्या मशिन नादुरुस्त असण्याच्या कालावधीमध्ये अत्यवस्थ रूग्णांना अत्यावश्यक सेवा देणे शक्य होणार नाही.

त्याकरीता सदर मशिनचे यापुढील कालावधीकरीता दुरूस्ती देखभाल करणेकरीता पुरवठाधारक कंपनीकडे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे अधिक योग्य राहील असे नम्र मत आहे.

तरी सी.टी. स्कॅन मशीनचे मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडे दि. 17/07/2016 ते दि. 16/07/2017 या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच CMC चे एकुण रकमेपैकी 50% रक्कम सहा महिन्यांनंतर व उर्वरीत 50 % रक्कम वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधी पुर्ण झालेनंतर अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडून दि.१७.०७.२०१६ ते दि.१६.०७.२०१७ या कालावधीसाठी सी.टी. स्कॅन मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस मान्यता देण्यात आली. तसेच कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा दर ठरविणेसाठी संबंधीत कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीस पुढील रुग्णालय उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे, लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील जमीनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेसाठी कायम खरेदी करणेकामी सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविणेच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील, असे नमूद आहे.

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे, लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील जमीनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कायम खरेदी करणेकामी सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत..

**प्रस्तावना-**

**पूर्वपिठीका-**

**(अ)** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०८ फेब्रुवारी २००९ रोजीच्या सभेत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या लक्ष्मीवाडी मळया अंतर्गत येणा-या जमीनी संस्थानने घेणेबाबतचा क्रं.१६५ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून शासनाकडून शेती महामंडळाची, सलग पट्टयातील जास्तीत जास्त जमीन उपलब्ध करुन घेणेसाठी प्रयत्न करणेत यावेत. याकामी महामंडळ,शासन यांचेशी चर्चा/वाटाघाटी करणेस मान्यता

देण्यात आली. याकामी शेती महामंडळास अथवा सरकारी-निमसरकारी संस्थेस कागदपत्रे,नकाशे व इतर कागदपत्रे उपलब्ध करुन देणेस व इतर अनुषंगिक कामासाठी येणा-या योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली." त्याप्रमाणे मा.कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/भूसंपादन/२१२६/२००९ दि.२०/०२/२००९ अन्वये खालील गावांचे त्यांचेपुढे दाखविलेले क्षेत्र संस्थानला देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | गावाचे नाव | क्षेत्र हे.आर |
|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ६३.०९ |
| २ | कनकुरी | ०६.६५ |
| ३ | शिर्डी | ११.८२ |
| ४ | निमगाव को-हाळे (जी.आर.बी.वाडी) | ०५.९५ |
| ५ | साकुरी | १३.८२ |
| ६ | सावळविहीर बु. | ७५.७० |
| ७ | सावळविहीर खु. | ३३.६७ |
| ८ | चांदेकसारे/सोनेवाडी | १५३.७३ |
| | **एकूण क्षेत्र** | **३६४.४३** |

**(ब)** उक्त प्रस्तावात सदर जमीनीचा उपयोग खालीलप्रमाणे विविध कारणांसाठी करण्यात येणार असलेचे नमूद केलेले आहे.

१) साईभक्तांना जास्तीत जास्त निवासस्थाने उपलब्ध करुन देणे.

२) विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी सोयी उपलब्ध करुन देणे व त्यासाठी संकुलाची उभारणी करणे.

३) खेळाची मैदाने व संकुलाची उभारणी करणे.

४) साईभक्तांच्या वाहनासाठी वाहनतळ करणे.

५) साईभक्तांच्या मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे.

६) साईभक्तांसाठी उद्यानाची उभारणी करणे.

७) साईभक्तांसाठी स्वच्छतागृह उभारणे.

८) पिण्याच्या पाण्यासाठी साठवण तलाव उभारणी करणे.

९) संस्थानचे कर्मचा-यांसाठी निवासस्थानाचे बांधकाम करणे.

१०) संस्थानचे भविष्यातील विविध विकास प्रकल्पांचे बांधकाम करणे.

**(क)** प्रस्तुत गावच्या जमीनींचे मुल्यांकन करणेकामी मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली वेळोवेळी बैठका झालेल्या आहेत. मा.सहायक संचालक, नगररचना, मुल्यांकन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.२२/०४/२०१० रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त गावांच्या जमीनींचे मुल्यांकनमा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना सादर केलेले आहे. त्याची प्रत मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या.पुणे यांना देखील पाठविलेली आहे. त्याप्रमाणे उपरोक्त जमीनीचे मुल्यांकन रु.१,०१,६०,४०,०००/- (रु.एकशे एक कोटी साठ लाख चाळीस हजार मात्र) इतके होते. सदर पत्राच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांना इकडील जा.नं.एसएसएस/ बांधकाम/ भूसंपादन/४५३६/१३ दि.०३ जानेवारी २०१४ अन्वये उक्त क्षेत्र संस्थानला विकत देणेची पुन:श्च विनंती करण्यात आली. त्यास अनुसरुन मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांनी त्यांचेकडील जा.क्रं.जमीन/ २२९०/ लक्ष्मीवाडी/ ४१७/ श्री साईबाबा संस्थान/भाग-६ ज.त्र./८२९ दि.३१/०१/२०१४ अन्वये महामंडळाच्या लक्ष्मीवाडी मळयावरील उपलब्ध होणा-या सुमारे ३६४.४३ आर जमीनीची विक्री आपल्या संस्थानास करणेच्या दृष्टीने महामंडळास प्रती एकरी प्रचलित बाजारभावाने जमीनीचे मुल्य द्यावे लागेल. मान्य असल्यास त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करावा,असेबाबत इकडेस कळविले.

**(ड)** त्या अनुषंगाने दि.१५/०३/२०१४ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.१३ निर्णय क्रं.१८३ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून प्रस्तावित जमीनीची साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी करावयाच्या विकास कामांसाठी संस्थानला आवश्यकता आहे. त्यामुळे प्रस्तावात नमूद केलेल्या अ व ब प्रमाणे मान्यता देण्यात आली.."

सदर निर्णयातील **अ** म्हणजे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे हे संस्थानला ज्या जमीनी विकत देणार आहेत त्याबाबत शासनाचे नगररचना (मुल्यांकन) खाते संस्थानला देण्यात येणा-या जमीनीचे जे मुल्यांकन ठरवतील ते संस्थानने देणे अथवा शासनाचा याबाबत जो निर्णय होईल त्याप्रमाणे देणे.

आणि **ब** म्हणजे मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांना याबाबत दिलेल्या पत्रास कार्योत्तर मान्यता देणे,असे नमूद आहे.

उपरोक्त निर्णयातील पत्र जा.नं.एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/ ५१६४/२०१४ दि.१०/०२/२०१४ चे असून त्यात उक्त जमीनीचे मुल्यांकन किती होईल याबाबतची सविस्तर माहीती मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडून मागणी केलेली आहे.

उपरोक्त निर्णयात ठरलेप्रमाणे इकडील पत्र क्रं.एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/३७५२/२०१४ दि.१०/११/२०१४ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, शेती महामंडळ यांना किंमतीबाबत कळविणेत आलेले आहे. तद्नंतर प्रस्तुत प्रकरणी मा.व्यवस्थापकीय संचालक, शेती महामंडळ, मा.जिल्हाधिकारी, मा.प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, मुंबई व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,मुंबई यांचेकडेस वेळोवेळी पत्रव्यव्हार करणेत आलेला आहे.

**<u>सुधारीत प्रस्ताव-</u>** उपरोक्त मागणी केलेल्या क्षेत्राबाबत शेती महामंडळाचे स्थानिक अधिकारी यांचेकडेस समक्ष चौकशी केली असता व सदर क्षेत्राचा ताळमेळ घेतला असता त्यापैकी काही गावातील काही क्षेत्र शेती महामंडळाने शासनामार्फत खंडकरी शेतकऱ्यांना वाटप केलेले असलेचे व काही क्षेत्र वाटप करावयाचे प्रस्तावित असलेचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी सुधारीत प्रस्ताव सादर करणे उचित होईल.

शिर्डी हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे तिर्थस्थळ झालेले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत वाढच होत आहे. त्यासाठीचे नियोजन करणे, त्यांना अन्न, निवारा, वैद्यकिय सेवा या मुलभूत सोयी सुविधा विनासायास, विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे, उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे यासाठी संस्थानला मोठया प्रमाणात जागेची आवश्यकता आहे. मूळ शिर्डी गावचे भौगोलिक क्षेत्र अत्यंत कमी आहे. त्यासाठी शिर्डीचे नजीक असलेल्या गावातून संस्थानला आवश्यक व सोयीस्कर व संस्थानने यापूर्वी शेती महामंडळाकडून भूसंपादनाद्वारे घेतलेले क्षेत्र ४५ हे.६४ आर च्या नजीक असलेले क्षेत्र उपलब्ध करुन घेणे आवश्यक झालेले आहे.

त्यासाठी पुढील नमूद केलेल्या गावांचे त्यांचेपूढे दाखविलेले क्षेत्र संस्थानला कायम खरेदी देणेबाबतचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,शेती महामंडळ यांचेकडेस सादर करता येईल.

| अ.नं. | गावाचे नाव | क्षेत्र हे.आर |
|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ७१.०५ |
| २ | शिर्डी | ११.६२ |
| ३ | साकुरी | १३.८२ |
| ४ | सावळविहीर बु. | ७५.६१ |
| ५ | सावळविहीर खु. | ३३.६७ |
| ६ | चांदेकसारे/ सोनेवाडी | ९६.०७ |
| | **एकुण क्षेत्र** | **३०१.८४** |

(गावनिहाय व सर्वे नंबर निहाय क्षेत्राची यादी सोबत सादर केली असे)

उपरोक्त क्षेत्राचा उपयोग खालीलप्रमाणे विविध कारणांसाठी करता येईल.

**१)** उपरोक्त पैकी मौजे निमगाव-को-हाळे येथील सर्वे नं.८५ या जमीनीलगत संस्थानचे प्रसादालय आहे. त्या प्रसादालयातच लाडू निर्मिती व्यवस्था आहे. लाडू निर्मितीसाठी १) विभाग प्रमुख कार्यालय २) स्टोअर ३) ऑनलाईन चक्की ४) पुरुष स्वच्छता गृह, स्त्री स्वच्छता गृह ५) एलपीजी शेगडया, त्या ठिकाणी फलाईंग पॅन असतात. ६) बूंदी सुकविणे. ७) बूंदीपासून लाडू तयार करणे ८) लाडू सुकविणे ९) मेंटेनन्स रुम १०) कर्मचा-यांची कपडे बदलण्याची जागा ११) कंट्रोल कॅबिन, सुपरवायझर कार्यालय १२) वॉशिंग प्लॅन्ट तसेच एलपी गॅससाठी स्वतंत्र गोडावून इ.साठी किमान ३० आर जागा लागते. १३) लायटींग रुम १४) पार्कींग. इ.साठी संस्थानला उक्त सर्वे नं.८५ मधील पुरेशा जागेची आवश्यकता आहे. उर्वरित क्षेत्रात -

**२)** साईभक्तांना जास्तीत जास्त निवासस्थाने उपलब्ध करुन देणे.

**३)** साईभक्तांसाठी व नागरीकांसाठी सुसज्ज असे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणे.

**४)** साईभक्तांच्या मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे.

**५)** साईभक्तांसाठी उद्यानाची उभारणी करणे.

**६)** साईभक्तांसाठी लेझर शो ची उभारणी करणे.

**७)** साईभक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळ उभारणे.

**८)** साईभक्तांसाठी स्वच्छतागृह उभारणे

**९)** संस्थानचे कर्मचा-यांसाठी निवासस्थानांचे बांधकाम करणे

**१०)** भविष्यात संसथानचे विविध विकास प्रकल्पांची उभारणी करणे.

उपरोक्त मौजे निमगाव को-हाळे, शिर्डी, साकुरी, सावळविहीर बु., सावळविहीर खु.येथील जमीनींच्या किंमतीबाबतची माहीती मा.दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून प्राप्त करुन घेतली असून मौजे चांदेकसारे/ सोनेवाडी येथील जमीनींच्या किंमतीबाबतची माहीती मा.दुय्यम निबंधक,कोपरगाव यांचेकडून प्राप्त करुन घेतली आहे. त्याप्रमाणे उपरोक्त जमीनींची एकूण किंमत रु.३६९,२८,९०,५३०/- (अक्षरी रु.तीनशे एकोणसत्तर कोटी अठ्ठावीस लाख नव्वद हजार पाचशे तीस मात्र) इतकी होत आहे.

**विभागाचा अभिप्राय–** यापूर्वी मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावातील काही जमीनी खंडकरी शेतकऱ्यांना वाटप झालेल्या असल्याने अशा जमीनी वगळून उर्वरित जमीनी संस्थानला आवश्यक व सोयीस्कर असलेल्या जमीनी खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या.पुणे यांचेकडेस सादर करता येईल व त्याची प्रत मा.प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडेस सादर करता येईल

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे निमगाव-कोऱ्हाळे, शिर्डी, साकुरी, सावळविहीर बु., सावळविहीर खु. व चांदेकसारे/ सोनेवाडी येथील शेती महामंडळाची ३०१.८४ हेक्टर जमीन, दुय्यम निबंधक यांनी कळविलेल्या रु.३६९,२८,९०,५३०/- मात्र मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली व तसा प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या., पुणे व मा.प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडेस सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. साईभक्तांचे दर्शन सहज व सुलभ व्हावे यासाठी तिरुपती देवस्थानचे धर्तीवर Time base दर्शन प्रणाली सुरु करणेकामी संगणक विभागामार्फत कार्यवाही सुरु करणेत आली आहे. सदर सिस्टीम नुसार साईभक्तांना देणेत येणारे पास वितरणासाठी काऊंटर सुरु करावयाचे आहे. याकामी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेशी समक्ष चर्चा होऊन प्रशासकिय अधिकारी श्री.डी.टी.उगले, श्री.अे.आर.औटी, श्री.एस.एम.जोरी, उपअभियंता व श्री.राहुल गलांडे, माहिती तंत्रज्ञान यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी करुन काऊंटरसाठी जागा निश्चीत केल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**अ) पास वाटप काऊंटर्स :-**

| अ.नं. | इमारत | काऊंटर लोकेशन | संख्या | आवश्यक व्यवस्था |
|---|---|---|---|---|
| ०१ | साई आश्रम | आर ब्लॉक तळमजला येथे प्रतिक्षा हॉलमध्ये पश्चिम बाजूकडील ३.०० X ३२५ मी. साईजचे गाळयामध्ये | ०२ | पार्टीशन, काऊंटर, खुर्च्या |
| ०२ | साईबाबा भक्तनिवासस्थान | क्लॉकरुम काऊंटरचे दक्षिण बाजूकडील काऊंटर | ०२ | सध्याचे काऊंटर वापरणे. फक्त खुर्च्या आवश्यक |
| ०३ | व्दारावती भक्तनिवासस्थान | द्वारावती इमारतीचे पूर्व बाजूकडील पी.आर.ओ करीता तयार करणेत आलेले काऊंटर | ०२ | सध्याचे काऊंटर वापरणे. फक्त खुर्च्या आवश्यक |
| ०४ | साई धर्मशाळा | आर ब्लॉक तळमजला येथे प्रतिक्षा हॉलमध्ये पूर्व बाजूकडील ३.०० X ३.२५ मी. साईजचे गाळयामध्ये | ०२ | पार्टीशन, काऊंटर, खुर्च्या |
| ०५ | शिर्डी बस स्थानक | बसस्थानक इमारतीचे तळमजल्यावर दक्षिण बाजूकडील संस्थानचे गाळयामध्ये | ०२ | पार्टीशन, काऊंटर, खुर्च्या |
| ०६ | जुने प्रसादालय | डायनींग हॉलमध्ये Exit गेटचे पश्चिम बाजूस चार काऊंटर व पूर्व बाजूस सहा काऊंटर | १० | पार्टीशन, ऑफीस टेबल, खुर्च्या, पत्रा शेड, ओटा बांधकाम |
| | | **एकुण पास वाटप काऊंटर्स** | २० | |

**ब) पास तपासणी काऊंटर्स :-**

| अ.नं. | काऊंटर लोकेशन | संख्या | आवश्यक व्यवस्था |
|---|---|---|---|
| ०१ | पिंपळवाडी रस्ता दर्शन रांग पूर्व बाजू | ०२ | संक्षण विभागाकडील वॉचमन केबीन वापरणार, ऑफीस टेबल व खुर्च्या आवश्यक |
| ०२ | पिंपळवाडी रस्ता दर्शन रांग पश्चिम बाजू | ०२ | संक्षण विभागाकडील वॉचमन केबीन वापरणार, ऑफीस टेबल व खुर्च्या आवश्यक |
| | **एकुण पास तपासणी काऊंटर्स** | ०४ | |

उपरोक्त प्रमाणे साईभक्तांना पास देणेसाठी व पास व्हेरीफीकेशनसाठी काऊंटर तयार करणे व काऊंटर वरील कर्मचा-यांचे बैठक व्यवस्थेसाठी Revolving Chairs खरेदीसाठी व इतर कामासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

**क) अपेक्षित खर्चाचा तपशिलः-**

| अ.नं. | कामाचा तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| ०१ | साई आश्रम, साई धर्मशाळा व शिर्डी बस स्थानक येथे दर्शन पास देणेसाठी ०६ कॅश काऊंटर्स व जुने प्रसादालय येथे १० ऑफीस टेबल्स तसेच दर्शन लाईन शेडमध्ये पास तपासणीकामी ०४ ऑफीस टेबल्स खरेदी करणे. | २,६४,०००/- |
| ०२ | काऊंटर वरील कर्मचा-यांचे बैठक व्यवस्थेसाठी Revolving Chair खरेदी करणे. | १,२०,०००/- |
| ०३ | जुने प्रसादालय येथील डायनींग हॉल येथे ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये कॅबीन तयार करणे तसेच साईआश्रम व साईधर्मशाळा, शिर्डी बस स्थानक येथे काऊंटरलगत ॲल्युमिनिअम पार्टीशन करणे. | २,९९,७४५/- |
| ०४ | जुने प्रसादालय येथील खिडक्यांना ग्रील बसविणे, ॲल्युमिनिअम कॅबीनचे छत एस.एस. स्क्वेअर पाईप ग्रीलमध्ये बंदिस्त करणे. | २,०६,३२२/- |
| ०५ | जुने प्रसादालय येथील खिडक्यांचे बाजूने ग्रॅनाईट क्लॅडींग करणे. | ३७,८००/- |
| ०६ | जुने प्रसादालय येथील काऊंटर समोर कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणे. | १,८५,६२२/- |
| | **एकुण अपेक्षित खर्च रु.** | **११,१३,४८९/-** |

**प्रस्ताव:-** वर नमूद केलेल्या ठिकाणी काऊंटर तयार करणे व इतर सुविधा करणेकामी एकुण रु.११,१३,४८९/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्त कामांचे स्वरुप भिन्न असल्यामुळे सदर कामे वेगवेगळया एजन्सीमार्फत करावी लागतील. तसेच सदरहू प्रत्येक काम हे रु.३ लक्ष पेक्षा कमी खर्चाचे असल्याने कोटेशन्स मागवून करुन घेता येईल. वरील 'क' पैकी अ.नं.४ मध्ये नमूद केलेली ग्रीलची कामे मेकॅनिकल विभागामार्फत व उर्वरीत कामे बांधकाम विभागामार्फत विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून करता येतिल.

तरी वरीलप्रमाणे दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी तसेच त्याकरीता येणारे अपेक्षित खर्चास व सदर कामासाठी कोटेशन्स मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **सन- २०१६ दिपावली निमित्त संस्थान कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी जा.नं.श्री.सा.सं.क.सं./ २१/ २०१६ दि.१०/०८/२०१६ व जा.क्र.२३/२०१६ दि.२९/०८/२०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे व्यवस्थापन मंडळाने तसेच आपण कर्मचा-यांच्या हिताच्या दृष्टीने वेळोवेळी करण्यात आलेल्या मागण्यांचा तातडीने विचार करुन कार्यवाही केलेली आहे. त्याबद्दल "श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना" श्री साईबाबा संस्थान त्रिसदस्यीय समिती व आपले मनःपुर्वक आभारी आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना दिपावली सानुग्रह देण्यात येते. त्याबद्दल श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना आपले मनःपुर्वक आभारी आहोत. यावर्षी दिपावली दि.३०/१०/२०१६ रोजी असुन दरवर्षी ८.३३ टक्के इतका सानुग्रह अनुदान दिला जात आहे. परंतु दिवसेंदिवस पडणारा दुष्काळ, वाढलेली महागाई लक्षात घेता ह्या दिपावली निमित्त कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान वाढ करुन १६.६६ टक्के इतका (डबल) दिल्यास दिपावली आनंदाने साजरी करता येईल.

तरी मा.साहेबांना श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना आपणास नम्रपणे विनंती करते की, ह्या वर्षी दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना त्यांचे दोन महिन्यांचे पगाराइतके सानुग्रह अनुदान मिळावे, ही नम्र विनंती.

**(ब)** सन १९७७ पासून तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळ/समितीचे निर्णयानुसार तसेच मा.न्यायालयाचे निर्णयानुसार संस्थानचे व्यवस्थापन पहाणारे मा.कोर्ट रिसीव्हर यांनी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवानिमित्त दरवर्षी दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदान देणेत येत आहे. त्यानंतर सन १९८४ मध्ये मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांनी संस्थान व्यवस्थापनासाठी स्किम तयार करुन, मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रणाखाली तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळानेही संस्थानचे व्यवस्थापन पहात असतांना दरवर्षी संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

दरम्यानचे कालावधीत, माहे ऑगस्ट, २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ (अधिनियम क्रमांक १४) हा कायदा पारीत केला. या अधिनियमात संस्थान कर्मचा-यांचे बाबतीत प्रामुख्याने खालील तरतुदी करणेत आलेल्या आहेत.

कलम नं.१५- कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या शीर्षाखालील पोटकलम (३) समितीच्या कार्यकारी अधिका-याचे आणि इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

कलम नं.१६- सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखालील "नियत दिवसाच्या लगतपुर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तीला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधीत अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही."

परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदीनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.

कलम १७- समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील पोटकलम (२) (घ) समितीच्या सदस्यांना व कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील.

तसेच या व्यतिरिक्त कलम १५ चे तरतुदीत उल्लेख केलेल्या व्यवस्थापन निधीबाबत या अधिनियमात कलम २२– व्यवस्थापन निधी व त्याचा विनीयोग या शीर्षाखालील तरतुदीत पोटकलम (३) (ख) मध्ये समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे असे स्पष्टपणे नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीने सन २००४ ते सन २०११ पर्यंत दरवर्षी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवाकरीता सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

**(क)** दरम्यानचे कालावधीत, म्हणजेच दिनांक २९ मार्च, २०१२ रोजीचे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व नियंत्रणाचे कामकाज मा.त्रिसदस्य समितीचे नियंत्रणाखाली आले.

(०१) मा.त्रिसदस्य समितीने सन २०१२ चे दिपावली उत्सवाकरीता संस्थान सेवकांना द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबत दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८७३ अन्वये तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्रमांक १२६९४/२०१२ चे अनुषंगाने, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे आदेशानुसार संस्थान सेवकांना रक्कम रुपये ४,८४,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान म्हणून वाटप करणेस मान्यता दिली.

मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडील जनहित याचिका १८/२०११ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ वर न्यायालयाने दि.१६ ऑक्टोबर, २०१२ रोजी केलेल्या आदेशात 6 (c) shall not take any major financial dicision of whatsoever nature असे नमूद करणेत आले. त्यामुळे मा.त्रिसदस्य समिती रु.१० लाख पर्यंतच निर्णय घेत होती. त्यापुढील रक्कमेचे विषय मा.मुंबई उच्च न्यायालयात मान्यतेसाठी सादर करणेत येत होते.

(०२) मा.त्रिसदस्य समितीने सन २०१३ चे दिपावली उत्सवाकरीता संस्थान सेवकांना द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबत दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७० अन्वये तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्रमांक १३२८४/ २०१३ चे अनुषंगाने, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशानुसार संस्थान कर्मचा-यांना रक्कम रुपये ५,६०,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान म्हणून वाटप करणेस सशर्त मान्यता दिलेली आहे.

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक २३ जानेवारी, २०१३ चे पत्रातील निर्देशानुसार आणि मा.उच्च न्यायालयाचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशानुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस संस्थान सेवकांना सन २०१३ चे दिपावलीकरीता सानुग्रह अनुदान अदा करणेस मान्यता मिळणेकामी अनुक्रमे दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१३ व दिनांक ०८ जानेवारी, २०१४ रोजी प्रस्ताव वजा विनंती पत्र सादर करणेत आलेले आहे.

त्यास अनुसरून, मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दिनांक ०४ एप्रिल, २०१४ रोजीचे पत्राने, प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रतिक्षा करणेत यावी, असे कळविलेले आहे.

(०३) त्यानंतर सन-२०१४ करीता रक्कम रुपये ६,५०,००,०००/- मात्र संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती दि.२८/०८/२०१४ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर निर्णयक्र.६९६ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"संस्थानमधील कायम कर्मचा-यांना सन-२०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजूरी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पीआयएल १८/२०११ सिव्हील अर्ज क्रमांक

१३२८४/२०१३ दाखल असून त्या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही. मा.खंडपीठाने या सिव्हील अर्जावर दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये सन २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान तुर्तास देण्याविषयी आदेश केलेला आहे व जर का शासन धोरणानुसार असे अनुदान देता येणार नाही, असे मा.खंडपीठाचे मत झाले तर दिले गेलेले अनुदान संबंधीत कर्मचा-यांच्या पगारामधून पुन्हा वसुल करुन घ्यावे, अशी अट घातली आहे.

त्यामुळे २०१४ चे सानुग्रह अनुदान देण्यासाठी संस्थानला आर्थिक अडचण जरी नसली, तरी मागील वर्षीच्या सानुग्रह अनुदानाबाबत निर्णय अद्याप झालेला नाही व त्यावर मा.खंडपीठाचा अंतीम निर्णय होईपर्यंत चालु वर्षाचे सानुग्रह देण्या विषयी समिती निर्णय घेऊ शकत नाही", असे ठरले.

सदर निर्णयावर श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेने मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे संस्थान कर्मचा-यांना दिपावलीसाठी सानुग्रह अनुदान मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं.९२१७/२०१४ व सिव्हील ॲप्लीकेशन ९४३७/२०१४ दाखल केले. त्यावर मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१४ रोजी सानुग्रह अनुदान देणेस सशर्त मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरून संस्थान कर्मचा-यांचे संम्मती पत्र घेऊन सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

(०४) सन-२०१५ दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना रक्कम रुपये ६,७५,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी पंच्याहत्तर लाख) मात्र सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेबाबत मा.त्रिसदस्य समिती दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेपुढे विषय सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.३२३ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"प्रस्तावातील अ.नं.०२ वगळता अ.नं.०१ व ०३ मध्ये नमुद केलेल्या पात्र कर्मचा-यांना सन २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पीआयएल १८/२०११ सिव्हील अर्ज क्रमांक १३२८४/२०१३ दाखल असून त्या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही. मा.खंडपीठाने या सिव्हील अर्जावर दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये, सन २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान तुर्तास देण्याविषयी अंतरीम आदेश केलेला आहे व जर का शासन धोरणानुसार असे अनुदान देता येणार नाही, असे मा.खंडपीठाचे मत झाले तर दिले गेलेले अनुदान संबंधीत कर्मचा-यांच्या पगारामधून पुन्हा वसुल करुन घ्यावे, अशी अट घातली आहे.

त्यामुळे सन -२०१५ चे सानुग्रह अनुदान देण्यासाठी संस्थानला आर्थिक अडचण जरी नसली, तरी सन २०१३ व २०१४ च्या सानुग्रह अनुदानाबाबत निर्णय अद्याप झालेला नाही व त्यावर मा.खंडपीठाचा अंतीम निर्णय होईपर्यंत चालु वर्षाचे सानुग्रह अनुदान देण्या विषयी समिती निर्णय घेऊ शकत नाही, असे ठरले."

सदर निर्णयावर श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेने मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे संस्थान कर्मचा-यांना दिपावलीसाठी सानुग्रह अनुदान मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं.१३३६६/२०१५ दाखल केले. त्यावर मा.उच्च न्यायालयाने दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केला.

1. Heard learned counsel for the rival parties.
2. Shri S.B.Talekar, learned counsel for the respondent nos.19 & 20 vehemently opposed the application for making ex-gratia payment to the employees.
3. We have perused the repeated orders made by this Court right from the year-2012.
4. Learned counsel Shri Talekar points out that the Government did not file effective reply though last order dated 13.10.2014 expected so. We do not want to go into the submissions on merits made by advocate Shri Talekar since we think that we should not digrees from the situation namely the orders passed every year by this Court right from 2012. True it is that there is no resolution passed by the Board of Trustees, but then subject to such resolution being passed, the order can be made in the same manner as was done for the last four years.
5. Shri Talekar also raised an objection that this being a PIL, the issue about the service matter cannot be raised and entertained in this PIL. As stated earlier, the PIL was pending right from 2011 and no objection was raised at that time. Not only this, but the Court made orders in PIL preventing any expenditure without permission from this Court and, therefore, unless the applications are entertained, the respondent no.2- Sansthan would not be able to spend a single pie without the orders of this Court in this PIL and, therefore, the objection is not accepted.
6. We, therefore, permit the respondent no.2- Sansthan to disburse the amount of Rs.6,75,00,000/- provisionally, and as an interim order, to the members of the applicant as ex-gratia payment for 2015 Diwali Festival and the same would be subject to the further decision in Civil Application No.13284/2013. If the Court finds that the amount could not have been paid or less amount should have been

paid, the direction, to recover that amount or to adjust that amount form the salaries of members of the applicant being paid, can be issued.

7. In our opinion, the PIL is pending since 2011 and every year on the strength of interim orders, the expenditure and payments are being disbursed from the income of the respondent no.2- Sansthan. This cannot be allowed to go on ad infinitum and, therefore, we direct that this PIL be placed for final hearing after ensuing Diwali vacation. Civil application is accordingly disposed of.

वरीलप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे उपरोक्तआदेशास अनुसरून संस्थान कर्मचा-यांना सन- २०१५ चे दिपावली निमित्त कर्मचा-यांचे संम्मती पत्र घेऊन लेखा विभागाचे दि.२४/०९/२०१६ चे अहवालानुसार रक्कम रु.६,३१,७५,३६९/- मात्र सानुग्रह अनुदानाचे वाटप करणेत आलेले आहे.

वरीलप्रमाणे मा.त्रिसदस्य समिती व मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करणेस सशर्त मान्यता दिलेली आहे. लेखाशाखा विभागाकडील दि.२४/०९/२०१६ रोजीचे व साईबाबा हॉस्पिटल (वित्त विभाग) कडील दि.२६/०९/२०१६ रोजीचे अहवालानुसार सन २०१२ ते २०१५ या प्रती वर्षी संस्थान कर्मचा-यांचे संम्मती पत्र घेऊन सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेल्या तसेच रोखुन ठेवलेल्या कर्मचा-यांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

**१) सन २०१२ ते २०१५ या आर्थिक वर्षात प्रतीवर्षी सानुग्रह अनुदान वाटप केलेल्या कर्मचा-यांची माहिती-**

| अ.नं. | वर्ष | मा.उच्च न्यायालयाने मंजुरी दिलेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम | स्थायी कर्मचारी संख्या | कंत्राटी व एकत्रित मानधनावरील कर्मचारी संख्या | सानुग्रह अनुदानापोटी वाटप केलेली एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २०१२-२०१३ | रु. ५,६०,००,०००/- | २२३० | २२५१ | रु. ५,१५,२६,५६२/- |
| ०२ | २०१३-२०१४ | रु. ६,५०,००,०००/- | २१८६ | २४४० | रु. ५,९०,८०,८६९/- |
| ०३ | २०१४-२०१५ | रु. ६,७५,००,०००/- | २१६१ | २५९७ | रु. ६,३१,७५,३६९/- |

**२) सन २०१२ ते २०१५ या आर्थिक वर्षात प्रतीवर्षी सेवानिवृत्त, मयत व इतर कारणास्तव सानुग्रह अनुदान वाटप न केलेल्यातसेच अनपेड ठेवलेल्या कर्मचा-यांची माहिती:-**

| अ.नं. | वर्ष | मा.उच्च न्यायालयाने मंजुरी दिलेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम | स्थायी कर्मचारी संख्या | कंत्राटी व एकत्रित मानधनावरील कर्मचारी संख्या | सेवानिवृत्त, मयत व इतर कारणास्तव सानुग्रह अनुदानापोटी वाटप न केलेली तसेच अनपेड ठेवलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २०१२-२०१३ | रु. ५,६०,००,०००/- | ८३ | १९ | रु. २१,५४,९२२/- |
| ०२ | २०१३-२०१४ | रु. ६,५०,००,०००/- | ८३ | १० | रु. २९,९१,६६८/- |
| ०३ | २०१४-२०१५ | रु. ६,७५,००,०००/- | १०३ | २४ | रु. ४१,४५,८४०/- |
| | | **एकूण -** | **२६९** | **५३** | **रु. ९२,९२,४३०/-** |

आता, मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे घेणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने मा.उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी दाखल केलेले अर्ज मागे (Withdraw) घेणेस मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरून मा.उच्च न्यायालयाचे दि.०८/०९/२०१६ चे आदेशान्वये सानुग्रह अनुदानासाठी दाखल केलेला अर्ज क्र.१३२८४/२०१३ परत घेतलेला आहे.

**(ड)** श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेचे मागणीनुसार सन-२०१६ चे दिपावली उत्सवाचे सानुग्रह अनुदानाकरीता खाली नमुद केलेल्या अटी शर्तीनुसार संस्थान आस्थापनेवरील स्थायी, अस्थायी (कंत्राटी), एकत्रित मानधन/ वेतनावरील कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत प्रस्तावीत करणेत येत आहे.

(०१) सन-२०१६ दिपावली उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदानासाठी प्रचलित नियमाप्रमाणे पात्र ठरणा-या स्थायी व अस्थायी संस्थान सेवकांना दि.०१ ऑक्टोबर, २०१५ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ अखेर वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने लेखाशाखेकडील दिनांक ०८/०९/२०१६ रोजीचे अहवालानुसार अंदाजे रक्कम रुपये ७,१५,००,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी पंधरा लाख) मात्र इतका खर्च येणार आहे.

(०२) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ या कालावधीत संस्थान आस्थापनेवरील स्थायी (कायम) तसेच मानधनावर सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले अधिकारी/ कर्मचारी, कंत्राटी सल्लागार/ मोजणीदार, डीटीपी ऑपरेटर, ग्रंथपाल, अर्धवेळ सहाय्यक शिक्षक व संस्थान आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने असलेले शासकीय अधिकारी यांना दिलेल्या वार्षिक एकूण वेतनाचे/ पगाराच्या ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम अदा करता येईल.

(०३) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ या कालावधीत ज्या कर्मचा-यांवर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन, सेवेतून कमी केलेले आहे. अशा कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

(०४) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ या कालावधीत संस्थानला कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविणेसाठी नेमलेल्या लेबर व सुरक्षा कंत्राटदारामार्फत कामास असलेल्या कंत्राटी कुशल, अकुशल व एकत्रित वेतन/ मानधनावरील तसेच माजी सैनिक सुरक्षा रक्षकासह इतर सुरक्षा कर्मचारी यांना दिलेल्या वार्षिक एकूण वेतनाचे ८.३३ टक्के दराने होणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधीत कंत्राटी कामगार यांना कंत्राटदारामार्फत आदा करता येईल.

**उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.**

(०१) उपरोक्त "**क**" मधील अ.नं.०१ ते ०४ मध्ये नमुद केलेनुसार मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात संस्थानचे स्थायी व अस्थायी पदावरील अधिकारी व कर्मचा-यांना प्रतिवर्षी सानुग्रह अनुदान वाटप करणेस सशर्त (Provisionally) मान्यता दिलेली आहे. या प्रती वर्षी वाटप करणेत आलेल्या सानुग्रह अनुदास मान्यता मिळणेस विनंती तसेच या कालावधीत सेवानिवृत्त व मयत झालेल्या तसेच इतर कारणास्तव ज्या कर्मचा-यांचे सानुग्रह अनुदानाची रक्कम अनपेड ठेवणेत आलेली आहे. त्याच बरोबर काही कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम देण्यात आलेली नाही, अशा कर्मचा-यांना सदरची रक्कम अदा करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

(०२) उपरोक्त "**ड**" मध्ये नमुद केलेप्रमाणे सन-२०१६ साठी अट-शर्त क्र.०२ व ०४ नुसार पात्र होणा-या संस्थानचे स्थायी व अस्थायी पदावरील अधिकारी व कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१५ ते दि.३० सप्टेंबर, २०१६ या कालावधीत एकूण पगाराच्या ८.३३ टक्के दराने अंदाजे रक्कम रु.७,१५,००,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी पंधरा लाख) मात्र सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**परंतु विधी व न्याय विभागाचे सासंकि- २०११/ ५३८/ प्र.क्र.६९/ पुनर्बांधणी-१२/ का.१६, दि.२३.०१.२०१३ रोजीचे पत्रास अनुसरुन, सदरहू सानुग्रह अनुदानसंस्थान नियमानुसार पात्र ठरणाऱ्या स्थायी व अस्थायी कर्मचाऱ्यांना आदा करणेपुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **श्री साईबाबा संस्थानचे तिन्ही उत्सव व दैनंदिन तीन आरती कालावधीत श्रींचे मुर्ती व समाधीस देणगी वस्त्रे स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखेच्या देणगी काऊंटरवर साईभक्तानी श्री साईबाबांना आर्पण केलेले सर्व कपडे कापड स्टोअरला जमा करुन त्यातुन किंमती असलेले तीन-तीन मिटरचे एक सारखे, एकाच रंगाचे दोन कपडे मंदिर विभागास श्रींना अरतीकालावधीत वापरासाठी देण्यात येत होते. किंवा काही भक्तांनी विशेष आरतीसाठी दिलेले कपडे मंदिर विभागामार्फत बाबांना चढविण्यात येत होते.परंतु काही साईभक्त मंदिरात परस्पर कपडे जमा करुन सदर कपडे आरतीस चढविण्यासाठी जबरदस्ती करु लागल्याने मंदिर विभागाने टिपणी ठेवुन सदर विषय मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत सादर केला होता.

मा.व्य.स. ठराव- मा. व्यवस्थापन समितीच्या दि.05/06/2014 रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक 393 अन्वये ज्या साईभक्तांना श्रींना वस्त्रेअर्पण करावयाची आहेत,त्यांचा दिवस व वेळ संगणकावर सॉफ्टवेअरद्वारे नोंदणी करुन घेण्यात यावा.असा निर्णय झालेलाआहे.

**सद्यस्थीती-** त्यानुसार देणगी काऊंटरवर आरतीसाठीच्या कपडयांची नोद घेण्याचे काम चालु आहे. सध्याच्या संगणक प्रणालीप्रमाणे प्रत्येक दिवशी बाबांचे आरतीसाठी फक्त 3 वस्त्रे स्वीकारुन त्या साई भक्तांना एक महिन्याची आगाऊ तारीख दिली जाते. देणगी आलेले एक महिन्यासाठीचे सर्व वस्त्रे कापड कोठी स्टोअरला जमा करुन घेण्यात येतात त्यानंतर सदर कपडे वापराच्या तारखेच्या आगोदर दोन दिवस रजिस्टरला नोंद करुन मंदिर विभागाचे ताब्यात दिली जातात. ज्या दिवशी कपडे वापरले जातात त्या दिवशी देणगीदार साईभक्तास मेसेज जातो. नंतर ते कपडे कापड स्टोअरला जमा करुन विक्री काऊंटरला प्रसाद रुपाने विक्री केली जाते.

येत असलेल्या अडचणी-आरतीच्या राखीव वस्त्रांची नोंद पहाटे 05.00 वाजता देणगी काऊंटरवर करावी लागत असल्याने. त्यासाठी भक्तांना पहाटे 5 वाजता देणगी काऊंटरला यावे लागते.रात्री 10.30 चे आरती नंतर मंदिर परिसरातील सर्व गेट बंद करुन पहाटे 04.00 वाजता गेट नं.4 उघडुन भक्तांना काकड अरतीसाठी आत सोडले जाते. त्याबरोबर देणगी वस्त्रे देण्यासाठी भक्त पहाटे पाच वाजता देणगी काऊटरवर येतात. व वस्त्रे देऊन देणगी पावती घेतात.परंतु भक्तांच्या तक्रारी वरुन असे निदर्शनास येत आहे की, काही एजंट लोक भक्तांकडुन पैसे घेऊन रात्रभर 4 नंबर गेट समोर थांबुन नंबर लागणेसाठी रांगेतील भक्तांना धक्काबुक्की करुन आत घुसण्याचा प्रयत्न करतात,त्यामुळे देणगी काऊंटरवर साईभक्त नाराजी व्यक्त करत आहे. तसेच काही भक्तांनी लेखी तक्रारही केल्या आहेत. कपडयांची नोंद करण्यासाठी एजंट कडुन पैशाची मागणी होत असल्याने यात संस्थानची बदनामी होते आहे.

**करावयाची सुधारीत पध्दत-** आरतीसाठी परिधान करावयाचे वस्त्र स्वीकारणेसाठी देणगीकाऊंटरवर एक स्वतंत्र संगणकावर भक्तांना पावती देण्याची व्यवस्था करता येईल. आरतीसाठी स्वीकारण्यात येणारे वस्त्र हे तीन मीटर लांब व 54" पन्हा रुंद असलेले तसेच स्वीकारण्यात येणारी वस्त्रे साधारणपणे वजनाने हालके असावे. किमान दोन वस्त्रे एका आरतीसाठी एका भक्तांकडुन स्वीकारण्यात येईल. पावती देते वेळेस, पावती व कपडयाला लावायाचे स्टीकर सध्या संगणकामधुन प्रिन्ट होत आहे.त्यामध्ये आरतीसाठी म्हणुन आणखी एक स्टीकर प्रिन्ट करण्याची सुविधा करता येईल.प्रिन्ट झालेल्या स्टीकरवर पावती करण्यारा लिपीक सही करुन पावती व स्टीकर भक्तांचे हातात दिले जाईल.भक्त तेथेच ठेवलेल्या शिलबंद पेटीमध्ये स्टीकरची एक घडी करुन त्या पेटी मध्ये टाकेल.भाक्तांकडुन कपडे स्वीकारतांना भक्तांचे ओळखपत्र पाहुन समक्ष भक्त हजर असेल तरच या योजनेत त्याचे कपडे स्वीकारले जातील. या योजनेमध्ये पुढील महिन्यासाठी तिन्ही आरत्यांना वापरण्यात येणारे वस्त्रे स्वीकारण्यात येतील. तसेच या मधुन संस्थान मध्ये साजरे केले जाणरे तीन्ही उत्सव, दिपावली, गुढीपाडवा, तसेच इतर काही विशिष्ठ दिवस या योजनेतुन राखीव ठेवले जातील.ते लकी ड्रॉ मध्ये समाविष्ठ केले जाणार नाही.
प्रत्येक दिवशी तीन कुपन म्हणजेच महिन्याचे 90/93 कुपन शिलबंद पेटी मध्ये गोळा झालेल्या एकुण कुपना पैकी लकी ड्रॉ पध्दतीने प्रत्येक महिन्यास काढण्यात येतील. ज्या भाग्यवंत भक्तांचे टोकण निघाले असेल त्याची माहिती आयटी विभागा मार्फत संस्थानच्या अधिकृत संकेत स्थळावर लगेच प्रसिघ्द करण्यात येईल.तसेच भक्तांकडुन मिळालेले ई-मेल, मोबाईल नंबर यावर त्यांना माहिती देण्याची सुविधा उपलब्ध करुन देता येईल.

**<u>लकी ड्रॉ ची कार्यपध्दती:-</u>** आरतीसाठी भक्तांकडुन येणाऱ्या वस्त्रांचा प्रत्येक महिन्याला लकी ड्रॉ काढुन भाग्यवंत भक्तांना त्यांनी आर्पण केलेली वस्त्रे ड्रॉ प्रमाणे निघालेल्या तारखेस व आरतीस श्रींना चढवण्यात येतील. यासाठी प्रत्येक महिना दिनांक 21 तारखेपासुन पुढील महिन्याच्या 20 तारखे पर्यंत असा मोजला जाऊन त्याचा लकी ड्रॉ प्रत्येक महिन्याचा दिनांक 21 ते 25 या तारखेमध्ये घेण्यात येऊन भाग्यवंत भक्तांची यादी संकेत स्थळावर त्या महिन्याच्या 25 ते 30/31 तारखेपर्यंत प्रदर्शित करण्यात येईल. त्या प्रमाणे लगतच्या महिन्यातील दि.1 ते 30/31 तारखे पर्यंत वस्त्रांचा वापर लकी ड्रॉ मध्ये निघालेल्या नांवाप्रमाणे करण्यात येईल. उर्वरीत लकी ड्रॉ मधील वस्त्रांचा विनीयोग कापड कोठी विक्री काऊंटरवर साई भक्तांना प्रसाद रुपाने विक्री/लिलाव करण्यात येईल. लकी ड्रॉ काढण्यासाठी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येईल यासमितीत मा. उपकार्यकारी अधिकारी, प्रशासन व लेखाशाखा यांचे प्रशासकिय अधिकारी मु.लेखाधिकारी यांची समितीत नेमणुक करता येईल. त्यांना लेखाशाखा व प्रशासन शाखेतील वरिष्ठ कमर्चारी मदत करतील.

आशाप्रकारे लकी ड्रॉ घेऊन बाबांना भाग्यवंत भक्तांचे महिनाभर आरत्यांसाठी चढविण्यात येणाऱ्या वस्त्रांचे नियोजन पुर्णपणे पारदर्शी असल्याने याबाबत वाद-विवाद न होता सर्वजन बाबांचा कौल स्वीकारुन समाधानवृत्तीने या नियोजनाचा स्वीकार करतील यासाठी आय. टी. विभागामार्फत स्वतंत्र संगणक प्रणाली तयार करुन घेता येईल.

उपरोक्त विवेचन केल्या प्रमाणे श्री बाबांच्या तिन्ही आरत्यांसाठी स्वीकारण्यात येणाऱ्या वस्त्रांच्या नियोजीत कार्यपध्दतीस मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती समोर सादर.

**निर्णय क्र.७४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रींच्या तीनही आरत्यांसाठी स्वीकारण्यात येणाऱ्या वस्त्रांच्या नियोजीत कार्यपध्दतीचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याव्यतिरिक्त शिल्लक राहणारे व वापरायोग्य असलेले वस्त्र (शॉली) आदिवासी भागातील गोर-गरीबांना मोफत वाटण्यात याव्या, असे समितीचे मत झाले. याबाबतचा सर्वसमावेशक प्रस्ताव उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे चर्चासत्र आयोजित करणेकामी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** थोर संत श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे. तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन साईचरीत्रावर आधारीत वेगवेगळे इव्हेन्ट तयार करुन त्याचे सादरीकरण करणे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील, अशाप्रकारे श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत.

याबाबत मा.उपसमितीचे दि.१६ सप्टेंबर, २०१६ रोजीचे सभेत सन २०१७-१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/ पदाधिकारी यांच्या सूचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठीतसेच या साई मंदिरांच्याव्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षातआयोजित करावयाचे कार्यक्रम/उपक्रम याबाबत व्यापक सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी येथे चर्चासत्र आयोजित करणेचा निर्णय घेणेत आलेला आहे.

त्यानुसार जनसंपर्क विभागाने दि.३०/०९/२०१६ रोजीचे कार्यालयीन आदेशान्वये बांधकाम विभागासह शताब्दी कक्षास चर्चासत्रासाठी उपस्थित राहणा-या देश-विदेशातील साई मंदिराचे अंदाजे १०००-१२०० अधिकारी/ पदाधिका-यांची बैठक व्यवस्था होईल एवढया आकारमानाचा सर्व सुविधांनी युक्त असलेला हॉल पहाणी करुन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने आरक्षित करणे अथवा आवश्यकतेनुसार वॉटरप्रुफ सुशोभित मंडप उभारणेबाबत कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे. याबाबत मा. कार्यकारी अधिकारी,मा. उपकार्यकारी अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचेसमवेत साईआश्रम भक्तनिवास परिसरात मंडप टाकून कार्यक्रम आयोजीत करणेबाबत पहाणी करणेत आली. यापुर्वी दि.११/०४/२०१३ रोजी साई आश्रम परिसरातील I आणि J इमारतींचे उत्तरेकडील मोकळया जागेत मंडप टाकून उदघाटन समारंभ आयोजीत करणेत आला होता. त्याच धर्तीवर सदर ठिकाणी मंडप टाकून विषयांकीत कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.

तरी साई आश्रम भक्तनिवास परीसरात मंडप व्यवस्था करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/ एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | **डोम मंडप व्यवस्था:-** वॉटरप्रुफ छत असलेला मंडप, आतिल बाजूस सुशोभित कापड, मध्यवर्ती ठिकाणी २७' उंची व दोन्ही बाजूस १२' उंची असलेला मंडप, साईडला व पाठीमागील बाजूस सफेद कनात, संपूर्ण मंडपात लाल रंगाचे कारपेटची बिछायत इ. (लोखंडी पाईप स्ट्रक्चर). | ८०'X२७०' | २१६०० चौ. फुट | २६/- | ५,६१,६००/- |
| २ | **स्टेज व्यवस्था:-** ४०'X३०' साईजचे जमिनीपासून ०४ फुट उंचीचे भक्कम स्टेज उभारणे, स्टेजवर लाल रंगाचे कारपेट, स्टेजला बॅकड्रॉपसाठी सुशोभित कापड लावणे. | ४०'X३०' | १२०० चौ. फुट | ६०/- | ७२,०००/- |
| ३ | **स्वागत कमानी:-**२'X२' आकाराची बॉक्स टाईप स्वागत कमानी उभारणे. (रुंदी-२०', उंची-१८'). | --- | ०२ नग | १८,०००/- | ३६,०००/- |
| ४ | पांढरे शुभ्र व स्वच्छ कव्हरसह पीव्हीसी खुर्च्या पुरविणे. | --- | १५५० नग | २०/- | ३१,०००/- |
| ५ | श्री सिटर एस. एस. सोफा व कुशनसह व त्याकरीता पांढरे शुभ्र व स्वच्छ कापड लावणे. | --- | १५० नग | ५००/- | ७५,०००/- |
| ६ | **बॅरेकेडींग व्यवस्था:-**कार्यस्थळावर तसेच इतर आवश्यक ठिकाणी बल्ली व एम. एस. पाईप वापरून ४'-६" उंचीचे मजबूत बॅरेकेडींग व्यवस्था करणे. | --- | ६५० र. फुट | १००/- | ६५,०००/- |
| ७ | फ्लेक्स बॅनर व इतर प्रिंटींग खर्च. | --- | --- | --- | २५,०००/- |
| ८ | साऊंड सिस्टीम व्यवस्था करणे. | --- | --- | --- | ६५,०००/- |
| ९ | लाईटस्, फॅन, २० नग डेझर्ट कुलर इ. विद्युत व्यवस्था करणे. | --- | --- | --- | १,५०,०००/- |
| १० | व्ही.आय.पी करीता व्यासपीठ खुर्च्या पुरविणे. | --- | ३० | ४००/- | १२,०००/- |
| ११ | व्ही.आय.पी करीता व्यासपीठ टी पॉय पुरविणे. | --- | ०५ | ५००/- | २,५००/- |
| १२ | स्टॅन्डसह एल.ई.डी. स्क्रीन-१२' X १०' व्यवस्था करणे. | --- | ०६ | --- | १,४४,०००/- |
| | | | | **एकूण खर्च रक्कम रुपये:-** | **१२,३९,१००/-** |

सदर व्यवस्थेसाठी उपरोक्तप्रमाणे रक्कम रु.१२,३९,१००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**प्रस्ताव:** तरी उपरोक्त नमूद अपेक्षित खर्चास व सदरहु व्यवस्था साई आश्रम भक्तनिवास येथील पार्किंगमध्ये करणेसाठी व त्याप्रमाणे वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास येथील पार्किंगमध्ये सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र आयोजित करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **श्री साईबाबा संस्थानमध्ये सीसीटीव्ही कंट्रोल सेलमार्फत सीसीटीव्ही व security surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकरीता व ध्वनीक्षेपण विभागाकडील Sound & Audio System अद्यावत करणेकामी कंन्सलटंन्ट नेमणुक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५५ (घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ताचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) दि. १६/०८/२०१६ रोजीचा मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२२, निर्णय क्र. ५३१.

२) दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.१२, निर्णय क्र. ६२६.

**प्रास्ताविक-** श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीत होणा-या साईभक्तांच्या गर्दीस अनुसरुन सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन सद्यस्थितीत मंदिर परिसरात कार्यान्वित असलेली सीसीटीव्ही यंत्रणा अपग्रेड करणेकरीता तसेच द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम -१, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय इ. विभागांकरीता सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करणेकामी नव्याने निवीदा प्रक्रीया करणेकरीता consultant नेमणुक करणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दि.२०/०६/२०१६ अन्वये आदेश दिलेले आहेत. सदर आदेशास अनुसरुन, consultant नेमणुक करणेकामी दि. १६/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. २२ निर्णय क्र.५३१ नुसार प्रस्ताव सादर करण्यात येवुन, त्यावर "प्रस्तावातील "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे सध्याची मंदिर परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणेचे Up-gradation व श्री साईबाबा संस्थानचे द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम-१, साईधर्मशाळा, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा रुग्णालय, श्री साईनाथ रुग्णालय व संस्थानचे सर्व शैक्षणिक संकुल परिसरात सीसीटीव्ही व security surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकामी अनुभवी consultant ची विहीत पद्धतीने नेमणुक करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदरहु कन्सलटंन्टची नेमणुक झाल्यानंतर त्यांचेकडुन प्रस्तावातील "ब" मध्ये नमुद केलेली कामे करुन घेण्यात यावी" असे ठरले.

तसेच ध्वनीक्षेपण विभागाकडील साऊंड सिस्टीम यंत्रणा अद्यावत करणेकामी Sound & Audio System consultant ची नेमणुक करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे मान्यतेस्तव दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. १२, निर्णय क्र.६२६ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. यावर सविस्तर चर्चा होवुन, "उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. परंतु नेमणुक करणेत येणा-या सल्लागारास बिलाची ५०% रक्कम आगाऊ न देता त्यांचे काम पुर्ण झालेनंतर संपुर्ण रक्कम अदा करणेत यावी" असे ठरले.

परंतु, मा.अध्यक्ष महोदय यांनी, सीसीटीव्ही कंट्रोल सेलमार्फत सीसीटीव्ही व **S**ecurity Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकामी व ध्वनीक्षेपण विभागाकडील Sound & Audio System अद्यावत करणेकामी एकच Consultant ची नेमणुक करुन त्यांचेकडुन दोन्हीविभागाकडील तांत्रिक कामे करुन घेण्यात यावे, असे सुचविलेले आहे.

**मागणी-** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे, मा. अध्यक्ष महोदय यांनी सुचविलेप्रमाणे, सीसीटीव्ही कंट्रोल सेलमार्फत सीसीटीव्ही व **S**ecurity Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकामी व ध्वनीक्षेपण विभागाकडील Sound & Audio System अद्यावत करणेकामी एकच consultant ची नेमणुक करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** तांत्रिक व आर्थिक.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे, सीसीटीव्ही कंट्रोल सेलमार्फत सीसीटीव्ही व **S**ecurity Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकामी व ध्वनीक्षेपण विभागाकडील Sound & Audio System अद्यावत करणेकामी एकच consultant ची नेमणुक करणेकामी ई-निवीदा मागविणेस व सदर consultant नेमणुक करणेकामी येणारे खर्चाचे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, सीसीटीव्ही कंट्रोल सेलमार्फत सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणे तसेच ध्वनीक्षेपण विभागाकडील Sound & Audio System अद्यावत करणेकामी एकच Consultant ची नेमणुक करणेकामी विहीत पध्दतीने ई-निवीदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** **सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश- विदेशातील साई मंदीराचे अधिकारी/पदाधिकारी यांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे चर्चासत्राचे आयोजना बाबत.**

**प्रस्ताव-** श्री क्षेत्र शिर्डी चे आराध्य श्री साईबाबा यांचे महानिर्वाणास सन २०१८ मध्ये एक शतक पुर्ण होत आहे. त्यानिमित्त संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०१७-१८ हे वर्ष श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष आणि या शतक महोत्सवी वर्षातील श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ हा उत्सव शताब्दी महोत्सची पुण्यतिथी उत्सव म्हणून साजरा करण्याचे प्रयोजन आहे.

सन २०१७-१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे कार्यक्रम उपक्रम याबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी / पदाधिकारी यांच्या सुचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिराच्या व्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे कार्यक्रम/उपक्रम याबाबत व्यापक सविस्तर चर्चा करणेसाठी दि.०४ डिसेंबर २०१६ रोजी शिर्डी येथे चर्चासत्राचे आयोजन करणेत आले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भीय आदेशान्वये चर्चासत्रासाठी उपस्थित राहणारे मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष / उपाध्यक्ष / सदस्य तसेच संस्थान व्यवस्थापनाचे अधिकारी / पदाधिकारी यांचेसह देश-विदेशातील साई मंदिराचे प्रतिनिधी यांना ओळखपत्र व बॅचेस संस्थान विभागामार्फत उपलब्ध करुन द्यावयाचे आहे.

दि.३०/०९/२०१६ रोजी साईनिवास बैठक कक्ष येथे मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या पुण्यतिथी उत्सव २०१६ चे कामकाज आढावा बैठकीमध्ये चर्चासाठी येणा-या पदाधिकारी /प्रतिनिधींना चांगल्या दर्जाचे बॅचेस व ओळखपत्र पुरविणे बाबत सुचना दिलेल्या आहेत.

चर्चासत्रासाठी उपस्थित राहणारे मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/ उपाध्यक्ष/ सदस्य तसेच संस्थान व्यवस्थापनाचे अधिकारी/ पदाधिकारी यांचेसह देश-विदेशातील साई मंदिराचे प्रतिनिधी यांचे करीता बॅचेस व ओळखपत्र तयार करणेकामी बॅचेस व ओळखपत्रावर टाकावयाचा तपशील, पदाधिकारी /प्रतिनिधींचे संपुर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबर व फोटोची आवश्यकता भासणार आहे. सदरची माहिती मिळणेकरीता जनसंपर्क कार्यालयास पत्र देता येईल.

दि.०४/१०/२०१६ रोजी साईनिवास अतिथीगृह येथे मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी प्रशासकिय अधिकारी (निवासस्थाने) यांचे समवेत झालेल्या चर्चेमध्ये कार्यक्रमासाठी उपस्थित राहणारे मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/ उपाध्यक्ष/ सदस्य तसेच संस्थान व्यवस्थापनाचे अधिकारी व स्टेजवर उपस्थित राहणारे मान्यवर यांचेकरीताच बॅचेस व देश-विदेशातील साई मंदिराचे येणारे प्रतिनिधी/ पदाधिकारी यांचे करीता ओळखपत्र तयार करणेत यावे अशा सुचना आहेत.

त्याअनुषंगाने जनसंपर्क कार्यालयाने कळविलेल्या यादी व उपलब्ध फोटोनुसार बॅचेस/ ओळखपत्र तयार करणारे परिसरातील नामांकीत पुरवठादार यांचे कडून नमुने मागवून वरिष्ठांचे सुचनेनुसार बॅचेस/ ओळखपत्र तयार करुन घेता येतील. त्याकामी खालील प्रमाणे अंदाजे खर्च येणे अपेक्षीत आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **नग (अंदाजे)** | **प्रति नग दर (अंदाजे)** | **अपेक्षीत खर्च** |
|---|---|---|---|---|
| ०१ | बॅचेस | १०० | ८०/- | ८,०००/- |
| ०२ | ओळखपत्र | २५०० | ४०/- | १,००,०००/- |
| | | | **एकूण -** | **१,०८,०००/-** |

तरी उपरोक्त तपशीलनुसार बॅचेस व ओळखपत्र विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या एकूण रक्कम रुपये १.०८,०००/- (अक्षरी– एक लाख, आठ हजार रुपये मात्र) पर्यंतचे अपेक्षीत खर्चाचे मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत नर्सिंग कॉलेज सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५२** दिनांक १६.०८.२०१६ रोजीचे सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी वर्षानिमित्त संस्थानमार्फत साई शताब्दी वैद्यकिय महाविद्यालय सुरु करणेत यावे, असे सर्वानुमते ठरले होते. याकरीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे नवीन कॉलेज सुरु करणेचा प्रस्ताव दि.३० ऑक्टोबर २०१६ पुर्वी सादर करणे आवश्यक आहे व त्यासाठी प्रथमत: व्यवस्थापन समिती सभेमध्ये ठराव संमत करुन, आवश्यक ती कागदपत्रे तसेच राष्ट्रीयकृत बँकेचे हमीपत्र सादर करावे लागणार आहे, अशी चर्चा झाली.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत साई समाधी शताब्दी वर्षामध्ये नर्सिंग कॉलेज सुरु करणेसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस व याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत एमबीबीएस मेडिकल कॉलेज सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५३** दिनांक १६.०८.२०१६ रोजीचे सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी वर्षानिमित्त संस्थानमार्फत साई शताब्दी वैद्यकिय महाविद्यालय सुरु करणेत यावे, असे सर्वानुमते ठरले होते. याकरीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे नवीन कॉलेज सुरु करणेचा प्रस्ताव दि.३० ऑक्टोबर २०१६ पुर्वी सादर करणे आवश्यक आहे व त्यासाठी प्रथमत: व्यवस्थापन समिती सभेमध्ये ठराव संमत करुन, आवश्यक ती कागदपत्रे तसेच राष्ट्रीयकृत बँकेचे हमीपत्र सादर करावे लागणार आहे, अशी चर्चा झाली.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत साई समाधी शताब्दी वर्षामध्ये एमबीबीएस मेडिकल कॉलेज सुरु करणेसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस व याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२ मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत**

**निर्णय क्र.७५४ मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यातआल्या.**

(०१) संस्थानमधील सर्व विभागांची खरेदी प्रक्रिया राबविणेसाठी खरेदी/ खर्चाचे अंदाजित मुल्य ठरविणे, नवीन खरेदी/ खर्चाच्या प्रस्तावांची आवश्यकता तपासणे या संदर्भातील कार्यवाही करणेसाठी मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले यांचे अध्यक्षतेखाली मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे व मा.श्री.सचिन भागवत तांबे या सदस्यांची खरेदी उपसमिती गठीत करणेत आली.

महत्वाचे आर्थिक विषय, नवीन खरेदी, नवीन खर्चविषयक प्रस्ताव या संबंधातील विविध विभागांचे प्रस्तावावर संबंधीत विभागप्रमुखांनी मुख्यलेखाधिकारी यांचे एक्स्पर्ट ओपीनीयन घ्यावे व त्यानंतरच वरीष्ठांच्या मार्गदर्शनाने खरेदी उपसमिती सभेसमोर सादर करावेत.

तसेच संरक्षण विभागाच्या समस्या सोडविणेसाठी समिती सदस्य मा.श्री.सचिन भागवत तांबे यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे, मंदिर विभागाच्या समस्यांसाठी समिती सदस्य मा.श्री.सचिन भागवत तांबे व मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

(०२) श्रींचे उत्सवादरम्यान मुंबई ते शिर्डी अशा मोठया प्रमाणात पदयात्री साईभक्त श्रींच्या पालख्या घेऊन येत असतात. त्यांच्या निवासव्यवस्थेसाठी मुंबईपासून शिर्डी पर्यंत संस्थानमार्फत प्रत्येक ३० किलोमीटर अंतरावर पालखी थांबे बनविणेत यावेत. पालखी थांब्याच्या ठिकाणी पदयात्रींसाठी निवारा, बायो-टॉयलेट व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे, याकामी देणगी स्वरुपात जमीनी/ जागा मिळणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

(०३) सभेच्या सुरुवातीस झालेल्या चर्चेप्रमाणे साईभक्त हा केंद्रस्थानी माणनेत येऊन, त्यासाठी संस्थानतर्फे साईभक्तांना आणखी सुविधा देण्यात याव्यात याबाबत चर्चा करणेत आली व चर्चेअंती पुण्यतिथीच्या मुहूर्तावर यापुढे दर्शन रांगेमधील सर्व भक्तांचे श्रींचा गंध लावून स्वागत करणेत यावे व सर्वसामान्य साईभक्तांसाठी सशुल्क व्ही.आय.पी. दर्शन पास विनाशिफारस सुरु करणेत यावे. एक वर्षापेक्षा कमी वयाच्या मुल असलेल्या माता व त्यांचे कुटुंबीय तसेच जेष्ठ नागरीक व त्यांचेबरोबर एक व्यक्ती यांना एक वेळा विनापास व्ही.आय.पी. गेटने दर्शनासाठी सोडण्यात यावे.

दर्शन रांगेमधील साईभक्तांना आर.ओ. वॉटर कुलरचे पाणी, चहा, कॉफी, दुध व बिस्कीट विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

संस्थानमार्फत साईभक्तांना विक्री करणेत असलेली सर्व संस्थान प्रकाशने छपाई किमतीच्या २०% सवलतीच्या दराने साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात यावीत, असे एकमताने ठरविले, याची कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी, अशा सुचना दिल्या.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, कॅन्टीन, प्रकाशने विभाग)

---

(०४) संस्थानमार्फत विक्री करणेत असलेल्या लाडू प्रसादाचा विशिष्ट वास येतो, अशा तक्रारी येत आहेत. याकरीता लाडू प्रसाद बनविणेसाठी वापरण्यात येणारे गावरान तुप कढवून घेण्यात यावे, त्यामुळे लाडू प्रसादाचा वास येणार नाही व तो प्रसाद जास्त दिवस चांगला राहील. तसेच लाडू प्रसाद बनविणेसाठी गावरान तूपाऐवजी रिफाईंड ऑईल वापरणे योग्य होईल का, याबाबत फुड एक्स्पर्टचा अभिप्राय घेण्यात येऊन, तसा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

(०५) श्री साईबाबा संस्थानसाठी ज्या काही मोठया खर्चाच्या वस्तु/ साहित्याची आवश्यकता असेल, अशा वस्तु/ साहित्य देणगी स्वरुपात मिळणेसाठी संस्थान संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, साईभक्तांना आवाहन करणेत यावे. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी)

---

(०६) संस्थानमधील सर्व स्थायी/ अस्थायी कर्मचाऱ्यांनी साईभक्तांबरोबर सौजन्याने वागावे यासाठी त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक संपादित करुन, दररोज याबाबतच्या सुचना मेसेज स्वरुपात मराठी/ इंग्रजी भाषेमध्ये पाठविणेत याव्यात.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

(०७) संस्थान रुग्णालयांसाठी संगणकीय प्रणाली देणगी स्वरुपात मिळणार असून, सदरहू संगणकीय प्रणाली कशी असावी, हे निश्चित करणेसाठी रुग्णालयामधील अधिकाऱ्यांनी रुबी हॉल क्लिनीक, पुणे या रुग्णालयांमध्ये कार्यान्वीत असलेल्या संगणकीय प्रणालीची पाहणी करावी. तसेच समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी हे नागपूर येथील २ दिवसीय हॉस्पिटल मॅनेजमेंट सेमीनॉरसाठी उपस्थित रहाणार आहेत, या सेमीनॉरसाठी डॉ.संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी तसेच डॉ.शिंदे, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना संस्थानमार्फत पाठविणेत यावे.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र.६८८ ते ७५४ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (बाजीराव शिंदे) | (सुरेश हावरे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**